**गोपनीय**

**प्रति,**

**मा.पोलीस अधिक्षक,सांगली.**

**क्रमांक** : जिवीशा /वापोप्रअ (एपीएआर)/ १६१ /२०१६ दिनांक १५ .०३.२०१६

**विषय** : वार्षीक पोलीस प्रशासन अहवाल – २०१५

------oo----

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सादर करण्यात येते की,सन २०१५ मध्ये सांगली जिल्हयातील पक्ष संघटना कार्यकत्याकडुन झालेल्या आंदोलनात्मक हालचाली बाबतची दि १.१.२०१५ ते ३१.१२.२०१५ अखेर या कालावधीची माहीती वार्षीक प्रशासन अहवाल -२०१५ मध्ये समाविष्ठ करण्यासाठी या सोबत सादर करण्यात आलेली आहे.( पान नं.१ ते १४६ )

**मा सविनय सादर**

**पोलीस निरीक्षक**
**जिल्हा विशेष शाखा,सांगली**

सांगली जिल्हयातील पक्ष / संघटना कार्यकत्याकडुन सन-२०१५ मध्ये झालेल्या आंदोलनात्मक हालचाली बाबतची ( दि १.१.२०१५ ते ३१.१२.२०१५ अखेर या कालावधीची ) माहीती


| अ.नं. | पक्ष/संघटनांचे नांव | पान नंबर |
|---|---|---|
| १ | कॉग्रेस आय | १ ते ६ |
| २ | राष्ट्रवादी कॉगेस | ७ ते १२ |
| ३ | भारतीय जनता पार्टी | १३ जे १५ |
| ४ | शिवसेना | १६ जे २० |
| ५ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | २१,२२ |
| ६ | बहुजन मुक्मी पार्टी / भारतीय कम्युनिस्ट पार्टी / शेतकरी कामगार पक्ष / बहुजन समाज पक्ष | २३,२४ |
| ७ | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया | २५ ते ३० |
| ८ | डेमोक्रॉटी पार्टी ऑफ इंडीया / राष्ट्रीय समाज पक्ष / मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी / राष्ट्रीय समता पक्ष | ३१ |
| ९ | जनता दल सेक्युलर | ३२ |
| १० | सर्व कामगार संघटना | ३३ ते ४६ |
| ११ | सर्व शेतकरी संघटना | ४७ ते ५४ |
| १२ | हिंदुत्ववादी हालचाल | ५५ ते ६० |
| १३ | मुस्लीम हालचाल | ६१ ते ६४ |
| १४ | सर्व पक्षीय आंदोलन (हालचाल) | ६५ ते ८२ |
| १५ | इतर संघटना आंदोलन (हालचाल) | ८३ ते १४६ |

## राजकीय पक्षांच्या सांगली जिल्हयातील हालचाली

१) कॉग्रेस आय :-

| अनं | पक्ष/ संघटना | नेतृत्व | ठिकाण | दिनांक व वेळ | घटनेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १. | कॉंग्रेस आय | श्री जितेंद्र पाटील रा बोरगांव माजी जि. प. सदस्य | बहे नाका इस्लामपुर ते तहसिलदार कार्यालया पर्यंत | २२.०१.२०१५ १२.०० वा. ते १४.१० | मोर्चा -डिझेल व पेट्रोल दर कमी करावेत या मागणी करीता निषेध मोर्चा काढुन शिष्टमंडळाने मागण्याचे निवेदन सौ.बीटकर-नायब तहसिलदार इस्लामपुर याना दिले आहे.-१००-१२५ |
| २. | कॉग्रेस आय | श्री मोहनराव कदम- अध्यक्ष सांगली जिल्हा | स्टेशन चौक गांधी पुतळयाजवळ | ३०.०१.२०१५ रोजी ०९.००ते १०.०० वा | सभा -- राष्ट्रपीता महात्मा गांधी यांचे पुण्यतिथी निमीत्त सभा पार पडली सदर सभेस २० ते२५ कार्यकर्ते उपस्थित होते |
| ३. | कॉंग्रेस आय | श्री बाळासो बाबुराव पाटील (साखळकर) रा. साखराळे अध्यक्ष वाळवा तालुका | महामार्ग क्रमांक ४ वाघवाडी फाटा` | ९.२.२०१५ १३.१५ वा. ते १३.२५ वा. | **रस्ता रोको प्रयत्न** :- भाजपा व शिवसेनेच्या केंद्रातील व राज्यातील सरकारने जाहीर केलेल्या लोकहित विरोधी धोरणाचा निषेध करण्यासाठी जमले असता बंदोबस्तावरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी श्री बाळासो बाबुराव पाटील (साखळकर) रा. साखराळे अध्यक्ष वाळवा तालुका कॉंग्रेस आय व श्री जितेंद्र पाटील - माजी जि. प. सदस्य यांचे सह १४ प्रमुख कार्यकर्त्यांना १३.२५ वा. मुपोकाक ६८ प्रमाणे ताब्यात घेवून १४.२५ वाजता मुपोकाक ६९ प्रमाणे मुक्त करण्यात आले आहे. जनसमुदाय -६०० ते ७०० कार्यकर्ते |
| ४. | कॉंग्रेस आय पक्ष | श्री मोहन कदम- सांगली जिल्हा कॉंग्रेस आय अध्यक्ष | कॉंग्रेस भवन सांगली | ५.२.२०१५ ११.३० वा. ते १४.०० वा | **बैठक :-** आमदार श्री रामहरी रुपन्नावर- निरीक्षक कॉंग्रेस आय यांचे प्रमुख उपस्थीतीत कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये सरकारने शेतक-याचा व जनतेचा विश्वासघात केला असून त्यासंदर्भात जनतेमध्ये जागृती करण्यासाठी रस्त्यावर उतरुन राज्यभरात आंदोलन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. सरकारने सत्त्येवर आल्या पासून लोकहितोपयोगी निर्णय घेतलेला नाही उलट आघाडी सरकारने लोकहितोपयोगी घेतलेले निर्णय रद्द करून जनतेला अडचणीत आणले आहे याचे निर्षधात दिनांक ९.२.२०१५ रोजी केंद्रातील व राज्यातील सरकारचे विरोधात वाघवाडी फाटा येथे राज्य महामार्ग क्रमांक ४ वर रस्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.<br>सदर बैठकीस श्री पृथ्वीराज पाटील- सांगली शहर अध्यक्ष कॉंग्रेस आय, श्री विश्वजीत कदम- महाराष्ट्र युवक कॉंग्रेस आय अध्यक्ष, श्री विवेक कांबळे- महापौर,सामिकु मनपा, श्रीमती नलिनी चंदले-निरीक्षक कॉंग्रेस आय, श्री प्रशांत पाटील- उप महापौर,सामिकु,मनपा, माजी आमदार श्री हाफीज धत्तुरे, श्री किशोर जामदार-गटनेते, यांचे सह ५० ते ६० कार्यकर्ते उपस्थीत होते. |
| ५. | कॉंग्रेस आय | श्री मुन्ना कुरणे-माजी नगरसेवक | आपटा पोलीस चौकी ते जिल्हाधिकारी कार्यालय | २०.२.२०१५ १३.०५ ते १४.४५ वा | **मोर्चा**:- रॉकेल कोटा वाढवुन मिळावा या व इतर मागण्यासाठी मोर्चा काढणेत आला मागण्याचे निवेदन श्री संजय शिंदे-अपर जिल्हाधिकारी सांगली याना दिले आहे. जनसमुदाय- १५० ते २०० |
| ६. | कॉंग्रेस आय | श्री सर्जेराव खाशेराव पवार- पलूस तालुका अध्यक्ष | कुंडल | २२.२.२०१५ ०८.०० वा. ते १०.०० वा. फेरी - ०९.४० वा. ते १०.२० | **गांवबंद व निषेध फेरी** :- कॉ गोविंद पानसरे यांचे हत्येच्या निषेधार्थ कुंडल गांव बंद पाळण्यात आले. कुंडल गावातील प्रमुख मार्गाने निषेध फेरी काढण्यात आली. सदर निषेध फेरी खारगे चौक कुंडल येथे आल्यानंतर सदर ठिकाणी निषेध सभा पार पडली. जनसमुदाय- ७० ते ७५ बंद प्रतिसाद- ८० टक्के |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | काँग्रेस आय | कार्यकर्ते | शिराळा | २४.२.२०१५ ०९.०० वा. ते १८.०० वा. | **गांवबंद :-** कॉ.गोविंद पानसरे यांचे हत्येच्या निषेधार्थ शिराळा गांव बंद पाळण्यात आले. बंदला अत्यावश्यक सेवा वगळता ७० टक्के प्रतिसाद मिळाला. |
| ८. | काँग्रेस आय पक्ष | श्री पृथ्वीराज पाटील - सांगली जिल्हा अध्यक्ष | **सांगली** | ५.३.२०१५ १४.०० वा. | **निवेदन** -- मुस्लीम समास दिलेले आरक्षण रद्द करण्यात आले आहे ते मिळावे या व इतर मागण्यांचे निवेदन मा. ना. श्री चंद्रकांत पाटील- सहकार मंत्री तथा पालकमंत्री सांगली जिल्हा यांना दिले. जनसमुदाय - १५ ते २० कार्यकर्ते |
| ९. | काँग्रेस आय पक्ष | श्री पृथ्वीराज पाटील- सांगली जिल्हा अध्यक्ष | **सांगली** | ५.३.२०१५ १५.०० वा.ते १४.३० वा | **होळी** - शासनाने मुस्लीमांना दिलेले आरक्षण रद्द केले आहे याचे निषेधार्थ मुस्लीमांचे आरक्षण रद्द करणा-या आदेशाच्या प्रतिकात्मक प्रतीची होळी केली. जनसमुदाय - ३५ ते ४० |
| १०. | काँग्रेस आय पक्ष | श्री व्यंकटराव पवार – काँग्रेस आय कार्यकता रा. तडसर | मायाक्का मंदीर कडेगांव ते तडसील कार्यालय कडेगांव असा | ६.४.२०१५ ११.३० वा. ते ११.५० वा. या | मोर्चा:- टेंभू योजनेचे पाणी एप्रिल, मे, व जून या महीन्यामध्ये तडसर तलावामध्ये सोडावे या व इतर मागण्याकरीता मोर्चा काढण्यात आला. मोर्चामध्ये १०० ते १५० जनसमुदाय सहभागी झाला होता. मोर्चा तहसील कार्यालय कडेगांव येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री निकम- तहसीलदार कडेगांव यांना देण्यात आले. |
| ११. | काँग्रेस आय | श्री महादेव (नाना) पाटील | तासगांव | ०२.०५.२०१५ ०८.०० वा.ते १७.०० वा. | **गांव बंद- मोटार सायकल रॅली-** आरफळ योजनेचे पाणी तात्काळ सुरु करावे, म्हैशाळ योजनेचे पाणी तासगांव तालुक्यास मिळावे या व इतर मागण्यासाठी तासगांव गांव बंद पाळण्यात आले. बंदला ६० ते ७० टक्के प्रतिसाद मिळाला.<br>दरम्यान मुदतीत १०.३५ वा. ते ११.२५ वा. या वेळेत श्री महादेव (नाना) पाटील यांचे नेतृत्वाखाली तासगांव शहरातून मोटार सायकल रॅली काढण्यात आली. मोटार सायकल रॅली मध्ये ४० ते ४५ मोटार सायकलसह ८० ते ९० जनसमुदाय सहभागी झाला होता. |
| १२. | शिराळा विधानसभा युवक काँग्रेसच्या वतीने | श्री. प्रजित यादव- अध्यक्ष, शिराळा विधानसभा युवक काँग्रेस | **तहसिल कार्यालय शिराळा** | ०८.०६.२०१५ १२.४५ वा | **निवेदन :-** संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, वृध्दपकाळ योजना या व इतर शासकिय योजनांचे लाभार्थींचे प्रस्ताव गेले ९ महिन्यापासून प्रलंबित आहे. सदर प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणतीही कार्यवाही होत नाही. सदरचे प्रलंबित प्रस्ताव तात्काळ मंजूर करण्याबाबत शासनाने निर्णय घ्यावा. तसेच शासनाने नोकरभरती बंद केल्याचा निर्णय रद्द करावा. तसेच शिराळा येथील नागपंचमीच्या सणास न्यायलयीन बंदी बाबत विचार करुन सदरचा सण पूर्वरत सूरु करणेबाबत केंद्रिय मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांनी विधानसभा निवडणूकीच्यावेळी शिराळयाच्या जनतेला आश्वासन देवून केंद्रशासन या प्रश्नावर लक्ष देईल असे सांगीतले होते परंतु गेली ८ महिन्यापासून नागपंचमी बाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. तरी सदरबाबत शासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा अन्यथा काँग्रेसच्या वतीने निर्णय होईपर्यंत उपोषण करणार असलेबाबतचे निवेदन तहसिलदार शिराळा श्रीमती विजया पाटील यांना देण्यात आले. सदर निवेदन देतेवळी श्री. हणमंत पाटील- अध्यक्ष, शिराळा तालुका काँग्रेस व ८ ते ९ कार्यकर्ते उपस्थित होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३. | काँग्रेस | श्री. आप्पासो रामराव शिंदे- कवठेमहंकाळ तालुकाध्यक्ष काँग्रेस(आय) | करोली (टी) गावी ग्रामपंचायत जवळील मैदानात | दि. ०९.०७.२०१५ रोजी १७.४५ वा ते २०.०० वा | शेतकरी मेळावा :- शेतकरी मेळावा घेण्यात आला. सदर मेळाव्यास मा. आमदार श्री. पंतगराव कदम- माजी मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई, श्री. प्रतिक पाटील- माजी मंत्री भारत सरकार, श्री. पृथ्वीराज पाटील- सांगली शहर अध्यक्ष काँग्रेस(आय), श्री.माणिकराव भोसले- माजी जि.प. सदस्य ,सौ. तानुबाई पाटील- सांगली जिल्हा महिला अध्यक्ष काँग्रेस(आय), श्री. अविराज शिंदे रा. मळणगांव, श्री बाळासाहेब गुरव रा. कवठेमहंकाळ श्री. नामदेवराव मोहिते इ. मान्यवर उपस्थित होते. वि.का.स. सोसायटी करोली(टी) चे इतर सदस्य व ५० ते ६० कार्यकर्त्यांनी काँग्रेस आय पक्षात प्रवेश केला. सदर शेतकरी मेळाव्यास ८००-८५० इतका जनसमुदाय उपस्थित होता |
| १४. | सांगली जिल्हा काँग्रेस कमीटी व सांगली शहर काँग्रेस कमीटी | श्री. पृथ्वीराज पाटील- - सांगली शहर अध्यक्ष काँग्रेस(आय) | काँग्रेस कमीटी भवन ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ०९.०७.२०१५ रोजी १३.०० वा ते १५.१५ वा | मोर्चाः- महाराष्ट्रातील शेतकरी पुर्णपणे कर्जमुक्त झाला पाहिजे, शासनाने शेतकऱ्यांची कर्जे माफ करावी या व इतर मागण्यांसाठी असा मोर्चा काढला. सदर मोर्चामध्ये मा.आमदार श्री. पंतगराव कदम- माजी वन मंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई, श्री. प्रतिक पाटील- माजी केंद्रीय कोळसा मंत्री भारत सरकार उपस्थित होते. सदर मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाचे पटागंणात आलेनंतर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. त्यानंतर शिष्टमंडळाने श्री. शेखर गायकवाड- जिल्हाधिकारी यांची भेट घेतली मागण्यांचे निवेदन दिले. |
| १५. | काँग्रेस आय | श्री. पृथ्वीराज पाटील- जिल्हाध्यक्ष, काँग्रेस आय कमीटी | स्टेशन चौक सांगली | २५.०७.२०१५ रोजी १६.०० वा ते १६.३० वा या वेळेत | मूक धरणे आंदोलन केंद्रिय कृषी मंत्री ना.श्री. राधामोहन सिंग यांनी शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्येबाबत केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ मूक निदर्शने केली. जनसमूदाय- ३५ ते ४० . |
| १६. | काँग्रेस आय | सौ मालन मोहीते – कडेगांव तालुका अध्यक्ष | कॉग्रेस भवन कडेगांव ते तहसील कार्यालय कडेगांव | ०६.०८.२०१५ रोजी १३.१० वा. ते १३.४० वा. | मोर्चा - संसदेमध्ये कॉग्रेस पक्षाचे खासदारांचे निलंबन केलेचे निषेधार्थ मोर्चा काढला मोर्चा तहसील कार्यालय कडेगांव येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री हेमंत निकम तहसीलदार यांना देण्यात आले<br>जनसमुदाय : १००-१२५ |
| १७. | काँग्रेस आय | श्री महेंद्र लाड – रा. कुंडल | जुने एस टी स्टँड पसूस ते तहसील कार्यालय पलूस | ०६.०८.२०१५ रोजी १०.३० वा. ते ११.१५ वा. | मोर्चा - संसदेमध्ये कॉग्रेस पक्षाचे खासदारांचे निलंबन केलेचे निषेधार्थ ा मोर्चा काढला मोर्चा तहसील कार्यालय पलूस येथे आल्यानंतर मागण्याचे तहसीलदार पलूस यांना देण्यात आले. जनसमुदाय : ५०-५५ |
| १८. | काँग्रेस आय | श्री महादेव नाना पाटील | भिलवडी नाका ते तहसील कार्यालय तासगाव | २०.०८.२०१५ रोजी १२.१५ ते १४.२० | मोर्चा - शासनाने विविध पाणी योजनांचे पाणी चालु करावे व पुर्वीप्रमाणे पुन्हा बैलगाडी शर्यती सुरु कराव्यात या व इतर मागण्याकरीता सुमारे ५० बैलगाडया व २५० ते ३०० जनसमुदायासह मोर्चा काढला. |
| १९. | काँग्रेस आय | श्री सत्यजीत शिवाजीराव देशमुख | मार्केट यार्ड पेट्रोल पंपासमोर सांगली | २६.८.२०१५ रोजी १२.४५ वा. ते १३.०५ वा. | निदर्शने - केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारच्या हुकूमशाही माणसीकतेचा व दिशाभूल करण्याच्या तंत्राचा परदापाश करण्यासाठी निदर्शने करण्यात आली.<br>रस्ता रोको- त्यानंतर अचानकपणे सदर कार्यकर्त्यांनी १३.०५ वा. ते १३.१५ वा. यावेळेत सांगली ते मिरज जाणारा रस्ता अडवून रस्ता रोको आंदोलन केले त्यावेळी आंदोलनाचे ठिकाणी डॉ श्री पतंगराव कदम- आमदार काँग्रेस आय (माजी पालकमंत्री सांगली जिल्हा ) यांनी येवून कार्यकर्त्यांना मेळाव्याचे ठिकाणी जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे कार्यकर्ते वारणा मंगल कार्यालय मार्केट यार्ड सांगली येथे मेळाव्याचे ठिकाणी गेले.कॉग्रेस पक्षाचे कार्यकर्त्यांनी अचानकपणे रस्ता अडविलेबाबत विश्रामबाग पोलीस ठाणेस भा ा-५ गुरनं. १८६/२०१५ भादविस कलम ३४१, मुपो ा ३७ (१)(३)/१३५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २०. | काँग्रेस आय | डॉ श्री पतंगराव कदम- आमदार काँग्रेस आय (माजी पालकमंत्री सांगली जिल्हा) | वारणा मंगल कार्यालय, मार्केट यार्ड सांगली | २६.८.२०१५ रोजी १३.१५ वा. ते १५.०० वा. | मेळावा-काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. प्रमुख वक्त्यानी आपले भाषणात केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारच्या हुकूमशाही माणसीकतेचा व दिशाभूल करण्याच्या तंत्राचा निषेध केला. जनता व्यापारी शेतकरी कसे हवालदिल झाले आहेत याबाबत मार्गदर्शन करुन शासनाने दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी केली आहे.सदर मेळाव्यास डॉ श्री पतंगराव कदम- आमदार काँग्रेस आय (माजी पालकमंत्री सांगली जिल्हा ), श्री प्रतिक पाटील -माजी केंद्रीय कोळसा मंत्री काँग्रेस आय, श्री हाफीजभाई धत्तुरे -माजी आमदार काँग्रेस आय, श्री मोहनराव कदम- सांगली जिल्हा काँग्रेस आय अध्यक्ष, श्री सत्यजीत देशमुख - माजी जि.प.उपाध्यक्ष काँग्रेस आय, श्रीमती शैलजा पाटील, सौ मालन मोहीते- माजी जि.प.अध्यक्ष यांचे सह ३५० ते ४०० कार्यकर्ते हजर होते.मेळाव्यामध्ये श्री मुन्ना कुरणे यांनी पुन्हा काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केले बाबत श्री पतंगराव कदम यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. |
| २१. | काँग्रेस आय | श्री बाबासाहेब मुळीक- अध्यक्ष काँग्रेस आय खानापूर तालुका | भिवघाट चौक | ३१.८.२०१५ रोजी १०.३० वा. ते ११.३० वा | सभा - खानापूर तालुक्यात दुष्काळ जाहिर करावा या व इतर मागण्याकरीता रस्ता रोको आंदोलन रद्द करून सभा घेण्यात आली. सदर सभेत श्री सदाशिवराव पाटील -माजी आमदार काँग्रेस आय, श्री सुहास शिंदे- जि.प.सदस्य, श्री नामदेव माळी, श्री किसन जानकर, या प्रमुख कार्यकर्त्यांसह १०० ते १५० जनसमुदाय हजर होता. त्यानंतर मागण्याचे निवेदन शिष्ठमंडळाने श्रीमती अंजली मरोड- तहसीलदार खानापूर विटा यांना दिले. |
| २२. | काँग्रेस आय | श्री सत्यजीत देशमुख- सरचिटणीस , महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आय | आंबामाता मंदीर, शिराळा | १२.९.२०१५ रोजी १२.१५ वा. ते १३.३० वा. | बैठक पदयात्रा - श्री सत्यजीत देशमुख- सरचिटणीस , महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आय यांचे नेतृत्वाखाली शिराळा व वाळवा तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थीती निर्माण झाल्याने सरकारने दुष्काळ जाहिर करावा या मागणी करीता बैठक पार पडली बैठकीस २०० ते २५० जनसमुदाय उपस्थीत होता. त्यानंतर आंबामाता मंदीर ते शिराळा तहसील कार्यालय अशी पदयात्रा काढण्यात आली. सदर पदयात्रा सोमवार पेठ- गुरूवार पेठ-एस टी स्टॅंड मार्गे तहसील कार्यालय शिराळा येथे आल्यानंतर १४.१० वाजता श्री पवार – तहसीलदार शिराळा यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले. पदयात्रेमध्ये १४०० ते १५०० जनसमुदाय सहभागी झाला होता. निवेदन दिल्यानंतर १४.१५ वा. ते १५.४५ वा. या वेळेत तहसील कार्यालय शिराळा समोर सभा पार पडली. सदर सभेत डॉ. श्री. विश्वजीत कदम- अध्यक्ष महाराष्ट्र पदेश युवक काँग्रेस आय, श्री हिम्मतसिंग - मुख्य सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आय, श्री सत्यजीत देशमुख - सरचिटणीस , महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आय, श्री राहुल आवाडे ,श्री जयराज पाटील, श्री प्रजितजी यादव वगैरेंची भाषणे झाली. भाषणामध्ये दुष्काळी परिस्थीती मुळे शेतक-यांची सर्व पिके वाया गेली आहेत. त्याच बरोबर पशुधन धोक्यात आले आहे त्यामुळे शेतक-यांना कर्ज माफी करावी ,दुष्काळ जाहीर करावा वगैरे मुद्दे मांडण्यात आले. सदर सभेस १४०० ते १५०० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| २३. | काँग्रेस आय | श्री पतंगराव कदम - माजी मंत्री काँग्रेस आय | मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविदयालय कडेगांव | १४.९.२०१५ रोजी १५.०० वा.ते १६.४५ वा. | आदर्श माता पुरस्कार सोहळा -मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविदयालय कडेगांव येथे श्री पतंगराव कदम - माजी मंत्री काँग्रेस आय यांचे आयोजनाखाली आदर्श माता पुरस्कार सोहळा कार्यक्रमा पार पडला. सदर पुरस्कार सोहळयास मा. ना. श्री चंद्रकांत पाटील- सहकारी मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई तथा पालकमंत्री सांगली जिल्हा यांनी हजर राहून आदर्श मातांना पुरस्कार प्रदान केला. आदर्श माता पुरस्कार कार्यक्रमास श्री पंतगराव कदम - माजी मंत्री , श्री मोहनराव कदम, श्री विजय खांडेकर- एबीपी माझाचे प्रमुख यांचे सह १० ते १५ हजार जनसमुदाय हजर होता |
| २४. | काँग्रेस आय | श्री वसंतराव गायकवाड- आटपाडी तालुका अध्यक्ष | साठे चौक आटपाडी ते तहसील कार्यालय आटपाडी | ०६.१०.२०१५ रोजी १२.०० ते १२.१५ | मोर्चा :- पेट्रोल व डिझेल दर वाढीच्या निषेधार्थ व पेट्रोल व डिझेल वर लावलेले कर तात्काळ कमी करावेत या मागणीसाठी १५ ते २० कार्यकर्त्यांनी मोर्चा तहसील कार्यालय आटपाडी येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री भांबुरे- अव्वल कारकुन यांना दिले.. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५. | कॉंग्रेस आय | सौ मालनताई मोहीते- कडेगांव तालुका अध्यक्ष | शिवाजी चौक कडेगांव ते तहसील कार्यालय कडेगांव | ०६.१०.२०१५ रोजी ११.४५ ते १२.१० | मोर्चा :- पेट्रोल व डिझेल दर वाढीच्या निषेधार्थ व पेट्रोल व डिझेल वर लावलेले कर तात्काळ कमी करावेत या मागणीसाठी १२५ ते १५० कार्यकर्त्यांनी मोर्चा तहसील कार्यालय कडेगांव येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री भिसे-निवासी नायब तहसीलदार यांना दिले.. |
| २६. | कॉंग्रेस आय | श्री पृथ्वीराज पाटील - सांगली शहर अध्यक्ष | मिरज शहर | ०६.१०.२०१५ रोजी १०.३० ते ११.३० | सायकल रॅली :- पेट्रोल व डिझेल दर वाढीच्या निषेधार्थ व पेट्रोल व डिझेल वर लावलेले कर तात्काळ कमी करावेत या मागणीसाठी ५० ते ६० कार्यकर्त्यांनी मिरज शहरातून सायकल रॅली काढली. सायकल रॅली तहसील कार्यालय मिरज येथे आल्यानंतर पेट्रोल व डिझेलवरील विक्रीकर रद्द करावा, म्हैशाळ योजनेतील शेतक-यांचा थकबाकी बोजा कमी करावा वगैरे मागण्याचे निवेदन श्री सावंत- नायब तहसीलदार यांना दिले. रॅली मध्ये श्री हाफीज धत्तुरे- माजी आमदार, श्री सिध्दार्थ जाधव, श्री राजेंद्र म्हेत्रे, श्री रफीक शेख, श्री आयुब निशानदार, किरण आवळे, वगैरे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. |
| २७. | कॉंग्रेस आय | श्री बाळासाहेब बाबुराव पाटील रा. साखराळे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छ. शिवाजी महाराज यांचे पुतळयासमोर इस्लांमपूर | ०६.१०.२०१५ रोजी ११.४५ ते १२.१५ | निदर्शने :- पेट्रोल व डिझेल दर वाढीच्या निषेधार्थ व पेट्रोल व डिझेल वर लावलेले कर तात्काळ कमी करावेत या मागणीसाठी ३० ते ३५ कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छ. शिवाजी महाराज यांचे पुतळयासमोर निदर्शने केली. त्यांनतर शिष्ठमंडळाने तहसील कार्यालय इस्लांमपूर येथे जावून मागण्याचे निवेदन डॉ शैलजा पाटील- नायब तहसीलदार यांना दिले. |
| २८. | कॉंग्रेस आय | पृथ्वीराज पाटील - सांगली शहर कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ६.१०.२०१५ रोजी १२.१५ वा. | निवेदन :- पेट्रोल व डिझेल दर वाढीच्या निषेधार्थ व पेट्रोल व डिझेल वर लावलेले कर तात्काळ कमी करावेत, म्हैशाळ योजनेतील शेतक-यांचा थकबाकी बोजा कमी करावा वगैरे मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |
| २९. | कॉंग्रेस आय | श्री ए.डी. पाटील- पलूस तालुका कॉंग्रेस आय अध्यक्ष | तहसील कार्यालय पलूस | ६.१०.२०१५ रोजी ११.०० वा.ते १३.०० वा. | निदर्शने :- पेट्रोल व डिझेलवरील विक्रीकर रद्द करावा, वगैरे मागण्यासाठी तहसील कार्यालय पलूस समोर निर्देशने केली. सदर वेळी श्री महेंद्र लाड, श्री खाशाबा दळवी, श्री विक्रम पाटील, श्री आनंदराव पाटील असे कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. |
| ३०. | कॉंग्रेस आय | श्री रविंद्र आण्णा देशमुख- अध्यक्ष खानापूर तालुका कॉंग्रेस आय | तहसीलदार कार्यालय विटा | ६.१०.२०१५ रोजी ११.३० | निवेदन :- पेट्रोल व डिझेलवरील विक्रीकर रद्द करावा वगैरे मागण्याचे निवेदन श्री पाटील- नायब तहसीलदार विटा यांना दिले. |
| ३१. | कॉंग्रेस आय | श्री सत्यजीत देशमुख - सरचिटणीस , महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी | तहसीलदार कार्यालय | २६.१०.२०१५ रोजी १४.४० | निवेदनः- ५० ते ६० कार्यकर्त्यांनी शिराळा व वाळवा तालुक्यातील पश्चिमेकडील गावांमध्ये या वर्षी सरासरी पेक्षा ५० टक्के कमी पाऊस झालेला आहे त्यामुळे पिके वाळून गेली आहेत,पिण्याच्या पाण्याचा व जनावराच्या चा-याचा प्रश्न निर्माण झाला आहे त्यामुळे शासनाने प्रत्यक्ष शेतक-याच्या बांधावर जावून वस्तूनिष्ठ पंचनामे करावेत, दोन्ही तालुक्यामध्ये दुष्काळ जाहीर करावा, सणाच्या तोंडावर शासनाने डाळीच्या किमंती वाढविल्यामुळे सर्वसामान्य जनतेला खरेदी करणे अशक्य झाले आहे तरी सरकारने स्वस्त धान्य दुकानातून सर्व प्रकारच्या शिधापत्रिकावर पुरेशा डाळी उपलब्ध करून दयाव्यात या व इतर मागण्याचे निवेदन दिले. |
| ३२. | कॉंग्रेस आय | सौ मालन मोहीते- कडेगांव तालुका अध्यक्ष कॉंग्रेस आय | -- | २७.१०.२०१५ रोजी ११.०० वा. | निवेदनः- ४ लोकांचे शिष्ठमंडळाने भाजप सरकार सत्तेवर आल्यापासून महागाई वाढत चालली आहे तरी सरकारने स्वस्त धान्य दुकानातून सर्व प्रकारच्या शिधापत्रिकावर पुरेशा डाळी उपलब्ध करून दयाव्यात या व इतर मागण्याचे निवेदन दिले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३३. | कॉंग्रेस आय | श्री आप्पासाहेब रामराव शिंदे - अध्यक्ष कवठे महंकाळ | कॉग्रेस भवन ते तहसील कार्यालय कवठे महंकाळ | २७.१०.२०१५ रोजी १४.०० वा. ते १४.५० वा | मोर्चा :- २५ ते ३० कार्यकर्त्यांनी डाळीचे दरवाढीचे निषेधार्थ कॉग्रेस भवन ते तहसील कार्यालय कवठे महंकाळ असा मोर्चा काढला. मोर्चा तहसील कार्यालय कवठे महंकाळ येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन सौ. रेडेकर – नायब तहसीलदार यांना दिले. |
| ३४. | कॉंग्रेस आय | श्री पृथ्वीराज पाटील - सांगली जिल्हा अध्यक्ष कॉंग्रेस कमिटी | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | २८.१०.२०१५ रोजी ११.४५ वा. ते १२.४५ वा | धरणे आंदोलन :- १०० ते १२५ कार्यकर्त्यांनी डाळीचे वाढलेले दर तात्काळ कमी करावेत, सर्व प्रकारच्या डाळी स्वस्त धान्य दुकानामधून माफक दरात दयाव्यात या व इतर मागण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री त्रिगुण कुलकर्णी निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |
| ३५. | कॉंग्रेस आय | श्री पृथ्वीराज पाटील | महात्मा गांधी यांचे स्टेशन चौकातील पुतळयाजवळ | १८.११.२०१५ १४.१५ | निषेध - : ४० ते ५० स्त्री पुरुष अशांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा मारेकरी नथुराम गोडसे याचा फाशी दिवस साजरा करणा-या संघटनांचा निषेध करण्यासाठी अचानकपणे कॉंग्रेस कमिटी कार्यालयाहून १४.१५ वाजता पायी चालत निघून महात्मा गांधी यांचे स्टेशन चौकातील पुतळयाजवळ येवून त्यांनी वरील घटनेचा निषेध केला. त्यावेळी त्यांनी १) मुंह मे गांधी, बगल मे नथू. २) नथुरामचा फाशी दिन साजरा करण्याविषय भाजपा गप्प का. ३) फॅसिष्ठवादी प्रवृत्ती गाढा अशी घोष वाक्ये लिहलेले बोर्ड आणलेले होते. सदर ठिकाणी ॲड. के.डी . शिंदे, श्री विक्रम कोळेकर, श्री पृथ्वीराज पाटील यांनी आपले भाषणामध्ये सध्याचे शासनाकडून डाळीचे दर कमी झालेले नसून शासन अच्छे दिनाचे खोटे आश्वासन जनतेला देत आहे असे सांगून निषेध नोंदविला.सदर वेळी उपस्थीत कार्यकर्त्यांनी शांतता पाळून अतिरेकी हल्ल्यामध्ये सिमेवर शहीद झालेले लेप्टनंन्ट कर्नल श्री संतोष महाडीक यांना श्रध्दांजली वाहीली. तसेच सदर निषेधाचे ठिकाणी नथुराम गोडसे यांचा प्रतिकात्मक पुतळा दहनासाठी आणण्यात आला होता. त्यास लागलीच पोलीसांनी ताब्यात घेतले आहे तो ताब्यात घेत असताना सदर पुतळयास कार्यकर्ते चप्पलाने मारण्याचा प्रयत्न करीत होते. सदर कार्यक्रम १४.५५ वा. समाप्त झालेला आहे. |
| ३६. | कॉंग्रेस आय | श्री सचिन चव्हाण | कॉंग्रेस कमिटी ते स्टेशन चौक | १९.१२.२०१५ रोजी १४.१५ ते १५.०५ | मोर्चा :- केंद्र व राज्य शासन यांच्या महागाई व इतर धोरणांच्या विरोधात मोर्चा काढला. मोर्चा स्टेशन चौक सांगली येथे आल्यांनतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले. प्रमुख वक्ते श्री मोहनराव कदम, श्री सत्यजीत कदम यांनी वाढती महागाई, कॉंग्रेसचे वरीष्ठ नेते कसे अडचणीत येतील या बाबत भाजपा सरकार प्रयत्न करीत आहे. सर्वानी एकजुटीने राहणे गरजेचे आहे याबाबत मार्गदर्शन केले. तसेच पटियाला न्यायालयाने नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी श्रीमती सोनिया गांधी व श्री राहूल गांधी यांना जामीन मंजूर केल्याने साखर वाटप करण्यात आले. जनसमुदाय १०० ते १५० स्त्री व पुरुष. |
| ३७. | कॉंग्रेस आय | पी एम पाटील रा बिळूर अध्यक्ष जत तालुका कॉग्रेस | मार्केटयार्ड जत ते तहसिल कार्यालय जत | २८/१२/२०१५ रोजी १२.३० ते १५.४५ | मोर्चा :- जत तालुका दुष्काळ जाहिर करुन संपुर्ण सवलती त्वरीत मिळाव्यात, जत तालुका विभाजन करावे या व इतर मागण्यांकरीता मार्केटयार्ड जत ते तहसिल कार्यालय जत असा मोर्चा काढला. मागण्यांचे निवेदन तहसिलदार जत यांना दिले. मोर्चात १०००/११०० जनसमुदाय उपस्थित होता. |

२) राष्ट्रवादी काँग्रेस :-

| अनं | पक्ष/ संघटना | नेतृत्व | ठिकाण | दिनांक व वेळ | घटनेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १. | राष्ट्रवादी | श्री अमर मोरे-राष्ट्रवादी कार्यकर्ता | ग्रामपंचायत दिघंची कार्यालया समोर | **२.१.२०१५ रोजी** ०९.३०-१७.३०. | **.उपोषण :-** दलीत वस्ती योजनेत धर्मराज रणदिवे रस्ता व कैलास रणदिवे रस्ता न करता रस्त्याचे बजेट काढुन सरपंच व ग्रामविकास अधिकारी दिघंची यांनी भ्रष्टाचार केलेचे निष्पन्न झाले आहे.तरी त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करावा या मागणी करीता **.उपोषण** सुरु केले होते १७.३० वा. श्री टी आर पाटील-विस्तार अधिकारी पंचायत समिती आटपाडी यांनी उपोषण कर्त्यांची भेट घेवुन मागणीच्या संदर्भात आटपाडी पोलीस ठाणेस भाग ५ गु.रं.नं.-०१./२०१५ भादंसिक-४०८,४२० वगेरे प्रमाणे गुन्हा दाखल केला असलेचे सांगीतलेने उपोषण स्थगित केले आहे. |
| २. | राष्ट्रवादी कॉग्रेस | श्री संजय बजाज - सांगली शहर अध्यक्ष | स्टेशन चौक सांगली | ३०.०१.२०१५ रोजी १०.०० वा ते ११.०० वा या वेळेत | मुक आंदोलन- २० ते २५ कार्यकत्याानी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची हत्या करणाऱ्या देशद्रोही नथुराम गोडसे यांचे निषेधार्त मुक आंदोलन केले व नंतर नथुराम गोडसे यांचे विरोधात घोषणा दिल्या. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पुतळयास हार घालुन आदोलन संपविले आहे. |
| ३. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री विजय बळवंत पाटील- अध्यक्ष शिराळा तालुका राष्ट्रवादी | तहसील कार्यालय शिराळा | ३.२.२०१५<br>१३.०० वा. | **निवेदन** :- युती सरकारने ७२ टक्के पर्यंत रॉकेल कोटा कपात केला आहे तो पुर्ववत करावा, केसरी रेशनकार्ड धारकांना धान्य योजना त्वरीत सुरु करावी या व इतर मागण्याचे निवेदन येथे एकत्र जमून श्री विजय पाटील – तहसीलदार शिराळा यांना दिले. जनसमुदाय- २० ते २५ कार्यकर्त्यांनी |
| ४. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री बी.के.पाटील अध्यक्ष वाळवा तालुका | तहसील कार्यालय इस्लांमपूर | ३.२.२०१५<br>१२.०० वा. | **निवेदन** :- युती सरकारने ७२ टक्के पर्यंत रॉकेल कोटा कपात केला आहे तो पुर्ववत करावा या व इतर मागण्याचे निवेदन एकत्र जमूनश्रीमती धनश्री शंकरदास भांबुरे – नायब तहसीलदार इस्लांमपूर यांना दिले.<br>जनसमुदाय :- १०० ते १२५ पुरुष व १५ महीला |
| ५. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री ताजुद्दीन तांबोळी-माजी युवक राष्ट्रवादी जिल्हा अध्यक्ष | उदयोग भवन सांगली | १०.२.२०१५ रोजी<br>१२.००. ते १२.४५ | **चर्चा** :- श्री भगवान वसंत पाटील रा. उपळावी ता. तासगांव यांनी तंत्र उदयोगासाठी कर्ज मिळणे करीता महाव्यवस्थापक, उदयोग भवन सांगली यांना अर्ज दिलेला होता परंतू त्यांचा उदयोग सुरु आहे असे कारण सांगून त्यांना कर्ज नाकारण्यात आलेले आहे. या करीता दिनांक १०.२.२०१५ रोजी ११.०० वाजे पर्यंत सदर प्रकरणी न्याय न मिळाल्यास श्री बी.जी.कांबळे, महाव्यवस्थापक, उदयोग भवन सांगली यांचे कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता परंतु त्यांनी सदरचे आंदोलन रद्द करुन श्री किशोर उनउने- माजी जिल्हा परिषद सदस्य यांचे समवेत शिष्ट मंडळाने श्री बी.जी.कांबळे, महाव्यवस्थापक, उदयोग भवन सांगली चर्चा केली चर्चेत श्री भिमराव पाटील उपळावी यांनी कोणताही प्रकारचा सदर ठिकाणी उदयोग चालु केला नसलेचे सांगीतले सदर बाबत फेर चौकशी करुन त्यांचे कर्ज मंजुर करण्याचे आश्वासन दिले. |
| ६. | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | श्री संजय बजाज - सांगली शहर अध्यक्ष | **सांगली** | ५.३.२०१५ १२.३० वा. | **निवेदन** -- अवकाळी पावसामुळे द्राक्षे, शाळू व डाळींब या पिकांचे नुकसान झाले आहे तरी शेतक-यांना नुकसान भरपाई मिळावी वगैरे मागण्यांचे निवेदन मा. ना. श्री चंद्रकांत पाटील-सहकार मंत्री तथा पालकमंत्री सांगली जिल्हा यांना दिले. जनसमुदाय १५ ते २० कार्यकर्ते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | राष्टवादी कॉग्रेस | श्रीमती सुमनताई पाटील | तासगांव | १४.३.२०१५<br><br>१०.०० ते ११.०० | **मेळावा** -- २८७-तासगांव कवठेमहाकाळ विधानसभा मतदार संघाचे पोट निवडणुकी निमित्त मेळावा मा.ना.श्री.अजित पवार माजी उप मुख्यमंत्री म.रा.मुंबई यांचे अध्यक्षतेखाली पार पडला सदर वेळी माजी मंत्री,प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते हजर होते.सदर निवडणुकीसाठी माजी गृहमंत्री कै.आर आर पाटील यांच्या पत्नी श्रीमती सुमनताई पाटील यांचे नावाची घोषणा करुन त्यांना विक्रमी मताधिक्यांनी निवडून आणण्याचे अहवान केले आहे. |
| ८. | राष्ट्रवादी कॉंग्रेस | श्री. स्वप्नील पाटील-जिल्हाध्यक्ष | शिवाजी चौक, तासगांव | ०५.०६.२०१५ ११.२५ वा ते ११.४० | **मूक निदर्शने** :- महाराष्ट्र शासनाने सरकारी नोकऱ्यांमधील नोकर भरतीवर बंदी आणलेचे निषेधार्थ मूक निदर्शने करण्यात आली. सदर वेळी २० ते २२ कार्यकर्ते उपस्थित होते. |
| ९. | राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला आघाडी | श्रीमती डॉ. छाया जाधव- अध्यक्ष, | स्टेशन चौक सांगली | २७.६.२०१५ १२.०५ वा ते १२.२० वा | **निदर्शने** :- महिला व बालकल्याण मंत्री पंकजा मुंडे यांनी महिला व बालकल्याण समितीमध्ये भ्रष्टाचार केलेच्या निषेधार्थ २० ते २५ महिला कार्यकर्त्यांनी सांगली शहर पोलीस ठाणे कडून परवानगी घेवून निदर्शने केली. |
| १०. | राष्ट्रवादी कॉंग्रेस | श्री. दिलीप पाटील नागरी सत्कार समिती,वाळवा | वाळवा गावातील प्रमुख रस्त्यावरुन | दिनांक ०३.०७.२०१५ रोजी १८.३० ते १९.०० वा. | सत्कार सोहळा :- दिलीप पाटील यांची सांगली जिल्हा मध्यवर्ती सह.बँक सांगलीचे अध्यक्षपदी निवड झालेबद्दल मिरवणुक काढली. मिरवणुकीमध्ये श्री.अजित पवार आमदार (माजी उपमुख्यमंत्री),श्री.जयंत पाटील आमदार (माजी ग्रामविकास मंत्री ) यांचेसह ३००० जनसमुदाय उपस्थित होता. मिरवणुक बाजार मैदान वाळवा येथे आलेनंतर १९.०० ते २१.३० या वेळेत दिलीप पाटील यांचे सत्काराचा कार्यक्रम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पार पडला. |
| ११. | वाळवा तालुका युवक राष्ट्रवादी कॉंग्रेसचे | अध्यक्ष श्री. संजय पाटील रा. इस्लामपूर | तहसिल कार्यालय वाळवा-इस्लामपूर | २५.०७.२०१५ रोजी १३.३० वा ते १४.०० वा या वेळेत | निदर्शने :- केंद्रीय कृषी मंत्री श्री. राधामोहन सिंग यांनी शेतकरी आत्महत्येबाबत केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ १५ ते २० कार्यकर्त्यांनीटाळ-मृदुगांच्या गजरात निषेध नोंदवून प्रमुख वक्त्यांची भाषणे होवून निवासी नायब तहसिलदार श्री. बिपीन लोकरे यांना निषेधाचे निवेदन देण्यात आले. |
| १२. | राष्ट्रवादी कॉंग्रेस | -- | तासगांव | दि. ०१.०९.२०१५ रोजी १४.१५ वा | गुन्हा दाखल कारवाई :- दि.०१.०८.२०१५ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती तासगांव संचालक निवडणूक मतदान झाले त्यावेळी यशवंत हायस्कूल पागा गल्ली तासगांव येथील मतदान केंद्रापैकी केंद्र क्रमांक ३ या ठिकाणी १४.१५ वा चे सुमारास राष्ट्रवादी कॉंग्रेस चे आमदार श्रीमती सुमनताई पाटील गटाचे श्री. दिनकर हिंदूराव पाटील रा. मांजर्डे हे एका खाजगी वाहनातून काही हमाल मतदार त्या ठिकाणी मतदानाकरीता घेवून आले असता भाजप खासदार श्री. संजयकाका पाटील गटाच्या काही लोकांनी त्यावर आक्षेप घेवून मारामारी व दगड फेकीची घटना घडली सदर बाबत तासगांव पोलीस ठाणेस भाग ५ गु.र.नं. १५७/२०१५ भादविसंक १४३,१४७,१४८,१४९,३३२,३५३,३३७,४२७,५०४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. |
| १३. | राष्ट्रवादी | श्री जयंत पाटील आमदार | वारणा मंगल कार्यालय मार्केट यार्ड सांगली | दि.२१.०८.२०१५ रोजी १२.४५ ते १५.३० | सभाः- जिल्यातील ग्रामीण व महापालिका क्षेत्रातील राष्ट्रवादी कार्यकर्त्यांची सभा पार पडली. प्रमुख वक्ते श्री सुनिल तटकरे-प्रदेशाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस, श्रीमती सुमनताई पाटील आमदार राष्ट्रवादी, श्री धनंजय मुंडे आमदार राष्ट्रवादी, श्री मानसिंग नाईक माजी आमदार राष्ट्रवादी, यांनी राष्ट्रवादी पक्ष उभारणी/बळकटी बाबत व राज्यातील पाण्याची भिषन टंचाई दुष्काळ परिस्थिती या बाबत मार्गदर्शन करून लवकरात लवकर आंदोलने करून शासनास जागे करू. या विषयावर मार्गदर्शन केले आहे.सदर सभेस ४००-५०० कार्यकर्ते हजर होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४. | राष्ट्रवादी काँग्रेस | सौ. वंदना सुतार- सरपंच ग्रामपंचायत सावळज ता. तासगांव | सावळज | दि.२१.०८.२०१५ रोजी ०६.०० ते १८.०० वा. | गावबंद :- सर्व पक्षीयांचे वतीने पावसाच्या अल्पप्रमाणामुळे खरीप हंगाम धोक्यात आला असून पाणी टंचाईस समोरे जावे लागत आहे. शासनाने टंचाई जाहीर करुन पाण्याचा तसेच जनावरांच्या चा-याचा प्रश्न मिटवावा या मागणीसाठी सावळज गांव अत्यावश्यक सेवा वगळता बंद पाळण्यात आला. बंदला ९० टक्के प्रतिसाद मिळाला. |
| १५. | राष्ट्रवादी काँग्रेस | --- | सांगली, मिरज | दि.२३.०८.२०१५ | गुन्हा दाखल कारवाई :- राष्ट्रवादी प ाच्या शहर विभा ातील पदाधि ा-यांच्या निवडी पार पडल्या त्या अनुषं ाने विश्रामबा ा, महात्मा ांधी चौ व मिरज शहर पोलीस ठा ो हद्दीमध्ये मा.जिल्हाधि ारी सां ाली यांच्या बंदी आदेशाचा भं रुन ाढ यात आले विनापरवाना रॅली बाबत विश्रामबा ा पोलीस ठाणेस भा ा-६ गुरनं. ४४१/२०१५ मुपो ा ३७ (१)(३)/१३५ महात्मा ांधी चौ पोलीस ठाणेस भा ा-६ गुरनं. १५/२०१५ मुपो ा ३७ (१)(३)/१३५ मोटार वाहन ायदा लम १९९/१७७ व मिरज शहर पोलीस ठाणेस भा ा-६ गुरनं. १९६/२०१५ मुपो ा ३७ (१)(३)/१३५, मोटार वाहन ायदा लम १९९/१७७ प्रमा ो ुन्हे दा ाल आहेत. |
| १६. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री हणमंत आप्पा देसाई – अध्यक्ष तालुका तासगांव | तासगांव तालुका | दिनांक २५.८.२०१५ रोजी ०८.०० ते १६.०० वा. | तासगांव तालुका बंद :- तासगांव तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा. तालुक्यातील विविध पाणी योजना चालू कराव्यात, तासगांव तालुक्यामध्ये चारा डेपो, चारा छावण्या सुरु कराव्यात, शेतक-यांची कर्ज माफी करावी, विज बील माफ करावे या व इतर मागण्यासाठी तासगांव तालुका बंद पाळण्यात आला. बंदला अत्यावश्यक सेवा वगळता ६० ते ७० टक्के प्रतिसाद मिळाला. |
| १७. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री चन्नाप्पा रामचंद्र होर्तीकर राष्ट्रवादी कार्यकर्ता | संख | ३१.८.२०१५ रोजी १७.३० वा. ते १८.४५ वा. | सभा- दुष्काळी परिस्थीती बाबत सभा पार पाडली. सदर सभेमध्ये श्री जयंतराव पाटील- आमदार राष्ट्रवादी कॉंग्रेस , सौ रेश्माआक्का होर्तीकर- जि.प.अध्यक्ष यांनी मार्गदर्शन केले. सदर सभेस ३०० ते ३५० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| १८. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री चन्नाप्पा रामचंद्र होर्तीकर राष्ट्रवादी कार्यकर्ता | बाजार कट्टा उमदी | ३१.८.२०१५ रोजी १५.०० वा. ते १५.४५ वा. | सभा- दुष्काळी परिस्थीती बाबत सभा पार पाडली. सदर सभेमध्ये श्री जयंतराव पाटील- आमदार राष्ट्रवादी कॉंग्रेस , सौ रेश्माआक्का होर्तीकर- जि.प.अध्यक्ष यांनी मार्गदर्शन केले. सदर सभेस ४५० ते ५०० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| १९. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री जयंतराव पाटील - आमदार (माजी मंत्री) | राष्ट्रवादी कार्यालय ते मनपा कार्यालय | १५.९.२०१५ | मोर्चा - सांगली मिरज आणि कुपवाड महापालीकेने पाणी खाजगीकरण रद्द करावे या व इतर मागण्यासाठी राष्ट्रवादी कार्यालय ते मनपा कार्यालय असा मोर्चा काढला. मोर्चा मनपा कार्यालय सांगली येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले. सभेमध्ये प्रमुख वक्त्यांनी मागण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर मागण्याचे निवेदन श्री अजिज कारचे - आयुक्त, सामिकु, मनपा यांना देण्यात आले. मोर्चामध्ये २००० ते २५०० जनसमुदाय सहभागी झाला होता. |
| २०. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री विजय बळवंतराव नलवडे - शिराळा तालुका अध्यक्ष | अंबामाता मदीर शिराळा ते तहसील कायालय शिराळा | १.१०.२०१५ रोजी ११.४० वा. ते १३.५० वा. . | मोर्चा :- शेतक-यांच्या विविध प्रश्न व मागण्याकरीता मोर्चा १२.४५ वा. तहसील कार्यालय शिराळा येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री विजय पाटील- तहसीलदार शिराळा यांना देण्यात आले. त्यानंतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले. सभेमध्ये श्री मानसिंगराव नाईक- माजी आमदार, श्री विजय बळवंतराव नलवडे, श्री धनंजय माने यांची भाषणे झाली. सदर भाषणामध्ये शिराळा तालुक्यामध्ये अत्यंत कमी प्रमाणात पाऊस झाल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, शिराळा तालुक्यामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने पीकांचे पंचनामे करुन शिराळा तालुक्यामध्ये दुष्काळ जाहीर करावा वगैरे मार्गदर्शन केले. मोर्चामध्ये श्री मानसिंगराव नाईक- माजी आमदार, श्री विजय बळवंत नलवडे, श्री धनंजय माने, श्री गजानन सोनटक्के- सरपंच शिराळा, ॲड. भगतसिंग नाईक या प्रमुखासह १५०० ते १६०० जनसमुदाय उपस्थीत होता. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री हारुण खतीब | खतीब हॉल मिरज ते महानगर पालिका कार्यालय मिरज | १२.१०.२०१५ रोजी ११.३० वा. ते १३.४० वा | घागरी मोर्चा - सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगर पालिका हद्दीतील वॉर्ड क्रमांक २५ मधील पाण्याच्या समस्येच्या निषेधार्थ खतीब हॉल मिरज ते महानगर पालिका कार्यालय मिरज असा घागरी मोर्चा काढण्यात आला. मोर्चा महानगरपालिका कार्यालय मिरज येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री सुनिल नाईक- उपायुक्त, मनपा यांना देण्यात आले आहे. मोर्चामध्ये श्री संजय बजाज- सांगली जिल्हा अध्यक्ष, श्री दिग्वीजय पाटील, श्री मैनुद्दीन बागवान, अल्लु काझी, श्री अभिजीत हारगे, या प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी यांचेसह २०० ते २५० जनसमुदाय उपस्थीत होता |
| २२. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री पी आर पाटील – चेअरमन राजाराम बापू सहकारी साखर कारखाना | बागणी गांवी हनुमान मंदीरामध्ये | २६.१०.२०१५ रोजी १७.०० वा. ते १८.०० | बैठक :- भाजपा सरकार शेतक-यांच्या प्रश्नाबाबत व मागण्यात दिलेली आश्वासने पुर्ण करण्यास अपयशी ठरले असल्याने निषेधार्थ दिनांक ३०.१०.२०१५ रोजी तहसील कार्यालय इस्लामपूर येथे मोर्चा आयोजीत करण्यात आला असून सदर मोर्चास जास्तीत जास्त संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीस श्री पी आर पाटील, श्री संजय पाटील, वगैरे ५० ते ६० जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य उपस्थीत होते. |
| २३. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री जयंतराव पाटील- मांजी मंत्री, आमदार राष्ट्रवादी कॉंग्रेस व श्री राजेंद्र आण्णा देशमुख माजी आमदार राष्ट्रवादी कॉंग्रेस | एस टी स्टॅंड ते तहसील कार्यालय आटपाडी | २९.१०.२०१५ रोजी १२.००वा. ते १४.०० वा. | मोर्चा :- जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ तात्काळ कमी करावी या व इतर मागण्यासाठी एस टी स्टॅंड ते तहसील कार्यालय आपटपाडी असा मोर्चा काढला. मोर्चा तहसील कार्यालय आटपाडी येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री जोगेंद्र कटयारे – तहसीलदार आटपाडी यांना देण्यात आले. मोर्चामध्ये ५०० ते ६०० जनसमुदाय सहभागी झाला होता. |
| २४. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री.जयंत पाटील माजी मंत्री, विद्यमान आमदार राष्ट्रवादी कॉंग्रेस | जुने पोलीस स्टेशन चौक ते तहसील कार्यालय इस्लामपुर | दि.३०.१०.२०१५ रोजी १२.०० ते १४.१५ | मोर्चा :- इस्लामपुर जुने पोलीस ठाणे चौकातील छत्रपती शिवाजी महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयास श्री.जयंत पाटील माजी मंत्री, विद्यमान आमदार राष्ट्रवादी कॉंग्रेस यांनी पुष्पहार अर्पण केले नंतर मोर्चास सुरवात झाली.मोर्चा इस्लामपूरशहरातील प्रमख्य मार्गावरुन तहसिल कार्यालय इस्लामपूर येथें आले नंतर मोर्चाचे रुपांतर जाहीर सभेत झाले श्री.जयंत पाटील माजी मंत्री, विद्यमान आमदार राष्ट्रवादी कॉंग्रेस यांनी आपले भाषणात केंद्र/राज्य शासनाने वेळीच जनहिताचे निर्णय घ्यावेत , केंद्र/राज्य शासनाने निवडणुकीच्या वेळी दिलेली आश्वासने पूर्ण केली नाहीत,बाजारपेठेत तेलाचे दर घसरल्याने पेट्रोल डिझेल चे दर कमी झाले परंतु वाहतुकीवर अवलंबून असलेल्या वस्तुंच्या किमती उतरल्या नाहीत.मोदीनी शेतमालाला आधारभुत धोरण दिले नाही. कांदयाचे भाव वाढल्याने ब्रम्हदेश व इतर देशातुन कांदा आयात करावा लागला सरकारचे शेतक-याचे मदतीचे धोरण चुकीचे आहे ., शेतक-याच्या मालाला धोरण नाही कमतरता भासुन दर वाढवावायचे आणि तो बोजाग्राहकांच्या माथी मारायचा,कोल्हापुर टोल प्रश्न, धनगर समाज आरक्षणप्रश्न एक महीन्यात सोडवु असे राजकर्त्यानी सांगितले होते परंतु ते अदयाप सोडविले नाहीत मुजफ्फरनगर येथील हत्याकांडामुळे अशांत परिस्थिती निर्माण झालेली आहे त्यामुळे विविध मान्यवर मिळालेले पुरस्कार परत करत आहेत. कै. पानसरे ,कलबुर्गी यांच्या हत्या झाल्या तपास रुद्रगौडा पाटील पर्यत येवुन थांबला आहे. मोदीनी नेपाळ व इतर देशांना मदत दिली परंतु महाराष्ट्रातील दुष्काळाकरीता पैसे दिलेले नाहीत असे अनेक प्रश्न आहेत ते सोडविणेसाठी यापुढे लडा देण्यासाठी मोठया संख्येने सहभागी व्हावे. या मुदयावर मार्गदर्शन केले. जाहीर सभा संपलेनंतर शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्रीमती रुपाली सरनोबत तहसिलदार इय्सलामपुर यांना देणेत आले. मोर्चा मध्ये श्री विलासराव शिंदे जिल्हाअध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस, जिल्हा परीषद, पंचायत समिती व नगर पालिका इस्लामपुर मधील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सदस्य- नगरसेवक ,विविध संस्थांचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी यांचे सह सुमारे ६ते ७ हजार जनसमुदाय हजर होता . |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री.बाबासाहेब मुळीक – तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस खानापूर, विटा | काँग्रेस भवन, खानापूर नाका ते तहसील कार्यालय, विटा | ०२.११.२०१५ रोजी ११.४५ ते १२.१५ | मोर्चा- २० ते २५ महिला व ६० ते ७० पुरुष कार्यकर्त्यांनी वाढते महागाईचे निषेधार्थ मोर्चा काढला. मोर्चा तहसील कार्यालय विटा येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. सदरवेळी बाबासाहेब मुळीक, किसन जानकर यांनी वाढत्या महागाईबाबत मार्गदर्शन करून शासनाने महागाई कमी करण्यासाठी प्रयत्न न केलेस पुढील काळात तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा दिला आहे. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवदेन शिष्टमंडळाने श्री.पाटील – नायब तहसीलदार विटा यांना दिले. |
| २६. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्रीमती सुमनताई पाटील - आमदार राष्ट्रवादी काँग्रेस.श्री विजय सगरे- चेअरमन महाकाली सहकारी साखर कारखाना कवठे महंकाळ | कवठे महंकाळ युवावाणी चौक ते तहसील कार्यालय कवठे महंकाळ . | ४.११.२०१५ रोजी १२.१५ वा. ते १४.०० वा. | मोर्चा- म्हैशाळ सिंचन योजनेची पाणीपट्टी बिले शेतक-यांचे सातबारावर न लादता टंचाईतून विज बिले भरुन योजना चालू ठेवावी, टेंभू योजनेस भरीव निधी देवून काम त्वरीत सुरु करा, चारा छावण्या तातडीने सुरु करा, तुरडाळ कांदा व अन्य जिवनावश्यक वस्तूंची गगनाला भिडलेली महागाई कमी करावी, शेती कर्जे पुर्णपणे माफ करावीत, विदयार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करा, मुलींचे साठी पदवी पर्यंतचे एस टी पास मोफत करावेत, विज बिले १०० टक्के माफ करा या व इतर मागण्याकरीता मोर्चा काढण्यात आला. मोर्चा तहसील कार्यालय कवठे महंकाळ येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले प्रमुख वक्ते श्रीमती सुमनताई पाटील - आमदार राष्ट्रवादी काँग्रेस (तासगांव कवठेमहंकाळ विधानसभा मतदार संघ), श्री विजय सगरे- चेअरमन महाकाली सहकारी साखर कारखाना, श्रीमती सुरेखा कोळेकर- तालुका अध्यक्ष महीला राष्ट्रवादी काँग्रेस, नामदेवराव करगणे- तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस कवठे महंकाळ यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर मागण्याचे निवेदन श्री डोंगरे – तहसीलदार कवठे महंकाळ यांना देण्यात आले. मोर्चास ६०० ते ७०० जनसमुदाय हजर होता. |
| २७. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्रीमती सुमनताई पाटील- आमदार राष्ट्रवादी काँग्रेस | मार्केट यार्ड तासगांव ते तहसील कार्यालय तासगांव | २६.११.२०१५ रोजी १२.५० वा. ते १४.४५ वा | मोर्चा - : महागाई विरोधात व आ र फळ, ताकारी, म्हैशाळ, पुणदी व विसापूर या उपसा सिंचन योजना तात्काळ चालू कराव्यात, चारा छावण्या सुरू कराव्यात या इतर मागण्यासाठी मार्केट यार्ड तासगांव ते तहसील कार्यालय तासगांव तासगांव शहरातील प्रमुख मार्गानी मोर्चा काढला. मोर्चामध्ये श्री सुरेशभाऊ पाटील- संचालक जिल्हा मध्यवर्ती बँक, कु. स्मीता पाटील, श्री अविनाश पाटील- सभापती मार्केट कमिटी तासगांव, श्रीमती योजना शिंदे – जि. प. सदस्या, श्री अमोल शिंदे- माजी नगराध्यक्ष तासगांव नगरपालीका, श्री हणमंत देसाई- तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस या प्रमुख नेत्यासह १२०० ते १५०० कार्यकर्ते उपस्थीत होते. मोर्चा तहसील कार्यालय तासगांव येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री भोसले- नायब तहसीलदार तासगांव यांना देण्यात आले. |
| २८. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री. योगेद्र थोरात | राष्ट्रवादी कॉग्रेस कार्यालय सांगली ते राजवाडा चौक | १५.१२.२०१५ रोजी ०९.०५ते ०९.३५ . | सायकल रॅली :- श्री. शरदचंद्र पवार यांचे अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्य विदयार्थ्याची सायकल रॅली काढणेत आली. सदर रॅलीमध्ये श्री. कमलाकर पाटील , संजय बजाज, मनोज भिसे ,या राष्ट्रवादीच्या प्रमुख कार्यकर्त्यासह १००ते १२५ शालेय विदयार्थी सहभागी झालेले होते |
| २९. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री विजयआण्णा सगरे- चेअरमन, महाकाली सहकारी साखर कारखाना, कवठेमहंकाळ | तहसीलदार कवठे महंकाळ कार्यालय | १५.१२.२०१५ रोजी १३.०० वा | निवेदन :- ४० ते ४५ कार्यकर्त्यांनी श्रीमती सुमनताई पाटील- आमदार राष्ट्रवादी काँग्रेस यांनी दिनांक १५.१२.२०१५ रोजी नागपूर विधानभवन येथे केले उपोषणास पाठींबा म्हणून म्हैशाळ योजनेची पाणी पट्टी शेतक-यांच्या सातबा-यावर न लावता टंचाई फंडातून विज बिले भरुन म्हैशाळ योजना चालू ठेवा, नागज व ढालगांव परिसरातील टेंभू योजनेच्या कामाला भरपूर निधी देवून योजना तात्काळ सुरु करा, चारा छावण्या तातडीने सुरु कराव्यात वगैरे मागण्याचे निवेदन श्री सचिन डोंगरे – तहसीलदार कवठे महंकाळ यांना दिले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३०. | राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस आय | श्री मानसिंगराव नाईक- माजी आमदार राष्ट्रवादी काँग्रेस व श्री सत्यजीत देशमुख- सरचिटणीस काँग्रेस आय | आंबामाता मंदीर शिराळा ते तहसील कार्यालय शिराळा | १६.१२.२०१५ रोजी १३.४५ वा. ते १६.०० | मोर्चा :- शिराळा तालुका दुष्काळग्रस्त जाहिर करावा या व इतर मागण्यासाठी आंबामाता मंदीर शिराळा ते तहसील कार्यालय शिराळ असा मोर्चा काढला. मोर्चा १४.२० वाजता तहसील कार्यालय शिराळा येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले. सदर वेळी श्री महादेव पाटील, श्री के डी पाटील, सौ उषाताई दशवंत,-अध्यक्ष शिराळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस, श्री मानसिंगराव नाईक- माजी आमदार राष्ट्रवादी काँग्रेस, श्री सत्यजीत देशमुख- सरचिटणीस काँग्रेस आय यांची भाषणे झाली. १६.०० वाजता मागण्याचे निवेदन श्री विजय पाटील- तहसीलदार शिराळा यांना देण्यात आले. सदर मोर्चामध्ये ६००० ते ६५०० पुरुष व १००० ते १५०० महीला सहभागी झाल्या होत्या. |
| ३१. | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री हणमंतराव रघुनाथ देसाई तालूका अध्यक्ष | शिवाजी चौक तासगांव | १६.१२.२०१५ रोजी ११.३५ वा. ते १६.०५ वा | एक दिवशीय लाक्षणीक उपोषण : - ६० ते ७० कार्यकर्त्यांनी नागपूर येथे सुरु असलेल्या आमदार श्रीमती सुमनताई पाटील यांचे उपोषणास पाठींबा देण्यासाठी शिवाजी चौक तासगांव येथे एक दिवशीय लाक्षणीक उपोषण केले. |
| ३२. | राष्ट्रवादी काँग्रेस | प्रा. श्री प्रमोद इनामदार- राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष व श्री दिलीप बुरसे- सभापती पंचायत समिती मिरज | मिरज तहसील कार्यालयासमोर | १९.१२.२०१५ रोजी ११.३० वा. ते १३.०० | धरणे आंदोलन : - म्हैशाळ योजनेचे विज बिल व पाणी बिल माफ करुन तातडीने शासनाने भरावीत. दुष्काळ जाहीर करावा या व इतर मागण्याकरीता धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री घाडगे- तहसीलदार मिरज यांना देण्यात आले. जनसमुदाय २० ते २५. |
| ३३. | राष्ट्रवादी काँग्रेस | कु. स्मीता पाटील | जुने तहसील कार्यालय तासगांव समोर | २५.१२.२०१५ रोजी ११.०० वा. ते १६.०० वा | एक दिवशीय लाक्षणीक उपोषण : - कु. स्मीता पाटील- राष्ट्रवादी काँग्रेस यांचे नेतृत्वाखाली ७० ते ८० कार्यकर्त्यांनी सांगली जिल्हयातील अवैध धंदे बंद करावेत या मागणीसाठी लाक्षणिक उपोषण केले. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री शहाणे- सपोनि तासगांव पोलीस ठाणे यांना देण्यात आले. |

३) भारतीय जनता पार्टी :-

| अनं | पक्ष/ संघटना | नेतृत्व | ठिकाण | दिनांक व वेळ | घटनेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १. | भारतीय जनता पक्ष. | श्री विक्रम पाटील- प्रदेश उपाध्यक्ष | इस्लांमपूर शहर | १७.३.२०१५ रोजी ०९.०० वा. ते १७.०० वा. या वेळेत | **बंद** - इस्लांमपूर नगरपरिषदेने नागरीकांचेवर आकारलेली वाढीव घरपट्टी कमी करावी या मागणी करीता इस्लांमपूर शहर बंद पाळण्यात आले. बंदला अत्यावश्यक सेवा वगळता ६० टक्के प्रतिसाद मिळाला.<br>दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्री विजय देशमुख – प्रांत इस्लांमपूर व श्री निलेश देशमुख- मुख्याधिकारी, नगरपरिषद इस्लांमपूर यांना दिले. सदर वेळी मुख्याधिकारी इस्लांमपूर नगरपरिषद यांनी विनामुल्य अपिल दाखल करण्यास आंदोलनकर्ते यांना परवानगी दिली आहे. |
| २. | भाजपा | श्री संजय महालींग परमणे- अध्यक्ष परिवर्तन पॅनल | सांगली गणपती मंदीर – गणपती पेठ- बुरुड गल्ली- कापड पेठ- हरभट रोड | दिनांक २८..४.२०१५ रोजी ११.०० वा. ते ११.३० वा. या वेळेत | **रॅली** - सांगली अर्बन बँक संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक २०१५ चे अनुषंगाने श्री गणेश गाडगीळ- परीवर्तन पॅनेल उमेदवार यांचे प्रचारार्थ पायी चालत रॅली काढण्यात आली. रॅली मध्ये श्री संजय पाटील- खासदार (भाजपा), श्री सुधीर गाडगीळ-आमदार (भाजपा), श्री सुरेश खाडे-आमदार (भाजपा) या प्रमुख नेत्यासह १०० ते १५० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| ३. | परिवर्तन पॅनल (भाजपा), | श्री संजय महालींग परमणे- अध्यक्ष परिवर्तन पॅनल | सांगली गणपती मंदीर – गणपती पेठ- बुरुड गल्ली- कापड पेठ- हरभट रोड | २८..४.२०१५ रोजी ११.०० वा. ते ११.३० वा. या वेळेत | **रॅली** - श्री गणेश गाडगीळ- परीवर्तन पॅनेल यांचे प्रचारार्थ पायी चालत रॅली काढण्यात आली. रॅली मध्ये श्री संजय पाटील- खासदार (भाजपा), श्री सुधीर गाडगीळ-आमदार (भाजपा), श्री सुरेश खाडे- आमदार (भाजपा) या प्रमुख नेत्यासह १०० ते १५० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| ४. | भाजप | **भाजप कार्यकर्ते सावळज** | ग्रामपंचायत चौक, सावळज | दिनांक १३.७.२०१४ रोजी १०.०० वा.ते १४.०० वा | **सत्कार समारंभ** :-लोकसभा निवडणुक-२०१४मध्ये महायुतीचे वतीने श्री संजय पाटील हे विजयी झालेने नुतन खासदार यांचा सत्कार समारंभ पार पडला. सत्कार समारंभास श्री अजितराव घोरपडे-माजी मंत्री, श्री सदाभाऊ खोत-प्रदेशाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना उपस्थीत होते. सत्कार समारंभात प्रमुख वक्त्यानी सावळज विभागाने लोकसभेसाठी मोठे मताधिक्य दिले आहे. आगामी विधानसभा निवडणूकीमध्ये महायुतीचे श्री अजितराव घोरपडे हे उमेदवार असणार आहेत त्यांना निवडूण दयावे, राज्यात महायुतीचे सरकार आणावयाचे आहे. सध्याचे लोकप्रतिनिधी अकार्यक्षम असल्याने शेतीला पाणी देवू शकलेले नाहीत अथवा तरुणाकरीता उदयोग उभे करु शकलेले नाहीत.महायुतीच्या उमेदवारास निवडूण दया असे आवाहन केले. श्री सदाभाऊ खोत यांनी गृहमंत्री यांचेवर वैयक्तीक टिकाटिपण्णी केली.सदर सत्कार समारंभ परिषद शांततेत पार पडला असून सत्कार समारंभाचे वेळी योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला होता. |
| ५. | भाजप | श्री दिपक आदगौंडा पाटील- कार्यकर्ता | महात्मा गांधी पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय | दिनांक १४.७.२०१४१२.४ ५ वा.ते १३.४५ | **मोर्चा–** महानगर पालिका गुंठेवारी प्रश्नाबाबत मोर्चा काढला. जनसमुदाय १०-१२५ मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन मा.जिल्हाधिकारी यांना दिले. |
| ६. | भाजप | श्री.गौतम पवार | मनपा कार्यालय, सांगली. | दिनांक २२.७.२०१४ रोजी १३.१० वा. | **निवेदन :-** श्री.लक्ष्मीकांत कमलाकर अधिक्षक अभियंता सांगली,मिरज व कुपवाड म. न.पा यांना जलभवन येथे शेरीनाला तात्काळ सुरू करावा या मागणी करीता घेराव घालण्याचा इशारा दिला होता परंतु त्यांनी घेरावा आंदोलनरदद करुन आपल्या मागण्याचे निवेदन शिष्टमंडळाने म.न.पा कार्यालयात जावुन श्री.लक्ष्मीकांत कमलाकर- अधिक्षक अभियंता मिरज व कुपवाड म. न.पा यांना मागण्याचे निवेदन दिले आहे. जनसमुदाय ७० ते ८० कार्यकते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | भारतीय जनता पार्टी | सौ. शलाका पवार | मारुती चौक, सांगली | .७.८.२०१४ रोजी १३.३० वा.ते १३.५० वा | **निदर्शने :-** अमीर खान व मल्लीका शेरावत या सिने कलाकारांनी नग्न अवस्थेत पिक्चर मध्ये काम केल्याचा निषेध म्हणून निदर्शने करुन अमीर खान व मल्लिका शेरावत यांचे फोटोंस नारळ टोपी देण्याचा कार्यक्रम करण्यात आला. जनसमुदाय २५ ते ३० |
| ८. | भाजप महिला आघाडी | श्री शेखर इनामदार माजी नगरसेवक भाजप व सौ.निता केळकर भाजप महिला आघाडी | विश्रामबाग चौक. सांगली. | २५.८.२०१४ रोजी १४.३० वा.ते १५.३० वा. | **निदर्शने :** मा.ना.श्री जितेंद्र आव्हाड आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी मुंबई येथे दहिहंडीचे वेळी राष्ट्रध्वजाचा आवमान केल्याने त्यांचेवर कारवाई व्हावी या मागणी करीता निदर्शने केली त्यानंतर मागण्याचे निवेदन शिष्टमंडळाने श्री धंनजय भांगे पोलीस निरिक्षक विश्रामबाग पो.ठाणे यांना दिले जनसमुदाय १५ ते २० |
| ९. | भाजप | -- | तासगांव | दि. ०१.०९.२०१५ रोजी १४.१५ वा | **गुन्हा दाखल कारवाई :-** दि.०१.०८.२०१५ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती तासगांव संचालक निवडणूक मतदान झाले त्यावेळी यशवंत हायस्कूल पागा गल्ली तासगांव येथील मतदान केंद्रापैकी केंद्र क्रमांक ३ या ठिकाणी १४.१५ वा चे सुमारास राष्ट्रवादी कॉंग्रेस चे आमदार श्रीमती सुमनताई पाटील गटाचे श्री. दिनकर हिंदूराव पाटील रा. मांजर्डे हे एका खाजगी वाहनातून काही हमाल मतदार त्या ठिकाणी मतदानाकरीता घेवून आले असता भाजप खासदार श्री. संजयकाका पाटील गटाच्या काही लोकांनी त्यावर आक्षेप घेवून मारामारी व दगड फेकीची घटना घडली सदर बाबत तासगांव पोलीस ठाणेस भाग ५ गु.र.नं. १५७/२०१५ भादविसंक १४३,१४७,१४८,१४९,३३२,३५३,३३७,४२७,५०४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. |
| १०. | भारतीय जनता पक्ष | श्री शेखर इनामदार- सांगली शहर अध्यक्ष | | दिनांक १६.८.२०१५ रोजी ११.३० वा. ते १२.१५ वा. | **मोर्चा :-** श्री संजयकाका पाटील- खासदार भाजपा, श्री सुधीर गाडगीळ- आमदार भाजपा,श्री शिवाजीराव नाईक- आमदार भाजपा, श्री सुधीर खाडे - आमदार भाजपा, श्री विलासराव जगताप - आमदार भाजपा, माजी आमदार श्री दिनकर तात्या पाटील, श्री गोपीचंद पडळकर- रासप, सौ निता केळकर-महीला आघाडी, सौ भारती दिगडे या प्रमुखांच्या उपस्थीतीत कॉंग्रेसच्या खासदारांनी संसदेचे कामकाज बंद पाडल्याचे निषेधार्थ स्टेशन चौक ते राजवाडा चौक सांगली असा मोर्चा काढला. मोर्चा राजवाडा चौक या ठिकाणी आल्यानंतर निदर्शने करण्यात आली व सदर ठिकाणी मान्यवरांची भाषणे झाली. मान्यवरांनी भाषणामध्ये संसदेच्या कामकाजास खिळ घालणा-या कॉंग्रेस खासदारांचा निषेध केला व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याची माहीती आपआपले भागामध्ये दयावी असे उपस्थीत कार्यकर्त्यांना आवाहन केले.सदर वेळी ३०० ते ३५० कार्यकर्ते उपस्थीत होते. |
| ११. | भाजप | श्री.संजयकाका पाटील खासदार | माधवनगर, सांगली | दिनांक २८.०८.२०१५ रोजी ११.०० वा ते ११.२५ | उद्घाटन :- रविवार पेठ येथील रस्त्याचे व बुधगाव येथील रस्त्याचे उद्घाटनाचा कार्यक्रम श्री.रावसाहेब दानवे प्रदेशध्यक्ष भाजप यांच्या हस्ते झाला. सदर वेळी श्री.संजयकाका पाटील खासदार भाजप, श्री.सुधीर गाडगीळ आमदार भाजप,श्रीमती निता केळकर भाजप महिला आघाडी,दिपक शिंदे ,पप्पू डोंगरे,मोहन पाटील,राजाराम गुरुड या भाजपच्या प्रमुख कार्यकर्त्यासह १००-१२५ जनसमुदाय हजर होता. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२. | भाजप | श्री.संजयकाका पाटील खासदार | कोहिनूर मंगल कार्यालय तासगाव | दिनांक २८.०८.२०१५ रोजी १५.०० ते १६.३० या | मेळावा :- भाजप कार्यकर्त्याचा मेळावा व पक्ष प्रवेश कार्यक्रम पार पाडला. सदर मेळाव्यास श्री.रावसाहेब दानवे प्रदेशध्यक्ष भाजप, श्री.संजयकाका पाटील खासदार भाजप, श्री.विलासराव जगताप आमदार भाजप जत, श्री.सुधीर गाडगीळ आमदार भाजप,सांगली ,श्री.शिवाजीराव नाईक भाजप आमदार शिराळा श्री.सुरेश खाडे भाजप आमदार मिरज, श्री.गोपीचंद पडळकर श्री.दिनकर तात्या पाटील,श्री.मकरंद देशपांडे,श्री.पृथ्वीराज बाबा देशमुख शेखर इनामदार समन्वयक भाजप,राजाराम गुरुड जिल्हाध्यक्ष भाजप,निलम जाधव महिला आघाडी या प्रमुख कार्यकर्त्यासह १५०० ते २००० जनसमुदाय हजर होतासदर मेळाव्यामध्ये श्री.मुन्ना कूरणे श्री.सलीम भैय्या पन्हाळकर,हायूम सावनूरकर,सुशांत रजपूत,विरेद्र थोरात,निखिल नाईक, प्रताप पाटील,प्रा.पी.ए.माने,सुरेश दादा चौड,दत्तात्रय खोत,विकास पाटील,सुधीर प ाटील,अजय निकम,दादासाहेब कोळेकर ,अनिल शिंदे,महंमद तांबोळी,महेश हिंगमिरे या कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेसच्या कार्यकर्त्यानी आपल्या समर्थकासह भाजप मध्ये पक्ष प्रवेश केला मेळाव्यात श्री.रावसाहेब दानवे भाजप प्रदेशाध्यक्ष,श्री.संजयकाका पाटील खासदार भाजप यांनी जिल्हयातील विविध पाणी योजना तात्काळ सुरु करुन दुष्काळी भागास पाणी देण्याचे आश्वासन दिले. |
| १३. | भारतीय जनता पक्ष | प्रदिपबापू वाले | कवठे महंकाळ | २.९.२०१५ ११.३० | **निवेदन** - कवठे महंकाळ तालुक्यातील १० ते १५ कार्यकर्त्यानी डॉ एस एम कलबुर्गी यांच्या हत्येचा निषेध व्यक्त करुन कलबुर्गी यांच्या मारेक-यांना तात्काळ अटक करावी वगैरेमागण्याचे निवेदन श्रीमती रेडेकर- नायब तहसीलदार यांना दिले. |
| अनं | पक्ष/ संघटना | नेतृत्व | ठिकाण | दिनांक व वेळ | घटनेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १. | समतावादी महासंघ | श्री विजय चांदणे- अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | ५.१०.२०१५ रोजी ११.३० वा. ते १७.०० | **धरणे आंदोलन**:- गवळेवाडी येथील पारधी कुटूंबांना श्री बाळू पाटील हे त्रास देतात याचे निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री शेखर गायकवाड - जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले. |
| २. | रा.स.प. | दशरत राऊत सचिव रा.स.प. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बचत भवन, आटपाडी | ११.१०.२०१५ रोजी १३.०० ते १५.०० वा | **युवा परिषद** :- राजाभाई फड - युवक प्रदेशाध्यक्ष रा.स.प, भिमराव जामूने- मुंबई प्रदेश अध्यक्ष, दादा केसरकर- प्रदेश अध्यक्ष, रा.स.प., विष्णू चव्हाण – प्रवक्ते, रा.स.प., नंदनी कोंडाळकर - महिला प्रदेश अध्यक्ष, उज्वला हक्के- पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्ष या प्रमुख वक्त्यांनी पक्षवाढीसाठी मार्गदर्शन केले आहे. सदर मेळाव्यास ४०० ते ५०० जनसमुदाय हजर होता. |

१६) जनता दल सेक्युलर :-

| अनं | पक्ष/ संघटना | नेतृत्व | ठिकाण | दिनांक व वेळ | घटनेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १. | जनता दल सांगली | माजी आमदार प्रा.श्री.शरद पाटील | दिनानाथ मंगेशकर नाटयगृह सांगली | १०.१.२०१५ रोजी १२.३० वा.ते १४.०० वा. | मेळावा - शेतकरी मेळावा पार पडला. सदर मेळाव्या मध्ये एफआरपी प्रमाणे साखर कारखान्यांनी दर दयावा,६० वषा्रवरील शेतकऱ्यांना २०००/- पेन्शन मंजुर झाली पाहीजे याकरीता मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना एक लाख पत्रे पाठविण्याचा संकल्प केला आहे.तसेच कोल्हापुर येथील कारखाने उसाला जादा दर देतात सांगली जिल्हयात दर कमी का मिळतो यासाठी एकजुट होण्याचे ठरले आहे सदर मेळाव्यास श्री.प्रताप होगाडे,ॲड.श्री.के.डी शिंदे,आबा सागर यांचे सह २०० ते २५० शेतकरी उपस्थित होते. |
| २. | जनता दल सेक्युलर | प्रा.श्री. शरद पाटील - अध्यक्ष व माजी आमदार | क्रांतिसिंह नाना पाटील उदयान विश्रामबाग | २७.२.२०१५ ११.१५ वा. ते १२.१५. | **विज बिल होळी** :- वीज दरवाढीच्या निषेधार्थ निदर्शने करुन वाढीव विजबीलाची होळी केली. जनसमुदाय-३५ ते ४० |
| ३. | जनता दल | श्री आबासो सागर - तालुका अध्यक्ष | आटपाडी एसटी स्टँन्ड ते पोस्ट ऑफिस कार्यालय आटपाडी | दिनांक ०३.०३.२०१५ रोजी १२.४० वा | **मोर्चा** - ६० वर्षावरील शेतकऱ्यांना दरमहा २००० रुपये पेन्शन चालु करावी या व इतर मागण्यासाठी मा मुख्यमंत्री यांना पेन्शन बाबत पत्रे पाठविणेत आली त्यानंतर मोर्चा डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन पटांगणात आला सदर ठिकाणी १४.४५ वा पर्यत पेन्शन परिषद झाली.सदर परिषदेस माजी आमदार प्रा.श्री शरद पाटील,के.डी शिंदे-अध्यक्ष जनतादल सेक्युलर सांगली जिल्हा,जनार्धन गोंधळी व आबासो सागर यांची भाषणे झाली.<br>नंतर १५.०० वा पेन्शनबाबतचे फॉर्म व मागण्याचे निवेदन श्री सचिन इथापे-प्रांताधिकारी विटा विभाग यांना दिले आहे. जनसमुदाय ४५०० ते ५००० |
| ४. | जनता दल | श्री शरद पाटील - माजी आमदार | लाल जिन मंदीर कुपवाड | दिनांक १९.८.२०१५ रोजी २१.०० वा. ते २१.३० वा. | सभा : राजस्थान उच्च न्यायालयाने जैन समाजातील यम सल्लेखना बेकायदेशीर ठरवून त्यावर बंदी घातली आहे त्याचे विरोधात जैन समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी सभा पार पडली.सभेमध्ये श्री शरद पाटील - माजी आमदार, श्री राजू शेट्टी- खासदार स्वाभिमानी शेतकरी संघटना, श्री सी. टी. पाटील- निवृत्त उच्चन्यायाधीश यांनी उपस्थीतांना मार्गदर्शन केले. सदर वेळी १५० ते १७५ पुरुष व ५० ते ६० महीला असा जनसमुदाय उपस्थीत होता. |
| ५. | जनता दल | श्री आबासाहेब सागर- अध्यक्ष आटपाडी | ग्रामपंचायत कार्यालय बनपूरी समोर | ०१.१२.२०१५ रोजी ११.०० वा. ते १३.०० वा. | धरणे आंदोलनः- १५० ते २०० कार्यकर्त्यांनी ६० वर्षावरील व्यक्तींना इतर राज्या प्रमाणे पेन्शन मिळावी या व इतर मागण्या करीता ग्रामपंचायत कार्यालय बनपूरी समोर धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत श्री केंगार- तलाठी बनपुरी यांना मागण्याचे निवेदन दिले. |
| ६. | जनता दल | श्री आबासाो सरगर- आटपाडी | पिंपरी खुर्द तलाठी कार्यालयासमोर | १६.१२.२०१५ रोजी ११.०० वा. ते १२.१५ | धरणे आंदोलनः- ८० ते १०० कार्यकर्त्यांनी ६० वर्षापुढील व्यक्तींना इतर राज्याप्रमाणे दरमहा २००० /- रुपये पेन्शन मिळावी या व इतर मागणी करीता पिंपरी खुर्द तलाठी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. |

१६) सर्व पक्षीय आंदोलने :-

| अनं | पक्ष/ संघटना | नेतृत्व | ठिकाण | दिनांक व वेळ | घटनेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १. | शिवसेना, भाजपा व शिवप्रतिष्ठानच्या | -- | आझाद चौक सांगली व टिळक चौक | २०.१.२०१५ | सांगली शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये जिल्हाधिकारी निवासस्थाना जवळील चौक (आझाद चौक) व टिळक चौक येथे चौकातील आयलंड मध्ये विनापरवाना भगवे झेंडे लावण्यात आले आहेत. दिनांक २०.१.२०१५ रोजी आझाद चौक सांगली येथे लावलेला भगवा झेंडा सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी काढण्यासाठी गेले असता सांगली जिल्हा स्थल सिमा हद्दीमध्ये मा. जिल्हादंडाधिकारी सांगली यांनी मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३) चा बंदी आदेश लागू केलेला असताना शिवसेना, भाजपा व शिवप्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी सदर ठिकाणी येवून झेंडे काढण्यास विरोध केला, घोषणाबाजी करून मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) च्या बंदी आदेशाचा भंग केला म्हणून सांगली शहर पोलीस ठाणेस भाग- ६ गुरनं. ७/२०१५ भा.द.वि.सं. कलम १८८, मुपोकाक १३५ प्रमाणे<br>१) हणमंत पवार – भाजपा/शिवप्रतिष्ठान, २) अनिल शेटे- शिवसेना, ३) संदीप सुतार- शिवसेना,<br>४) महेंद्र पंडाळे- शिवसेना, ५) अजिंक्य पाटील- शिवसेना व इतर १० सर्व रा. सांगली |
| २. | सर्व पक्षीयांचे वतीने | श्री शरद पाटील- माजी आमदार जनता दल सेक्युलर | गांधी पुतळा स्टेशन चौक सांगली ते शहरातील प्रमुख मार्गानी फिरुन परत स्टेशन चौक | २२.२.२०१५ ११.१५ वा. ते १२.२० वा. | **निषेध फेरी व व्यापार बंद:-** कॉ गोविंदराव पानसरे यांचेवरील हल्ल्याचे निषेधार्त निषेध फेरी काढली. फेरी दरम्यान त्यांनी सांगली शहर बंद ठेवण्याचे आवाहन केले. सदर निषेध फेरीमध्ये कॉंग्रेस आय, दलीत महासंघ, मनसे या पक्ष संघटनांचे ३०-३५ कार्यकर्ते व मार्केट यार्ड सांगली येथील व्यापारी सामील झाले होते. सदर दिवशी सांगली शहरातील ७० टक्के व्यापार बंद होता. |
| ३. | पाणी संघर्ष समिती उमदी | अध्यक्ष श्री. सुनील गणपती पोतदार | उमदी ते जिल्हाधिकारी सांगली | दि. ०१.०७.२०१५ रोजी ११.०० वा ते ०६.०७.२०१५ रोजी १३.०० वा. पर्यंत पदयात्रा व दि.०६.०७.१५ ते ०९.०७.१५ रोजी ११.३० वा पर्यंत ठिय्या आंदोलन | पदयात्रा व ठिय्या आंदोलन :- जत तालुक्यातील पाणी प्रश्ना संदर्भात शासनाने पाणी संघर्ष समितीस दिलेली लेखी आश्वासने पूर्ण न केलेचे निषेधार्थ यांचे नेतृत्वाखाली दि. ०१.०७.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा पासून उमदी ते सांगली अशी पदयात्रा सुरु केलेली पदयात्रा दिनांक ०६.०७.२०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे १३.०० वा आल्या नंतर सदर रॅलीचे सभेत रुपांतर होवून रॅलीस खा.श्री. संजय काका पाटील, आ.श्री. विलासराव जगताप, आ.श्री. सुरेश खाडे, आ.श्री. सुधिर गाडगीळ, आ.श्री. शिवाजीराव नाईक, माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, नितीन शिंदे - मनसे व सुनिल पोतदार व इतर पदाधिकारी यांनी मार्गदर्शनपर भाषण करून त्यांच्या मागण्याचे निवेदन शिष्टमंडळाव्दारे जिल्हाधिकारी,सांगली यांना देण्यात आले. व मागण्या मान्य होईपर्यंत दिनांक ६.७.२०१५ रोजी पासून ७० ते ७५ ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर ठिया आंदोलन सुरु केले होते. महाराष्ट्र शासनाने मागण्यांच्या पूर्ततेसाठी ३२ कोटी रुपये निधी मंजूर केलेने ग्रामस्थांनी दि. ०९.०७.२०१५ रोजी ११.३० वा आपले आंदोलन स्थगीत केले आहे. ठिय्या आंदोलनास सुमारे ७० ते ७५ लोक हजर होते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | पाणी संघर्ष समिती उमदी | अध्यक्ष श्री. सुनील गणपती पोतदार | उमदी ता. जत | १०.०७.२०१५ रोजी १९.०० वा ते २०.३० वा या वेळेत | नागरी सत्कार सोहळा:- पाणी संघर्ष समिती उमदीचे वतीने अध्यक्ष श्री. सुनील पोतदार यांचे नेतृत्वाखाली जत तालुका पुर्व भागातील ४२ गांवाना म्हैशाळ योजनेचे पाणी मिळावे या व इ तर मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या उमदी ते जिल्हाधिकारी सांगली पदयात्रेस यश मिळून मागण्या मान्य होऊ योजनेस निधी मंजूर होण्यात मा. खासदार संजयकाका पाटील, मा.आमदार विलासराव जगताप यांनी शासन दरबारी प्रयत्न केलेने त्यांच्या सत्कारासाठी नागरी सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. सुमारे १०० ते १२५ लोक हजर होते. |
| ५. | अखील भारतीय भटके गोसावी समाज युवक संघटना | अमर भिमराव माळी -अध्यक्ष वाळवा तालुका | तहसिलदार कार्यालय इस्लामपूर | दि.०३.०७.२०१५ रोजी १६.०० वा. | निवेदन :- जातीचे दाखले त्वरीत मिळावे शासनाच्या पडीक गायरान जमीनी गोसावी समाजातील लोकांना मिळाव्यात वगैरे मागण्याचे निवेदन देण्यात आले. |
| ६. | शहर सुधार समिती सांगली | ॲड. अमित शिंदे | किसान चौक मिरज | दिनांक ५.७.२०१५ रोजी १९.४५ वा. ते २०.१५ वा. या वेळेत | कॉर्नर सभा : मिरज आणि कुपवाड शहर महानगर पालिका नगरसेवकांनी आपआपले वार्डात एरिया सभा घ्यावी या विषयावर कॉर्नर सभा पार पडली. सदर कॉर्नर सभेस ६० ते ७० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| ७. | शिराळा ग्रामस्थ | श्री राजेंद्र भिमराव माने - सामाजीक कार्यकर्ता रा. शिराळा | शिराळा तहसील कार्यालयासमोर | दिनांक २९.६.२०१५ रोजी १०.३० वा. पासून ते दि. ०६.०७.२०१५ रोजी १३.०० वा पर्यंत | चक्री उपोषण व शिराळा गाव बंद- हे केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री प्रकाश जावडेकर व मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपंचमी दिवशी जिवंत नागाच्या पुजेस व मिरवणूकीस कायदेशीर मंजूरी मिळण्यासाठी नवीन विधेयक राज्य विधी मंडळात व संसदेत मांडून तात्काळ पारित करावे या मागणीसाठी आमरण उपोषणास बसले होते त्यांना पाठिंबा म्हणून दि. ०२.०७.२०१५ रोजी १४.३० वा नागमंडळातील ५ ते ७ सदस्यांचे दररोज चक्री उपोषण केले. तसेच शिराळा गाव |
| ८. | आम आदमी पार्टी सांगली | साजीद मुजावर | गांधी पुतळा, स्टेशन चौक सांगली | दि. ११.०७.२०१५ रोजी १२.४५ वा ते १३.०० | निदर्शने :- मध्यप्रदेश येथे घडलेल्या व्यापम घोटाळयाची योग्य चौकशी होवून दोषींना शिक्षा व्हावी या मागणीकरीता ७ ते ८ कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. |
| ९. | वैयक्तिक | जितेंद्र महादेव व्हनकडे रा. कुपवाड | जिल्हाधिकारी कार्यालयाचे पटागंणात | दि. ०७.०७.२०१५ रोजी १३.०० वा दि. ११.०७.२०१५ रोजी १३.१५ वा | आमरण उपोषण :- पोदार इंटरनॅशनल स्कूल प्रा.लि. लक्ष्मीनगर सांगली या शाळेच्या बेकायदेशीर बांधकामावर त्वरीत कारवाई करावी या मागणीसाठी आमरण उपोषणास बसलेले होते. श्री. सुधीर गाडगीळ-आमदार भाजपा यांनी उपोषणकर्त्याची भेट घेवून त्यांचे मागणीसंदर्भात चर्चा केली. चर्चेत उपोषणकर्त्याचे समाधान झालेने त्यांनी आपले आमरण उपोषण स्थगित केले |
| १०. | स्वराज्य अभियानचे वतीने | डॉ.श्री.नामदेव कस्तुरे | विश्रामबाग चौक सांगली येथे | द्दीत दि. १२.०७.२०१५ रोजी १८.१५ वा. ते २०.१५ | सभा :- विश्रामबाग पोलीस ठाणे भूमी अधिग्रहण कायदयाची माहिती लोकांना देणे व दि. १०.०८.२०१५ रोजी दिल्ली येथे आयोजित केले जयकिसान आंदोलनात सहभागी होण्याचे लोकांना अवाहन करण्यासाठी सभा पार पडली. सदर सभेस श्री. मानव कांबळे- अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य स्वराज्य अभियान हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. सदर सभेस ४० ते ५० इतका |
| ११. | शिराळा तालुका पत्रकार संघटना चे वतीने | श्री. विनायक गायकवाड रा. शिराळा- कार्याध्यक्ष | शिराळा तहसिल कार्यालय | दि.१३.०७.२०१५ रोजी ११.०० वा. | निवेदनः- पत्रकारावरील वाढत्या हल्ल्यांना पायबंद घालण्यासाठी आणि त्यांच्या जिविताचे रक्षण करणेसाठी पत्रकारांवर हल्ले करणाऱ्या हल्लेखोरांना कठोर शिक्षेची तरतूद असणारा कायदा शासनाने तयार करून अंमलात आणावा या मागण्यांचे निवेदन नायब तहसिलदार श्री. उदय पवार यांना देण्यात आले. सदरवेळी संघटनेचे २०-२५ पत्रकार उपस्थित होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२. | खोजा शिया इस्ना असरी जमात सांगलीचे वतीने | अध्यक्ष मोहमंदअलि देवजानी | स्टेशन चौक सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | दि. १७.०७.२०१५ रोजी १५.०० वा ते १६.०० वा या वेळेत | निषेध फेरी :- अलकुदर दिवसानिमीत्त आंतरराष्ट्रीय आंतकवादा विरुध्द व अन्यायाविरुध्द स्टेशन चौक येथे मौलाना मंहमदहुसेन सुरतवाला यांचे मार्गदर्शन झाले. त्यानंतर ७० ते ७५ कार्यकर्त्यांसह अशी निषेध फेरी काढली. निषेध फेरी जिल्हाधिकारी कार्यालय येथे आलेनंतर शिष्टमंडळाने आपल्या मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शिंदे यांना दिले आहे. |
| १३. | ऑल इंडीया मजलिसे इत्तेहादूल मुसलमीन (एमआयएम) | श्री. शाकीर इसालाल तांबोळी रा. इस्लामपूर | महाराष्ट्र लॉन, एमआयडीसी रोड, मिरज | दि. १३.०७.२०१५ रोजी १८.३० वा ते १९.३० वा दरम्यान वा दरम्यान | इफ्तार पार्टी :- श्री. अंजुम इनामदार रा. पुणे ( संघटक- एमआयएम पश्चिम महाराष्ट्र ) यांचे प्रमुख्र उपस्थितीत रमजान ईद च्या अनुषंगाने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. १२५ ते १५० मुस्लीम कार्यकर्ते तसेच श्री. अरुण कांबळे- आरपीआय इस्लामपूर शहर अध्यक्ष, श्री. किरण माने रा. आष्टा, श्री. राजाराम कांबळे रा. आष्टा, श्री. सलीम मुल्ला रा. पुणे , श्री. वासिम मुल्ला रा. पुणे, श्री. अल्ताफ मुल्ला रा. पुणे हे उपस्थित होते. |
| १४. | सांगली शहर सुधार समितीच्या वतीने | श्री. प्रभाकर पांडुरंग पाटील | त्रिमुर्ती कॉलनी , रिक्शा स्टॉपजवळ १०० फूटी रोड सांगली | दि. १६.०७.२०१५ रोजी १९.०० वा ते २०.१५ वा या वेळेत | कॉर्नर सभा :- एरिया सभेची जनजागृती करणेकरीता कॉर्नर सभा पार पडली. सदर सभेस ३० ते ३५ जनसमुदाय उपस्थित होता. |
| १५. | येथे टाकळी येथील ग्रामस्थ | ाध्ये श्री अजित नेमगोंडा पाटील यांचे | चाँद फ्रुट कपनी मिरज- टाकळी रोड मिरज | दिनांक २०.७.२०१५ रोजी १२.२५ वा. सुमारास | रास्ता रोको प्रयत्न :- मिरज- टाकळी रस्ता दुरुस्त करावा या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन करण्याच्या उद्देशाने रस्त्यावर येवू लागताच पोलीस निरीक्षक मिरज शहर यांनी त्यांना मुपोकाक ६८ प्रमाणे १२.२५ वा. ताब्यात घेतले व १२.४५ वाजता मुपोकाक ६९ प्रमाणे १२.४५ वा. सोडून दिले आहे. |
| १६. | माळावाडी ग्रामस्थ | १. श्री महादेव शिवाजी महींद वगैरे १० सर्व रा. माळवाडी | माळवाडी ग्रामपंचातय कार्यालया समोर | दिनांक २०.७.२०१५ रोजी ११.०० वा ते १७.४५ वा | धरणे आंदोलन :- माळवाडी ग्रामपंचायतीचे अकार्यक्षम ग्रामविकास अधिकारी व भ्रष्ट मनमानी कारभार करणारी माळवाडी ग्रामपंचायतीचे निषेधार्थ धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत श्री संजय माने — विस्तार अधिकारी व श्री विजय कांबळे- सभापती पंचायत समिती यांनी आंदोलनाचे ठिकाणी येवून सदर बाबत चौकशी करण्याचे आश्वासन दिले. |
| १७. | निवारा हक्क संघर्ष समिती कुंडल | श्री भारत पाटणकर - अध्यक्ष श्रमिकमुक्ती दल यांचे नेतृत्वाखाली | आमराई ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | दिनांक २०.७.२०१५ रोजी १३.३५ वा. ते १३.४५ वा. | मोर्चा :- कुंडल तालुका पलूस येथील वाल्मीकी या शासकीय इमारतीमुळे सुमारे २०० कुटूंब बेघर झाली आहेत त्यांना वन विभागाकडून सर्व प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देतो असे सांगून ही अदयाप पर्यंत सुविधा उपलब्ध केलेली नाही याचे निषेधार्थ १०० ते १२५ लोकांनी असा मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले |
| १८. | माळवाडी ग्रामस्थ | महादेव शिवाजी महिंद वगैरे १० ग्रामस्थांनी | माळवाडी ग्रामपंचायात समोर | २०.७.२०१५ रोजी ११.०० वा ते दि. २२.०७.२०१५ रोजी १७.०० वा. | धरणे आंदोलन :- माळवाडी ग्रामपंचायतीचे अकार्यक्षम ग्रामविकास अधिकारी व भ्रष्ट मनमानी कारभार करणारी माळवाडी ग्रामपंचायत यांचे विरोधात धरणे आंदोलन सुरु केले होते. श्री. पृथ्वीराज देशमुख्र - माजी आमदार, पलुस पंचायतीचे गटविकास अधिकारी श्री. जोशी यांनी वरील धरणे आंदोलनकर्त्यांशी त्यांच्या मागण्याबाबत चर्चा केली. चर्चेमधे आंदोलन कर्त्यांचे समाधान झालेने त्यांनी सदरचे धरणे आंदोलन |
| १९. | सांगली जिल्हा कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना | सचिव प्रा.एन डी बिरनाळे | आमराई ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | दि. २२.०७.२०१५ रोजी १४.५० ते १६.३० या वेळेत | मोर्चा :- २०११-१२ पासून २०१४-१५ पर्यंत वाढीव पदांना त्वरीत मान्यता दयावी, ऑनलाईन मान्यता त्रुटी दूर करावयात, सन २००७ ते २०१५ अख्रेर वाढीव पदावरील शिक्षकांना पगार मिळावा या व इतर मागण्यासाठी असा मोर्चा काढला. सदरचा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. दरम्यान मुदतीत आपल्या मागण्यांचे निवेदन निवासी जिल्हाधिकारी श्री. शिंदे यांना दिले. जनसमुदाय- १०० ते १२५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २०. | महात्मा फुले समता परिषद | जिल्हाध्यक्ष श्री. दत्तात्रय घाडगे | जिल्हाध्यक्ष श्री. दत्तात्रय घाडगे | २६.०७.२०१५ रोजी ११.०० वा ते १४.०० या वेळेत | मूक धरणे आंदोलन :- जातीय निहाय जनगनना जाहीर करावी या मागणीसाठी स्टेशन चौक, सांगली येथे मूक धरणे आंदोलन करण्यात आले. जनसमदाय १० ते १५. |
| २१. | रिक्षा चालक मालक व रिक्षा संघटना | नितीन शिंदे- माजी आमदार म.न.से सांगली, | म.न.पा. शाळा नं. १ चे मैदानात | दिनांक २६.०७.२०१५ रोजी १७.३० ते १८.३५ या वेळेत | बैठक :- टप्पा वाहतुकीस बंदी घालण्याकरीता तीव्र आंदोलने करणेचे आहे वगैरे विषयावर मित्रमंडळ चौकातील पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. बैठकीत प्रमुख्र वक्ते नितीन शिंदे- माजी आमदार म.न.से सांगली, महेश कांबळे- मिरज यांनी मार्गदर्शन केले. बैठकीस ३० ते ३५ लोक हजर होते. |
| २२. | रिपब्लीकन युथ फोर्स मिरज | श्री महेंद्र गाडे- जिल्हाध्यक्ष | सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका कार्यालय मिरज समोर | २९.०७.२०१५ रोजी ११.३० वा ते ११.५५ वा या वेळेत | निदर्शने:- मिरज शहरातील चामडयाचा व्यापार मिरज शहरातून हद्दपार करावा या व इतर मागण्या करीता निदर्शने केली. त्यानंतर शिष्ठ मंडळाने मागण्याचे निवेदन श्रीमती टिना गवळी - सह उपायुक्त, मनपा, कार्यालय मिरज यांना देण्यात आले. जनसमुदाय- १५ ते २० |
| २३. | अंगणवाडी कर्मचारी संघटना | श्री. बिराज साळुंखे अध्यक्ष | मिरज पंचायत कार्यालयासमोर | २२.०७.२०१५ रोजी ११.०० वा ते १५.०० वा | धरणे आंदोलन :- अंगणवाडी सेविकांचे थकित मानधन मिळावे या मागण्यासाठी धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत श्री. यु एम वाघमोडे यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेवून मागण्यांचे निवेदन स्विकारले. व थकित वेतन त्वरीत देण्याची व्यवस्था करीत असल्याचे आश्वासन दिले. जनसमुदाय- ९० ते १०० अंगणवाडी सेविका व कर्मचारी |
| २४. | महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघ | श्रीमती मंगला सराफ - कार्याध्यक्ष | सांगली एस. टी. स्टँड ते जिल्हापरीषद सांगली | दिनांक २३.०७.२०१५ रोजी १२.५० ते १५.०० या वेळेत | थाळीनाद मोर्चा :- अंगणवाडी कर्मचारी यांच्या विविध मागण्याकरीता असा थाळीनाद मोर्चा काढण्यात आला. मोर्चा जिल्हा परीषद येथे पोहचलेनंतर आपल्या मागण्यांचे निवेदन श्री. किरण जाधव - उप मुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण विभाग जि.प. सांगली यांना देण्यात आले. सदर मोर्चामधे ५०० ते ५५० अंगणवाडी महिला कर्मचारी सहभागी झालेल्या होत्या. |
| २५. | वैयक्तीक | श्री महेंद्र मारुती कांबळे- रा. नागराळे ता. पलूस | उप निबंधक,पलूस यांचे कार्यालयासमोर | ३०.७.२०१५ ते ६.८.२०१५ रोजी १६.०० | आमरण उपोषण : डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी पाणी पुरवठा संस्था नागराळे यांचे कडे शेतामध्ये पाईप लाईन जोडून देणे बाबत मागील ४ वर्षापासून मागणी करून ही पाणी पुरवठा सहकारी संस्थेने पाईप लाईन जोडून दिलेली नाही याचे निषेधार्थ पासून आमरण उपोषणास बसले होते.दिनांक ६.८.२०१५ रोजी संस्थेच्या संचालक मंडळाची व आरपीआय कार्यकर्त्यांची बैठक पार पडली सदर बैठकी मध्ये सध्या पाणी पुरवठा संस्था अर्थिक अडचणी मध्ये असल्याने अर्जदार यांना भुईपाटाने पाणी देण्याची व्यवस्था करण्या येईल व संस्थेची आर्थिक परिस्थीती सुधारल्यानंतर पाईप लाईन जोडून देण्यात येईल असा निर्णय झाल्यांनतर उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| २६. | सांगली शहर सुधार समिती | श्री जनार्दन गोंधळी | सांगलवाडी | ०१.०९.२०१५ १९.२० वा. ते २०.२० | कॉर्नर सभा : सांगलीवाडी राम मंदीर जवळील मोकळया जागेत वार्डामध्ये नागरी सुविधा मिळाव्यात या विषयावर कॉर्नर सभा पार पडली. प्रमुख्र वक्ते ॲड श्री अमित शिंदे, श्री भगवान हारुगडे, श्री विष्णू पाटील यांनी नगरसेवकांनी एरीया सभा घेतली पाहीजे या बाबत मार्गदर्शन केले. सदर वेळी ३० ते ४० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| २७. | सांगली शहर सुधार समिती | श्री सचिन मच्छिंद्र कांबळे- रा. वॉन्लेसवाडी | ढेरे मळा, वॉन्लेसवाडी | ०२.०८.२०१५ रोजी १८.०० वा. ते २१.०० वा. | कॉर्नर सभा : वार्डामध्ये नागरी सुविधा मिळाव्यात, नागरीकांचे सामाजीक हक्क व अधिकार काय आहेत याबाबत माहीती देणे या विषयावर कॉर्नर सभा पार पडली. सदर वेळी ७० ते ८० जनसमदाय उपस्थीत होता. |
| २८. | दि. सॅलरी ऑनर्स को.ऑप. सोसायटी | श्री लालासाहेब भगवान मोरे- चेअरमन | दिनानाथ मंगेशकर नाटयगृह सांगली | २.८.२०१५ रोजी १०.३० वा ते ११.०५ वा. | वार्षिक सर्वसाधारण सभा : दि. सॅलरी ऑनर्स को.ऑप. सोसायटीची १०३ व्या सत्राची वार्षिक सर्वसाधारण सभा यांचे अध्यक्षते खाली पार पडली. सदर वेळी ४०० ते ४५० सभासद उपस्थीत होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९. | ग्रामस्थ | श्री जयवंत मदने | नागठाणे ग्रामपंचायत कार्यालयासमोर | दिनांक ३.८.२०१५ रोजी ११.०० वा. ते १५.१० वाजता | धरणे आंदोलन : श्री जयवंत मदने वगैरे ९ ग्रामस्थांनी ग्रामपंचायत नागठाणे येथील भ्रष्ट व बोगस कारभाराची चौकशी होवून विविध मुद्याबाबत लेखी माहीती मिळावी या व इतर मागण्याकरीता बेमुदत धरणे आंदोलन सुरु केले होते. श्री पृथ्वीराज देशमुख - माजी आमदार, श्री अरुण लाड चेअरमन क्रांती सहकारी साखर कारखाना, श्री जोशी – गट विकास अधिकारी पलूस पंचायत समिती, श्री संजय माने- विस्तार अधिकारी यांनी आंदोलनाचे ठिकाणी भेट देवून मागण्याबाबत चर्चा केली. चर्चे मध्ये आंदोलनकर्ते यांचे समाधान झाल्याने स्थगित केले आहे. |
| ३०. | रणसंग्राम सोशल फाउंडेशन कुंडल | ॲड दिपक लाड- संस्थापक | खारगे चौक, कुंडल | दिनांक ०३.०८.२०१५ रोजी १९.०० वा. ते २१.०० वा. | सांगता समारंभ : लोक शाहीर आण्णाभाऊ साठे व क्रांतीसिंह नाना पाटील यांचा विचार जागर पंधरवडा अभियान सांगता समारंभ पार पडला. सदर कार्यक्रमाचे वेळी प्रमुख वक्ते प्रा. डॉ.श्री बाबुराव गुरव- विद्रोही सांस्कृतीक चळवळीचे नेते व ॲड. मनिषा रोटे- मुख्य संघटीका लोकशासन आंदोलन यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या विचारधारेवर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास १५० ते २०० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| ३१. | हुव्ळे प्लॉट रहीवासी क्रांती समिती मालगांव ता. मिरज | श्री शाहीन शेख | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | दिनांक ०४.८.२०१५ रोजी ११.०० वा. ते १४.१५ वा. | धरणे - हुव्ळे प्लॉट , मालगांव ता.मिरज येथील रहीवाश्यांची ८ अ चे उता-यावर नांवे लावावीत या इतर मागण्याकरीता धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत श्री शेखर गायकवाड- जिल्हाधिकारी सांगली यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले. जनसमुदाय ३० ते ३५ महीला |
| ३२. | -- | -- | अहील्यादेवी होळकर चौक करगणी | -- | गुन्हा दाखल माहिती : करगणी या गावांत पुण्यश्लोक अहील्यादेवी होळकर यांचा अर्ध पुतळा बसविण्यात आलेला आहे. अर्धपुतळयास नुकसान करण्याच्या उद्देशाने दगड मारुन पुतळयाचे अंशतः नुकसान करुन धनगर समाजाच्या भावना दुखावल्याबाबत आटपाडी पोलीस ठाणे दखलपात्र गुरनं ९९/२०१५ भा. द. वि. सं. कलम २९५, दिनांक १२.०८.२०१५ रोजी दाखल झाले दखलपात्र गुन्हा दाखल आहे. |
| ३३. | जेष्ठ नागरीक संघ समन्वय समिती | श्री गोविंदराव परांजपे- अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालया समोर | ११.८.२०१५ रोजी ११.०० वा. ते १७.०० वा. | धरणे - राज्याचे जेष्ठ नागरीक धोरण जाहिर झाले आहे परंतू त्याची अंमलबजावणी झालेली नाही तरी त्याची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी या व इतर मागण्याकरीता धरणे आंदोलन करण्यात आले. जनसमुदाय ४० ते ५० जेष्ठ नागरीक |
| ३४. | राष्ट्रीय बसवेश्वर सेना | श्री बश्वराज पाटील - अध्यक्ष | गुड्डापूर ता. जत | दिनांक १३.८.२०१५ रोजी १०.०० वा. ते १७.०० वा. | महामेळावा : लिंगायत धर्म महामेळावा पार पडला. सदर मेळाव्यास श्री बसवजय मृत्यूंजय महास्वामीजी जगत् गुरु पंचमसाली मठापीठ व श्री सिध्दुमोदी - माजी मंत्री कर्नाटक राज्य यांनी मार्गदर्शन केले. मेळाव्यास १५०० ते १७०० जनसमुदाय हजर होता. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३५. | सर्व पक्षीय | --- | विश्रामगृह सांगली | दि. ०६.०८.२०१५ रोजी | बैठक : सर्वपक्षीय टोल विरोधी कृती समितीची बैठक पार पडली आहे. सदर बैठकीत मा. आमदार श्री. सुधीर गाडगीळ, श्री. विवेक कांबळे- महापौर सांमिकु महानगरपालिका, श्री. प्रशांत पाटील- उप महापौर, दिग्वीजय सुर्यवंशी- विरोधी पक्षनेता सांमिकु महानगरपालिका, श्री. बापूसाहेब पाटील स्वातंत्र्यसैनिक, श्री. पृथ्वीराज पाटील- काँग्रेस शहराध्यक्ष, श्री. पृथ्वीराज पवार- शिवसेना, श्री. सतिश साखळकर- निमंत्रक टोलविरोधी कृती समिती, अतुल शहा- अध्यक्ष व्यापारी महसंघ, श्रीमती स्वरदा केळकर- नगरसेविका भाजप, श्री. युवराज बावडेकर, श्री. संदीप राजोबा- युवाअध्यक्ष स्वा.शे.सं.,अंजिक्य पाटील- शिवसेना उप जिल्हाप्रमुख, बाळासाहेब कलशेट्टी, ॲड. अमित शिंदे, महेश पाटील ,सागर घोडके- राष्ट्रवादी कॉ., तानाजी सावंत- मनसे, सुरेश दुधगांवकर- आरपीआय, आदित्य पटवर्धन, प्रशांत मजलेकर- माजी उप महापौर, आशिश कोरे, आनंदराव पवार- शिवसेना सांगली जिल्हाप्रमुख या नेत्यांनी अन्यायी टोल वसूलीबाबत आपआपली मते व्यक्त केली त्यामध्ये वरील प्रमुख वक्त्यांनी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळेच न्यायालयाचे आदेशाने गाडलेले टोलचे भूत पुन्हा उभे राहीले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदाराला सोयीस्कर भूमीका घेत दुर्लक्ष केल्यानेच जनतेवर पुन्हा टोलचा भुर्दंड बसणार आहे, तरी टोल वसुली बंद व्हावी याकरीता तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. तसेच टोल वसुली सुरु करु नये याबाबत शासनाने योग्य पावले उचलावी यासाठी पालकमंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांची भेटून निवेदन दिले आहे. |
| ३६. | अखिल भारतीय ब्राम्हण महासंघ शाखा सांगली | श्री केदार खाडीलकर – जिल्हा अध्यक्ष व श्री मंगेश ठाणेदार- सांगली शहर अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | दिनांक १३.८.२०१५ रोजी ११.५० वाजता | निवेदन-.ब्राम्हण पुरोहितांना मासिक वेतन दयावे, २. ॲट्रॉसिटी ॲक्ट कलमाखाली ब्राम्हण समाजास संरक्षण दयावे, ३. ब्राम्हण तरुणांसाठी वेगळया आर्थिक सहकारी संस्था स्थापन कराव्यात या व इतर मागण्याचे निवेदन यांनी एकत्र जमून श्री टी. पी. दोरकर- तहसीलदार सर्वसाधारण यांना दिले. त्यानंतर सदरचे कार्यकर्ते शांततेत निघून गेले आहेत.जनसमुदाय - १५ |
| ३७. | शिराळा ग्रामस्थ | --- | शिराळा पोलीस ठाणेत | दि.१६.८.२००१५ रोजी १७.१५ वा.ते २१.१५ वा. | बैठक - शिराळा येथील नागपंचमीचे संदर्भात बैठक घेतली बैठकीस उपविभागीय पोलीस अधीकारी, व इतर पोलीस ठाणेकडील अधीकारी तसेच शिराळा येथील नागपंचमी साजरी करणारे मंडळे,प्रतिष्ठीत नागरीक शांतता कमीटीचे पदाधिकारी वैगेरे उपस्थित होते त्यावेळी त्यांना नागपंचमी ही शांततेत व कायदा सुव्सवस्थेस बाधा न आणता साजरी करणेबाबत अवाहन केले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३८. | विश्वहिंदू परिषद व बजरंग दल | श्री प्रताप विजय गायकवाड रा. कापरी ता. शिराळा-प्रखंड मंत्री | अंबामाता मंदीर, शिराळा | दिनांक १३.८.२०१५ रोजी १९.१५ वा. ते १९.५० वा. | बैठक : ह.भ.प.श्री संतोष दत्तात्रय कोळी उर्फ बाळ महाराज रा. इंचलकरंजी (व्हर्बेटीम यादी २०१५ अ.नं.५४ ) यांच्या प्रमुख उपस्थीतीत येथे शिराळा नागपंचमी या विषयावर बैठक पार पडली.<br>ह.भ.प.श्री संतोष दत्तात्रय कोळी उर्फ बाळ महाराज रा. इंचलकरंजी (व्हर्बेटीम यादी २०१५ अ.नं.५४) यांनी आपले भाषणामध्ये, पुजा करणे हा हिंदूचा हक्क आहे. शिराळा नागपंचमीला प्राचिन इतिहास आहे. या नागपंचमीसाठी देश विदेशातून भाविक मोठया संख्येने येत असतात. नागाचे विष न काढता पुजा करण्याचा आणि पुन्हा त्यांना सोडून देण्याची परंपरा आहे. हा उत्सव १२ व्या शतकात श्री गोरक्ष नाथानी सुरु केला होता. ती परंपरा व कायदयाचा बाऊ करुन मोडीत काढण्याचा आणि हिंदू श्रध्देवर गंडांतर आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. भारतीय परंपरा आणि पर्यावरण संवर्धन यांचा मिलाफ म्हणून नागपंचमीकडे पाहीले जाते. प्रशासनाने या दृष्टीने उत्सवाकडे पाहणे आवश्यक आहे, त्या दृष्टीने मध्य काढला पाहीजे. परंतू ते न करता केवळ कांहीजणांच्या विरोधामुळे हा उत्सव बंद पाडू नये. प्रसंगी वन अधिका-यांच्या देखरेखी खाली आम्हीच काय समस्त शिराळा वासिय नागपंचमी साजरी करतील. मुस्लीम धर्मिय हे सकाळी ५ वाजता मशिदीवरील भोंग्यावरुन आजाण देतात, त्यांना कोणीही बंधक घालत नाही परंतू आम्ही वर्षातून १ दिवस साजरा करतो त्यास मात्र सगळी कडून बंधने घातली जातात. कांही लोक शिराळा येथील नागपंचमी मध्ये जिवंत नागांची पुजा बंद करण्याचे षडयंत्र करीत आहेत असे होवू देणार नाही, विश्वहिंदू परिषद तुमच्या पाठीशी आहे. आपण सर्वानी नागपंचमी पुर्वी प्रमाणे साजरी करायचीच, तसेच नागपंचमी दिवशी १९.८.२०१५ रोजी सकाळी ०८.३० वाजता मंदीरामध्ये सर्वानी येवून जिवंत नागाची पुजा करायचीच त्यावेळी मी सुध्दा येणार आहे, असे वक्तव्य केले आहे. सदर कार्यक्रमास श्री प्रताप विजय गायकवाड, श्री जवार छाबडा रा. इचलकरंजी, यांचे सह २०० ते २५० ग्रामस्थ उपस्थित होते. |
| ३९. | वैयक्तीक | सौ अनुसया वसंत सुर्यवंशी रा. ढवळेश्वर ता.खानापूर | तहसिलदार कार्यालय विटा समोर | दिनांक ९.८.२०१५ रोजी स.१०.०० वा. ते दिनांक १०.८.२०१५ रोजी २०.३० वाजता | उपोषण - सौ अनुसया वसंत सुर्यवंशी रा. ढवळेश्वर ता.खानापूर हया त्यांचे मालकीचे ढवळेश्वर हददीतील गट नं. ५८० या जमीनीमध्ये श्री सिताराम फाटक व त्यांचे दोन बंधु यांनी पिकावर तणनाशकाचे विषारी औषध मारुन पिकाचे सुमारे ३०,०००/- चे नुकसान केले आहे तरी त्यांचेवर गुन्हा दाखल करुन कायदेशीर कारवाई करावी या मागणीकरीता आमरण उपोषणास बसल्या होत्या. तहसीलदार श्रीमती अंजली मरोड यांनी उपोषणकर्त्या सौ अनुसया सुर्यवंशी यांची भेट घेवून चर्चा केली व कागदपत्रे पाहून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याने उपोषणकर्त्या यांनी मागे घेतले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४०. | श्रमिक मुक्ती दल | श्री वसंत दादू पाटील- राज्य कार्यकारणी सदस्य श्रमिक मुक्ती दल | मणदूर हुतात्मा स्मारक ते चांदोली धरण गेट असा | दिनांक ९.८.२०१५ रोजी १५.४० वा. ते १६.३० वा. | मोर्चा : धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबीत मागण्याबाबत निर्णय होवून ही अनेक वर्षे मागण्यांची पुर्तता झालेली नाही या करीता वतीने यांचे मोर्चा काढण्यात आला. सदर वेळी डॉ भारत पाटणकर-अध्यक्ष श्रमिक मुक्ती दल, श्री दिलीप पाटील - श्रमिक मुक्ती दल राज्य कार्यकारणी सदस्य सातारा, श्री मारुती पाटील- राज्य कार्यकारणी सदस्य कोल्हापूर यांचे सह १०० ते १२५ स्त्रीया व ३०० ते ३५० पुरुष असे एकुण ४०० ते ५०० धरणग्रस्त प्रकल्पग्रस्त हजर होते. चांदोली धरण गेट या ठिकाणी श्री निकम- सहा. अभियंता पाटबंधारे उपविभाग कोडोली, श्री शिंदे- सहा. अभियंता पाटबंधारे विभाग वारणावती, श्री झुरे- विभागीय वन अधिकारी, वनजीव कोल्हापूर, श्री कदम- शाखाधिकारी पाटबंधारे उपविभाग वारणावती श्री कुंभार- सर्कल चरण या शासकीय अधिका-यांनी उपस्थीत राहून मागण्याचे निवेदन स्विकारले. चांदोली धरण गेट येथे डॉ. भारत पाटणकर यांनी उपस्थीत धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त यांना त्यांच्या मागण्याबाबत मार्गदर्शन केले.त्यानंतर आंदोलनकर्ते परत मणदूर हुतात्मा स्मारक या ठिकाणी आले नंतर मोर्चा शांततेत संपलेला आहे. |
| ४१. | टोल विरोधी कृती समिती, सांगली | -- | सांगली - इस्लांमपूर रोडवरील टोल नाक्याजवळ | दिनांक १०.०८.२०१५ रोजी ११.४० वाजता | धरणे - सांगली - इस्लांमपूर रोडवरील सांगली येथील बायपास पुलाचा टोल वसूली करणेबाबत न्यायालयाने अशोका बिल्डकॉन कंपनीच्या बाजूने निकाल दिल्याने अशोका बिल्डकॉन कंपनीने टोल वसूली सुरु करण्याबाबत हालचाली सुरु केल्या असल्याची माहीती टोल विरोधी कृती समितीच्या कार्यकर्त्यांनी दिनांक १०.८.२०१५ रोजी धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्या अनुषंगाने दिनांक १०.८.२०१५ रोजी १०.१५ ते ११.४५ वा या वेळेत सांगली शहर पोलीस ठाणे येथे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील टोलविरोधी कृती समितीच्या कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. बैठकीत उप विभागीय पोलीस अधिकारी शहर विभाग सांगली यांनी टोल वसुलीच्या अनुषंगाने न्यायालयीन आदेशाची माहीती देवून आंदोलन करण्यापासून परावृत्त करुन मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देणे बाबत मार्गदर्शन केले.टोल वसूली विरोधात धरणे आंदोलन करण्यासाठी चे शहरालगतच्या इतर गांवातील कार्यकर्ते सांगली - इस्लांमपूर रोडवरील टोल नाक्याजवळ जमा झाले होते. सदरबाबत सांगली शहर पोलीस ठाणेस माहीती मिळाल्याने सांगली शहर पोलीस ठाणे कडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी १६ कार्यकर्त्यांना ११.४० वाजता मुपोकाक ६८ प्रमाणे ताब्यात घेतले. त्यानंतर टोल विरोधी कृती समितीच्या कार्यकर्त्यांच्या शिष्ठमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे जावून मागण्याचे निवेदन श्री शिंदे- निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना दिलेनंतर १४.१५ वाजता ताब्यात घेतलेल्या कार्यकर्त्यांना मुपोकाक ६९ प्रमाणे मुक्त करण्यात आले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४२. | शिवप्रतिष्ठान संघटना सांगली | श्री हणमंत पवार- विभाग प्रमुख | छ. शिवाजी महाराज पुतळा,मारुती चौक सांगली | दिनांक १९.८.२०१५ रोजी १८.३५ वा. ते १८.५५ वा. | श्री बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र भुषण पुरस्कार प्रदान केलेचे अनुषंगाने शासनाचे समर्थनार्थ साखर वाटून व फटाक्याची आतषबाजी करुन आनंदोत्सव साजरा केला. छ. शिवाजी महाराज यांचे पुतळयास प्रदक्षिणा घालून ध्येय मंत्र व प्रेरणा मंत्र म्हंटले. त्यानंतर श्री सचिन पवार, युवराज बावडेकर, श्री हणमंत पवार यांनी श्री बाबासाहेब पुरंदरे यांचे मुळे देशात व राज्यात तळागाळापर्यंत छ. शिवाजी महाराजांचा इतिहास समजला आहे त्यामुळे कांही संघटनांनी पुरस्कारास विरोध केला परंतू शासनाने योग्य व्यक्तीला पुरस्कार दिला आहे म्हणून शासनाचे अभिनंदन वगैरे भाषणे केली. सदर वेळी श्री हणमंत पवार- शिवप्रतिष्ठान, श्री बापू हरीदास-शिवप्रतिष्ठान, श्री केदार खाडीलकर-शिवप्रतिष्ठान, श्री सचिन पवार-शिवप्रतिष्ठान, श्री मोहनसिंग रजपूत – शिवप्रतिष्ठान, युवराज बावडेकर- भाजपा, श्री श्रीराम कुलकर्णी- विश्वहिंदू परिषद वगैरे प्रमुख कार्यकर्ते उपस्थीत होते. जनसमुदाय - २५ ते ३० |
| ४३. | जामा मशिद तासगांव | श्री हाजी यासीन मुल्ला - अध्यक्ष | जामा मशिद, तासगांव | दिनांक १८.८.२०१५ रोजी १०.०० वा. ते २१.२० वा. | इस्तेमा : श्री अबु नशर मुल्ला रा. मुस्लीम मोहल्ला तासगांव यांचे संयोजनाखाली मुस्लीम धर्मियाचा जोड इस्तेमा पार पडला. सदर कार्यक्रमास १८०० ते २००० मुस्लीम लोक उपस्थीत होते. |
| ४४. | श्रमिक मुक्ती दल | श्री भारत पाटणकर- अध्यक्ष | सिध्दनाथ मंदीर, खरसुंडी | दिनांक १८.८.२०१५ रोजी १०.३० वा. ते १२.३० वा. | बैठक - आटपाडी तालुक्यास टेंभू योजने पाणी सोडणे या विषयावर बैठक पार पडली. बैठकीस श्री आनंदराव पाटील, श्री राहुल गुरव या प्रमुखा सह ५० ते ६० ग्रामस्थ उपस्थीत होते सदर बैठकीमध्ये आगामी कालावधी मध्ये आटपाडी तालुक्यास टेंभू योजनेचे पाणी न सोडल्यास दिनांक २४.८.२०१५ रोजी आटपाडी तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. |
| ४५. | जेष्ठ नागरीक समन्वय समिती इस्लांमपूर | श्री जगन्नाथ भगवान मोरे- तालुका अध्यक्ष | शिवाजी पुतळा ते तहसील कार्यालय इस्लांमपूर असा | दिनांक १७.८.२०१५ रोजी ११.३० वा ते १३.०० वा. | मोर्चा - जेष्ठ नागरीकांना २००० /- रुपये पेन्शन मिळाली पाहीजे, जेष्ठ नागरीकां मोफत औषण उपचार मिळाला पाहीजे या व इतर मागण्या करीता मोर्चा काढला. मोर्चा तहसील कार्यालया इस्लांमपूर येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन सौ. रुपाली सरनोबत – तहसीलदार इस्लांमपूर यांना देण्यात आले. जनसमुदाय १५० पुरुष व १५० महीला |
| ४६. | जेष्ठ नागरीक समन्वय समिती पलूस | श्री लक्ष्मण आणा पाटील- तालुका अध्यक्ष | धोंडीराज मंदीर ते तहसील कार्यालय पलूस असा | दिनांक १७.८.२०१५ रोजी १०.१५ वा ते ११.३० वा. | मोर्चा - जेष्ठ नागरीकांना २००० /- रुपये पेन्शन मिळाली पाहीजे, जेष्ठ नागरीकां मोफत औषण उपचार मिळाला पाहीजे या व इतर मागण्या करीता मोर्चा काढला. मोर्चा तहसील कार्यालया पलूस येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन नायब तहसीलदार पलूस यांना देण्यात आले. जनसमुदाय ४० ते ५० महीला जेष्ठ नागरीक |
| ४७. | | श्री दिपक रामाण्णा माने- सामाजीक कार्यकर्ता | सामाजीक न्याय भवन सांगली | दिनांक १७.८.२०१५ रोजी ११.०० वा ते १२.४० वा. | धरणे आंदोलन : अनेक महीन्यापासून मागासवर्गीय औदयोगीक सहकार संस्थेची चौकशी करुन कारवाई करावी या व इतर मागण्यासाठी धरणे आंदोलन करुन निदर्शने केली. मागण्याचे निवेदन श्री दिपक घाटे- समाज कल्याण अधिकारी यांना दिले जनसमुदाय : ४० ते ५० नागरीक |
| ४८. | सांगली जिल्हा जेष्ठ नागरीक संघ समन्वय समिती | श्री गोविंदराव परांजपे – जिल्हाध्यक्ष | जिल्हाधिकारी सांगली | दिनांक १७.८.२०१५ रोजी १०.५०. वा. | निवेदन - राज्याचे जेष्ठ नागरीक धोरण जाहीर झाले आहे परंतू त्याची अंमलबजावणी झालेली नाही तरी त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी या मागणीचे निवेदन श्री शेखर गायकवाड- जिल्हाधिकारी सांगली यांना दिले आहे. जनसमुदाय : १० ते १५ जेष्ठ नागरीक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४९. | महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती | श्री.राहुल थोरात सचिव | डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा शास्त्री चौक सांगली | दि.२०.०८.२०१५ रोजी ११.३० ते १६.०० | निवेदन : डॉ.नरेंद्र दाभोळकरांच्या खुनास दोन वर्ष पुर्ण झाली तरी मारेकरी सापडले नाहीत म्हणुन मा.राष्ट्रपती यांना डॉ.नरेंद्र दाभोळकर के हत्यारोंको कब पकडा जायेगा या ओळीचे पत्र लिहण्याचा उपक्रम राबविण्यात आला.दरम्यान मुदतीत शिष्टमंडळाने मागण्याचे निवेदन श्री.शेखर गायकवाड - जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले.जनसमुदाय १० ते १५ |
| ५०. | जिल्हा धनगर समाज | श्री गोपीचंद पडळकर सांगली | सांगली स्टेशन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय | दिनांक २०.०८.२०१५ रोजी १२.३० ते १२.५० | मोर्चा : धनगर समाजाचे नेते गृह राज्य मंत्री मा. राम शिंदे यांच्या अहमदनगर येथील ऑफिसची मोडतोड काही समाजकंटकांनी केली आहे.त्यांचेवर कारवाई करावी व संबधित संघटनेवर कायमस्वरुपी बंधी घालावी या व इतर मागण्याकरीता मोर्चा काढण्यात आला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय येथे आल्यानंतर निदर्शने करुन शिष्टमंडळाद्वारे मागण्याचे निवेदन श्री.शेखर गायकडवाड-जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले.जनसमुदाय १५० ते १७५ इतका हजर होता. |
| ५१. | शिवसन्मान जागर परीषद, सांगली | डॉ.संजय पाटील | छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळयासमोर | दि.२०.०८.२०१५ रोजी ११.२५ ते ११.३५ | आत्मक्लेश : श्री.बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्र भुषण पुरस्कार दिलेचे निषेधार्थ "छत्रपती शिवाजी महाराज आम्ही सर्वजण आपली जड अंतकरणाने आत्मक्लेषाने पिडीत होवून आपणांसमोर नतमस्तक होवून जाहीर माफी मागत आहोत आम्ही राष्ट्रमाता जिजाऊ मांसाहेब व आपली तसेच कुणबीयांचा मराठे सरदार व त्यांच्या आया - बहिणींची बदनामी करणाऱ्यांना आज राज्यमान्यता मिळाली आहे.त्याचा आम्ही जाहिर धिक्कार व निषेध करीत आहोत.आम्ही तुम्हा सर्वांची बदनामी रोखु शकलो नाही.त्यास आम्ही असमर्थ ठरलो याप्रसंगी आम्ही आपली शपथ घेतो की, आम्ही आजपासुन तुम्हां सर्वांची बदनामीकारक विकृत लिहलेला खोटा इतिहास मिटेपर्यंत प्रबोधनाच्या माध्यमांतुन लोकशाही मार्गांने खरा इतिहास सर्व लोकांच्यापर्यंत पोहचवण्याचे कार्य आमच्या अखेरच्या श्वसापर्यंत करण्यास कटीबद्ध आहोत." असा माफीनामा व शपथ घेण्यात आली. जनसमुदाय : १५ ते २० |
| ५२. | जैन धर्मिय | -- | इनामधामणी, अंकली, समडोळी, नांद्रे, दुधगांव | दिनांक २४.८.२०१५ रोजी ०८.०० ते १८.०० वा. | दुकाने बंद : जैन समाजाच्या धर्म गुरुंच्या कडून करण्यात येणारी आत्मसल्लेखना ही आत्महत्या आहे त्यास प्रोत्साहन देणारे वर भादविस कलम ३०९, ३०६ प्रमाणे कारवाई करावी असा निर्णय राजस्थान उच्च न्यायालयाने दिला आहे. तो निर्णय जैन धर्मिय लोकांवर अन्यायकारक आहे याचे निषेधार्थ जैन धर्मिय लोक आपली दुकाने,व्यवहार १०० टक्के बंद ठेवून जयसिंगपूर येथे काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये सहभागी होण्यासाठी गेले होते. नंतर जैन धर्मियांनी आपली दुकाने व व्यवहार सुरु केले. |
| ५३. | श्रमिक मुक्ती दल | श्री भारत पाटणकर - अध्यक्ष | आटपाडी एस टी स्टँड ते आटपाडी तहसील कार्यालय असा | दिनांक २४.८.२०१५ रोजी १२.०५ ते १४.३० वा. | मोर्चा : जनावरांना चारा छावणी व पिण्याच्या पाण्याचे टँकर चालू करावेत, आटपाडी तालुक्यासाठी टेंबू योजनेचे पाणी सोडावे या व इतर मागण्यासाठी काढला. मोर्चा तहसील कार्यालय येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री जोगेंदर कटारीया – तहसीलदार यांना देण्यात आला आहे. जनसमुदाय ७० ते ८० |
| ५४. | रामोशी समाज ग्रामस्थ | अमोल विलासराव मंडले रा. विटा | बानूरगड | दिनांक २३.८.२०१५ रोजी १२.०० ते १५.०० वा. | मेळावा : बहीर्जी नाईक समाधी स्थळा जवळ बानूरगड ता. खानापूर येथे व श्री अनिल बाबर- आमदार शिवसेना यांचे उपस्थीतीत रामोशी बेरड समाजाचा मेळावा पार पडला. श्री दादासाहेब जाधव, श्री खाशाबा दळवी या प्रमुखासह १५० ते १७५ जनसमुदाय उपस्थीत होता. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५५. | शिराळा ग्रामस्थ | -- | अंबामाता मंदीर शिराळा | दिनांक २६.८.२०१५ रोजी १९.३० ते २०.०० वा. | बैठक : दिनांक १९.८.२०१५ रोजी शिराळा येथे नागपंचमी उत्सव पार पडला सदर वेळी ध्वनी प्रदुषण अधिनियमाचा भंग केले बाबत पोलीस विभागाने गुन्हे दाखल कारवाई केली आहे. शिराळा ग्रामस्थ व नागमंडळ संदस्यांची बैठक पार पडली. बैठकीमध्ये ध्वनी प्रदुषण अधिनियमाचा भंग केले बाबत पोलीस विभागाने गुन्हे दाखल केलेचे निषेधार्थ चर्चा होवून दिनांक २७.८.२०१५ रोजी शिराळा गांव बंद पाळण्याचा व मोर्चाने शिराळा पोलीस ठाणे येथे येवून ठिया आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर बैठकीस २०० ते २५० लोक उपस्थीत होते. |
| ५६. | ग्रामस्थ | शिवाजी शंकर पाटील | लाडेगाव पाणी पुरवठा संस्था कार्यालयाचे | दिनांक २४.०८.२०१५ रोजी ११.०० वा | उपोषण : शिवाजी शंकर पाटील हे पाणी पुरवठा संस्थेने शेतीस पाणी दिले नाही या मागणीसाठी उपोषणास बसले होते.दिनांक २८.०८.२०१५ रोजी श्री.पांडूरंग तूकाराम पाटील चेअरमन लाडेगाव पाणी पुरवठा संस्था यांनी उपोषण कर्त्याची भेट घेवून शेतीस पाणी देण्याचे व वाळलेल्या ऊसाबद्दल संस्थेविरुध्द कोर्टात केस दाखल करा. कोर्टाच्या आदेशाचे पालन केले जाईल असे तोंडी आश्वासन दिल्याने उपोषण कर्ते यांचे समाधान झालेने उपोषण कर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| ५७. | शिराळा ग्रामस्थ व नाग मंडळ सदस्यानी | | शिराळा गाव | दि.२७.०८.२०१५ रोजी | गावबंद : दिनांक १९.८.२०१५ रोजी शिराळा येथे नागपंचमी उत्सव पार पडला सदर वेळी ध्वनी प्रदुषण अधिनियमाचा भंग केले बाबत पोलीस विभागाने गुन्हे दाखल करुन कारवाई केली आहे.त्या निषेधार्थ शिराळा गाव बंद ठेवले.<br>मुख्यमोर्चा व ठिय्या आंदोलन : ११.०० वा.शिराळा ग्रामस्थ व नागमंडळाचे कार्यकर्ते १०० ते१२५ असे शिराळा आंबामाता मंदीर येथे एकत्र जमले व विनापरवाना मुक मोर्चाने तहसीलदार कार्यालय,शिराळा येथे १२.०० वा आले व आपल्या मागण्यासाठी ठिय्या आंदोलन सुरु केले असता<br>बैठक : उपविभागीय पोलीस अधिकारी इस्लामपुर विभाग इस्लामपुर व पोलीस निरीक्षक शिराळा यांनी १२.४५ ते १२.५५ या वेळेत आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाची बैठक घेवून चर्चा केली.त्या चर्चेत ध्वनी प्रदुषण संदर्भात केलेली कारवाई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग झालेने करण्यात आलेली आहे.सदरबाबत कायदेशीर बाबीचे सहकार्य पोलीस प्रशासनाकडून करण्यात येईल याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर १४.४५ वा शिष्टमंडळतील प्रमुख श्री सम्राट शिंदे-उपाध्यक्ष आंबामाता ट्रस्ट,श्री गजानन सोनटक्के - सरपंच ग्रामपंचायत शिराळा हे आंदोलनाच्य ठिकाणी जाऊन आंदोलनकर्त्यांना बैठकीत झालेल्या चर्चेबाबतची माहिती सांगत असताना आंदोलनास बसलेल्या आंदोलनकर्त्यापैकी केदार नितीन नलवडे,संतोष सर्जेराव हिरुगडे यांनी प्रशासनाने केले कारवाईचा निषेध म्हणुन आम्ही आत्मदहन करीत आहोत असे म्हणुन अंगावरती रॉकेल ओतुन घेत असताना पोलीसांनी हस्तक्षेप करुन त्या दोघांना ताब्यात घेतले. त्यानंतर १४.५० वा आंदोलनकर्त्यांनी ठिय्या आंदोलन मागे घेतले. वरील घटनेचे अनुषांगाने शिराळा पोलीस ठाणेस भा I-६ गुरनं. ६०/२०१५, मुपो I १३५ प्रमा ो ुन्हा दा ाल आहे. |
| ५८. | पश्चिम महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय मानवधिकार संघटना | श्री.विजय जाधव अध्यक्ष | तहसिल कार्यालय इस्लामपूर | दिनांक २८.०८.२०१५ रोजी १३.३० वा | निवेदन : बैलगाडी शर्यती पुन्हा चालू करण्यासाठी परवानगी मिळावी या मागणीचे निवेदन शिष्ट मंडळाने सौ.रुपाली सरनोबत तहसीलदार इस्लामपूर यांना देण्यात आले. जनसमुदाय १० ते १२. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५९. | -- | रामचंद्र दत्तू पाटील,प्रशांत रामचंद्र पाटील दोन्ही रा.आमणापूर हे आमणापूर | पलूस पंचायत समिती समोर | दिनांक २८.०८.२०१५ रोजी ११.०० वा | उपोषण : रामचंद्र दत्तू पाटील,प्रशांत रामचंद्र पाटील दोन्ही रा.आमणापूर हे आमणापूर येथील सि.स.नं.७५७, ७५८ व ७६८ मिळकत धारकांने ग्रामपंचायत हद्दीत अतिक्रमण केले आहे.अतिक्रमण काढणेबाबत गटविकास अधिकारी पलूस यांचेकडे वेळोवेळी अर्ज देवूनही अदयाप पर्यंत अतिक्रमण काढले नाही त्यामुळे येण्या –जाण्यासाठी अडथळा होतो म्हणून आमरण उपोषणास बसले आहे. उपोषण कर्ते यांना सीआरपीसी १४९ प्रमाणे नोटीस देण्यात आलेली आहे. दिनांक २९.८.२०१५ रोजी १४.०० वाजता गटविकास अधिकारी पलूस यांनी आंदोलनकर्ते यांना अतिक्रमण काढणेबाबत ग्रामपंचायत आमणापूर यांना आदेश दिले आहेत अतिक्रमण काढणे बाबत कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे लेखी पत्र दिल्याने आंदोलनकर्ते यांचे समाधान झालेने आंदोलनकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| ६०. | ग्रामस्थ | श्री.विनोद गजानन सुर्यवंशी रा.बेलवडे | कडेगाव तहसीलदार कार्यालया समोर | दि.२८.०८.२०१५ रोजी १०.०० वा | उपोषण : ग्रामस्थ टेंभू उपसा जलसिंचन पोट कालवा क्रमांक ७ मधून पाणी मिळावे या मागणीसाठी उपोषणस बसले होते. तसेच काशीनाथ लक्ष्मण चव्हाण ,पांडूरंग गणपती चव्हाण दोन्ही रा.विहापूर यांनी टेंभू उपसा जलसिंचन पोट क०.२ कालवा क्रमांक ७ हा विहापूर गावचे जमीन गट नंबर २०८/२०९ मधून बळजबरीने गैरहाक्काने सर्व्हे नसताना काढलेला पोट कालवा सर्व्हे झालेल्या शेतातून काढावा,काढण्यात आलेला कालवा मुजवून नुकसान भरपाई मिळावी या मागणीसाठी दिनांक ३१.०८.२०१५ रोजी तहसीलदार कार्यालया समोर कुंटूबासह आत्मदहन करणार म्हणून इशारा दिला होता.दिनांक २८.०८.२०१५ रोजी १०.३० ते १५.३० या वेळेत मुख्य कार्यकारी अभियंता टेभु उपसा योजना ओगलेवाडी यांचे कार्यालयात श्री.झिंगटे मुख्य कार्यकारी अभियंता यांचे उपस्थितीत बैठक पार पडली. बैठकीत आंदोलकांच्या मागणीबाबत चर्चा झाली.त्यात विहापूर गट जमीन नं २०८,२०९ संपादित करावयाच्या जमिनीचा प्रस्ताव तातडीने महसूल विभागाकडे पाठविणे विहापूर येडे रस्त्याकडील पुर्वे कडील भराव रस्ते बांध ठेवून काढून घेणे पाणी चालू करणे व आंदोलन कर्त्याच्या संमती शिवाय दोन्ही बाजूचा रस्ता भराव करावयाचा नाही असे सर्वानीमते ठरले.सदर बाबतचे प्रोसेडींग तयार करुन त्यांची प्रत आंदोलन कर्त्याना दिल्याने आंदोलन कर्ते श्री.विनोद गजानन सुर्यवंशी,मनोज किसनराव मोहिते,पोपट विठोबा मुळीक,विशाल सिध्दनाथ सुर्यवंशी ,रविंद्र शंकर सुर्यवंशी यांनी १८.३० वा प्रांत कडेगाव यांच्या हस्ते सरबत घेवून उपोषण मागे घेतले आहे. काशीनाथ लक्ष्मण चव्हाण,पांडूरंग गणपती चव्हाण यांनीही दिनांक ३१.०८.२०१५ रोजीचे कुंटूबासह आत्मदहन आंदोलन मागे घेतले आहे. |
| ६१. | पश्चिम महाराष्ट्र अंतरराष्ट्रीय मानव अधिकार संघटना | श्री विजय बाळासाो जाधव अध्यक्ष | इस्लांमपूर | ३०.८.२०१५ रोजी ११.३० वा. | बैलगाडी शर्यती पुन्हा चालू करण्यासाठी सभा घेण्यासाठी एकत्र जमून घोषणाबाजी केली जिल्हयात मुपोकाक ३७ (१)(३) चा बंदी आदेश लागू असल्याने बंदी आदेशाचा भंग केले बाबत इस्लांमपूर पोलीस ठाणेस भाग ६ गुरनं. १४०/१५ भादविस कलम १८८, मुपोकाक १३५ प्रमाणे गुन्हा दिनांक ३०.८.२०१५ रोजी १४.५६ वाजता विजय बाळासाो जाधव, उदय दिनकर घाडगे, शामराव विठ्ठल तेवरे, पिरसिंग सरदार जाधव, मनोज गणपती सुतार वगैरे ५० ते ६० लोकांचे विरुध्द दाखल करण्यात आला आहे |
| ६२. | महाराष्ट्र धनगर समाज महासंघ | श्री आण्णासाहेब डांगे यांचे अध्यक्ष | आण्णासाहेब डांगे कॉलेज आष्टा सभागृहात | ३०.८.२०१५ रोजी १२.०० ते १२.४० वा. या वेळेत | बैठक :- महाराष्ट्र धनगर समाज महासंघ बैठक पार पडली. बैठकीमध्ये दिनांक १२.९.२०१५ रोजी चौंडी ता. जामखेड जि. अहमदनगर येथे अहील्याबाई होळकर यांची जयंती मोठया प्रमाणात साजरी करणेबाबत चर्चा झाली. बैठकीमध्ये बाबुराव हुळ्ळे, चिमणराव डांगे, आर एस चोपडे या प्रमुख व्यक्ती सह १०० ते १२५ जनसमुदाय हजर होता. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६३. | -- | -- | विजयालक्ष्मी कॉटन मिट आटपाडी | ३०.८.२०१५ १३.०० ते १६.०० वा. | सत्कार कार्यक्रम - श्री जसराम नेवासेकर, उप यंत्रचालक एमएसईबी यांचा सेवानिवृत्ती निमीत्त सत्कार कार्यक्रम पार पडला सदर कार्यक्रमास मा. श्री रामराजे निंबाळकर - सभापती विधान सभा , श्री जयंतराव पाटील- आमदार राष्ट्रवादी, श्री हर्षवर्धन पाटील- कॉंग्रेस आय, श्री राजेंद्र देशमुख, श्री पृथ्वीराज देशमुख यांचे सह ५०० ते ६०० जनसमुदाय हजर होता. |
| ६४. | - | - | माळी मंगल कार्यालय सांगली | ३०.८.२०१५ १६.५० ते १९.३५ वा. | गौरव संमारंभ प्रा. डॉ. वसंतराव जोगळे यांचा गौरव संमारंभ पार पडला. सदर कार्यक्रमास श्री रामराजे निंबाळकर- सभापती विधान परिषद, मा.ना.श्री. राम शिंदे – गृहराज्य मंत्री, म.रा.मुंबई , मा. ना. श्री. चंद्रकांत दादा पाटील- सहकार मंत्री, म.रा.मुंबई, श्री संजयकाका पाटील- खासदार भाजपा, श्री सुधीर गाडगीळ - आमदार भाजपा, श्री गणपतराव देशमुख- आमदार शेकाप यांचे सह ३०० ते ४०० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| ६५. | हिंदू जनजागृती समिती | श्री दत्तात्रय रेठरेकर | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ०२.०८.२०१५ रोजी १७.०० | निवेदन :-१० ते १२ कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे येवून भारतातील आंतकवादी कारवाया मध्ये सहभागी असलेल्या पाकिस्तान समवेत दिनांक १० ते १२ सप्टेंबर २०१५ या कालावधीमध्ये दिल्ली येथे आयोजीत केलेला ‘‘शान-ए-पाकिस्तान’’ हा कार्यक्रम रहीत करावा वगैरे मजकूराच्या मा. पंतप्रधान, भारत सरकार यांना दिलेल्या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी सांगली यांना दिली आहे. सदर निवेदनामध्ये भारत निर्यात महासंघ व बराती पाकीस्तान (पाकीस्तान वाणिज्य महासंघाचे सदस्य) यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसांचा आधुनिक वस्त्रपर्यावराणांचे प्रदर्शन आणि विक्री असा ‘‘शान – ए – पाकिस्तान’’ नावाचा कार्यक्रम आयोजीत केला आहे. दिनांक १०.९.२०१५ रोजी ‘‘एक शाम पाकिस्तान के नाम’’ हा कव्वालीचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे.नुकतेच पाकपुरस्कृत आतंकवादयानी पंजाब आणि जम्मू काश्मिर राज्यामध्ये आक्रमण करुन एका पोलीस अधीक्षकासह अनेक निरपराधांचा जीव घेतला आहे अशा शत्रुराष्ट्रातील कलाकारांसमवेत वस्त्रप्रावरणांच्या प्रदर्शनाचा आणि कव्वालीचा कार्यक्रम ठेवण्यास अनुमती देणे म्हणजे राष्ट्रद्रोहच होय त्यामुळे सदर कार्यक्रम रद्द करुन भारतीयांच्या बलिदाना सन्मान राखावा, गेल्या ६७ वर्षाच्या अनुभवातून पाकिस्तानशी कितीही चर्चा करुन, आणि गाणी गाऊन वा क्रिकेट खेळून त्यांचे वाकडे शेपूट सरळ झालेले नाही,. पाकीस्तानी खेळाडूना व कलाकारांना भारतात मोकळीक देवून शासन भारतीयांच्या बलीदानाचा अपमान करीत आहे.तेव्हा आपल्या नविन सरकाने जुन्या सरकारच्या धोरणांना बाजूला सारुन पाकिस्तानला जशास तसे उत्तर दिले पाहीजे वगैरे मजकूर नमूद आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६६. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान सांगली | श्री नितीन चौगुले | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ०३.०८.२०१५ रोजी १५.०० | निवेदन - २५ ते ३० कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे येवून सांगली जिल्हयातील इस्लांमपूरचे इश्वरपूर असे नामांतर करावे वगैरे मजकूराचे निवेदन श्री शिंदे- निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना दिले आहे.सदर निवेदनामध्ये नुकतेच दिल्लीतील औरंगजेब रोडचे नांव बदलून माजी राष्ट्रपती स्व. डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचे नांव दिले गेले, याच बरोबर औरंगाबाद या शहराचे नामांतर संभाजीनगर असे करावे या साठी शिवसेनेचे पक्ष प्रमुख श्री उद्दव ठाकरे यांनी मागणी केली आहे. बॉम्बेची मुंबई, मद्रासचे चेन्नई, बेंगलोरचे बंगळूरू, कलकत्त्याचे कोलकत्ता व बेळगांवचे बेळगांवी असे नामांतर होवू शकते हे लक्षात घेवून सांगली जिल्हयातील इस्लांमपूर या गावांचे नांव ईश्वरपूर करावे. श्री शिवछत्रपतीच्या काळामध्ये या भागात मुघलांनी स्वारी केल्यानंतर ते सैनिकी तळ म्हणून या जागेचा वापर करीत होते त्यामुळेच त्याचे नांव इस्लांमपूर असे पडले. याचे मुळ नांव उरण असे होते. इतिहासाकडे डोळसपणे पाहीले असता महाराष्ट्रावर आक्रमण केल्यानंतर अनेक परकीय सत्तानी येथील अनेक गांवांची,कित्येक गडकिल्ल्यांची, विविध रस्त्यांची मुळ नांवे बदलून आपआपल्या धर्मास अनुकूल नांवे ठेवली. उस्मानाबाद, औरंगाबाद, अहमदाबाद, गुलशनाबाद या प्रमाणेच इस्लांमपूर हे नांव देखील या पठडीतील आहे. मागील अनेक वर्षा पासून या गावांचे नांव बदलावे या साठी मागणी लावून धरली गेली आहे |
| ६७. | एम आय एम | नवनिर्वाचीत जिल्हाध्यक्ष शाकिर तांबोळी रा. इस्लांमपूर | जे.के. हॉल मिरज | ०१/०९/२०१५ रोजी १९.५५ वा ते २१.०५ | बैठक व सत्कार:- एम आय एम कार्यकर्त्याची बैठक व नवनिर्वाचीत जिल्हाध्यक्ष शाकिर तांबोळी रा. इस्लांमपूर यांचा सत्कार सभारंभ पार पडला. सदर कार्यक्रमास श्री नितीन कांबळे रा सांगली (अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती सांगली), श्री इब्राहिम ढालाईत रा मिरज, सौ. वहिदा अत्तार रा मिरज, श्री कैलाश काळे रा सांगली (आरपीआय), श्री नंदकुमार बनसोडे रा सांगली (आरपीआय), श्री उमर गवंडी रा सांगली, श्री सलिम सौदागर,श्री मोईन अलासे रा मिरज, श्री दिलावर मुल्ला रा. इचलकरंजी, श्री निहाल अहमद रा मिरज, श्री शाजा बारगीर रा मिरज वगैरे प्रमुख २०० ते २५० आरपीआय व मुस्लीम कार्यकर्ते उपस्थित होते. |
| ६८. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री संभाजी भिडे- संस्थापक शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | कोरेगांव सुभाष चौक | २५.९.२०१५ रोजी २०.५५ ते २२.५५ वा | व्याख्यान- श्री संभाजी भिडे यांनी आपले भाषणामध्ये हिंदु धर्माची उंची फार मोठी आहे. हिंदुस्थान सर्वश्रेष्ठ देश आहे. शिवचरित्र, महाभारत, रामायण वाचले पाहीजे त्याशिवाय आपला देश वाचणार नाही असे सांगून आमागी दसरा सणाचे मुहूर्तावर ५ लाख "शिव शंभू" ग्रंथ छापणार आहे ते सर्वानी विकत घ्यावेत असे आवाहन केले आहे. सदर कार्यक्रमास २५० ते ३०० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| ६९. | आमरण उपोषण | साहेबराव दगडू कांबळे रा. मांजर्डे | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | २८.९.२०१५ रोजी १२.०० वा. १८.१५ | उपोषण- श्री साहेबराव दगडू कांबळे रा. माजर्डे ता. तासगांव हे त्यांचेवर तत्कालीन उपविभागीय अधिकारी मिरज श्री हेमंत निकम यांनी आपले पदाचा गैरवापर करून बडतर्फ करण्याची चुकीची कारवाई केली आहे याचे निषेधार्थ दिनांक २८.९.२०१५ रोजी १२.०० वा. पासून जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर आमरण उपोषणास बसले होते.<br>श्री शेखर गायकवाड - जिल्हाधिकारी सांगली यांनी उपोषणकर्ते यांचेशी त्यांच्या मागण्याबाबत चर्चा करून त्यांना त्यांच्या मागण्याबाबत योग्य त्या न्यायालयामध्ये दाद मागण्याबाबत मागदर्शन केल्याने उपोषणकर्ते यांनी दिनांक २८.९.२०१५ रोजी १८.१५ वाजता उपोषण मागे घेतले आहे. |
| ७०. | आरळा ता. शिराळा ग्रामस्थ | श्री निलोफर डांगे- सरपंच आरळा | आरळा गांवी सांगली ते चांदोली जाणारे रोडवर | २९.९.२०१५ रोजी ११.०० ते ११.२५ वा. | रस्ता रोको- आरळा येथील ग्रामस्थांनी चांदोली धरणाकडे जाणारा मुख्य रस्ता खराब झाला आहे तो तात्काळ दुरुस्त करावा, रस्त्याचे कडेला गटाराची सोय करावी या बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्र व्यवहार करुन ही सार्वजनिक बांधकाम विभागाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे यांचे निषेधार्थ रस्ता रोको आंदोलन केले. सदर आंदोलनास श्री निलोफर डांगे- सरपंच आरळा, सौ सुशिला नांगरे- जि.प. सदस्य, श्री हिंदुराव नांगरे- माजी सरपंच यांचे सह १२५ ते १५० ग्रामस्थ उपस्थीत होते. श्री दाभोळे- सहा अभियंता श्रेणी १ व श्री माने- कनिष्ठ अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, शिराळा यांनी आंदोलनाचे ठिकाणी येवून रस्ता दुरुस्ती करणे बाबत लेखी आश्वासन दिल्यानंतर रस्ता आंदोलन मागे घेण्यात आले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७१. | आमरण उपोषण | सौ. सुवर्णा भिमराव पाटील रा. कणदूर ता. शिराळा | तहसील कार्यालय शिराळा समोर | २९.९.२०१५ रोजी १०.३० | आमरण उपोषण -सौ. सुवर्णा भिमराव पाटील रा. कणदूर ता. शिराळा यांनी त्यांचे शेजारील यशवंत पांडुरंग आतकीरे यांचे घर विकत घेतले आहे. सदर घराचे परिसरामध्ये गोबर गॅस प्लँट व शेड सुध्दा आहे सदर शेड मध्ये विठ्ठल नारायण आतकीरे यांनी गुरे बांधली आहेत सदर बाबत त्यांना सौ. सुवर्णा भिमराव पाटील यांनी विचारणा केली असता असता विठ्ठल नारायण आतकीरे यांनी सौ. सुवर्णा भिमराव पाटील यांना दोन तीन वेळा मारहाण केली आहे सदर बाबत शिराळा तक्रार केली आहे सदर बाबत सौ. सुवर्णा भिमराव पाटील हया विचारणा करण्यास पोलीस ठाणे मध्ये गेले असता पोलीस अधिकारी त्यांनाच दमदाटी करतात तरी संबधीतांवर कारवाई व्हावी, त्यांचे शेड मधील विठ्ठल नारायण आतकीरे यांनी बांधलेली गुरे बाहेर काढावीत या मागणीसाठी सौ. सुवर्णा भिमराव पाटील यांनी दिनांक २९.९.२०१५ रोजी १०.३० वाजले पासून तहसील कार्यालय शिराळा समोर आमरण उपोषण सुरु केले आहे. |
| ७२. | शिवप्रतिष्ठान | श्री गजाजन पाटील शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान चे वाळवा तालुका प्रमुख | मुख्याधिकरी , इस्लांमपूर नगरपालिका | २९.९.२०१५ रोजी ११.४५ वा. ते १२.०० वा. | निवेदन- ३० ते ३५ कार्यकर्त्यांनी नजीकच्या कालावधी मध्ये होणा-या इस्लांमपूर नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये उरुण इस्लांमपूरचे नांव बदलून उरुण इश्वरपूर करावे हा विषय घेण्यात यावा या करीता इस्लांमपूर शहरातील नागरीकांच्या सहया घेतलेले निवेदन मुख्याधिकरी , इस्लांमपूर नगरपालिका यांना दिले. |
| ७३. | हातनूर गांव ग्रामस्थ | श्री बबन विश्वनाथ घेवारे व श्री लक्ष्मण विठोबा पवार | हातनूर गांव चावडी समोर | १.१०.२०१५ रोजी ११.०० | आमरण उपोषण :- हातनूर गांवास टेंभू योजनेचे पाणी मिळावे, राजणी शुगर वर्कस, कवठे महंकाळ या साखर कारखान्याने शेतक-यांची थकीत बिले तात्काळ दयावीत या इतर मागण्यासाठी हातनूर गांव चावडी समोर आमरण उपोषण सुरु केले आहे. सदर उपोषणास पाठींबा म्हणून दिनांक ०७.१०.२०१५ रोजी ०७.०० वा. ते १२.४५ वा. या वेळेत हातनूर येथील ग्रामस्थानी हातनूर गांव बंद पाळले. हातनूर गांव बंदला ९० ते ९५ टक्के प्रतिसाद मिळाला आहे. हातनूर गांव बंद शांततेत पार पडला |
| ७४. | स्वाभीमानी शेतकरी संघटना | खासदार राजू शेट्टी व प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत रा.मरळनाथपूर ता.वाळवा जि.सांगली | स्वाभीमानी शेतकरी संघटनेच्या जिल्हा कार्यालयामध्ये | ०४.१०.२०१५ रोजी १४.२५ वा.१६.४५ वा | बैठक व पत्रकार परिषद :- यापूर्वीच्या गळीत हंगामात साखर कारखान्यात ऊसाला शासनाच्या एफआरपी प्रमाणे दर दयावा या मागणीसाठी तसेच म्हैशाळ योजनेच्या पाणीपट्टीची थकबाकी शेतक-यांच्या सातबा-यावर चढविण्याची शासनाने तयारी केली आहे त्यास विरोध करण्यासाठी नियोजनाची बैठक व पत्रकार परिषद घेतली. बैठकीस स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे १२५ ते १५० कार्यकर्ते उपस्थित होते. |
| ७५. | स्वाभीमानी शेतकरी संघटना | श्री. रविकांत तुपकर, अध्यक्ष-वस्त्रोद्योग महामंडळ,महाराष्ट्र राज्य | पाडळी, कांदे व मांगले | ११.१०.२०१५ रोजी १८.०० ते २२.०० | जाहिर सभा :- सभेमध्ये प्रमुख वक्त्यांनी दिनांक.१६.१०.२०१५ रोजी कोल्हापूर येथे आयोजीत केले मोर्चामध्ये मोठया संख्येने हजर राहणेबाबत व एफ.आर.पी.ची. रक्कम एक रक्कमी घ्यायची या बाबत मार्गदर्शन केले. प्रत्येक ठिकाणी १०० ते १२५ कार्यकर्ते हजर होते. |
| ७६. | स्वाभीमानी शेतकरी संघटना | श्री जयकुमार जिनपाल कोले वश्री राजू शेट्टी – खासदार स्वाभिमानी शेतकरीस संघटना, श्री विकास देशमुख-जिल्हा अध्यक्ष | सोसायटी चौक्, अंकलखोप | १४.१०.२०१५ रोजी २०.०० वा. ते २१.३० वा. | सभा :- एफआरपी प्रमाणे ऊसास दर मिळाल्या शिवाय साखर कारखान्यांना गाळप परवाना देण्यात येवू नये, ज्या कारखान्यानी मागील गाळपाचा अर्धवट एफआरपी दिलेला आहे, एक रकमी एफआरपी मिळावी या व इतर मागण्यासाठी दिनांक १६.१०.२०१५ रोजी कोल्हापूर येथे साखर उपआयुक्त कार्यालयावर मोर्चा आयोजीत केला आहे सदर मोर्चास मोठया संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सदर सभेस ४०० ते ५०० शेतकरी उपस्थीत होते. |
| ७७. | आवामी विकास पार्टी | श्री अशरफ वांकर-पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष | मिरज शहर पोलीस ठाणे | २९.११.२०१५ | निवेदन - : दिनांक २९.११.२०१५ रोजीच्या दैनिक लोकमत चे मंथन पुरवणी मध्ये इसिस (आयएसआय ) या अतिरेकी संघटनेबद्दल लेख प्रसिध्द झाला आहे. सदर लेखा मध्ये डुक्कर या प्राण्याचे व्यंग चित्र काढून त्यावर आरबी भाषेमध्ये ''अल्लाह महंमद रसुल'' असे लिहण्यात आले आहे याचे निषेधार्थ २० ते २५ कार्यकर्त्यांनी मिरज शहर पोलीस ठाणे येथे येवून दैनिक लोकमत चे संपादक व सदर लेखाचे लेखक यांचे वर कारवाई करावी या व इतर मागण्याचे निवेदन मिरज शहर पोलीस ठाणे येथे दिले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७८. | एआयएमआयए म | श्री शाकीर तांबोळी जिल्हाध्यक्ष मजलीस – ए- इतेहादउल - मुसलमीन (एआयएमआयएम) | जुने तहसील कार्यालय इस्लांमपूर समोर | २९.११.२०१५ रोजी १९.३० वा ते १९.४५ | दैनिक लोकमत आवृत्तीचे दहन - : दिनांक २९.११.२०१५ रोजीच्या दैनिक लोकमत चे मंथन पुरवणी मध्ये इसिस (आयएसआय ) या अतिरेकी संघटनेबद्दल लेख प्रसिध्द झाला आहे. सदर लेखा मध्ये डुक्कर या प्राण्याचे व्यंग चित्र काढून त्यावर आरबी भाषेमध्ये ''अल्लाह महंमद रसुल'' असे लिहण्यात आले आहे याचे निषेधार्थ ७० ते ८० कार्यकर्त्यांनी दिनांक २९.११.२०१५ रोजी १९.३० वा ते १९.४५ या वेळेत जुने तहसील कार्यालय इस्लामपूर समोर दैनिक लोकमत दैनिकाच्या दिनांक २९.११.२०१५ रोजीच्या आवृत्तीचे दहन केले. |
| ७९. | एआयएमआयए म भारत मुक्ती मोर्चा, पिपल्स रिपब्लीकन पार्टी, बहुजन मुक्ती पार्टी | श्री शाकीर तांबोळी, श्री आरि फ बावा | स्टेशन चौक सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ३०.११.२०१५ रोजी १२.४५ वा. ते १३.१५ वा | मोर्चा - : दिनांक २९.११.२०१५ रोजीच्या दैनिक लोकमत चे मंथन पुरवणी मध्ये इसिस (आयएसआय ) या अतिरेकी संघटनेबद्दल लेख प्रसिध्द झाला आहे. सदर लेखा मध्ये डुक्कर या प्राण्याचे व्यंग चित्र काढून त्यावर आरबी भाषेमध्ये ''अल्लाह महंमद रसुल'' असे लिहण्यात आले आहे याचे निषेधार्थ २०० ते २५० मुस्लीम कार्यकर्त्यांनी स्टेशन चौक सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले. दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने लेखक, व्यंगचित्रकार व संपादक यांचेवर कारवाई करावी या व इतर मागण्याचे निवेदन श्री शेखर गायकवाड- जिल्हाधिकारी सांगली यांना मागण्याचे निवेदन दिले. |
| ८०. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री सदाभाऊ खोत प्रदेशाध्यक्ष | गेस्ट हाऊस, इस्लांमपूर | ८.१२.२०१५ रोजी १५.०० | पत्रकार परिषद :- श्री सदाभाऊ खोत यांनी पत्रकार परिषदेमध्ये, साखर कारखाना संचालकांनी ऊसाला एफआरपी प्रमाणे एकरकमी दर दिला पाहीजे या मागणीसाठी दिनांक १३.१२.२०१५ रोजी सांगली जिल्हयामध्ये विविध ठिकाणी चक्का जाम आंदोलन करण्यात येणार आहे. त्यावेळी वैदयकीय सेवा वगळून दुध,ऊस वाहतुक करणारी व इतर वाहने रोखून धरणेत येणार आहेत. सदर दिवशी नागरीकांनी बाहेर पडू नये अन्यथा आंदोलन चिघळले जावून आंदोलन पुढे सुरु ठेवावे लागेल वगैरे सांगितले आहे. |
| ८१. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री सदाभाऊ खोत प्रदेशाध्यक्ष | पत्रकारभवन पुणे | १५/१२/२०१५ रोजी १६.३० वा. ते १७.१५ वा. | पत्रकार परिषद :- पत्रकारभवन येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते श्री सदाभाऊ खोत रा. मरळनाथपुर व विकास देशमुख्र रा. कोकरुड (जिल्हाध्यक्ष) यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेवून सांगली जिल्हयातील साखर कारखानदारांनी ऊसाला प्रतिटन पहिला हप्ता १७००/- रुपये देण्याचा प्रयत्न चालू केलेचे विरोधात आंदोलनाच्या पहील्या टप्प्यात दि. १६.१२.२०१५ रोजी चे १७.०० वा. पासून ऊसतोडी व ऊस वाहतूक बेमुदत बंद करण्याचे जाहीर केले आहे. तसेच कारखानदारांनी व वाहन मालकांनी बळजबरीने ऊस नेण्याचा प्रयत्न केलेस तोडी बंद पाडून वाहनांची तोडफोड केली जाईल, तसेच साखर कारखान्यांच्या गट कार्यालयांना कुलपे लावली जातील. कारखान्यांच्या कर्मचायांना, संचालकाना व अध्यक्षांना गावात फिरु देणार नाही व फिरले तर चोप दिला जाईल असा इशारा दिला आहे. आंदोलनाच्या दुस-या टप्यात दोन दिवसानंतर रास्ता रोको, राज्य व राष्ट्रीय महामार्गाची अडवणूक करुन मुंबई पुण्याची वाहतुक, दुध, भाजीपाला पुर्णपणे थांबविण्यात येईल. कारखाण्यातून बाहेर पडणारी साखर रोखली जाईल, कारखाण्यावर धडक मोर्चे काढले जातील व सदरचे आंदोलन एक रक्कमी एफ.आर.पी. निर्णय झाल्याशिवाय थांबणार नसल्याचे जाहीर केले आहे. एकंदरीत नागपूर येथे शासन, कारखानदार, संघटना यामध्ये झालेल्या बैठकीत ८०टक्के प्रथम उर्वरीत २० टक्के नंतर अशी एफ.आर.पी. ची रक्कम देण्याचे मान्य केल्याचे संघटना सांगत आहे, परंतु प्रत्यक्षात कारखानदार १७००/- रु पहिली उचल देण्याच्या मनस्थितीमध्ये असल्यामुळे शेतक-यामध्ये नाराजी आहे. त्याचा फायदा स्वाभिमानी शेतकरी संघटना घेवून आंदोलन छेडून संघटना बळकट करण्याचा प्रयत्न करीत आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८२. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री सदाभाऊ खोत प्रदेशाध्यक्ष | इस्लामपूर शासकिय विश्रामगृह | १७.१२.२०१५ रोजी १२.४५ वा.ते १३.०५ | बैठक : - दि.१८.१२.२०१५ रोजी एफआरपीची ८० टक्के रक्कमी शेतक-यांचे खात्यात तात्काळ जमा व्हावी या मागणीसाठी सांगली जिल्हयात करण्यात येणा-या चक्का जाम आंदोलनाची पुर्वतयारी व कार्यकर्त्यांना सुचना देण्याबाबतची बैठक आज दि.१७.१२.२०१५ रोजी १२.४५ वा.ते १३.०५ वा.पर्यंत इस्लामपूर शासकिय विश्रामगृह येथे पार पडली. सदर बैठकीस श्री.सदाभाऊ खोत रा.मरळनाथपुर (प्रदेशाध्यक्ष) यांनी मार्गदर्शन केले असून बैठकीस १.श्री.विकास देशमुख रा.कोकरुड- जिल्हाअध्यक्ष, २.भास्कर नाना कदम रा.इस्लामपूर- कार्याध्यक्ष, ३.भागवत जाधव रा.इस्लामपूर, ४.राम पाटील रा.शिराळा (तालुका अध्यक्ष) वगैरे २५/३० संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. सदरची बैठक संपल्यानंतर श्री सदाभाऊ खोत हे सांगली येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेस उपस्थित राहण्यासाठी प्रमुख कार्यकर्त्यासह सांगली करीता रवाना झाले. १४.३५ वा.ते १५.०५ वा. या वेळेत स्वभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष श्री सदाभाऊ खोत यांनी पुष्पराज चौक,सांगली येथील संघटनेचे जिल्हा कार्यालयात पत्रकार बैठक घेतली |
| ८३. | शेतकरी संघटना (रघुनाथ पाटील गट) | श्री महादेव शंकर कोरे- जिल्हाध्यक्ष | किसान चौक मिरज | ९.१२.२०१५ रोजी १८.२० वा.ते २०.३० वा. | सभा :- सातवा वेतन आयोग रद्द करावा, ऊसाला एफआरपी प्रमाणे एक रक्कमी दर मिळावा या व इतर विषयावर सभा पार पडली. सभे मध्ये श्री सतनाथ सिंग बेरु - अध्यक्ष शेतकरी महासंघ पंजाब, श्री रघुनाथदादा पाटील- अध्यक्ष, शेतकरी संघटना, श्री शिवाजीराव नांदखिले- प्रदेशाध्यक्ष क्रांतीसिंह नोना पाटील ब्रिगेड महाराष्ट्र राज्य, श्री महादेव कोरे - जिल्हा अध्यक्ष शेतकरी संघटना या प्रमुख वक्त्यांची भाषणे झाली. सदर सभेस १०० ते १२५ जनसमुदाय उपस्थीत होता. |
| ८४. | शेतकरी संघटना (रघुनाथदादा पाटील गट) | श्री महादेव कोरे- जिल्हाध्यक्ष | मार्केट यार्ड तासगांव | १२.१२.२०१५ रोजी ११.१५ वा. ते १२.३५ वा. | निवेदन : - शासकीय नोकरांना सातवा वेतन आयोग लागू करु नये, शेतीमालावरील निर्यात बंदी उठवावी, ऊसाला एफआरपी प्रमाणे एक रकमी दर मिळावा या व इतर मागण्याचे निवेदन श्री संजयकाका पाटील- खासदार भाजपा यांना दिनांक १२.१२.२०१५ रोजी ११.१५ वा. ते १२.३५ वा. या वेळेत मार्केट यार्ड तासगांव येथे दिले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८५. | शेतकरी संघटना (रघुनाथदादा पाटील गट) व अखिल भारतीय शेतकरी शर्यत बचाव संघर्ष कृती समिती | श्री रघुनाथ पाटील- अध्यक्ष शेतकरी संघटना रा. साखराळे व श्री प्रसाद गणपतराव धर्माधिकारी -अध्यक्ष अखिल भारतीय शेतकरी शर्यत बचाव संघर्ष कृती समिती | राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४, सांगली व कोल्हापूर जिल्हा सिमा हद्दीवर किणी-वाठार पुलावर | २१/१२/२०१५ रोजी १२.१५ वा ते १२.३५ | रस्ता रोको : - १. गोवंश हत्याबंदी कायदा हा चुकीच्या पध्दतीने राबविलाजात असुन त्यामुळे भाकड व अनुउत्पादक गोवंश जनावरांची संख्या वाढत आहे. अशा जनावरांचे संगोपन करण्यासाठी शेतक-यास नाहक खर्च होतो तो शेतक-यांना पेलवत नाही तरी गोवंश हत्या बंदी कायदयाचा फेरविचार करुन दुरुस्ती करावी २. बैलगाडी शर्यतीवरील बंदी उठवावी व पुर्ववत बैलगाडया शर्यती घेण्यास परवानगी दयावी ३. उसाची एफ आर पी. रक्कम एक रकमी एकाच टप्प्यात मिळावी ४. दुधाचे भाव कमी होत आहेत त्यामध्ये शासन हस्तक्षेप करीत नाही शासनाने हस्तक्षेप करुन.दुधाची दरवाढ करणेबाबत योग्य नियोजन करावे ५. शेतक-याच्या अन्य शेतीमालाच्या किंमती कमी होत आहेत त्यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही तरी शासनाने अन्य शेतमालाच्या किंमतीबाबत परिणामकारक धोरण तयार करुन शेतक-याचे अन्य शेती मालांस कायमस्वरुपी हमी भाव दयावा ६. शेतक-याच्या आत्महत्याकरण्याच्या प्रमाणांत वाढ झालेली आहे त्यामध्ये शासनाचा दृष्टिकोन उदासीन आहे शेतक-याच्या आत्महत्या बंद होण्यासाठी शासनाने शेतक-याची कर्जमाफी करावी . शेतीमालांस हमी भाव दयावा शेतक-याचे कल्याणासाठी योग्य त्या उपाय योजना सुरु कराव्यात ७. शेतक-याच्या प्रश्नाकडे शासन जाणुनबुजून दुर्लक्ष करीत आहे शासन भांडवलशाहीचा विचार करीत आहे. या व इतर मागण्याकरीता शेतकरी सघटना (रघुनाथदादा पाटील गट) व अखिल भारतीय शेतकरी शर्यत बचाव संघर्ष कृती समिती यांच्या वतीने श्री रघुनाथ पाटील- अध्यक्ष शेतकरी संघटना रा. साखराळे व श्री प्रसाद गणपतराव धर्माधिकारी -अध्यक्ष अखिल भारतीय शेतकरी शर्यत बचाव संघर्ष कृती समिती यांचे नेतृत्वाखाली राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४, सांगली व कोल्हापूर जिल्हा सिमा हद्दीवर किणी-वाठार पुलावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. रस्ता रोको आंदोलनास १५०/२०० कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते. |

**१४) इतर संघटना आंदोलने :-**

---

| अनं | पक्ष/ संघटना | नेतृत्व | ठिकाण | दिनांक व वेळ | घटनेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती | श्री अशोक नाना कांबळे | आंबेडकर नगर ते जत तहसील कार्यालय | ६.१.२०१५ रोजी १३.०० -१७.००. | **मोर्चा** - आंबेडकर नगर जत येथील १०० ते १५० नागरीकांनी जत येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नियोजीत उदयानासाठी आरक्षीत जागेवरील अतिक्रमण काढावे,सदर जागा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यासाठी उपलब्ध करुन दयावी, वगैरे मागण्यासाठी मोर्चा काढण्यात आला. मोर्चा तहसील कार्यालय जत येथे आल्यानंतर जत तहसील कार्यालयासमोर सदर मागण्यासाठी उपोषण सुरु करण्यात आले.<br>श्री प्रमोद गायकवाड- प्रांत अधिकारी जत, श्री डी एम कांबळे- तहसीलदार जत व श्री पंडीत पाटील- कार्यकारी अधिकारी जत नगर परिषद यांनी येत्या दोन दिवसात आरक्षीत जागेवरील अतिक्रमण काढणेची कार्यवाही करीत असले बाबत लेखी आश्वासन दिल्यानंतर १७.०० वाजता उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| २. | दलीत महासंघ | श्री उत्तम जिन्नाप्पा मोहीते – जिल्हा अध्यक्ष दलीत महासंघ | स्टेशन चौक ते सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगर पालिका कार्यालय सांगली | दिनांक २०.०१.२०१५ रोजी १२.४५ वा. ते १३.३० | मोर्चा --बुधगांव व सांगली येथील वाल्मीकी आवास येथे लाईट,पाणी, गटार वगैरे नागरी सुविधा पुरवाव्यात या मागणी साठी उघडा मोर्चा काढला. मोर्चा मनपा कार्यालय सांगली येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री अजिज कारचे – आयुक्त,सामिकु ,मनपा यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>सदर आंदोलनकर्ते यांनी मोर्चा काढून मा.जिल्हादंडाधिकारी सांगली यांनी दिनांक १३.१.२०१५ ते २७.१.२०१५ या कालावधी करीता लागू केले मुपाकाक ३७ (१) (३) चे बंदी आदेशाचा भंग केले बाबत सांगली शहर पोलीस ठाणेस भाग- ६ गुरनं. ६/२०१५ भा.द.वि.सं. कलम १८८, मुपोकाक १३५ प्रमाणे दाखल आहे. जनसमुदाय - ३५ ते ४० कार्यकर्ते |
| ३. | **शेतकरी संघटनेच्या (रघुनाथ पाटील प्रणित)** | श्री भाऊसाहेब पवार रा. तडसर | मायक्का मंदीरा शेजारी | **०१.०१.२०१५ रोजी** १२.०० वा. ते १२.१० वा. | रस्ता रोको प्रयत्न :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी ४ ते ५ कार्यकर्ते यांनी एस टी स्टॅंड चौक, कडेगांव येथे येवून मायक्का मंदीरा शेजारी शेतकरी संघटनेचे झेंडे घेवून रस्ता रोको करण्याच्या इरादयाने जमा झाले होते, ते रस्ता रोको न करता निघून गेले आहेत. |
| ४. | **शेतकरी संघटनेच्या (रघुनाथ पाटील प्रणित)** | श्री अशोकराव माने रा. अग्रण धुळगांव | मिरज - पंढरपूर रोडवर अलकुड एस फाटा | **०१.०१.२०१५ रोजी** १०.३० वा. ते ११.१५ वा. | **रस्ता रोको** :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी २० ते २५ कार्यकर्त्यांनी रस्ता रोको आंदोलन केले. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन निवासी नायब तसहीलदार यांना देण्यात आले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | **शेतकरी संघटनेच्या (रघुनाथ पाटील प्रणित)** | श्री अशोकराव माने रा. अग्रण धुळगांव | मिरज - पंढरपूर रोडवर शिरढोण एस टी स्टॅंड चौक शिरढोण | **०१.०१.२०१५ रोजी** १३.३० वा. ते १४.३० | **रस्ता रोको** :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी २०० ते २५० कार्यकर्त्यांनी रस्ता रोको आंदोलन केले. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन निवासी नायब तसहीलदार यांना देण्यात आले. |
| ६. | **शेतकरी संघटनेच्या (रघुनाथ पाटील प्रणित)** | श्री नंदकुमार पाटील रा. खरशिंग- | मिरज - पंढरपूर रोडवर खरशिंग फाटा | **०१.०१.२०१५ रोजी** १२.०० वा ते १४.०० वा. | **रस्ता रोको** :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी २०० ते २५० कार्यकर्त्यांनी रस्ता रोको आंदोलन केले. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन सर्कल तलाठी यांना देण्यात आले. खरशिंग फाटा येथे बेकायदा जमाव जमवून रास्ता रोको आंदोलन करुन लोकांचे जाण्या येण्यास अडथळा केला व मुपाकाक ३७ (१) (३) चे बंदी आदेशाचा भंग केलेच कारणावरुन कवठे महंकाळ पोलीस ठाणेस भाग-५ गुरनं. १/२०१५ भा.द.वि.सं. कलम १४१,१४३,३४१,५०६, मुपोकाक १३५ प्रमाणे. |
| ७. | **शेतकरी संघटना (शरद जोशी प्रणीत)** | **श्री संजय कोले- सांगली जिल्हा अध्यक्ष** | **गणपती मंदीर सांगली** | **१०.१.२०१५ रोजी १०.३०-१९.००.** | मोटार सायकल रॅली - २०१४ – २०१५ चे ऊस गाळप हंगामा करीता एफआरपी प्रमाणे ऊस दर मिळावा, ऊस बिले एक रकमी मिळावीत या व इतर मागण्यासाठी मोटार सायकल रॅली काढून साखर कारखान्यांवर जावून मागण्याचण निवेदने दिली त्याची माहीती खालील प्रमाणे...<br>रॅलीची सुरुवात गणपती मंदीर सांगली येथून १०.३० वा. झाली. सांगली शहरातील प्रमुख मार्गावर फिरुन सदर रॅली वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना सांगली येथे गेली<br>सदर ठिकाणी श्री विशाल पाटील – चेअरमन वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना यांना मागण्याचे निवेदन दिले. त्यानंतर सदर रॅली क्रांती सहकारी कारखाना कुंडल येथे गेली सदर ठिकाणी श्री अरुण लाड- चेअरमन यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>त्या ठिकाणाहून ४ ते ५ लोकांचे शिष्ठमंडळ सोनहीरा शेतकरी सहकारी साखर कारखाना येथे मागण्याचे निवेदन देण्यासाठी गेले<br>त्यानंतर रॅली राजाराम बापू सहकारी साखर कारखाना इस्लांमपूर येथे गेली सदर ठिकाणी मागण्याचे निवेदन श्री आर डी माउुली-एमडी राजाराम बापू कारखाना यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>त्यानंतर रॅली हुतात्मा अहीर सहकारी साखर कारखाना वाळवा या ठीकाणी गेली सदर ठिकाणी श्री बाळासाहेब पाटील - संचालक यांना मागण्याचे निवेदन दिले<br>त्यानंतर रॅलीची सांगता झाली. रॅली मध्ये २५ ते ३० मोटार सायकलवर ५० ते ६० कार्यकर्ते सहभागी झाले होते. |
| ८. | पलूस तालुका स्वाभिमानी शेतकरी संघटना युवा आघाडी ए | संदीप धनपाल राजोबा अध्यक्ष पलूस तालुका स्वाभिमानी शेतकरी संघटना युवा आघाडी | पलूस ते सांगली जाणारे रोडवर वसगडे एस टी स्टॅंड येथे | १०.१.२०१५ रोजी ११.१५ वा. ते १३.१५ वा. | **रस्ता रोको :- शेतक-यांची ऊस बिले एफआरपी प्रमाणे दिलेली नाहीत त्या साखर कारखान्यांचे चेअरमन व संचालक मंडळावर व त्यांना पाठीशी घालणा-या साखर आयुक्त यांचेवर फौजादारी गुन्हे दाखल करावेत या व इतर मागण्या करीता रास्ता रेको आंदोलन करण्यात आले. सदर आंदोलनाचे अनुषंगाने भिलवडी पोलीस ठाणेस भाग ५ गुरनं. ६/१५ भादविस कलम १४३, १४५,३४१, मुपोकाक १३५** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री दिपक आप्पासाो मगदूम रा. समडोळी | सांगली ते इस्लांमपूर जाणारे रोडवर लक्ष्मी फाटा | १२.१.२०१५ रोजी १६.०० - १७.००.वा. | रस्ता रोको :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी व साखर आयुक्त कार्यालय येथील आंदोलनाचे वेळी मा. श्री. राजू शेट्टी- खासदार स्वाभिमानी शेतकरी संघटना व श्री सदाभाऊ खोत- प्रदेशाध्यक्ष यांना अटक झाल्याचे निषेधार्थ रास्ता रोको करण्याच्या उद्देशाने अचानक पणे श्री दिपक आप्पासाो मगदूम रा. समडोळी यांचे नेतृत्वाखाली समडोळी,दुधगांव,सावळवाडी कसबे डिग्रज येथील १० ते १५ कार्यकर्त्यांनी जमा होवून शासनाचे विरोधात घोषणाबाजी केली. त्यानंतर सदर कार्यकर्ते रस्ता रोको करण्याच्या इरादयाने रस्त्यावर आले असता त्यातील प्रमुख १० कार्यकर्त्यांना बंदोबस्तावरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी १६.१० वा. मुपोकाक ६८ प्रमाणे ताब्यात घेतले व १७.०० वाजता मुपोकाक कलम ६९ प्रमाणे मुक्त केले आहे. तसेच नांद्रे गांवचे हद्दीमध्ये नांद्रे ते वसगडे जाणारे रोडवर सायली धाब्यासमोर १५.०० वाजता पलूस ते सांगली जाणारे एस टी बसवर दगड मारुन एस टी ची काच फोडून ५०००/- रुपये नुकसान केले बाबत सांगली ग्रामिण पोलीस ठाणे भाग-६ गुरनं. ३/२०१५ भादविस कलम ३३६,४२७,३४ प्रॉ.डॅ.ॲक्ट कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल आहे जुनी धामणी गांवचे हद्दीत रेल्वे पुलाजवळ ४ ते ५ लोकांनी धामणी गांवाकडे येत असलेली बस आडवून घोषणा देवून एस टी बसवर दगड मारुन एस टी च्या काचा फोडून १००००/- रुपये नुकसान केले बाबत सांगली ग्रामिण पोलीस ठाणे भाग-६ गुरनं. ४/२०१५ भादविस कलम ३४१,३३६,४२७,३४ प्रॉ.डॅ.ॲक्ट कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयांची माहीती अलहिदा इकडील जा.क्र.जिविशा/ुस दर गुन्हे/२३२/२०१५ दिनांक १३.१.२०१५ अन्वये सादर करण्यात आली आहे. |
| १०. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री नितीन नारायण पाटील- स्वाभिमानी शेतकरी संघटना | आमणापूर गांवातील चौका | १३.१.२०१५ रोजी ०९.३० वा. ते ०९.४५ वा | रस्ता रोको :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन केले. |
| ११. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री बी आर पाटील- कार्यकर्ता | आरग ता.मिरज गांवातील चौका | १३.१.२०१५ रोजी १२.०० वा. ते १२.२० वा | रस्ता रोको :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन केले. सदर वेळी पर्यायी मार्गाने वाहतूक सुरु ठेवण्यात आली होती. जनसमुदाय- २० ते ३० कार्यकर्ते |
| १२. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री जयकुमार कोल्हे – अध्यक्ष पलूस तालुका | अंकलखोप ते नागठाणे जाणारे रोडवर नागठाणे फाटा | १३.१.२०१५ रोजी ९.४० वा. ते ०९.५० वा | रस्ता रोको :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन केले. ७ प्रमुख कार्यकर्त्यांना मुपोकाक ६८ प्रमाणे ०९.५० वा. ताब्यात घेवून मुपोकाक ६९ प्रमाणे १०.१५ वा. मुक्त करण्यात आले आहे. जनसमुदाय - १० ते १५ कार्यकर्ते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री संदीप राजोबा –युवा अध्यक्ष | वसगडे ता. पलसू एस टी स्टँड चौक | १३.१.२०१५ रोजी १३.३० वा. ते १३.४० | निदर्शने :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी निदर्शने केली. जनसमुदाय - १५ कार्यकर्ते |
| १४. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री शहाजी पाटील –कार्यकर्ता | ताकारी ता.वाळवा येथे ताकारी ते कराड रोडवर कॅनॉलवर | १३.१.२०१५ रोजी १३.३० वा. ते १३.४५ वा | रास्ता रोको :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन केले. जनसमुदाय - ५० ते ६० कार्यकर्ते |
| १५. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | संभाजी चौगुले बागणी | बागणी | १३.१.२०१५ रोजी ०८.०० वा. ते १४.०० वा. या वेळेत | गांवबंद/पुतळा दहन :- :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी बागणी गांव बंद पाळण्यात आले. बंदला अत्यावश्यक सेवा वगळता ९० टक्के प्रतिसाद मिळाला. दरम्यान मुदतीत ४ ते ५ कार्यकर्त्यांनी अचानकपणे साखर सम्राटांच्या प्रतिकात्मक पुतळयाचे दहन केले. |
| १६. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री महेश खराडे -प्रवक्ता | आष्टा एस टी स्टँड चौकामध्ये | १३.१.२०१५ रोजी ०८.३० | जमाव बंदी आदेश भंग :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी २० ते २२ कार्यकर्त्यांनी बेकायदा जमाव करुन एफआरपी प्रमाणे ऊसाला दर मिळावा वगैरे घोषणा दिल्या. आष्टा पो. ठाणेस भाग -६ गुरनं ४/२०१५ भा.द.वि.सं.कलम- १८८, मुं.पो.का.क. १३५ , प्रमाणे दाखल आहे. |
| १७. | स्वाभिमनी शेतकरी संघटना | श्री संदीप राजोबा- स्वाभिमानी शेतकरी संघटना युवा आघाडी अध्यक्ष | जुने एस टी स्टँड चौक, पलूस | दिनांक १६.१.२०१५ रोजी ११.३५. वा. ते ११.५५ वा. | रस्ता रोको --ऊसाला प्रतिटन एफआरपी प्रमाणे दर मिळावा, एफआरपी प्रमाणे ऊसाला दर न देणा-या साखर कारखान्यांच्या संचालकांच्यावर फौजदार गुन्हे दाखल करावेत या मागणी करीता रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. जनसमुदाय - ५० ते ६० कार्यकर्ते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८. | शेतकरी संघटना | श्री रघुनाथ दादा पाटील | अंकलखोप गांवी विठ्ठल मंदीरात | दिनांक १६.१.२०१५ रोजी १६.४५ वा. ते १९.०० वा | रस्ता रोको --ॅश्री बी जी पाटील,श्री बाळासाहेब कुलकर्णी, श्री श्रीकांत आण्णा लाड व श्री वसंत बिरनाळे यांचे उपस्थितीत उस दरा बाबत बैठक झाली त्यामध्ये वरील सर्वानी शेतकऱ्यांना उस दरासाठी कारखानदार व शासना बरोबर संघर्ष करावा लागेल त्याकरीता सर्वानी एकत्र येवुन कोल्हापुर येथील आर जे डी ऑफिसवर मोर्चा काढण्याचे ठरले आहे. सदर बैठकीस ६०-७० शेतकरी उस्थिीत होते. |
| १९. | महाराष्ट्र नव निर्माण सेना | श्री बाळासाहेब उ र्फ प्रदीप बर्गे - अध्यक्ष आधार ठेवीदार संघटना | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | दिनांक १६.१.२०१५ रोजी १२.०० वा. ते १४.०० वा. | शंखध्वनी आंदोलन --सांगली व आधार ठेवीदार संघटना सांगली चे वतीने सांगली जिल्हयातील दोषी पतसंस्था चालकावर व सहकार विभागातील अधिका-यावंर कारवाई करावी या व इतर मागण्यासाठी थाळीनाद व शंखध्वनी आंदोलन केले.<br>दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री पाटील- निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले. जनसमुदाय - १५ ते २० कार्यकर्ते |
| २०. | अखिल भारतीय विदयार्थी परिषदे | श्री विवेकानंद उजळबकर- प्रांत मंत्री | वारणा मंगल कार्यालय, मार्केट यार्ड सांगली | दिनांक १७.१.२०१५ रोजी १४.३० वा. ते १६.१५ वा. | छात्र नेता संमेलन -श्री विवेकानंद उजळबकर- प्रांत मंत्री यांचे अध्यक्षते छात्र नेता संमेलन पार पडले.<br>सदर संमेलनाचे उद्‌घाटन श्री एन व्ही देशपांडे-संचालक येरळा प्रोजेक्ट सोसायटी सांगली यांचे हस्ते झाले. सदर संमेलनामध्ये आजची तरुणाई ही व्यसनाच्या विळख्यात अडकत चाललेली आहे. त्यावर महाविदयालयामध्ये प्रबोधन होण्याची गरज होण्याची गरज आहे. तसेच व्यसनमुक्त पर्यावरण युक्त तसेच स्वच्छ भारत अभियान इत्यादी परिषदे मार्फत राबविले जातात, अशी माहीती प्रदेश उपाध्यक्ष श्री निर्भय विसपुते यांनी दिली.<br>त्यानंतर महाविदयालयात येणा-या अडचणी कांही विदयार्थ्यांनी मांडल्या सदर वेळी दिनांक ६.२.२०१५ रोजी शिवाजी विदयापिठाचे कुलगूरु यांची शिवाजी विदयापीठ कोल्हापूर येथे भेट घेवून सदर अडचणीबाबत निवेदन दयायचे व सदर ठिकाणी आंदोलन करावयाचे असा निर्णय घेण्यात आला आहे. |
| २१. | हमाल पंचायत सांगली | श्री बापुसो भुजाप्पा मगदुक -सेक्रेटरी | वसंतदादा पाटील कृषी उत्पन्न बाजार समिती सांगली | ६.१.२०१५ रोजी १२.३० वा. ते १६.३० वा. | कामबंद -वसंतदादा पाटील कृषी उत्पन्न बाजार समिती सांगली येथील हमालाच्या हमाली दरांत वाढ करावी या मागणीसाठी माहे नोव्हेबर-२०१४ रोजी प्रशासक मार्केट कमिटी यांना पत्राने कळविलेले होते. त्यानंतर प्रशासक माकेट कमिटी, अध्यक्ष चेबर ऑफ कॉमर्स व हमाल पदाधिकारी यांचेत दि.२९.१२.२०१४ रोजी बैठकझाली होती परंतु त्याचेत केणत्याही प्रकारचा तोडगा निघालेला नव्हता परत दिनांक २.१.२०१५ रोजी बैठक झाली त्यात कोणत्याही प्रकारचा तोडगा न निघालेने अचानक पणे हमालांनी आपले कामबंद आंदोलन सुरु केलेले होते. सदर आंदोलनांत ३०० ते४०० हमाल सहभागी झालेले होते.<br>मार्केट कमिटी कार्यालय सांगली येथे हमाल पंचायतीचे पदाधिकारी यांची संयुक्त बैठक पार पडली. बैठकीमध्ये व्यापा-यांनी हमालांचे विरुध्द तक्रारी सांगितल्या त्याबाबत येत्या १५ दिवसात तक्रारींचे निरसन केले जाईल असे हमाल पंचायतीचे वतीने सांगण्यात आले त्यानंतर हमाली दरवाढ साडेतेरा टक्के देण्याचे व्यापा-यांनी मान्य केल्यानंतर हमालांनी आपले कामबंद आंदोलन मागे घेवून काम सुरु केले आहे. |
| २२. | महाराष्ट्र राज्य शिक्षण क्षेत्र संघटना समन्वय समिती | श्री जयसिंग पाटील – सचिव | कर्मवीर भाऊराव पाटील चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा | १३.१.२०१५ रोजी १२.१०. वा. ते १४.१० वा. | मोर्चा -दिनांक २०.११.२०१३ रोजीचा तुकडयांचा सुधारीत आदेश रद्द करुन चिपळूनक समिती प्रमाणे शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे मंजूर करण्यात यावीत या व इतर मागण्याकरीता मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले. त्यानंतर मागण्याचे निवेदन शिष्ठमंडळाव्दारे श्री दिपेंद्रसिंह कुशवाह-जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले. जनसमुदाय-<br>३००० ते ३५०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३. | महाराष्ट्र राज्य, भुमि अभिलेख, कर्मचारी संघटन | श्री असलम मुजावर-सरचिटणीस सांगली | सांगली | दिनांक १६.१.२०१५ रोजी पासून | कामबंद आंदोलन -श्री चंद्रकांत दळवी (भाप्रसे), जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यपध्दतीमुळे महाराष्ट्रातील भूमि अभिलेख खात्यातील कर्मचा-यांची पिळवणूक होत आहे तरी श्री चंद्रकांत दळवी (भाप्रसे), जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख पदावरुन दूर करावे या मागणी करीता बेमुदत कामबंद आंदोलन सुरु केले आहे. सदर कामबंद आंदोलनामध्ये सुमारे १५० भुमी अभिलेख कर्मचारी सहभागी झाले आहेत. |
| २४. | महाराष्ट्र राज्य,अंगणवाडी कर्मचारी संघ शाखा जिल्हा सांगली | सौ. मंगला सराफ – कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य व सौ. स्नेहलता कोरे-जिल्हाध्यक्ष, रा. इस्लांमपूर | जिल्हा परिषद कार्यालय सांगली जवळील इमॅम्युअल इंग्लीश स्कुलचे ग्राऊंडवर | दिनांक २०.१.२०१५ रोजी ११.०० वा. ते १५.०० वा. या वेळेत | धरणे आंदोलन -अंगणवाडी कर्मचारी यांना १.४.२०१४ पासून वाढीव मानधन मिळावे, सन २०१४ ची भाऊबीज भेट मिळावी या व इतर १० मागण्यासाठी धरणे आंदोलन केले.<br>दरम्यान मुदतीत श्री जाधव - उप कार्यकारी अधिकारी महीला व बाल कल्याण जि.प.सांगली यांना मागण्याचे निवेदन दिले. सदर वेळी सौ मंगला सराफ यांनी दिनांक ८.२.२०१५ रोजी गेवराई ते बीड अशी पदयात्रा काढून मा. पंकजा मुंडे-पालवे - महीला व बाल कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना तसेच १९.२.२०१५ रोजी पारनेर ते अहमदनगर अशी पदयात्रा काढून मा.ना.श्री राम शिंदे-गृहराज्य मंत्री यांना मागण्याचे निवेदन देणार असल्याचे जाहीर केले आहे. जनसमुदाय - ३०० ते ४०० अंगणवाडी महीला कर्मचारी |
| २५. | महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना, | अशोक रामय्या नाईक, अध्यक्ष | टिळक चौक, सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली | २८.१.२०१५ रोजी १३.०० ते १४.३० | **मोर्चा** --१०० ते १२५ कार्यकर्त्यानी गौन खनिजाचे उत्खननावर शासनाची असलेली बंदी ताबडतोब उठवावी या व इतर मागण्यासाठी मोर्चा काढण्यात आला मागण्याचे निवेदन मा श्री दिपेंद्रसिंह कुशवाह-जिल्हाधिकारी सांगली यांना दिले आहे. |
| २६. | आटपाडी एस टी कर्मचारी संघटना | श्री प्रविण दिक्षीत-अध्यक्ष | एस टी डेपो आटपाडी समोर | दि.२९.१.२०१५ रोजी १२.०० वा ते १२.१५ वा | धरणे आंदोलन -- आटपाडी आगार प्रमुख यांचे मनमानी कारभाराचे विरोधात तसेच कर्मचारी यांना सुट्टया दयाव्यात,गाडया वेळेवर सोडाव्यात या मागणी करीता २० ते २५ कर्मचाऱ्यांनी धरणे आंदोलन करून घोषणा देवुन मागण्याची पुर्तता न झालेस परत आंदोलन करण्याचे ठरले आहे. |
| २७. | सांगली बार असोसिएशन | ॲड. श्री महेश जाधव-अध्यक्ष | सांगली न्यायालयात | ३१.१.२०१५ रोजी ११.०० वा.ते १७.०० वा | कामबंद आंदोलन-- कोल्हापुर येथे खंडपीठ व्हावे या मागणी करीता १०० ते १२५ वकील कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते |
| २८. | मिरज बार असोसिएशन | ॲड. श्री फैय्याज झारी-अध्यक्ष | मिरज न्यायालयात | ३१.१.२०१५ रोजी ११.०० वा.ते १७.०० वा | कामबंद आंदोलन-- कोल्हापुर येथे खंडपीठ व्हावे या मागणी करीता ९० ते १०० वकील कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९. | कवठेमहांकाळ बार असोसिएशन | ॲड.श्री बंडगर-अध्यक्ष न | कवठेमहांकाळ न्यायालयात | ३१.१.२०१५ रोजी ११.०० वा.ते १७.०० वा | कामबंद आंदोलन-- कोल्हापुर येथे खंडपीठ व्हावे या मागणी करीता २० ते २५ वकील कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते |
| ३०. | विटा बार असोसिएशन | ॲड.श्री शरद जाधव-अध्यक्ष ाएशन | विटा न्यायालयात | ३१.१.२०१५ रोजी ११.०० वा.ते १७.०० वा | कामबंद आंदोलन-- कोल्हापुर येथे खंडपीठ व्हावे या मागणी करीता ४० ते ४५ वकील कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते |
| ३१. | आटपाडी बार असोसिएशन | ॲड.श्री बेडगे-अध्यक्ष | आटपाडी न्यायालयात | ३१.१.२०१५ रोजी ११.०० वा.ते १७.०० वा | कामबंद आंदोलन-- कोल्हापुर येथे खंडपीठ व्हावे या मागणी करीता ३० ते ३५ वकील कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते |
| ३२. | जत बार असोसिएशन | ॲड.श्री निटवे-अध्यक्ष | जत न्यायालयात | ३१.१.२०१५ रोजी ११.०० वा.ते १७.०० वा | कामबंद आंदोलन-- कोल्हापुर येथे खंडपीठ व्हावे या मागणी करीता १५ ते २० वकील कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते |
| ३३. | पलुस बार असोसिएशन | ॲड.श्री - ए एस सुर्यवंशी | पलुस न्यायालयात | ३१.१.२०१५ रोजी ११.०० वा.ते १७.०० वा | कामबंद आंदोलन-- कोल्हापुर येथे खंडपीठ व्हावे या मागणी करीता २० ते २५ वकील कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते |
| ३४. | शिराळा बार असोसिएशन | ॲड.श्री नरेंद्र सुर्यवशी-अध्यक्ष | शिराळा न्यायालयात | ३१.१.२०१५ रोजी ११.०० वा.ते १७.०० वा | कामबंद आंदोलन-- कोल्हापुर येथे खंडपीठ व्हावे या मागणी करीता ३५ ते ४० वकील कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते |
| ३५. | तासगांव बार असोसिएशन | ॲड.श्री जी डी पाटील-अध्यक्ष | तासगांव न्यायालयात | ३१.१.२०१५ रोजी ११.०० वा.ते १७.०० वा | कामबंद आंदोलन-- कोल्हापुर येथे खंडपीठ व्हावे या मागणी करीता ३५ ते ४० वकील कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते |
| ३६. | इस्लामपुर बार असोसिएशन | ॲड.श्री ए डी माळी-अध्यक्ष ा | इस्लामपुर न्यायालयात | ३१.१.२०१५ रोजी ११.०० वा.ते १७.०० वा | कामबंद आंदोलन-- कोल्हापुर येथे खंडपीठ व्हावे या मागणी करीता २५ ते ३० वकील कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७. | सांगली बार असोसिएशन | ॲड. श्री महेश जाधव-अध्यक्ष | सांगली न्यायालयाचे आवारात | ३१.१.२०१५ रोजी १०.०० वा. ते ११.०० वा. | गांधीगिरी आंदोलन :- ३५ ते ४० वकीलांनी कोल्हापुर येथे खंडपीठ व्हावे या मागणी करीता रस्त्यावर उभे राहून न्यायालयात येणारे न्यायाधीशांना गुलाब पुष्प देवून गांधीगिरी आंदोलन केले. |
| ३८. | मिरज बार असोसिएशन | ॲड. श्री फैय्याज झारी-अध्यक्ष | मिरज न्यायालयाचे आवारामध्ये | ३१.१.२०१५ रोजी १०.०० वा. ते १७.०० वा | धरणे आंदोलन :- कोल्हापुर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे या मागणी करीता २५ ते ३० वकीलांनी धरणे आंदोलन केले. |
| ३९. | हिंदू समाज | श्री भक्तराज ठिगळे यांचे नेतृत्वाखाली | शिवाजी चौक विटा | दिनांक १.१.२०१५ रोजी | **निवेदन** :- विटा शहरातील प्रसाद व भैरवनाथ या दोन चित्रपटा गृहामध्ये पीके चित्रपट प्रदर्शित होत होता. ` वतीने चित्रपट गृह मालकांना पीके चित्रपटामध्ये हिंदू धर्माच्या भावना दुखवणारी दृश्ये व संवाद दाखविण्यात आले असल्याने सदर चित्रपट बंद करावा या मागणी करीता<br>चित्रपट गृह मालक व आंदोलन कर्ते यांचे मध्ये चर्चा होवून चित्रपट गृह मालकांनी चित्रपट दाखविण्योचे बंद करण्याचे ठरले त्यामुळे आंदोलन कर्ते यांनी त्यांचे आंदोलन स्थगित केले आहे. |
| ४०. | भारतीय होलार समाज संघटना | श्री आबासाहेब पांडुरंग ऐवळे-अध्यक्ष | तहसील कार्यालय जत समोर | दिनांक ५.१.२०१५ रोजी १२.०० वा. ते १२.३० वा. | धरणे -बागेवाडी परिसरात चाललेले बेकायदेशीर पवनचक्कीचे काम बंद करावे या व इतर मागण्यासाठी धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत श्री कांबळे – तहसीलदार जत यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले. जनसमुदाय - ८ ते १० कार्यकर्ते |
| ४१. | वैयक्तीक | श्री रंगराव राजाराम मंडले व सौ सुमन रंगराव मंडले रा. कुंडलापूर | तहसील कार्यालय कवठे महंकाळचे आवारात | दिनांक १०.१.२०१५ रोजी १३.०० वा ते १३.१.२०१५ रोजी १७.०० वा. | **आमरण उपोषण** :- श्री रंगराव राजाराम मंडले वय ६० व सौ सुमन रंगराव मंडले वय ५० दोन्ही रा. कुंडलापूर हे मुलगा धनाजी रंगराव मंडले हा गेल्या महीन्यापासून संतोष कोळी व संजय जाधव यांनी बेपत्ता केला आहे तरी त्यांचे विरुध्द गुन्हा नोद होवून न्याय मिळावा या मागणी करीता आमरण उपोषणास बसले होते..<br>श्री डोंगरे – तहसीलदार कवठे महंकाळ व श्री युवराज मोहीते- पोलीस निरीक्षक कवठे महंकाळ पोलीस ठाणे यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेवून कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर उपोषण स्थगित केले आहे. |

<table>
<tr>
<td>४२.</td>
<td>शिवप्रतिष्ठाण</td>
<td>श्री संभाजी भिडे-संस्थापक</td>
<td>श्री वैराटगड ते श्रीसप्तर्षीगड मार्गे श्री क्षेत्र धावडशी जि. सातारा</td>
<td>दिनांक १५.१.२०१५ ते १८.१.२०१५</td>
<td>गडमोहीमः-शिवप्रतिष्ठानचे वतीने दिनांक १५.१.२०१५ ते १८.१.२०१५ या कालावधी मधील श्री वैराटगड ते श्रीसप्तर्षीगड मार्गे श्री क्षेत्र धावडशी जि. सातारा अशी काढणेत येणा-या गडकोट मोहीमेमध्ये सहभागी होण्यासाठी सांगली जिल्हयातून खालील प्रमाणे कार्यकर्ते रवाना झाले.
<table>
<tr><th>अ.नं.</th><th>नेतृत्व करणाराचे नांव</th><th>जनसमुदाय</th></tr>
<tr><td>१</td><td>श्री संभाजीराव भिडे (गुरुजी )-</td><td>४०० ते ५००</td></tr>
<tr><td>२</td><td>श्री विनायक माईणकर रा. मिरज</td><td>१०० ते १२५</td></tr>
<tr><td>३</td><td>श्री सतिश बापट रा. आष्टा</td><td>८० ते ९०</td></tr>
<tr><td>४</td><td>श्री विनोद बसुगडे रा. आष्टा</td><td>२५ ते ३०</td></tr>
<tr><td>५</td><td>श्री आनंदा धनवडे रा. तासगांव</td><td>७५ ते ८०</td></tr>
<tr><td>६</td><td>श्री राहुल रमेश टिंगरे रा. खानापूर</td><td>६० ते ७०</td></tr>
<tr><td>७</td><td>श्री अभिजीत बोडरे रा. विटा</td><td>६०ते ७०</td></tr>
<tr><td>८</td><td>श्री गजानन पाटील रा. इस्लांमपूर</td><td>१० ते १५</td></tr>
<tr><td>९</td><td>श्री प्रशांत पतंगराव पाटील रा.अंकलखोप</td><td>४ ते ५</td></tr>
<tr><td>१०</td><td>श्री राजेंद्र रामचंद्र खुर्द रा. शिराळा</td><td>१०० ते १२५</td></tr>
<tr><td>११</td><td>श्री प्रदिप शिंदे रा. कवठे महंकाळ</td><td>४० ते ५०</td></tr>
<tr><td>१२</td><td>श्री सुनिल केशव लाड रा. कवलापूर</td><td>४० ते ४५</td></tr>
<tr><td>१३</td><td>श्री सागर केशव पाटील रा.कवठे पिरान</td><td>१० ते १५</td></tr>
<tr><td>१४</td><td>श्री संजय हजारे रा. समडोळी</td><td>२० ते २५</td></tr>
<tr><td>१५</td><td>श्री चंद्रकांत शिंदे रा. कसबे डिग्रज</td><td>३५ ते ४०</td></tr>
</table>
</td>
</tr>
</table>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४३. | आष्टा शहर खोकी मालक चालक संघटनेच्या वतीने | श्री सुनिल माने- माजी राष्ट्रवादी काँग्रेस आष्टा शहर माजी अधक्ष | आष्टा ते इस्लांमपूर रोडवरील | दिनांक १७.१.२०१५ रोजी ०८.०० वा. पासून<br><br>दिनांक २१.१.२०१५ रोजी | खोकी बंद -सार्वजनिक बांधकाम विभागाचे वतीने आष्टा ते इस्लांमपूर रोडवरील खोकी काढणेत येणार आहेत याचे निषेधार्थ खोकी बंद आंदोलन सुरु केले होते. जनसमुदाय - १०० खोकीधारक<br>श्री विलासराव शिंदे-माजी आमदार व श्री वैभव शिंदे- राष्ट्रवादी काँग्रेस यांचे नेतृत्वाखाली सांगली येथे येवून मा.जिल्हाधिकारी सांगली यांना सदर खोकी न काढू नयेत वगैरे मागण्याचे निवेदन दिले .त्याचेळी मा.श्री दिपेंद्रसिंह कुशवाह- जिल्हाधिकरी यांनी तीन महीने खोकी काढणेस स्थगिती दिलेने आंदोलन मागे घेतले आहे. जनसमुदाय - २० ते २५ खोकीधारक |
| ४४. | मुस्लीम कार्यकर्ता | श्री मुस्तफा बुजरुक - मुस्लीम कार्यकर्ता मिरज | श्रीकांत चौक मिरज | दि.१८.०१.१५ ११.०० वा. ते १५.४५ वा | धरणे आंदोलन -- मुस्लीम समाजाला आरक्षण मिळावे या मागणी करीता धरणे आंदोलन केले.<br>सदर वेळी श्री इद्रीस नायकवडी-माजी महापौर,जैलाब शेख,मुबारक काझी वगैरे उपस्थित होते. नंतर शिष्टमंडळाने श्री हेमंत निकम-उपविभागीय दंडाधिकारी मिरज विभाग मिरज यांना निवेदन दिले आहे. जनसमुदाय- २५ ते ३० कार्यकर्ते |
| ४५. | दलीत महासंघ | श्री उत्तम जिन्नाप्पा मोहीते – जिल्हा अध्यक्ष | स्टेशन चौक ते सां,मि. कु. महानगर पालिका कार्यालय सांगली | २०.०१.२०१५ रोजी १२.४५ वा. ते १३.३० या | मोर्चा-- ३५ ते ४० कार्यकर्त्यांनी बुधगांव व सांगली येथील वाल्मीकी आवास येथे लाईट,पाणी, गटार वगैरे नागरी सुविधा पुरवाव्यात या मागणी साठी उघडा मोर्चा काढला. सांगली शहर पोलीस ठाणेस भाग- ६ गुरनं. ७/२०१५ भा.द.वि.सं. कलम १८८, मुपोकाक १३५ प्रमाणे |
| ४६. | -- | श्री विजय बाळासो जाधव रा. साखराळे व सौ. सरस्वती दिलीप चौगुले रा. गव्हाण ता. तासगांव | जिल्हाधिकारी कार्यालय | २२.१.२०१५ रोजी १७.०० | रस्ता रोको - जिल्हाधिकारी कार्यालय येथे नियोजन आढावा बैठक संपवून मा.ना.श्री चंद्रकांत पाटील- सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई तथा पालकमंत्री सांगली जिल्हा हे परत जात असताना श्री विजय बाळासो जाधव रा. साखराळे व सौ. सरस्वती दिलीप चौगुले रा. गव्हाण ता. तासगांव यांनी पालकमंत्र्यांच्या वाहनासमोर अचानकपणे बैठक मारुन रस्ता अडवून सांगली जिल्हयामध्ये दारुबंदी झालीच पाहीजे अशा घोषणा दिल्याचे कारणावरुन सांगली शहर पोलीस ठाणेस दाखल झाले गुन्हयाची माहीती खालील प्रमाण... |
| ४७. | जमीयत उलेमा-ए-हिंद | श्री मौलाना मुबारक काझी अध्यक्ष | मिरासाो दर्गा ते प्रांत कार्यालय मिरज | २३.१.२०१५ रोजी १५.३० वा. ते १६.४५ वा | मोर्चा - ४०० ते ५०० कार्यकर्त्यानी मुस्लीम समाजास आरक्षण मिळावे या व इतर मागण्या करीता मुक मोर्चा काढला. मोर्चा प्रांत कार्यालय मिरज येथे आल्या नंतर श्री हेमंत निकम – प्रांताधिकारी मिरज यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४८. | जमीयत उलेमा-ए-हिंद | श्री मुफती सादीक पटेल -अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय | दिनांक २३.१.२०१५ रोजी १६.१५ वा. | निवेदन :- जमीयत उलेमा-ए-हिंद सांगली जिल्हा मुस्लीम समाजास आरक्षण मिळावे या व इतर मागण्या करीता शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन मा श्री.दिपेंद्रसिंह कुशवाह-जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. जनसुदाय - ७ कार्यकर्ते |
| ४९. | ग्रामस्थ | श्री गौरव नायकवडी-सरपंच वाळवा ग्रामपंचायत | वाळवा एस टी बस स्थानकावर | दिनांक २३.१.२०१५ रोजीचे १०.०० वा. | बस अडवणे :- वाळवा परिसरातील एस टी बसेस वेळेवर येत नाहीत, तासगांव-इस्लामपुर बस रद्द केली तसेच वांरवार मागणी करुनही एस टी महामंडळ दखल घेत नाहीत म्हणुन वाळवा एस टी बस स्थानकावर थांबुन येणाऱ्या बसेस थांबवल्या होत्या वाळवा ग्रामचांयत सदस्य यांनी डेपो मॅनेजर श्री आर एच पाटील इस्लामपुर यांचेशी चर्चा केली. डेपो मॅनेजर यांनी आश्वासन दिले नंतर बससेवा पुर्ववत सूरु झाली. जनसमुदाय - २५-३० विदयार्थीनी |
| ५०. | मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष | कॉ. श्री. उमेश देशमुख- सेक्रेटरी | स्टेशन चौक सांगली | दिनांक २४.१.२०१५ रोजी १२.१० वा. ते १२.३० वा. | **निदर्शने** - अमेरीकेचे राष्ट्राध्यक्ष श्री बराक ओबामा यांचे भारत दौ-याचे निषेधार्थ निदर्शने केली. जनसमुदाय - १५ ते २० कार्यकर्ते |
| ५१. | ग्रामस्थ | श्री सुनिल वसंत पाटील व श्री स्वप्नील जालींदर पाटील | हनुमान मंदीर, वशी | दिनांक २५.१.२०१५ रोजी १०.०० वा. | **आमरण उपोषण** :- वशी ता. वाळवा हे वशी येथील गांवठाण जमीनीमधील मुरुम चोरीस जात आहे तरी मुरुम चोरी करणारांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत या मागणीसाठी आमरण उपोषणास बसले आहेत. |
| ५२. | पाणी संघर्ष समिती उमदी | श्री सुनिल गणपती पोतदार- अध्यक्ष पाणी संघर्ष समिती जत तालुका | उमदी गावी | दिनांक २६.१.२०१५ रोजी १७.४५ वा. ते १८.४५ वा. | **जाहीर सभा व चर्चा** :- जत तालुक्यातील उमदी परिसरातील ४२ गावांना म्हैशाळ योजनेचे पाणी मिळावे या विषयावर जाहीर सभा व चर्चा सत्र पार पडले. सदर सभेस मा. श्री संजय पाटील- खासदार भाजपा, मा. श्री विलासराव जगताप-आमदार भाजपा यांनी मागदर्शन करुन उमदी परिसरातील ४२ गांवाना म्हैशाळ योजनेचे पाणी देण्या करीता प्रयत्न करु असे आश्वासन दिले. |
| ५३. | नागरी हक्क कृती समिती, सांगली | श्री. सचिन मच्छिंद्र कांबळे, सचिव | जिल्हाधिकारी कार्यालय,समोर सांगली | दि.२८.१.२०१५ रोजी १२.१५ वा ते १५.१० | **धरणे आंदोलन** :- वालनेसवाडी येथील भूखंडावरील अतिक्रमण हटवावे या मागणी येथे धरणे आंदोलन केले व आपल्या मागण्याचे निवेदन मा श्री दिपेंद्रसिंह कुशवाह-जिल्हाधिकारी सांगली यांना दिले आहे. जनसमुदाय - १० ते १५ कार्यकर्ते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५४. | ग्रामस्थ | श्री सुनिल वसंत पाटील | **वशी गांव** | दिनांक ३०.१.२०१५ रोजी ०८.०० ते १७.०० वा पर्यत | **गावं बंद व मोर्चा** :- वशी गावामधील गावठाणमधील मुरुम चोरीला जातो, मुरुम चोरणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत या मागणीसाठी दिनांक २५.१.२०१५ रोजी १०.०० वा. पासून वशी येथील हनुमान मंदीरामध्ये आमरण उपोषणास बसले आहेत सदर मुरुम चोरीतील तीसरा आरोपी सरपंच यांना अटक करावी वशी गांव अत्याश्यक सेवा वगळुन ९० टक्के गावबंद होते ७० ते ८० ग्रामस्थांनी तहसिल कार्यालय इस्लामपुर येथे मोर्चा काढुन आपले मागणीचे निवेदन श्रीमती रुपाली सरनोबत –तहसिलदार इस्लामपुर यांना दिले आहे. |
| ५५. | दलीत समाज विकास परिषद | श्री योसेफ व्ही आवळे | | ०३.०२.२०१५ १३.३० वा. ते १४.०० वा | **निदर्शने :-** मौजे विजयनगर तालुका मिरज येथील गायरान जमिन नियमीती करण व्हावे या मागणी करीता तहसील कार्यालय मिरज समोर निदर्शने केली. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री घाडगे-तहसीलदार मिरज यांना देण्यात आले.<br>**जनसमुदाय** :- १५ ते २० . |
| ५६. | भारत मुक्ती मोर्चा | श्री महादेव तातुगडे | सांगली स्टेशन चौक सांगली | दि.१८.२.२०१५ रोजी ११.३० ते १२.०० या वेळेत | **पुतळा दहन व निदर्शने** :- कॉ गोविंदराव पानसरे यांचेवरील हल्ल्याचे निषेधार्त हल्लेखोरांचे पुतळ्याचे दहन करुन निदर्शने केली - जनसमुदाय - १५ ते २० |
| ५७. | सर्व पुरोगामी संघटनेचे वतीने | माजी आमदार श्री शरद पाटील,ॲड.श्री.के डी शिंदे,श्री शंकर पुजारी | राजवाडा चौक सांगली | दि.१८.०२.२०१५ रोजी<br>१२. ०५-१३.००. | **रास्ता रोको व निदर्शने** :- कॉ गोविंदराव पानसरे यांचेवरील हल्ल्याचे निषेधार्त रास्ता रोको व निदर्शने करीत असताना १२ ते १५ कार्यकर्त्यांना बी पी ॲक्ट ६८ प्रमाणे १२.०५ वा ताबेत घेवुन बी पी ॲक्ट-६९ प्रमाणे १३.०० वा मुक्त करणेत आले आहे. जनसमुदाय - ५० ते ६०. |
| ५८. | पुरोगामी चळवळ | श्री दादासाहेब ढेरे – पुरोगामी चळवळ | कवठे महंकाळ | २२.२.२०१५ ०८.०० वा. ते १७.०० | **गांवबंद व निषेध फेरी** :- कॉ गोविंदराव पानसरे यांचेवरील हल्ल्याचे निषेधार्त कवठे महंकाळ गांव बंद पाळण्यात आले. दरम्यान मुदतीत ११.०० वा. ते १३.०० वा. या वेळेत कवठे महंकाळ गावातून निषेध फेरी काढण्यात आली. गांव बंदला ६० टक्के प्रतिसाद मिळाला. निषेध फेरी मध्ये २५ ते ३० कार्यकर्ते सामील झाले होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५९. | दलीत महासंघ | श्री प्रविण कांबळे- सांगली जिल्हा अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | २४.२.२०१५ १०.४५ वा. १६.०० वा | **निदर्शने**:- कॉ. गोविंद पानसरे यांच्या हल्लेखोरांचा तात्काळ शोध घेवून कठोर शासन करावे या मागणी करीता एक दिवशीय धरणे आंदोलन केले. जनसमुदाय-१० ते १५ |
| ६०. | महाराष्ट्र राज्य, भुमि अभिलेख, कर्मचारी संघटनेच्या वतीने | श्री असलम मुजावर- सरचिटणीस सांगली | मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय विजयनगर सांगली | १६.१.२०१५ ते | **कामबंद** :- श्री चंद्रकांत दळवी (भाप्रसे), जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यपध्दतीमुळे महाराष्ट्रातील भूमि अभिलेख खात्यातील कर्मचा-यांची पिळवणूक होत आहे तरी श्री चंद्रकांत दळवी (भाप्रसे), जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख पदावरुन दूर करावे या मागणी करीता बेमुदत कामबंद आंदोलन केले. जनसमुदाय- १५० |
| ६१. | सांगली जिल्हा तोलाईदार सभा | श्री विकास मगदुम सेक्रेटरी | कृषी उत्पन्न बाजार समिती सांगली | १६.२.२०१५ ते १८.०२.२०१५ | **धरणे आंदोलन** :- तोलाई मजुरी वाढ मिळावी या मागणीसाठी धरणे आंदोलन करणेत आले जन समुदाय- ५० ते ७५ तालाईदार |
| ६२. | निवारा बांधकाम संघटना | श्री शंकर पुजारी- अध्यक्ष | डॉ आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी | २०.२.२०१५ रोजी १२.१५ ते १३.१५ | **मोर्चा**:- वयोवृध्द कलाकारांना पेन्शन मिळावी या व इतर मागण्यासाठी मोर्चा काढणेत आला<br>जन समुदाय ७० ते ७५ |
| ६३. | सांगली जिल्हा हमाल पंचायतीचे | श्री विकास मगदुम- सेक्रेटरी | कृषी उत्पन्न बाजार समिती सांगली | २१.२.२०१५ ते २६.०२.२०१५ | **कामबंद**:- हळद वाहतुक करणारे हमालांना व बैलगाडी मालकांना मजुरी वाढ मिळावी या व इतर मागण्यासाठी हमालांनी कामबंद आंदोलन सुरु केले होते. जनसमुदाय -१०० ते १२५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६४. | ग्रामस्थ | श्री सुनिल वसंत पाटील | कुरळप गांवी हनुमान मंदीरा मध्ये | २५.१.२०१५ ते ४.२.२०१५ | **उपोषण:-** वशी येथील गांवठाण जमीनीमधील मुरुम चोरीस जात आहे तरी मुरुम चोरी करणारांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत या मागणीसाठी आमरण उपोषणास बसले होते.<br>श्री विजयसिंह जाधव – गट विकास अधिकारी पंचायत समिती इस्लांमपूर व श्री एन बी ऐडके- नायब तहसीलदार इस्लांमपूर यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेवून मागण्यांची पुर्तता करणे बाबत लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| ६५. | वैयक्तीक | श्री शंकर जगन्नाथ मस्के रा. बावची ता. वाळवा | तहसील कार्यालय इस्लांमपूर समोर | दिनांक २.२.२०१५ रोजी ११.४५ वा. ते १५.०० वा पर्यत | **आमरण उपोषण:-** मुलगा चि. अदित्य शंकर मस्के याचे वर सुश्रूत हॉस्पीटल इस्लांमपूर येथील डॉ. दिलीप सावंत यांनी निष्काळजीपणे चूकीची शस्त्रक्रिया केली आहे त्याची चौकशी होवून डॉ दिलीप सावंत यांचेवर कायदेशीर कारवाई करावी या मागणी करीता आमरण उपोषणास बसले होते. उपोषणास कुटूंबातील व गावांतील १० ते १२ लोकांनी पाठींबा दिला होता.<br>तहसीलदार इस्लांमपूर यांनी सिव्हिल सर्जन, सिव्हील हॉस्पीटल, सांगली यांचा अहवाल आल्यानंतर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर उपोषणकर्ते उपोषण स्थगित केले आहे. |
| ६६. | यंत्रमाग संघ विटा | श्री किरण तारळेकर- अध्यक्ष | यंत्रमाग संघ कार्यालय विटा | दिनांक २.२.२०१५ रोजी ११.३० वा. ते ११.४० वा. | **वीजबील होळी:-** यंत्रमाग चालकांनी शासनाने यंत्रमाग व्यवसायासाठी विजबिल अनुदान जाहीर केले आहे परंतू प्रत्यक्षात अनुदान दिलेले नाही याचे निषेधार्थ समोर विज बिलाची होळी केली. जनसमुदाय २५ ते ३० मागण्याचे निवेदन श्री सचिन इथापे- प्रांताधिकारी विटा यांना दिले. |
| ६७. | ग्रामस्थ | श्री प्रकाश आनंदा बनसोडे | विरमरण चौक, एतवडे खुर्द | दिनांक १.२.२०१५ रोजी १३.०० वा. ते<br>दिनांक ७.२.२०१४ रोजी १२.०५ वा | **उपोषण:-** राष्ट्रीय पेय जल योजनेचे कामकाज तात्काळ सुरु करावे या व इतर मागण्यासाठी उपोषणास बसले होते.<br>श्री विजयसिंह जाधव – गट विकास अधिकारी इस्लांमपूर यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेवून राष्ट्रीय पेयजल योजनेतील तांत्रिक अडचणी बाबत मा. जिल्हाधिकारी सांगली व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांचे कडे पाठपुरावा करून लवकरात लवकर राष्ट्रीय पेयजल योजनेचे काम सुरु करण्याचे आश्वासन दिल्यानंतर उपोषणकर्ते मागे घेतले आहे. |
| ६८. | ग्रामस्थ | श्री बाबासाहेब तुकाराम महींद | देवराष्ट्रे | ३.१.२०१५ ०९.४० वा.ते १०.४० वा. | . **गावबंद:-** कै. यशवंतराव चव्हाण यांचे जन्म शताब्दी निमीत्त गांवचे विकासासाठी मिळालेल्या १५ कोटी रुपयातून देवराष्ट्रे गांवचा विकास झालेला नाही यांचे निषेधार्थ पासून देवराष्ट्रे गांवबंद पाळण्यात आले होते. श्री व्ही वाय भिसे- नायब तहसीलदार कडेगांव यांनी देवराष्ट्रे गांवी भेट देवून मागण्यांची पुर्तता करणेबाबत आश्वासन दिल्यानंतरवाजता गांवबंद आंदोलन मागे घेण्यात आले आहे. सदरवेळी ग्रामस्थांनी मागण्याचे निवेदन श्री श्री व्ही वाय भिसे- नायब तहसीलदार कडेगांव यांना दिले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६९. | आंतरराष्ट्रीय मानव न्याय अधिकार संघटना | श्री विजय जाधव - अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ५.२.२०१५ १२.४५ वाजता | **निवेदनः-** संपुर्ण जिल्हा दारुबंदी करावी या इतर मागण्याचे निवेदन श्री संजय शिंदे- निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांची जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे भेट घेवून दिले.जनसमुदाय-१०ते१५ |
| ७०. | शिवसेना | श्री शकील सय्यद | छ.शिवाजी महाराज पुतळा इस्लुमपूर | ३.२.२०१५ ११.४५ वा. ते १२.०० वा. | **निदर्शने-** ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या व इतर मागण्यासाठी निदर्शने केली. जनसमुदाय-४०ते५० |
| ७१. | ग्रामस्थ | श्री उत्तम रघुनाथ शिंदे रा. बेणापूर | तहसील कार्यालय विटा | ९.२.२०१५ १५.०० वा. १६.०० वा | **धरणे आंदोलन** :- सुझ्लॉन कंपनीने सन १९७२ मध्ये बांधलेला बंधारा फोडून रस्ता केला आहे तरी सदर कंपनीवर गुन्हा दाखल करावा या व इतर मागण्यासाठी धरणे आंदोलन केले. जनसमुदाय- १५ |
| ७२. | स्वस्त धान्य दुकानदार संघटना | श्री मुन्ना कुरणे व श्री सुभाष गोयकर | सांगली शहरामध्ये | १०.२.२०१५ १२.१५ वा | **निवदेनः-** सांगली जिल्हयातील स्वस्त धान्य दुकानदारांचे वतीने स्वस्त धान्य दुकानदारांना बायोमेट्रीक पध्दत सुरु करीत असताना त्याची माहीती दयावी या व इतर मागण्यासाठी श्री मुन्ना कुरणे व श्री सुभाष गोयकर -माजी नगरसेवक यांचे नेतृत्वाखाली शिष्ठ मंडळाने श्री विलास डुबल -अन्नधान्य वितरण अधिकारी सांगली यांना निवदेन दिले आहे. |
| ७३. | ग्रामस्थ | श्री अरुण लाड | कुंडल | १८.२.२०१५ ०९.२० ते १८.०० | **निषेधफेरी व गावबंदः-** कुंडल गावा मध्ये १५० ते १५० लोकांनी निषेध फेरी दि.१८.२.२०१५ रोजी १७.२० ते १७.४० या वेळेत काढली.व अत्यावश्यक सेवा वगळून गांव ९० टक्के बंद होंत. |
| ७४. | राष्ट्र सेवादल | श्री सदाशिव मगदुम | मिरज शहर पोलीस ठाणे हद्दीत | १८.२.२०१५ १२.०० वा. | **निवदेन .:-** श्री हेमंत निकम-उपविभागीय अधिकारी मिरज याना हल्लेखोरांना तात्काळ अटक करावी अन्यथा रस्त्यावर येवुन आदोलन करणार असलेचे निवेदन दिले आहे.जनसमुदाय -१०-१२ |
| ७५. | **अंधश्रध्दा निर्मुलन समिती** | **श्री संजय बनसोडे** | इस्लांमपूर शहरातील प्रमुख मार्गानी | **२२.२.२०१५ १५.३० वा. ते १०.०० वा.** | **निषेध फेरी :-** कॉ. गोविंद पानसरे यांचे हत्येचे निषेधार्थ छ. शिवाजी महाराज पुतळा, यल्लमा चौक- गांधी चौक- लाल चौक- जुनी भाजी मंडई- ब्राम्हणपुरी- आझाद चौक ते परत छ. शिवाजी महाराज पुतळा अशी इस्लांमपूर इस्लांमपूर शहरातील प्रमुख मार्गानी काळया फिती लावून निषेध फेरी काढली.जनसमुदाय ४०-५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७६. | परीवर्तनवादी जनसंघटना | श्री व्ही वाय पाटील | रामानंद नगर | २२.२.२०१५ १०.०० वा | **शोकसभा** :- कॉ. गोविंद पानसरे यांचे हत्येबाबत रामानंदनगर येथे शोकसभा घेण्यात आली. शोकसभेस १५ ते २० कार्यकर्ते उपस्थीत होते. |
| ७७. | परीवर्तनवादी जनसंघटना | श्री गणपतराव पाटील | जुने एस टी स्टँड चौक पलूस | २२.२.२०१५ १२.०० वा. | **शोकसभा** :- कॉ गोविंद पानसरे यांचे हत्येबाबत शोकसभा घेण्यात आली. शोकसभेस श्री अरुण लाड, मारुती शिरतोडे, यांचे सह १०० ते १२५ कार्यकर्ते उपस्थीत होते. |
| ७८. | ग्रामस्थ | गौरव नायकवाडी | वाळवा | २२.२.२०१५ ०८.०० वा. ते १६.०० वा | **गांवबंद** :- वाळवा गांवबंद पाळण्यात आले. बंदला अत्यावश्यक सेवा वगळता ६० टक्के प्रतिसाद मिळाला. |
| ७९. | ग्रामस्थ | श्री सुभाष पाटील रा वडीये रायबाग | विटा तहसिल कार्यालय | दि.२२.०२.२०१५ वेळ ११.३० ते ११.४५ | **धरणे आंदोलन** :- कॉ गोविंदराव पानसरे यांचेवरील हल्ल्याचे निषेधार्त धरणे आंदोलन करुन आरोपीना तात्काळ अटक करावी या व इतर मागण्याचे निवेदन नायब तहसिलदार विटा श्री महाजन यांना दिले आहे. जनसमुदाय-३०-४० |
| ८०. | ग्रामस्थ | श्री अशोक रामचंद्र मस्के | तासगांव पोलीस ठाणे हद्दीमध्ये | २२.०२.२०१५ ०८.०० वा. ते १६.०० वा. | **गांव बंद व निषेध फेरी** :- तासगांव बंद पाळण्यात आले. दरम्यान मुदतीत ११.०० वा. ते ११.३० वा या वेळेत मोटार सायकलवरून निषेध फेरी काढण्यात आली. तासगांव गांवबंदला ८० टक्के प्रतिसाद मिळाला. निषेध फेरीमध्ये ८ ते १० कार्यकर्ते  सहभागी झाले होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८१. | ग्रामस्थ | श्री जयंतराव शामराव निकम | कासेगांव | २२.२.२०१५ ०८.०० वा. ते १८.०० वा | **गांवबंद** :- कासेगांव गांव बंद पाळण्यात आले. बंदला अत्यावश्यक सेवा वगळता ८० टक्के प्रतिसाद मिळाला. |
| ८२. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री सिद्राम आप्पा स्वामी | श्री रामराव विदयामंदीर हायस्कुलचे जत | २२.२.२०१५ १४.३० वा. ते १७.४५ | **व्याख्यान** :- छ. संभाजी महाराज बलीदान मास चे अनुषंगाने श्री संभाजी भिडे- संस्थापक अध्यक्ष श्री शिवप्रतिष्ठान हिदुस्तान यांचा व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. जनसमुदाय-१०० ते १२५ |
| ८३. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री मिलींद मानगुडे | सग्राम लॉन पलूस | २३.२.२०१५ १९.०० वा. ते २०.५५ | **व्याख्यान-** छ. संभाजी महाराज बलीदान मास चे अनुषंगाने श्री संभाजी भिडे- संस्थापक अध्यक्ष श्री शिवप्रतिष्ठान हिदुस्तान यांचा व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. जनसमुदाय- ३०० ते ३५० |
| ८४. | भ्रष्टाचार जन आंदोलन समिती | स्वप्नील जालींदर पाटील रा. वशी | तहसील कार्यालय इस्लामपूर समोर | २३.२.२०१५ ११.०० वा. ते १४.०० वा | **धरणे आंदोलन** - भुसंपादन विधेयक विरोधी सत्याग्रही जेष्ठ समाज सेवक आण्णा हजारे यांना जाहीर पाठींबा म्हणून धरणे आंदोलन केले. जनसमुदाय-१० ते १५ |
| ८५. | शिवप्रतिष्ठान हिदुस्तान | श्री प्रदीप वसंत शिंदे | ग्रामपंचायत नाटयगृह कवठे महंकाळ | २१.२.२०१५ १४.०० वा. ते १६.३० वा. | **व्याख्यान:** - छ. संभाजी महाराज बलीदान मास चे अनुषंगाने श्री संभाजी भिडे- संस्थापक अध्यक्ष श्री शिवप्रतिष्ठान हिदुस्तान यांचा व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. जनसमुदाय- ४०० ते ५०० शिवप्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थीत होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८६. | आधार ठेवीदार संघटना | श्री पृथ्वीराज रामचंद्र खटावकर- | विश्रामबाग पोलीस ठाणे हद्दीमध्ये | २५.२.२०१५ ११.०० ते १७.०० वा. | **धरणे आंदोलन**:- सर्व पतसंस्था मध्ये अडकलेल्या ठेवी परत मिळाव्यात या व इतर मागण्या करीता जिल्हा उप निबंधक कार्यालय, मध्यवर्ती शासकीय इमारत, विजयनगर सांगली येथे धरणे आंदोलन केले.जनसमुदाय- ५० ते ६० |
| ८७. | समाजसेविका आटपाडी | श्रीमती कल्पना इनामदार रा.विठ्लापूर | एस टी स्टँड ते तहसील कार्यालय आटपाडी | २६.२.२०१५ ११.०० वा. १२.०० वा. | **मोर्चा** :- डाळींबावरील निर्यातीच्या जाचक अटी कमी कराव्यात या मागणी करीता मोर्चा काढला.<br>जनसमुदाय- ३० ते ४० |
| ८८. | ऑल इंडीया ट्रेड युनियन काँग्रेस | कॉ. रमेश सहस्त्रबुध्दे अध्यक्ष व ॲड. एम आर कुंभार- | स्टेशन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | मोर्चा १३.०० वा. ते १४.०० वा. या निदर्शने १४.३० वा. ते १६.०० वा. | **मोर्चा व निदर्शने** :- कॉ. रमेश सहस्त्रबुध्दे- अध्यक्ष व ॲड. एम आर कुंभार- जनरल सेक्रेटरी यांचे प्रमुख नेतृत्वाखाली १०० ते १२५ कार्यकर्त्यांनी राज्य व केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणाच्या निषेधार्थ व कामगारांना किमान १५०००/- रुपये मिळावे या व इतर मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा मोर्चा काढला.त्यानंतर सदर आंदोलनकर्त्यांनी कॉ. रमेश सहस्त्रबुध्दे- अध्यक्ष व ॲड. एम आर कुंभार- जनरल सेक्रेटरी यांचे प्रमुख नेतृत्वाखाली जिल्हा परिषद कार्यालय सांगली येथे जावून ग्रामपंचायत, अंगणवाडी, बालवाडी कामगारांना दरमहा १५०००/- रुपये किमान वेतन दयावे या व इतर मागण्यासाठी निदर्शने केले. |
| ८९. | कृष्णाव्हॅली चेंबरऑफ इंड.अड कॉमर्स | श्री. शिवाजी पाटील | क्रांतिसिंह नाना पाटील चौक ते एम.एस.ई.बी. | २७.२.२०१५ ११.१५ वा. १२.३० वा. | **मोर्चा** :- वाढलेली वीज दरवाढ रदद करावी या मागणी करीता मोर्चा काढला.<br>जनसमुदाय- १०० ते १२५ |
| ९०. | आधार ठेवीदार संघटना | श्री पृथ्वीराज खटावकर- मनपा क्षेत्र अध्यक्ष, | जिल्हा उप निबंधक कार्यालय, सांगली | २६.२.२०१५ ११.०० ते १७.०० वा. | **धरणे आंदोलन**:- ठेवीदारांना सांगली जिल्हयातील सर्व पतसंस्था मध्ये अडकलेल्या ठेवी परत मिळाव्यात या व इतर मागण्या करीता धरणे आंदोलन केले. जनसमुदाय- ५० ते ६० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९१. | भारीप बहुजन महासंघ | श्री मधुकर शेसवरे- उपाध्यक्ष<br>रा. मिरज | डॉ पद्म भुषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली समोर | २०.३.२०१५ रोजी ११.०० | **धरणे-** डॉ पद्म भुषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली हे सांगली येथून स्थलांतरीत करु नये या मागणी करीता दिनांक २०.३.२०१५ रोजी ११.०० पासून बेमुदत धरणे आंदोलनास बसले आहेत. जनसमुदाय -८ ते १० कार्यकर्ते दिनांक २१.३.२०१५ रोजी डॉ विकास कुरेकर वैदयकीय अधीक्षक यांनी आंदोलनाचे ठिकाणी भेट दिली व त्यांना यापुर्वीच रुग्णालयाचे स्थलांतराबाबत कोणताही निर्णय नाही तरी आपण आपले आंदोलन मागे घ्यावे अशी विनंती केली परंतू आंदोलनकर्ते यांनी आपले धरणे आंदोलन सुरुच ठेवले आहे. |
| ९२. | भारीप बहुजन महासंघ | श्री मधुकर शेसवरे- रा. मिरज उपाध्यक्ष | डॉ पद्म भुषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली समोर | दिनांक २०.३.२०१५ रोजी ११.०० पासून ते दिनांक २५.३.२०१५ रोजी ११.०० वा पर्यंत | **धरणे आंदोलन** :- डॉ पद्म भुषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली हे सांगली येथून स्थलांतरीत करु नये या मागणी करीता बेमुदत धरणे आंदोलनास बसले होते. सदर बाबत वरील संदर्भान्वये अहवाल सादर करण्यात आला आहे त्याचे अवलोकन होणेस विनंती आहे. आंदोलनकर्ते यांनी मा.जिल्हाधिकारी सांगली यांची जिल्हाधिकारी कार्यालय येथे भेट घेवून मागण्याचे निवेदन दिले व मागण्याबाबत चर्चा केली चर्चे मध्ये आंदोलन कर्ते यांचे समाधान झाल्याने आंदोलनकर्ते यांनी धरणे आंदोलन मागे घेतले आहे. जनसमुदाय - ८ ते १० कार्यकर्ते |
| ९३. | राष्ट्रीय समाज पक्ष सांगली | श्री संजय लवटे – जिल्हाध्यक्ष | स्टेशन चौक सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय | २३.३.२०१५ रोजी ११.४० वा. ते १२.४५ वा. | **निदर्शने** :- राज्य विमा कामगार रुग्णालय राजवाडा चौक सांगली येथील डॉ जावडेकर यांच्या मनमानी कारभाराची चौकशी होवून त्यांचे निलंबन करावे या मागणीसाठी मोर्चा काढण्यात आला दरम्यान मुदतीत राज्य विमा कामगार रुग्णालय राजवाडा चौक सांगली समोर निदर्शने करण्यात आली. .मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर शिष्ठ मंडळाने मागण्याचे निवेदन श्री शेखर गायकवाड जिल्हाधिकारी सांगली यांना मागण्याचे निवेदन दिले. सदर वेळी १५ ते २० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| ९४. | शिव स्वराज्य संघटन | श्री अजीत खंदारे- अध्यक्ष | एस टी स्टँड नेलकरंजी ते ग्रामपंचायत कार्यालय नेलकरंजी | दिनांक २५.३.२०१५ रोजी १०.०० वा. ते ११.०० वा. | **मोर्चा** :- ग्रामपंचायत नेलकरंजी कडून घरपट्टी व पाणी पट्टी इत्यादी कर वसूल केले जातात परंतू ग्रामस्थानां नागरी सुविधा दिल्या जात नाहीत, पाणी पुरवठया बाबत मागासवर्गीय लोकांचेवर अन्याय केला जातो यांचे निषेधार्थ मोर्चा काढला. मोर्चा ग्रामपंचायत कार्यालय नेलकरंजी या ठिकाणी आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री पाटील- ग्रामसेवक नेलकरंजी यांना देण्यात आले. जनसमुदाय १० ते १५ कार्यक्ते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९५. | शेतकरी संघर्ष समिती | मारुती केशव चव्हाण-अध्यक्ष | पलूस सहकारी बँक चौक पलूस ते तहसील कार्यालय पलूस असा | - दिनांक २३.३.२०१५ रोजी ११.०० वा. ते १२.४५ वा. | **मोर्चा** :- अवकाळी पावसाने द्राक्ष बागायत शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई दयावी, कर्ज माफी करावी, दिर्घकालीन कर्जाचे व्याज माफ करावे, कमीत कमी १६ तास विदयुत पुरवठा व्हावा, कृष्णा कॅनल व आर फळ योजनेचे पाणी वेळच्यावेळी मिळावे या व इतर मागण्या करीता मोर्चा काढला. मोर्चामध्ये ४०० ते ५०० द्राक्ष बागायतदार शेतकरी सहभागी झाले होते. मोर्चा तहसील कार्यालय पलूस येथे आल्यानंतर शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन नायब तहसीलदार श्री बरुडे यांना दिले आहे. मोर्चाचे वेळी पलूस बाजार पेठ येथील व्यापा-यांनी आपआपली दुकाने बंद ठेवून मोर्चा पाठींबा दिला होता. मोर्चा बाजारपेठेतून पास झालेनंतर सर्व दुकाने सुरु करण्यात आली होती. |
| ९६. | हमाल पंचायत | श्री विकास मगदुम-सेक्रेटरी | मार्केट यार्ड, सांगली. | दि.२१.२.२०१५ पासुन ते<br><br>दि.२६.०२.१५ रोजी १७.००-२१.०० वा<br><br>२७.२.२०१५<br>४.३.२०१५ रोजी १३.३० | **कामबंद** - हळद वाहतुक करणारे हमालांना व बैलगाडी मालकांना मजुरी वाढ मिळावी या व इतर मागण्यासाठी कामबंद आंदोलन सुरु केले होते.<br>**बैठक-** कृषी उत्पन्न बाजार समिती सांगली यांचे कार्यालयात हमाल पंचायतीचे श्री विकास मगदुम सेक्रेटरी, श्री बाळासाहेब बंडगर- माजी संचालक,कृषी उत्पन्न बाजार समिती सांगली. श्री.माळी- प्रशासक कृषी उत्पन्न बाजार समिती सांगली, श्री मनोहर सारडा- अध्यक्ष चेंबर ऑफ कॉमर्स, यांचेत हमालांचे मागण्याचे अनुषंगाने बैठक पार पडली. बैठकीमध्ये हमाल दरवाढी बाबत समाधान कारक चर्चा झालेने हळद हमालांनी कामबंद आंदोलन स्थगित केले होते. जनसमुदाय १०० ते १२५<br>**कामबंद** - परंतू हमाली व लेव्हीची रक्कम व्यापा-यांनी व वाहतुकदारांनी माथाडी बोर्डात भरावी या बाबत व्यापा-यांनी नकारात्मक धोरण स्वीकारले होते त्यामुळे हमालांनी दिनांक २७.२.२०१५ रोजी पासून आंदोलन पुढे चालू ठेवले होते.<br>दिनांक ४.३.२०१५ रोजी १२.१५ वा ते १३.३० वा या वेळेत श्री मदन पाटील- माजी मंत्री यांचे निवासस्थानी व्यापारी व हमाल पंचायतीचे पदाधिकारी यांची बैठक पार पडली. बैठकीत हमाली व लेव्ही व्यापारी देणार व माथाडी बोर्डात वाहतूकदार भरणार असा निर्णय झाल्याने हमालांनी कामबंद आंदोलन मागे घेतले आहे. |
| ९७. | प्राथमिक शिक्षक समिती | श्री. विश्वनाथ मिरजकर- राज्य | त्रिकोणी बाग सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय | ०७.०३.२०१५ रोजी १३.०५ वा.ते १६.०५ वा | **मोर्चा** - प्राथमिक शिक्षकांनी प्राथमिक शिक्षकांच्या विविध प्रलंबीत मागण्यांसाठी मोर्चा काढणेत आला मागण्याचे निवेदन श्री.संजय शिंदे- निवासी उपजिल्हाधिकारी सांगली यांना दिले आहे. जनसमुदाय - ३००ते३५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९८. | सांगली जिल्हा हमाल पंचायत. | श्री बापूसाहेब भुजाप्पा मगदूम - सेक्रेटरी | मार्केट यार्ड सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय | १६.३.२०१५ रोजी ११.३० वा. ते १४.४५ वा. या वेळेत | **मोर्चा - कामबंद आंदोलन- निवेदन - निदर्शने-** उदयोग व्यवसायातून माथाडी कामगार कायदा रद्द करु नये या व इतर मागण्यासाठी ४०० ते ५०० महीला व पुरुष अशांनी मोर्चा काढला.<br>मोर्चा सांगली मार्केट यार्ड येथून निघून मार्केट यार्ड परिसरातील माथाडी बोर्ड कार्यालय येथे गेला सदर ठिकाणी निदर्शने करुन मागण्याचे निवेदन श्री गुरव यांना दिले.<br>त्यानंतर सदर मोर्चा मार्केट कमिटी कार्यालय येथे आला व तेथे श्री एस डी पाटील- उप सचिव मार्केट कमिटी यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे येवून मोर्चाचे सभेत रुपांतर झाले.सभेत श्री विकास मगदूम- नगरसेवक, श्री पृथ्वीराज पवार- शिवसेना, ॲड. के डी शिंदे, श्री अमित शिंदे, सौ विदया स्वामी यांची भाषणे झाली<br>त्यानंतर मोर्चातील प्रमुख पदाधिकारी यांनी शिष्ठमंडळाने जावून निवासी उप जिल्हाधिकारी श्री संजय शिंदे यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>दरम्यान मुदतीत हमाल पंचायतीचे वतीने सांगली मार्केट व गणपती पेठ येथील हमालांनी कामबंद आंदोलन केले. |
| ९९. | महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना सांगली | श्री बिराज साळुंखे - अध्यक्ष | विभागीय कार्यालय सांगली समोर | दिनांक २३.३.२०१५ रोजी ११.०० वा. ते १६.३० वा. | **धरणे आंदोलन** :- एस टी कामगार करार १९८८ नुसार लिपीक पदावर कर्मचारी यांना वेतन निश्चित करुन तफावत दूर करावी या व इतर मागण्यासाठी धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्री कदम — विभाग नियंत्रक सांगली यांना दिले. जनसमुदाय-५० ते ५५ |
| १००. | निवासा बांधकाम संघटना (आयटेक) | कॉ. श्री शंकर पुजारी - अध्यक्ष | मराठा सेवा संघ सभागृह सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा | दिनांक २३.३.२०१५ रोजी १३.४५ वा. ते १४.४५ वा. | **मोर्चा :-** बांधकाम कामगारांच्या इमारत वइतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने घोषीत केलेले सर्व लाभ व बांधकाम कामगारांना अंत्योदय रेशनकार्ड मिळण्याबाबत व सांगली जिल्हयातील दहा हजार बांधकाम कामगारांना कामगारांचे दोन कोटी पंचवीस लाख इतक्या रक्कमेचे लाभ कामगारांना न देणा-या सांगली सहायक कामगार आयुक्त व सरकारी कामगार अधिकारी यांच्यावर कारवाई करावी या व इतर मागण्या करीता मोर्चा काढला.मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली या ठिकाणी आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री शेखर गायकवड- जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले. १०० ते १२५ बांधकाम कामगारांन |
| १०१. | महानगर पालिका कामगार सभा व म्युनसिपल मजदूर संघ सांगली | श्री दिलीप शिंदे - व श्री चिंतामणी कांबळे | महानगर पालिका कार्यालयासमोर | दिनांक २५.३.२०१५ रोजी ११.१० वा. ते १२.१० वा. | **निदर्शन** :- महानगरपालिका कर्मचा-यांचे पगार वेळेवर होत नाहीत, तरी व्यापा-याकडून एलबीटी वसुल करावी या मागणी करुन प्रत्येक महीन्याच्या १० तारखे पर्यंत कर्मचा-यांचे पगार अदा करावेत या मागणीसाठी निदर्शने केली. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री विवेक कांबळे - महापौर व श्री कारचे - आयुक्त मनपा यांना देण्यात आले. ६० ते ७० महानगरपालिका कर्मचारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०२. | शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) | प्रा. डॉ. आर एच पाटील – कार्यवाह सुटा (मो. नं९८२३९८५७५०) | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | दिनांक २७.३.२०१५ रोजी १६.०० वा. ते १६.३० वा. | **निदर्शने :-** मिरज महाविदयालयातील शिक्षकांचे अनेक प्रश्न प्रलंबीत आहेत त्यांची पुर्तता व्हावी, शिक्षकांच्यावर होणा-या अन्यायी घटना लक्षात घेवून उपाय योजना होवून शिक्षकांना त्यांचे न्याय हक्क मिळावेत. शिक्षकांना केलेल्या कामाचे वेतन मिळावे, वेतनवाढ मिळावी, त्यांचा छळवाद थांबवावा या व इतर मागण्यासाठी निदर्शने केली. दरम्यान मुदतीत श्री शिंदे – निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले. ३० ते ३५ शिक्षकांनी |
| १०३. | श्री शिवप्रतिष्ठान हिंदूस्तान | आनंदराव चव्हाण | टिळक चौक - बालाजी चौक - मारुती चौक- | दिनांक ०१.०३.२०१५ रोजी १०.३० वा. | **शोभा यात्रा -** श्री संभाजी भिडे- संस्थापक अध्यक्ष श्री शिवप्रतिष्ठान हिंदूस्तान यांचे उपस्थीत वडबुद्रूक जि. पुणे येथून छ. संभाजी महाराज यांची धर्मवीर ज्वाला आणण्यात आली. सदर धर्मवीर ज्वालेचे स्वागत करण्यात आले.<br>३० ते ३५ मोटार सायकल वरुन सांगली शहरातून शोभा यात्रा काढली. शोभा यात्रा छ. शिवाजी पुतळा येथे आल्यानंतर ध्येय मंत्र म्हणून शोभा यात्रेची सांगता झाली.<br>जनसमुदाय - ६० ते ७० |
| १०४. | लोकशासन आंदोलन | श्रीमती मनिषा रोटे- महीला संघटक यांचे प्रमुख्य | जिल्हाधिकारी कार्यालयाचे पटांगणात | दिनांक ०२.०३.२०१५ रोजी | **धरणे -** मा.उच्च न्यायालयाने सादर केलेल्या प्रतिज्ञा पत्रा नुसार दारिद्र रेषेच्या यादया जाहीर कराव्यात या मागणी करीता धरणे आंदोलन केले.<br>दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने श्री शिंदे निवासी उप जिल्हाधिकारी यांना भेटून मागण्याबाबत चर्चा केली. सदर वेळी निवासी उप जिल्हाधिकारी यांनी ग्रामिण विकास अधिकारी यांना निवेदन घेण्यासाठी आंदोलनाचे ठिकाणी पाठवितो असे सांगीतले. श्री सी डी सुतार- सहायक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा यांनी आंदोलनाचे ठिकाणी येवून मागण्याचे निवेदन स्विकारले व दिनांक १७.३.२०१५ रोजी पर्यंत दारिद्र रेषेची यादी जाहीर करण्याचे आश्वासन दिले. जनसमुदाय - १५०- २०० कार्यकर्ते |
| १०५. | सांगली शहर फास्टफूड विक्रेते संघटन | श्री सुरेश टेंगले- | स्टेशन चौक ते सामिकु, मनपा कार्यालय | ५.३.२०१५ रोजी ११.३० वा. ते १२.५५ वा. | **मोर्चा-** फेरीवाले धोरणाची अंमलबजावणी करावी या व इतर मागण्यासाठी मोर्चा काढला. मोर्चा मनपा कार्यालय येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री नाईक- सहायक आयुक्त, मनपा, कार्यालय सांगली यांना दिले.<br>जनसमुदाय - २५ ते ३० |
| १०६. | सांगली जिल्हा शिक्षण संस्था संघ सांगली | ॲड श्री.एस एस पाटील-अध्यक्ष व | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | ५.३.२०१५ रोजी ११.३० वा. ते १४.०० वा. | **घंटानाद -** महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने संस्था चालकांच्या मागण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे याचें निषेधार्त व शिक्षण विभागाने वेतनेत्तर खर्चाची परीपुर्ती म्हणून ५ टक्के रक्कम मंजूर केली परंतू मागील वर्षी टोकन रक्कम म्हणून फक्त एक लाख रुपये दिले या वर्षीची रक्कम व मागील फरक अदा करण्याबाबत शासनाने कुठली ही हालचाल केलेली नाही यांचे निषेधार्थ घंटानाद आंदोलन केले. दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने मा. ना. श्री चंद्रकांत पाटील- सहकार मंत्री तथा पालकमंत्री सांगली जिल्हा यांना मागण्याचे निवेदन दिले. जनसमुदाय - १५ ते २० कार्यकर्ते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०७. | जनसंघटना निमंत्रक | भाई व्ही.आय.पाटील व मारुती शिरतोडे - | जुने एसटी ते तहसिल कार्यालय पलूस | ०७.०३.२०१५ रोजी ११.३० ते १२.३० वा | **मोर्चा** - कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या झालेल्या हत्येच्या निषेधार्थ व इतर मागण्यासाठी मोर्चा काढणेत आला मागण्याचे निवेदन श्री.मधुसुदन बर्गे-तहसिलदार पलुस यांना दिले आहे. जनसमुदाय - ४०ते५० |
| १०८. | मुस्लीम आरक्षण कृती समितीच्या वतीने | श्री फिरोज पठाण- अध्यक्ष मुस्लीम आरक्षण कृती समिती सांगली | स्टेशन चौक सांगली | ०९.०३.२०१५ रोजी ११.१५ वा. ते १७.०५ वा. या वेळेत | **धरणे आंदोलन**- मुस्लीम समाजास दिलेले आरक्षण शासनाने रद्द केले आहे तरी मुस्लीम समाजास शिक्षणा मध्ये व नोकरी मध्ये आरक्षण दयावे या व इतर मागण्याकरीता धरणे आंदोलन केले.<br>दरम्यान मुदतीत शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे जावून श्री शेखर इनामदार- जिल्हाधिकारी सांगली यांची भेट घेवून त्यांना मागण्याचे निवेदन दिले आहे. जनसमुदाय-५०-५५. |
| १०९. | प्रतिभा महीला विचार संघटना सांगली | श्रीमती रमाताई बाबत- अध्यक्षा | स्टेशन चौक सांगली | ९.०३.२०१५ रोजी १६.०० वा. ते १६.३० वा. | **पुतळा दहन :** ''इंडीयन डॉटर'' या लघुपटाचे प्रसारणावर बंदी आणावी या मागण्याकरीता निदर्शने केली व परकीय प्रसार माध्यमाया श्रीमती लेसली एडवीन यांचे प्रतिकात्मक पुतळयाचे दहन केले. जनसमुदाय - १० ते १२ महीला कार्यकर्ते |
| ११०. | ग्रामस्थ | श्री. मलकाप्पा यल्लाप्पा बळूर रा. मौजे तिकोंडी ता.जत | तिकोंडी गावी येतनाळ रोड तलावाजवळ | दि.११.०३.२०१५ रोजी १३.०० वा पासून | **उपोषण :** तिकोंडी गावातील येतनाळ रोड येथील तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचे नुकसान भरपाई मिळावी या व इतर मागणीसाठी आमरण उपोषणास बसले होते.<br>श्री.प्रमोद गायकवाड- उपविभागीय अधिकारी जत व श्री.अभिजीत पाटील-तहससिलदार जत यांनी उपोषण कर्ते यांची भेट घेवुन त्यांचे मागण्या बाबत चर्चा केली त्यामध्ये उपोषणकर्त्यांचे समाधान झालेने त्यांनी उपोषण स्थगित केले आहे. जनसमुदाय - २३ |
| १११. | जनहित लोक आंदोलनाचे सदस्य | श्री. सुरेश शंकर बाबर वगैर ३ रा चरण ता शिराळा | चरण ग्रामपंचायत समोर | दि.१३.०३.२०१५ रोजी १०.००वा प्ते १७.४५ वा | **उपोषण :** चरण गावातील स्मशानभुमीचे काम उत्कृष्ठ व्हावे या व इतर मागण्या साठी उपोषणास बसले होते दरम्यानचे मुदतीत त्यांची श्री.ए. ए. कुंभार -सर्कल अधिकारी व श्री एन डी जगताप –ग्रामसेवक यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेवुन त्यांच्या मागण्याचे अनुषंगाने चर्चा केली त्यामध्ये उपोषणकर्त्यांचे समाधान झालेने आमरण उपोषण स्थगित केले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११२. | **शिवप्रतिष्ठान** कार्यकर्ते | ---- | मारुती चौक सांगली | १५.३.२०१५ रोजी १६.४५ वा. ते १९.३० वा. | दि.१९.२.२०१५ पासुन छ.संभाजी महाराज बलीदान मास सुरु झालेला असून सदर बलीदान मास श्री शिवप्रतिष्ठान चे वतीने तिल्हयात महीना भर साजरा केला जातो.त्या निमित्ताने विविध कार्यक्रम सुरु आहेत.<br>धर्मवीर संभाजी महाराज बलीदान मास निमित्त शिवप्रतिष्ठान, सांगलीचे वतीने दिनांक ९.३.२०१५ रोजी वडबुद्रुक जि. पुणे येथून धर्मवीर ज्वाला (ज्योत) आणून मारुती मंदीर, मारुती चौक, सांगली येथे आणून ठेवण्यात आली आहे. सांगली जिल्हयातील कवलापूर, बुधगांव, अंकली, समडोळी, कसबे डिग्रज, कवठे पिरान, बामनोळी, पदमाळे गावांमधून तसेच कोल्हापूर जिल्हयातील नांदणी, शिरोळ, जयसिंगपूर, कुरुंदवाड या गांवामधील सुमारे ४०० ते ४५० शिवप्रतिष्ठान कार्यकर्ते मारुती चौक सांगली येथे येवून मारुती मंदीर येथे ठेवण्यात आले धर्मवीर ज्वालेस (ज्योतीस) दुस-या धर्मवीर ज्वाला पेटवून घेवून आपआपल्या गांवी गेले आहेत. |
| ११३. | संभाजी ब्रिगेड | संजय पाटील | मिशन कंपौड ,जिल्हा परिषद जवळ सांगली | ७.३.२०१५ व ८.३.२०१५ रोजी | **राज्यस्तरीय अधिवेशन** - संभाजी ब्रिगेड या संघटनेचे ८ वे राज्यस्तरीय अधिवेशन उद्घाटन कार्यक्रम व ८ सत्रा मध्ये पार पडले.सदर अधिवेशनाचे ठिकाणी प्रमुख प्रवेशव्दारास कै आर आर पाटील प्रवेशव्दार, सभागृहास कै. पद्मभुषण वसंतदादा पाटील व कार्यक्रम स्थळास क्रांतीसिंह नाना पाटील, व्यासपीठास कॉ.कै गोविंद पानसरे, पुस्तक विक्री ठिकाणास कै नागनाथ नायकवडी, कै जी.डी. (बापू) लाड, डॉ बाबासाहेब आंबेडकर अशी नांवे देण्यात आली होती. तसेच सभा मंडपात कै. यशवंतराव चव्हाण, कै वसंतदादा पाटील, कै राजाराम बापू पाटील, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, शहीद भगतसिंग, अहिल्याबाई होळकर, छ. शाहू महाराज, संत गाडगे महाराज, रविंद्रनाथ टागोर इत्यादी थोर महापुरुषांची तैलचित्रे लावण्यात आलेली होती व व्यासपीठावर शेतक-यांचे सन्मानत--- संभाजी ब्रिगेड मैदानात, एकच ध्यास, तरुणांचा आर्थिक विकास, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड असे लिहलेला दोन्ही बाजूस वरील कोप-यामध्ये राजमाता जिजाऊ व छ.शिवाजी महाराज यांचे फोटो व मध्यभागी छ. संभाजी महाराज यांचा मोठा फोटो असेलेला फलक लावण्यात आला होता.<br>**उद्घाटन :-** दिनांक ७.३.२०१५ रोजी १०.०० वाजता जिजाऊ वंदन व संभाजी ब्रिगेड यांचे वतीने आलेल्या शाहीरांनी आपली शाहीरी गीते सादर केली. त्यानंतर आमदार श्री जगन्नाथ शिंदे - अध्यक्ष केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोशिएशन महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते दिप प्रज्वलन करुन झाले. सदर कार्यक्रमास श्री विवेक कांबळे- महापौर सांमिकु,मनपा सांगली, माजी आमदार श्री हाफीजभाई धत्तुरे, श्री मनोज शिंदे, श्री दिग्वीजय सुर्यवंशी- नगरसेवक सामिकु मनपा, ॲड. मनोज आखरे, श्री संजय देसाई, श्री वैभव शिंदे व इतर संभाजी ब्रिगेडचे १५ ते २० पदाधिकारी स्टेजवर उपस्थीत होते. उद्घाटन कार्यक्रमाचे वेळी हिंदकेसरी विजेता श्री सुनिल साळुंखे, व भंगारातून क्रेन निर्माण करणारे श्री महादेव जगताप यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे ठिकाणी विविध महापुरुषांच्या नावांने सद्भावना ज्योती आणल्या जात होत्या. त्या मध्ये मुस्लीम समाज ही सहभागी झालेला होता. उद्घाटन कार्यक्रमांचे वेळी प्रमुख वक्ते १. ॲड. मनोज आखरे २. आमदार श्री जगन्नाथ शिंदे ३. श्री यशवंत गोसावी- ४. श्री अमोल मिटकरी – ५. श्री मुन्नान शेख ६. प्रा. श्री गंगाधर बनबरे- ७. श्रीमंत कोकाटे ८. श्री सतिश चव्हाण ९. श्री पुरुषोत्तम खेडेकर यांची भाषणे झाली सदर बाबतचा सविस्तर अहवाल अलाहिदा सादर करण्यात आलेला आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११४. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान सांगली. | श्री नितीन चौगुले- कार्यवाह शिवप्रतिष्ठान | सांगली शहर(मारुती चौक ते शहरातील प्रमुख मार्गाने फिरुन परत मारुती चौक) | २०.३.२०१५ रोजी ०८.०० ते ०९.३५ | मुक अंतयात्रा-- शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान सांगलीचे वतीने सांगली जिल्हयामध्ये दिनांक २१.२.२०१५ ते २०.३.२०१५ या कालावधीमध्ये छ. संभाजी महाराज बलीदान मास पाळण्यात आला. छ. संभाजी महाराज बलीदान मास निमित्त सांगली जिल्हयामध्ये चौका चौकामध्ये छ. संभाजी महाराज यांचे फोटो लावून ध्येयमंत्र व प्रेरणामंत्र म्हणण्यात येत होते.<br><br>छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. |
| ११५. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री विनायक कुलकर्णी | मिरज शह | २०.३.२०१५ रोजी १९.१० ते २०.३५ | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय १५० ते २०० |
| ११६. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री सुनिल केशव लाड | कवलापूर | २०.३.२०१५ रोजी १०.०० ते १०.३० | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय ७० ते ८० |
| ११७. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री सागर वसंतराव पाटील | कवठे पिरान | २०.३.२०१५ रोजी १८.०० ते १८.४५ | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय १०० ते १२५ |
| ११८. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री संजय हजारे | समडोळी | २०.३.२०१५ रोजी १९.०० ते १९.४५ | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय १०० ते १२५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११९. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री चंद्रकांत शिंदे | कसबे डिग्रज | २०.३.२०१५ रोजी १९.३० ते २०१० | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय १०० ते १२५ |
| १२०. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री सतिश बापट | आष्टा | २०.३.२०१५ रोजी १८.३५ ते १९.२० | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय १०० ते १२५ |
| १२१. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री शरद कमलाकर पाटील | बागणी | २०.३.२०१५ रोजी १९.०० ते २०.१० | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय ९० ते १०० |
| १२२. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री महेश बाबर | विटा | २०.३.२०१५ रोजी १९.०० ते २०.०० | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय ८० ते ९० |
| १२३. | मुस्लीम समाज आरक्षण हक्क बचाव कृती समिती | मकसुद रहीमतुल्ला पटवेकर व श्री मुनीर रहीमतुल्ला पटवेकर- | आझाद चौक, मोमीन मोहल्ला ते तहसील कार्यालय इस्लांमपूर | २०.३.२०१५ रोजी १४.५५ वा. ते १६.०५ वा या वेळेत | मोर्चा - डिसेंबर अखेर मुस्लीम समाजास आरक्षण न मिळाा निषेधार्थ मोर्चा काढला. मोर्चा तहसील कार्यालय इस्लांमपूर येथे आल्यानंतर तहसीलदार श्रीमती रुपाली साळंखे यांना मागण्याचे निवेदन दिले आहे. सदर वेळी आंदोलनकर्ते यांनी डिसेंबर अखेर मुस्लीम समाजास आरक्षण न मिळाल्यास एक लाख मुस्लीम लोकांसह विधानसभेस घेराव घालण्यात येईल व गावांगावामध्ये मेळावे घेवून जनजागृती करु असा इशारा दिला आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२४. | --- | आप्पासाहेब जयवंत नरळे रा. सनमडी | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | १८.३.२०१५ रोजी ११.०० वा | आमरण उपोषण -सनमडी ता. जत येथे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गाव, तलाव, विहीरी आणि पारंपारीक पाणी साठयातील गाळ काढण्याच्या कामामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. सदर बाबत जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी जि.प.सांगली यांना वेळोवेळी अर्ज देवून ही कोणत्याही प्रकारची चौकशी झालेली नाही. तरी सदर भ्रष्टाचाराची सखोल चौकशी होवून संबंधीतावर कायदेशीर कारवाई व्हावी या मागणी करीता १.आप्पासाहेब जयवंत नरळे वय ३३, २. सतिश अंकुश कांबळे वय ३६, ३.केराप्पा आगनु म्हारनूर वय ४१, ४. मधुकर पांडुरंग नरळे वय ३२, सर्व रा. सनमडी ता. जत हे आमरण उपोषणास बसले होते. उपोषणकर्ते यांचे पैकी श्री केराप्पा आगनु म्हारनूर वय ४१, हे दिनांक १९.३.२०१५ रोजी उपोषण मागे घेवून गांवी निघून गेले आहेत. उर्वरीत उपोषणकर्ते यांचे उपोषण सुरु आहे. सदर आंदोलनकर्ते यांनी दिनांक २१.३.२०१५ रोजी गुढी पाडव्याचे दिवशी आंदोलनाचे ठिकाणी काळी गुढी उभी करुन प्रशासनाचा निषेध व्यक्त केला. |
| १२५. | वाळवा तालुका मुस्लीम समाज आरक्षण हक्क बचाव कृती समिती | श्री मकसुद रहीमतुल्ला पटवेकर व श्री मुनीर रहीमतुल्ला पटवेकर-माजी नगराध्यक्ष इस्लांमपूर नगरपालिका | आझाद चौक, मोमीन मोहल्ला ते तहसील कार्यालय इस्लांमपूर | दिनांक २०.३.२०१५ रोजी १४.५५ वा. ते १६.०५ वा | मोर्चा- मुस्लीम समाजाच्या विविध मागण्यासाठी मोर्चा काढला. मोर्चा तहसील कार्यालय इस्लांमपूर येथे आल्यानंतर तहसीलदार श्रीमती रुपाली साळंखे यांना मागण्याचे निवेदन दिले आहे. सदर वेळी आंदोलनकर्ते यांनी डिसेंबर अखेर मुस्लीम समाजास आरक्षण न मिळाल्यास एक लाख मुस्लीम लोकांसह विधानसभेस घेराव घालण्यात येईल व गावांगावामध्ये मेळावे घेवून जनजागृती करु असा इशारा दिला आहे. |
| १२६. | नगरसेवक | श्री अय्याज नायकवडी –मिरज | स्टेशन चौक सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | दिनांक २३.३.२०१५ रोजीचे ११.३५ वा ते १२.०५ वा. | मोर्चा- दिनांक १५.३.२०१५ रोजी महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये हजरत महंमद पैगंबर यांचे बद्दल आक्षेपार्ह मजकूर छापला याचे निषेधार्थ मोर्चा काढण्यात आला. मोर्चा मध्ये मुस्लीम समाजाचे प्रमुख श्री असिफ बावा, श्री ए ए मुत्तवली, ॲड. रियाज जमादार यांचे सह ५० ते ६० मुस्लीम समाजाचे लोक हजर होते.मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर शिष्ठ मंडळाने मागण्याचे निवेदन श्री शेखर गायकवाड जिल्हाधिकारी सांगली यांना मागण्याचे निवेदन दिले. |
| १२७. | --- | | मार्केट यार्ड, जत चे पाठीमागील डफळे सरकार यांचे मालकीचे मोकळया जागेत | दिनांक २७.३.२०१५ व २८.३.२०१५ रोजी | **इस्तेमा :-** मुस्लीम धर्मियाचा इस्तेमा पार पडला. दिनांक २७.३.२०१५ रोजी ०६.०० वाजता इस्तेमास सुरुवात झाली. इस्तेमा कार्यक्रमामध्ये रोज ५ वेळा नमाज पठण करण्यात आले. मौलाना आसिफ शेख यांनी नमाज पठण पढविले. तसेच इस्तेमा कार्यक्रमा दरम्यान मौलाना शमीम शेख रा. पुणे, मौलाना अफसरभाई रा. पुणे,मौलाना वाजीदभाई नांदेडवाले, मौलाना शोयब मुंब्रावाले, यांची प्रवचने झाली.<br>दिनांक २८.३.२०१५ रोजी ०९.३० वा. ते १०.०० वा. या वेळेत मौलाना मुबीन यांनी दूवा मागणेचा कार्यक्रम केला.<br>इस्तेमा कार्यक्रमास दिनांक २७.३.२०१५ रोजी ८ ते १० हजार व दिनांक २८.३.२०१५ रोजी ३५ ते ४० हजार जनसमुदाय उपस्थीत होता. |
| १२८. | ग्रामस्थ | सौ वंदना कदम-नगरसेविका सांगलीवाडी | हिराबाग वॉटर वर्क्स कार्यालय | दिनांक २३.३.२०१५ रोजी १३.४५ वा. ते १४.१५ वा. | **निदर्शने :-** दत्तनगर सांगलीवाडी येथील ड्रेनिज पाईप तात्काळ बदलावी या मागणीकरीता निदर्शने करण्यात आली. दरम्याने मुदतीत शिष्ठमंडळाने श्री रसाळ - उपायुक्त व श्री गिरी - उप अभियंता पाणी पुरवठा विभाग यांची भेट घेवून मागण्याबाबत चर्चा केली चर्चे मध्ये शिष्ठमंडळाचे समाधान झाल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. जनसमुदाय- ३० ते ४० स्त्री पुरुष हजर होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२९. | **ग्रामस्थ** | श्री राजेंद्र विठ्ठल परीट –नांद्रे ता.मिरज | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | दिनांक २३.३.२०१५ रोजी ११.४५ वा. ते १२.१५ वा. | **धरणे आंदोलन :-** हॅाटेल जनसेवा परमीट रुम ने शासनाची फसवणूक करुन खोटया कागदपत्राचे आधारे परवाना मिळवला आहे तो रद्द करावा या मागणी करीता धरणे आंदोलन केले. जनसमुदाय- ८ ते १०, |
| १३०. | ताकारी जनसेवा सामाजिक संस्था ताकारी | श्री युवराज शंकर निकम रा. ताकारी | ताकारी ग्रामपंचायत कार्यालया समोर | दिनांक २६.३.२०१५ रोजी १०.०० वा. ते १०.०५ वा. | **शंखध्वनी आंदोलन** :- ताकारी गांवातील गटारांची दुरुस्ती व सफाई करावी या मागणी सांठी शंखध्वनी आंदोलन केले. सदर आंदोलनामध्ये २० ते २५ लोक सहभागी झाले होते. दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने श्री ए आर सनदे- ग्रामविकास अधिकारी ताकारी यांना मागण्याचे निवेदन दिले. |
| १३१. | --- | १.आप्पासाहेब जयवंत नरळे वय ३३, २. सतिश अंकुश कांबळे वय ३६, ३. मधुकर पांडुरंग नरळे वय ३२, सर्व रा. सनमडी ता. जत | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | दिनांक १८.३.२०१५ रोजी ११.०० वा ते दिनांक २३.३.२०१५ रोजी १७.३० वा पर्यत | **आमरण उपोषण :-** सनमडी ता. जत येथे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गाव, तलाव, विहीरी आणि पारंपारीक पाणी साठयातील गाळ काढण्याच्या कामामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. सदर बाबत जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी जि.प.सांगली यांना वेळोवेळी अर्ज देवून ही कोणत्याही प्रकारची चौकशी झालेली नाही. तरी सदर भ्रष्टाचाराची सखोल चौकशी होवून संबंधीतावर कायदेशीर कारवाई व्हावी या मागणी करीता आमरण उपोषणास बसले होते.<br><br>श्रीमती सुचिता भिकाणे - उप जिल्हाधिकारी सांगली यांनी आंदोलनकर्ते १.आप्पासाहेब जयवंत नरळे वय ३३, २. सतिश अंकुश कांबळे वय ३६, ३. मधुकर पांडुरंग नरळे वय ३२,यांची भेट घेवून मागण्याबाबत चर्चा केली चर्चे अंती कारवाई करणेचे आश्वासन दिलेने आंदोलनकर्ते यांचे समाधान झाले. |
| १३२. | ग्रामस्थ | श्री आत्माराम तुकाराम पाटील वय ७८ रा. कामेरी ता. वाळवा | तहसील कार्यालय इस्लांमपूर समोर | दिनांक २३.३.२०१५ रोजी १०.०० वा. पासून<br><br>दिनांक २४.३.२०१५ रोजी १२.५० | **आमरण उपोषण :-** श्री आत्माराम तुकाराम पाटील वय ७८ रा. कामेरी ता. वाळवा हे त्यांचे स्वत:चे मालकीचे कामेरी येथील गट १४५०, १४५२ मध्ये जाण्यायेण्यासाठी मा. तहसीलदार यांनी दिनांक २९.९.१९९ रोजी मंजूर केलेला रस्ता तयार करुन मिळावा या मागणीसाठी आमरण उपोषणास बसले होते. तहसीलदार इस्लांमपूर यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेवून त्यांच्या मागण्याबाबत लेखी आश्वासन दिल्याने उपोषणकर्ते यांचे समाधान झाल्याने उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| १३३. | सांगली मिरज आणि कुपवाड शहर एल बी टी हटाव कृती समिती सांगलीचे | श्री समीर शहा – निमंत्रक | गणपती मंदीर ते सराफकट्टा – तानाजी चौक – पटेल चौक- राजवाडा चौक ते स्टेशन चौक अशी | दिनांक २६.३.२०१५ रोजी ११.०० वा. ते ११.१५ वा. | **रॅली व आमरण उपोषण :-** एल बी रद्द करावी या मागणी करीता रॅली काढली. रॅलीमध्ये ९० ते १०० मोटार सायकलवर १७५ ते १५० व्यापारी व शिवसेना कार्यकर्ते सहभागी झाले होते. सदर रॅली स्टेशन चौक सांगली येथे आल्यानंतर १)मोहनभाई ठाकुरदास गुरनानी वय ६८ वर्षे रा. मुंबई, २) समीर फुलचंद शहा वय ४३ रा. सांगली, ३) विराज आण्णासाहेब कोकणे वय ४७ रा.मिरज, ४) सुरेश भाऊजी पटेल वय ४२ रा. सांगली यांनी स्टेशन चौक सांगली येथे १२.०० वा. पासून वरील मागणीसाठी आमरण उपोषण सुरु केले आहे. सदर आंदोलनास शिवसेना सांगलीचे वतीने पाठींबा देण्यात आला आहे. दिनांक २६.३.२०१५ रोजी ११.०० वा. ते १६.०० वा. या वेळेत सांगली मिरज आणि कुपवाड शहरातील व्यापा-यांनी व्यापार बंद ठेवून सदर आंदोलनास पाठींबा दिला. व्यापार बंदला सांगली व मिरज शहरामध्ये १०० टक्के प्रतिसाद मिळाला तर कुपवाड शहरामध्ये ७० टक्के प्रतिसाद मिळाला. आमरण उपोषण शांततेत सुरु असून आमरण उपोषणाचे ठिकाणी योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. उपोषणकर्ते यांची वेळेवर वैदयकीय तपासणी करणेबाबत पोलीस निरीक्षक सांगली शहर पोलीस ठाणे यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. हालचालीवर लक्ष ठेवून आहोत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३४. | श्रमिक मुक्ती दल | मारुती पाटील- कोल्हापूर जिल्हा प्रमुख | झोळंबी फाटा येथे | दिनांक २८.३.२०१५ रोजी १४.५० वा. ते १७.३० वा. | **ठिय्या आंदोलन :-** शासने अधिग्रहन केलेल्या जमिनींचे पैसे दिलेले नाहीत, तसेच पर्यायी जमिनी दिलेल्या नाहीत तरी अधिग्रहन झालेल्या जमिनींचे पैसे मिळावेत व पर्यायी जमिनी मिळाव्यात या इतर मागण्यासाठी ठिया आंदोलन केले.<br>सदर आंदोलनकर्ते हे मागण्याबाबत चर्चा करण्यासाठी प्रधान सचिव महाराष्ट्र शासन यांची बैठकीची तारीख मिळत नाही ठिया आंदोलन करणार आहेत. जैनसमुदाय - १० ते १५ पुरुष व ३० ते ३५ महीला |
| १३५. | ग्रामस्थ | श्री सुनिल रामचंद्र रसाळ रा. जत | प्रांत कार्यालय जत समोर | दिनांक ३०.३.२०१५ रोजी १०.३० वा. ते १८.३० वाजता | **आमरण उपोषणास** :- मारुती विंड कंपनीने टॉवर उभा करीत असताना श्री सुनिल रामचंद्र रसाळ यांचे घराचे नुकसान केले आहे त्याची नुकसान भरपाई मिळावी या मागणी करीता हे पासून आमरण उपोषणास बसले होते.<br>श्री गायकवाड - प्रांत जत यांनी मारुती विंड कंपनीचे अधिकारी व उपोषणकर्ते यांची बैठक घेतली सदर बैठकीमध्ये विंड कंपनीच्या अधिका-यांनी ४ दिवसात नुकसान भरपाई दयावी व ४ दिवसात नुकसान न दिल्यास त्यांचेवर गुन्हे दाखल करावेत असा निर्णय घेण्यात आल्याने उपोषणकर्ते उपोषण मागे घेतले आहे. |
| १३६. | - | श्री गौतम रामचंद्र ऐवळे व श्री अजित पाटील रा. जत | प्रांत कार्यालय जत समोर | दिनांक १.४.२०१५ रोजी ११.०० वा. दिनांक २.४.२०१५ रोजी १६.४५ वा पर्यंत | **उपोषण** :- जत येथील स्मशानभुमीचे काम लवकरात लवकर पुर्ण करावे या मागणीकरीता उपोषणास बसले होते. श्री गायकवाड -प्रांत अधिकारी जत यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेवून मागण्याबाबत आश्वासन दिले उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| १३७. | - | श्री रणधीर नाईक- जिल्हा परिषद सदस्य | ग्रामपंचायत कार्यालय खिरवडे | दिनांक ८.४.२०१५ रोजी १४.३० वा. ते १५.३० वा. | **बैठक** :- कोकरुड पोलीस ठाणे हद्दीमध्ये खिरवडे ता. शिराळा येथे दलीत वसाहतीमध्ये विशेष घटक योजने मधून पिण्याच्या पाण्याची नळपाणी पुरवठा योजना सन २०१३ -२०१४ साली मंजूर झाली आहे. सध्या उन्हाळयाचे दिवस असल्याने मागासवर्गीय वसाहतीमध्ये पिण्याच्या पाण्याची कमतरता भासत आहे. त्या करीता सदर योजना लवकरात लवकर पुर्ण व्हावी या करीता मागासवर्गीय वसाहती मधील लोक प्रशासनाकडे दाद मागत आहेत.<br>खिरवडे येथील आनंदा विष्णू पाटील हे राजकीय हेतू पोटी खिरवडे येथे पाणी पुरवठा करणा-या विहीरीचे पाणी उन्हाळयामध्ये कमी पडणार आहे हे कारण पुढे करुन विशेष घटक योजनेस विरोध करीत आहेत. त्यामुळे खिरवडे गांवामध्ये पिण्याच्या पाण्यावरुन दलीत व सवर्ण यांचे मध्ये तणावाचे वातावरण निर्माण होवू लागलेने बैठक पार पडली आहे. सदर बैठकीमध्ये श्री आनंदा विष्णू पाटील यांनी मंजूर योजनेला विरोध करुन गांवातील जॅकवेल वरुन किंवा मागासवर्गीय वस्तीवरील बोअरींग वरुन मागसवर्गीय वसाहतीस पाणी पुरवठा करता येईल असा प्रस्ताव मांडला. सदर वेळी मागासवर्गीय समाजातील कांही प्रतिष्ठीत लोकांनी सदर प्रस्ताव मान्य असल्याचे सांगितले, त्यामुळे दिनांक ९.४.२०१५ रोजी गट विकास अधिकारी, शिराळा यांचेशी चर्चा करुन सदर बाबत निर्णय घेण्याचे ठरले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३८. | | श्री रणधीर नाईक-जिल्हा परिषद सदस्य | पंचायत समिती शिराळा | दिनांक ९.४.२०१५ रोजी ११.२० वा. ते १३.०० वा. | **बैठक** :- खिरवडे येथील पाणी प्रश्नाबाबत प्रशासन व गावकऱ्याची बैठक पार पडली. बैठकीत सदरची योजना गांव विहीर ते मागासवर्गीय वसाहत अशी मंजूर असल्याने सदर मंजूरी प्रमाणेच योजनेचे काम पुर्ण करावे लागेल, त्यास दुसरा कोणताही पर्याय नाही, सदर योजनेचा मंजूर निधी इतर कोणत्याही कामा करीता वापरता येणार नाही असे प्रशासनाच्या वतीने सांगितले. त्या वेळी श्री आनंदा विष्णू पाटील यांनी उन्हाळयामध्ये गांवालाच पाणी कमी पडत असते त्यामुळे सदर नळपाणी पुरवठा योजनेस विरोध आहे असे सांगितले त्यामुळे सदर बैठकीमध्ये कोणतीही तडजोड न झालेली नाही. |
| १३९. | जय भीम,जय भारत विचार मंच रा. चिंचोली ता. शिराळा | श्री विशाल घोलप-संस्थापक अध्यक्ष | तहसील कार्यालय शिराळा समोर | दिनांक १४.४.२०१५ रोजी ११.०० वा. पासून ते १७.४.२०१५ रोजी १७.०० वा. पर्यंत | **ठिया आंदोलन** :- दलीत वसाहत, खिरवडे येथील मंजूर पाण्याचे पाणी योजनेला विरोध करणा-या प्रवृत्तीच्या विरोधात श्री विशाल घोलप- संस्थापक अध्यक्ष जय भीम,जय भारत विचार मंच रा. चिंचोली ता. शिराळा यांचे नेतृत्वाखाली २५ ते ३० कार्यकर्ते दिनांक १४.४.२०१५ रोजी ११.०० वा. पासून तहसील कार्यालय शिराळा समोर ठिया आंदोलनास बसले आहेत. मा जिल्हाधिकारी सांगली यांचे आदेशान्वये नळपाणी पुरवठा योजनेच्या कामास सुरुवात झाल्याने दिनांक १७.४.२०१५ रोजी ठिया आंदोलन मागे घेण्यात आले आहे. |
| १४०. | इंडीयन मेडीकल असोशिएशन विटा | डॉ श्री वैभव माने-अध्यक्ष | विटा शहरातील प्रमुख मार्गावरुन नगरपालिका कार्यालय व तहसील कार्यालय | दिनांक ४.४.२०१५ रोजी १०.०० वा. ते ११.३० वा. | **मुक मोर्चा** :-विटा येथील साई हॉस्पीटल वर झालेल्या हल्ल्याचे निषेधार्थ ठिकाणी मुक मोर्चा काढण्यात आला. मोर्चा नगरपालिका कार्यालय येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री वैभव पाटील-नगराध्यक्ष विटा, श्री अनिल बाबर-आमदार यांना देण्यात आले त्यानंतर मुक मोर्चा तहसील कार्यालय येथे आला सदर ठिकाणी मागण्याचे निवेदन श्री महादेव पाटील - अव्वल कारकून यांना देण्यात आले. मोर्चा मध्ये ४० ते ५० डॉक्टर सहभागी झाले होते. |
| १४१. | - | श्री वि. द. बर्वे | मारुती चौक सांगली | दिनांक ६.४.२०१५ रोजी १९.३० वा ते २०.३५ वा | **सभा** :- सांगली अर्बन बँक व इतर सहकारी बँकाच्या निवडणूकामध्ये १०० टक्के मतदान करावे या विषयावर सभा पार पडली. सदर सभेस १५ ते २० जनसमदाय उपस्थीत होता. |
| १४२. | डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती | - | सांगली जिल्हयात | दि.१४.०४.२०१५ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीः- जिल्हयात दिनांक १४.४.२०१५ ते ३०.४.२०१५ या कालावधीमध्ये एकुण १८० मिरवणूका पार पडल्या आहेत. तसेच दिनांक १४.४.२०१५ रोजी ८ ठिकाणी पुतळे/अर्ध पुतळे व १८८ ठिकाणी फोटो प्रतिष्ठापना/पुजनाचे कार्यक्रम पार पडले आहेत. सदर बाबत समग्र अहवाल सादर करण्यात आला आहे. |
| १४३. | -- | -- | सांगली जिल्हयात | २०.४.२०१५ | शिवजयंती (पारंपारीक):- छ.शिवाजी महाराज जयंती (पारंपारीक) निमित्त जिल्हयात दिनांक २०.४.२०१५ ते ३०.४.२०१५ या कालावधीमध्ये एकुण १५० मिरवणूका पार पडल्या आहेत. तसेच दिनांक २०.४.२०१५ रोजी १२० ठिकाणी पुतळे/अर्ध पुतळे व ४२ ठिकाणी फोटो प्रतिष्ठापना/पुजनाचे कार्यक्रम पार पडले आहेत.सदर बाबत समग्र अहवाल सादर करण्यात आला आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४४. | बार असोशिएशन सांगली | श्री महेश जाधव - अध्यक्ष | सांगली न्यायालय | ११.०४.१५ रोजी ११.१५ वा. ते १२.०० वा | निदर्शने :- कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायायलाचे खंडपीठ व्हावे या मागणी करीता निदर्शने केली.जनसमुदाय १०ते१५ वकील |
| १४५. | महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग | श्री मोहमंद हुसेन खान (आमीरसाब) अध्यक्ष | मदरसा हजरअली बिन तालीब व डॉ झाकीर हुसेन रेसिडेन्सीयल हासस्कुल पलूस | दिनांक १२.४.२०१५ रोजी ०९.०० वा. ते १५.०० वा. | स्नेहसम्मेलन व पदवीदान कार्यक्रमः- पलूस येथील मदरसा हजरअली बिन तालीब व डॉ झाकीर हुसेन रेसिडेन्सीयल हासस्कुल पलूस येथे स्नेहसम्मेलन व पदवीदान कार्यक्रम पार पडला. सदर वेळी श्री मोहमंद हुसेन खान (आमीरसाब) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग यांचे हस्ते व इब्राहीम बाबा तांबोळी, हजरत मौलाना अमानुल्ला साहब, परवेज पिरजादे, सर्जेराव खरात इत्यादी लोकांचे उपस्थीतीत शाळेतील १४ मुलांना हुरान हाफीज ही पदवी दान करुन रोख रक्कम, कपडे, शालेय पुस्तके देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे वेळी श्री मोहमंद हुसेन खान (आमीरसाब) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग यांनी खेडयातील मुलांना आपल्या इस्लाम धर्माची तालिम देण्यासाठी असे समारंभ वरचेवर झाले पाहीजेत व त्यांना इस्लामिक धर्माची शिकवण दिली पाहीजे, तसेच मदरसा मध्ये मुस्लीम मुलांसाठी बीएमएस, एमबीबीएस, इंजिनियरींगची शिक्षण सुविधा सुरु केली पाहीजे या साठी मुस्लीम जमातीच्या लोकांनी मदत करावी असे आवाहन केले व सदर मदरसा मधील गुणवंत विदयार्थ्यांसाठी अकलकुवा येथे मोठा समारंभ घेणार आहे असे जाहीर केले.<br>सदर स्नेहसम्मेलन व पदवीदान कार्यक्रमाकरीता करीता ५०० स्त्रिया व १५०० ते १७०० पुरुष हजर होते. स्नेहसम्मेलंन व पदवीदान कार्यक्रम शांततेत पार पडला. |
| १४६. | वैयक्तीक | श्री रणजीत सर्जेराव गायकवाड रा. इस्लांमपूर | इस्लांमपूर नगरपालीका कार्यालयासमोर | दिनांक १३.४.२०१५ रोजी १३.०० ते १७.३० वा. | उपोषण :- इस्लांमपूर नगरपालिकेच्या नगरसेवकांच्या घरपट्टी व पाणीपट्टी बाबत ची माहीती इस्लांमपूर नगरपालिकेकडे माहीती अधिकाराखाली मागणी केली होती ती नगरपालिका कार्यालयाने दिली नाही याचे निषेधार्थ आमरण उपोषणास बसले होते. त्यांनी त्यांच्या कौटुंबीक अडचणी मुळे उपोषण मागे घेतले आहे. |
| १४७. | सां. मि. कु. पालिका कर्मचारी संघटनेच्या | श्री नितीन शिंदे- जनरल सेक्रेटरी | महानगर पालिका कार्यालय सांगली | २८.४.२०१५ रोजी ११.०० वा ते ११.३० | **निदर्शने** - एलबीटी व जकात रद्द करण्याच्या प्रयत्नात विदयमान सरकार असल्याचे निषेधार्थ महानगर पालिका कार्यालय सांगली समोर निदर्शने करण्यात आली. त्यानंतर शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन मा.आयुक्त,सामिक, मनपा यांना देण्यात आले. जनसमुदाय-७०-८० |
| १४८. | चेंबर ऑफ कॉमर्स सांगली | श्री मनोहरलाल सारडा- अध्यक्ष | सांगली मार्केट यार्ड | दिनांक १३.४.२०१५ रोजी १३.१० वा. ते १३.२० वा | निवेदन :- सांगली मार्केट यार्ड येथे शेतीमालाची साठवण करण्यासाठी पणन मंडळातर्फे मोठया प्रमाणात वेअर हाऊस बांधावीत, सांगली शहरा नजीक १५० एकर मध्ये सर्व सोईनी युक्त अशा मार्केट कमिटीची निर्मिती करावी, प्रक्रीया केलेल्या शेती मालास मार्केट कमिटीच्या नियमातून वगळावे, मिरज तालुक्यासाठी स्वतंत्र मार्केट कमिटीची निर्मिती करावी वगैरे मागण्याचे निवेदन मा. ना. श्री चंद्रकांत पाटील- सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई तथा पालकमंत्री सांगली जिल्हा यांना दिले. जनसमुदाय - ५ ते ६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४९. | दलीत सेना | श्री मधुकर बाबुराव कांबळे- उपाध्यक्ष जिल्हा दलीत सेना | खटाव | १९.४.२०१५ रोजी १०.०० ते १०.४५ वा. | बैठकः- आंबेडकर जयंती निमित्त खटाव ता. पलूस येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्र असलेल्या पोस्टरवर शेणाचे शिंतोडे टाकून विटंबना केले घटनेच्या अनुषंगाने पोलीस व महसूल प्रशासनाचे वतीने दोन्ही समाजातील प्रमुख नेत्यांची बैठक घेवून कायदा व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. ६०-७० .<br>मुक फेरी :- वरील घटनेच्या निषेधार्थ ११.१५ ते ११.३५ वा. या वेळेत दलीत सेनेच्या वतीने खटाव गावांतील प्रमुख मार्गाने मुकफेरी काढण्यात आली. जनसमुदाय १०० ते १२५.<br>गांवबंद :- वरील घटनेच्या निषेधार्थ ११.३५ वा. ते १७.०० वा. या वेळेत गांव बंद पाळण्यात आले. बंदला ६० ते७० टक्के प्रतिसाद मिळाला. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५०. | -- | श्री संभाजी नारायण पाटील | शेगांव | २२.४.२०१५ रोजी ०८.०० वा. ते १८.१५ | श्री स्वप्नील प्रभाकर कांबळे वगैरे शेगांव येथील दलीत समाजातील लोकांनी श्री लक्ष्मण गोरख शिंदे यांना आंबेडकर जयंतीचे वेळी सदर भगवा झेंडा काढून निळा झेंडा लावतो असे सांगितले असता श्री लक्ष्मण शिंदे यांनी आंबेडकर जयंती झाल्यानंतर निळा झेंडा काढून घ्या असे सांगून निळा झेंडा लावण्यास परवानगी दिली होती त्या प्रमाणे सदर कमानीवर आंबेडकर जयंतीच्या अनुषंगाने निळा झेंडा लावलेला होता. आंबेडकर जयंती झाल्यानंतर सदर निळा झेंडा काढला नाही म्हणून दिनांक २१.४.२०१५ रोजी किरण पाटील वगैरे लोकांनी श्री स्वप्नील प्रभाकर कांबळे यास निळा झेंडा काढायला लावला सदर बाबत स्वप्निल प्रभाकर कांबळे यांनी दिले फिर्यादीवरुन जत पोलीस ठाणेस भाग ५ गुरनं ८०/१५ भादविस २९५,१४३, मुपोकाक ३७(३)/१३५ दाखल झाला आहे.<br>**गांव बंद - उपोषण** - सदर दाखल गुन्हयाचे निषेधार्थ शेगांव येथील सवर्ण समाजातील लोकांनी श्री संभाजी नारायण पाटील यांचे नेतृत्वाखाली आज दिनांक २२.४.२०१५ रोजी ०८.०० वा. पासून शेगांव गांव बंद पाळले होते. तसेच श्री संभाजी नारायण पाटील यांचे नेतृत्वाखाली १० (सवर्ण) लोक दाखल गुन्हयाचे निषेधार्थ शेगांव गांवचे वेशीवरील कमानीचे ठिकाणी उपोषणास बसले<br>दिनांक २२.४.२०१५ रोजी श्री अभिजीत पाटील- तहसीलदार जत व श्री अनिकेत भारती - उप विभागीय पोलीस अधिकारी जत विभाग, जत यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेवून त्यांना सदर बाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आश्वासन दिलेनंतर उपोषणकर्ते यांनी १८.१५ वाजता उपोषण मागे घेतले आहे त्यानंतर गांवातील सर्व व्यवहार सुरु झाले आहेत. श्री अभिजीत पाटील- तहसीलदार जत व श्री अनिकेत भारती - उप विभागीय पोलीस अधिकारी जत विभाग, जत यांनी दोन्ही समाजातील प्रतिष्ठीत लोकांची बैठक घेवून शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.<br>दिनांक २३.४.२०१५ रोजी शेगांव गांवातील सर्व व्यवहार सकाळ पासून सुरळीत सुरु होते. अचानकपणे १५.०० वा. चे सुमारास गावांतील दुकानदार व दलीत समाजामध्ये दुकानातील माल देणे घेण्याचे कारणावरुन वाद झाला असता लागलीच पोनि जत पोलीस ठाणे यांनी दुकांनदारांची बैठक घेवून कायदा व सुव्यवस्था राखणेकामी मार्गदर्शन केले.त्यानंतर लगेच गांवातील दुकानदारांनी स्वतंत्र बैठक घेवून गांवातील सवर्ण व दलीत यांचेतील वाद व तणाव पुर्णपणे संपुष्टात येत नाही तो पर्यंत दुकाने बंद ठेवणेचा निर्णय घेवून १८.०० वा. पासून दुकाने बंद ठेवली आहेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५१. | | | | | शेगांव येथील दलीत-सवर्ण यांचेत निर्माण झालेला वाद व तणाव पुर्णपणे संपुष्टात यावा या करीता मा. पोलीस अधीक्षक सो यांनी दिले सुचने प्रमाणे दिनांक २५.४.२०१५ रोजी १८.१५ वा. ते १९.३० वा. या वेळेत शेगांव गांवी श्री अनिकेत भारती- उप विभागीय पोलीस अधिकारी तासगांव विभाग तासगां तासगांव अतिरीक्त कार्यभार जत यांनी श्री पिंगळे- पोलीस निरीक्षक जत पोलीस ठाणे, महसूल प्रशासनामधील श्री अभिजीत पाटील – तहसीलदार जत, विदयमान आमदार श्री विलासराव जगताप (भाजपा), जत शहरातील दलीत समाजातील विविध पक्ष संघटनांचे प्रमुखपदाधिकारी, शेगांव गावांतील दलीत - सवर्ण समाजाचे प्रमुख कार्यकर्ते गांवातील प्रतिष्ठीत लोक, ग्रामपंचायतीचे आजी माजी पदाधिकारी, यांची बैठक घेतली. बैठकीत दलीत व सवर्ण समाजातील लोकांच्या अडीअडचणी, मागण्या या बाबत एकुण घेण्यात आल्या, पोलीस, महसूल प्रशासनाच्या वतीने सुयोग्य मार्गदर्शन करण्यात आले आहे. पोलीस, महसूल प्रशासनाचे वतीने गावांमध्ये शांतता प्रस्थापीत करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे व जे जातीय तणाव निर्माण करतील त्यांचेवर तात्काळ ठोस कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे सांगण्यात आले आहे. बैठकीत मध्ये सुयोग्य मार्गदर्शन केलेने दिनांक २७.४.२०१५ रोजी विविध दलीत पक्ष/संघटनानी पुकारलेले जत बंद आंदोलन मागे घेतले आहे. |
| १५२. | श्रमिक मुक्ती दल | मारुती पाटील-कोल्हापूर जिल्हा प्रमुख | झोळंबी फाटा, मणदूर | दिनांक २८.३.२०१५ रोजी पासून ते ५.४.१५ रोजी पर्यंत | **ठिया आंदोलन** :- शासने अधिग्रहन केलेल्या जमिनींचे पैसे दिलेले नाहीत, तसेच पर्यायी जमिनी दिलेल्या नाहीत तरी अधिग्रहन झालेल्या जमिनींचे पैसे मिळावेत व पर्यायी जमिनी मिळाव्यात या इतर मागण्यासाठी ठिया आंदोलन सुरु केले होते.<br>आंदोलनकर्ते यांनी दिनांक ५.४.२०१५ रोजी महाराष्ट्र राज्याचे प्रधान वन सचिव यांनी आंदोलनकर्ते यांना दिनांक १५.४.२०१५ रोजी मागण्याबाबत बैठक घेण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलनकर्ते यांनी आपले ठिया आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे.<br>१० ते १५ पुरुष व ३० ते ३५ महीला |
| १५३. | श्रमिक मुक्ती दलाचे वतीने | श्री भारत पाटणकर-अध्यक्ष श्रमिक मुक्ती दल | दिघंची | दिनांक २६.४.२०१५ रोजी ११.०५ वा. ते १३.१५ वा. | **बैठक** - टेंबू योजनेच्या पाण्या संदर्भात बैठक पार पडली. बैठकीमध्ये टेंबू योजनेचे पाणी दिघंची, पुजारवाडी, महाडीकवाडी या गावांना पोहचवणेबाबत चर्चा झाली. बैठकीस श्री आनंदराव पाटील, श्री हणमंत देशमुख, श्री आण्णा पत्की या प्रमुखासह ४० ते ५० लोक उपस्थीत होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **१५४.** | श्रमिक मुक्ती दल | श्री वसंत दादू पाटील रा. पणुंब्रे - श्रमिक मुक्ती दल राज्य कार्यकारणी सदस्य | मणदूर हुतात्मा स्मारक | ६.४.२०१५ रोजी ११.०० वा. ते ३०.४.२०१५ | **ठिया आंदोलन** :- चांदोली धरणग्रस्ताचे व चांदोली अभयारण्यग्रस्ताचे पुर्नवसना बाबत तत्कालीन मुख्यमंत्री यांचे बैठकीत झालेल्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करुन जादाचे लाभ प्रकल्पग्रस्तांना दयावेत या व इतर मागणीसाठी दिनांक ६.४.२०१५ रोजी ११.०० वा पासून मणदूर हुतात्मा स्मारक येथे बेमुदन ठिया आंदोलनास बसले आहेत.जनसमुदाय १०० ते १२५<br>**रॅली**:- दिनांक १०.४.२०१५ रोजी १६.०० वा. ते १७.१५ वा. या वेळेत आंदोलनकर्त्यांनी हुतात्मा स्मारक मणदूर ते वन विभाग चांदोली वारणावती कार्यालय अशी रॅली काढली रॅली वन विभाग कार्यालय येथे आल्यानंतर वन विभागाशी संबंधीत मागण्याचे निवेदन देण्यात आले. त्यानंतर सदर आंदोलनकर्त्यांनी पुन्हा हुतात्मा स्मारक मणदूर येथे येवून ठिया आंदोलन सुरु केले आहे. दिनांक १२.४.२०१५ रोजी १२.३० वा. ते १५.१५ वा. या वेळेत श्री भारत पाटणकर - अध्यक्ष श्रमिक मुक्ती दल यांनी आंदोलनाचे ठिकाणी उपस्थीत राहून आंदोलनकर्ते यांना आंदोलन तीव्र करण्याबाबत मार्गदर्शन केले.<br>**मोर्चा** :- दिनांक १३.४.२०१५ रोजी १२.३० वा. ते १५.३० वा. या वेळेत आंदोलनकर्ते यांचे वतीने मणदूर हुतात्मा स्मारक ते पाटबंधारे विभाग कार्यालय, वारणावती असा मोर्चा काढला.मोर्चा पाटबंधारे विभाग कार्यालय वारणावती येथे आल्यानंतर सदर ठिकाणी श्री सत्यजीत देशमुख- माजी उप अध्यक्ष जि.प.,श्री साळुंखे – उप जिल्हाधिकारी पुनर्वसन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, श्री बारदेसकर – कार्यकारी अभियंता इस्लांमपूर, श्री विजय पाटील – तहसीलदार शिराळा, श्री शिंदे - सहा. अभियंता श्रेणी २ पाटबंधारे विभाग वारणावती , श्री हणमंत पाटील- शिराळा पंचायत समिती सदस्य व आंदोलनकर्ते यांचे मध्ये आंदोलनकर्ते यांच्या मागण्याबाबत चर्चा झाली सदर वेळी उपस्थीत मान्यवरांनी आंदोलनकर्ते यांचे कडून मागण्याचे निवेदन स्विकारले. चर्चेमध्ये सकारात्मक निर्णय न झाल्यामुळे आंदोलनकर्ते यांनी हुतात्मा स्मारक मणदूर येथे परत येवून ठिया आंदोलन सुरु केले आहे.अदयाप आंदोलन चालु आहे. |
| **१५५.** | एस टी कामगार संघटना सांगली | श्री बिराज साळुंखे – विभागीय अध्यक्ष | -- | ३०.४.२०१५ रोजी ०७.३० वा. वा ते ११.४५ | **संप**- जिल्हातील एस टी महामंडळाचे सर्व कर्मचारी केंद्र सरकारचा रस्ते व सुरक्षा कायदा सन २०१४ रद्द करावा या व इतर मागणी करीता संपा मध्ये सहभागी झाले होते.<br>मुंबई येथे मा.ना.श्री दिवाकर रावते- परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई व वहातुक संघटनांचे नेते/पदाधिकारी यांचे मध्ये मागण्याच्या अनुषंगाने चर्चा झाली त्यामध्ये वाहतुक संघटनांच्या नेत्यांचे व पदाधिकारी यांचे समाधान झाल्याने संप मागे घेतलेबाबत कळविण्यात आले नंतर सांगली जिल्हयातील सर्व एस टी बसेस ११.४५ वाजता सुरु झालेल्या आहेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५६. | -- | वैभव कृष्णांत बुढ्ढे रा. चिकुर्डे | जय भवानी चौक चिकुर्डे | २२.४.२०१५ रोजी १०.०५ वा. ते १२.३० वा या वेळेत | **रस्ता रोको** - चिकुर्डे ते वारणानगर रस्त्याची दुरुस्ती करावी या मागणी करीता चिकुर्डे येथील ग्रामस्थांनी रस्ता रोको आंदोलन केले.<br>श्री चव्हाण उप अभियंता बांधकाम विभाग वाळवा-इस्लामपूर पंचायत समिती यांनी सदर आंदोलनाचे ठिकाणी येवून निवेदन स्विकारले व शासकीय निधी मिळल्यानंतर रस्त्याचे काम तात्काळ सुरु होईल असे तोंडी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्ते यांनी रस्ता रोको आंदोलन मागे घेतले आहे. रस्ता रोको आंदोलनामध्ये २०० ते २५० ग्रामस्थ सहभागी झाले होते. रस्ता रोको आंदोलनाचे वेळी पर्यायी मार्गाने वाहतूक सुरु ठेवण्यात आली होती. |
| १५७. | - | श्री संतोष बापूराव पाटील रा. नेमिनाथ नगर | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | २७.४.२०१५ रोजी ११.०० वा. | **बेमुदत उपोषण-** वैजनाथ श्रीरंग काशिद हे गुन्हेगारी वृत्तीचे असून त्यांचेवर मोका अंतर्गत कारवाई करावी या मागणीसाठी बेमुदत उपोषणास बसले आहेत. अदयाप सुरु आहे. |
| १५८. | -- | सौ वंदना कदम – नगरसेविका | मित्र मंडळ चौक, सांगली | दिनांक २७.४.२०१५ रोजी ११.०० वा. ते १५.१५ | **उपोषण** - सांगलीवाडी येथील ड्रेनिज वाहीनीचे काम तात्काळ करावे या व इतर मागणी करीता उपोषण बसले होते. उपोषणाचे ठिकाणी उपस्थीत राहून १५ ते २० लोकांनी पाठींबा दिलेला होता. अभियंता, मनपा, सांगली यांनी आंदोलनाचे ठिकाणी येवून मागण्याबाबत सकारात्मक चर्चा केल्या नंतर उपोषणकर्ते यांनी १५.१५ वाजता उपोषण मागे घेतले आहे. |
| १५९. | -- | श्री हणमंत देखमुख- | दिघंची | २८.४.२०१५ रोजी १८.०० वा. ते १९.०० वा. या वेळेत | **बैठक** - दिघंची, उंबरगांव, लिगीवरे,पळसखेड या गावांतील ग्रामस्थांची टेंबू योजनेचे पाणी दिघंची, उंबरगांव, लिंगीवरे, पळसखेड या गावांना टेंबू योजनेचे पाणी मिळावे या विषयावर बैठक पार पडली. सदर बैठकीस ४० ते ५० ग्रामस्थ उपस्थीत होते. |
| १६०. | नागरी हक्क संघटना सांगली | श्री वि.द.बर्वे - अध्यक्ष नागरी हक्क संघटना सांगली | पोदार इंटरनॅशनल स्कुलचे समोर | २९.४.२०१५ रोजी ११.०० वा. ते १५.४५ वा. या वेळेत | **लाक्षणिक उपोषण** - मनपाच्या प्राथमिक शाळेसाठी राखीव असलेल्या जागेवर पोदार इंटरनॅशनल स्कुल बांधण्यात आले आहे तरी पोदार इंटरनॅशनल स्कुलच्या बांधकामाची चौकशी होवून कारवाई व्हावी या मागणीकरीता एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले. जनसमुदाय ६-७ |
| १६१. | मांग गारुडी क्रांती दल सांगली. | श्री बाबासाहेब चौगुले. | इंदिरा नगर झोपडपट्टी, सांगली | २९.४.२०१५ १८.०-२.०० | **मेळावा** - मांग गारुडी समाजाचा परिवर्तन मेळावा पार पडला. मेळाव्यास १०० ते १५० जनसमुदाय उपस्थित होता. |
| १६२. | ग्रामस्थ | -- | हातनूर | २१.४.२०१५०८.००-१७.०० | **गांवबंद** :- टेंभू उपसा योजने अंतर्गत मांजर्डे गावाकडे जाणारा पाट फोडून हातनूर गावाकडे पाणी नेले बाबत हातनूर येथील ग्रामस्था विरुध्द दिनांक १९.४.२०१५ रोजी गुन्हा दाखल कारवाई व अटक कारवाई करण्यात आली याचे निषेधार्थ गांव बंद आंदोलन करण्यात आले. गांवबद आंदोलनास ५० ते ६० टक्के प्रतिसाद मिळाला. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६३. | निवारा बांधकाम कामगार संघटना सांगली | श्री. शंकर लखू पुजारी- अध्यक्ष, | सांगली एस.टी. स्टॅण्ड - कॉंग्रेस कमीटी ते उदयोग भवन सांगली | दि. १४.०७.२०१५ रोजी १२.०० वा ते १४.५० वा या दरम्यान | मोर्चा :- बांधकाम कामगारांच्या विविध मागण्यांसाठी मोर्चा काढण्यात आला. (जनसमुदाय- ८० ते ९०) दरम्यान मुदतीत शिष्टमंडळाने मागण्यांचे निवेदन श्री. पाटणकर-सहाय्यक कामगार आयुक्त सांगली यांना देण्यात आले आहे. |
| १६४. | सांगली जिल्हा हमाल पंचायत समिती | जनरल सेक्रेटरी श्री. बापूसाहेब मगदूम | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली चे पटांगणात | दि. १५.०७.२०१५ रोजी ११.०० वा ते १७.०० वा या वेळेत | धरणे आंदोलन :- एल.पी.जी. गॅस एजन्सी व गॅस सिलेंडर गोदाम मधील हमाल कामगारांना माथाडी कायदयाचे संरक्षण मिळावे या व इतर मागण्यांकरीता १०० ते १२५ कार्यकर्त्यांसह धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत शिष्टमंडळाने आपल्या मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकरी श्री. शिंदे यांना दिले |
| १६५. | एसटी कामगार संघटना आटपाडी | श्री. प्रविण देशमुख | आटपाडी एस टी आगारासमोर | दि. १७.०७.२०१५ रोजी १५.१५ वा ते १२.४५ वा | निदर्शने :- श्री. आत्तार- आटपाडी एसटी डेपो इनजार्च यांचे गैरकारभाराच्या निषेधार्थ २० ते २५ कामगारांनी निदर्शने केली. |
| १६६. | शिक्षक मतदार संघ | श्री भगवानराव साळुंखे - माजी आमदार | जिल्हा परिषद कार्यालय सांगली समोर | दिनांक ०१.०८.२०१५ रोजी १४.०० वा. ते १७.०० | निदर्शने : शिक्षकांचे पगार मागील ३ महीन्यापासून मिळालेले नाहीत याचे निषेधार्थ निदर्शने करण्यात आली. सदर वेळी ५० ते ६० शिक्षक / शिक्षीका उपस्थीत होते. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री मधुकर यादव – शिक्षणाधिकारी माध्यमिक जि.प. यांना देण्यात आले. |
| १६७. | महाराष्ट्र एस टी वर्कर्स कॉंग्रेस संघटना | श्री आर डी पाटील – जनरल सेक्रेटरी | विभागीय एस टी महामंडळ कार्यालय सांगली | दिनांक १४.८.२०१५ रोजी १२.४५. वा. ते १३.१५ | निदर्शने : ढोल वाजवून :- एस टी कर्मचा-यांनी कामगार करार रद्द करुन पगारवाढ मिळालीच पाहीजे वगैरे मागण्यासाठी ढोल वाजवून निदर्शने केली व मागण्याचे निवेदन श्री कदम- डेपो मॅनेजर यांना दिले जनसमुदाय : १०० ते १२५ |
| १६८. | महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन | श्री सुभाष बी. मरीगुद्दी- | जिल्हा परिषद कार्यालयासमोर | ११.८.२०१५ रोजी १३.३०. वा. ते १५.०० | निदर्शने : जिल्हा परिषद कर्मचा-यांनी जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या प्रलंबीत मागण्यासाठी निदर्शने केली. जनसमुदाय : २५० ते ३०० |
| १६९. | जिल्हा परिषद प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना | श्री बाळासाहेब ज्ञानू शेलार | जिल्हा परिषद कार्यालय सांगली समोर | १.१०.२०१५ रोजी १०.०० | आमरण उपोषण :- जिल्हा परिषदेकडील प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना १) कासेगांव, २) जुनेखेड- नवे खेड, ३) नांद्रे - वसगडे, ४) तुंग- बागणी, ५) कुंडल, ६) वाघोली अशा एकुण ६ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर काम करणा-या कर्मचा-यांचे पगार वेळेवर होत नाहीत या करीता सदर प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवरील ५५ ते ६० कर्मचारी श्री बाळासाहेब ज्ञानू शेलार यांचे नेतृत्वाखाली जिल्हा परिषद कार्यालय सांगली समोर आमरण उपोषणास बसले होते. मा. मुख्यकारी अधिकारी जि.प.सांगली यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेवून त्यांच्या मागण्या मान्य करुन तीन महीन्याचा पगार तात्काळ देणेबाबत आश्वासन दिल्याने उपोषणकर्ते यांनी १८.४५ वाजता उपोषण मागे घेतले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७०. | सांगली जिल्हा हमाल पंचायत समिती | श्री विकास मगदूम, सेक्रेटरी, सांगली जिल्हा हमाल पंचायत | स्टेशन चौक, वसंतदादा पुतळया जवळ सांगली | ०२.१०.२०१५ रोजी ११.३० ते १६.०० | धरणे आंदोलन :- १०० ते १२५ कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारचे कामगार विरोधी धोरणाचे विरोधात धरणे आंदोलन केले आहे. |
| १७१. | महापालिका कामगार सभा सांगली | दिलीप शिंदे - सेक्रेटरी | सांगली मिरज आणि कुपवाड महापालिका कार्यालय सांगली समोर | ०३.१०.२०१५ रोजी ११.३० ते ११.५० वा | निदर्शनेः- मनपा कामगारांनी महापालिकेच्या मुकादमास मारहाण करणारे नगरसेवक श्री सरगर व श्री लेंगरे यांचेवर कारवाई करावी या मागणी करीता निदर्शने केली. |
| १७२. | महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना | श्री बिराज साळुंखे- अध्यक्ष | एस टी विभागीय कार्यालय सांगली | १४.१०.२०१५ रोजी ११.०० वा. ते १६.०० वा. | धरणे आंदोलन व निवेदन :- ९०- १०० एस टी कामगारांनी मिरज येथील आगार व्यवस्थापक यांना घेराव घालून दहशत निर्माण करणा-या इंटक कार्यकर्त्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावे या व इतर मागण्यासाठी एस टी विभागीय कार्यालय सांगली समोर धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत श्री दिलीप कदम – विभाग नियंत्रक, सांगली यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले. |
| १७३. | महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना तासगांव आगार | श्री डी वाय शेळके- अध्यक्ष | एस टी आगार तासगांव चे समोर | १५.१०.२०१५ रोजी १०.०० वा. ते १६.०५ या | धरणे आंदोलन :- आगार व्यवस्थापक यांचे मनमानी हेकेखोर अरेरावी पध्दतीच्या वागणूकीच्या निषेधार्थ व इतर मागण्यासाठी धरणे आंदोलन करण्यात आले. धरणे आंदोलनामध्ये ३० ते ४० एस टी कामगार सहभागी झाले होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७४. | निनाईदेवी सहकारी साखर कामगार युनियन करुंगली | श्री निवृत्ती गणपती नायकवडी - अध्यक्ष | निनाईदेवी सहकारी साखर कारखान्याच्या गेटसमोर | २३.१०.२०१५ रोजी १५.०० | आमरण उपोषण व ठिया आंदोलन :- निनाईदेवी सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्र राज्य सह. बँकेने दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लि. यांना विक्री केला आहे. दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लि. यांनी कारखाना सुरु करताना जुन्या कामगारांना कामावर घेण्याचे आश्वासन दिले होते. परंतू जुन्या ५३३ कामगारांना कामावर घेतलेले नाही तरी जुन्या ५३३ कामगारांना कामावर घ्यावे या मागणी करीता आमरण उपोषणास बसले आहेत.दिनांक २३.१०.२०१५ रोजी उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी करण्यासाठी वैदयकीय अधिकारी आले असता उपोषणकर्त्यांनी वैदयकीय तपासणी करुन घेतली नाही. दिनांक २४.१०.२०१५ रोजी उपोषणकर्ते यांचे पैकी केरबा गोविदं घोंगडे रा. चिखली या उपोषकर्त्याच्या अचानकपणे पोटात दुखू लागल्यामुळे त्याला सीपीआर कोल्हापूर येथे उपचाराकरीता दाखल करण्यात आले आहे.दिनांक २५.१०.२०१५ रोजी वैदयकीय अधिकारी हे उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी करणे करीता आले असता साखर कारगार युनियनचे अध्यक्ष श्री निवृत्ती गणपती नायकवडी यानी उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी करायची नाही असे सांगितले. त्यानंतर २ ते ३ उपोषणकर्ते यांना चक्कर येवू लागल्याने कांही उपोषणकर्ते वैदयकीय तपासणी करुन घेण्यास तयार झालेने सपोनि कोकरुड पोलीस ठाणे यांनी वैदयकीय अधिकारी यांना बोलावून ५४ उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी करुन घेतली असता १. पांडुरंग महीपती पाटील, २. प्रकाश बबन पाटील, ३.संजय बाबुराव पाटील, ४. रघुनाथ शंकर पाटील, ५. विश्वनाथ रघुनाथ जंगम, ६. सर्जेराव बाबुराव जाधव यांची प्रकृत्ती खालावली असल्याने त्यांना उपाचाराकरीता दवाखान्यात दाखल करण्याचा सल्ला दिल्याने सदर उपोषणकर्ते यांना ग्रामिण रुग्णालय शिराळा येथे औषधोपचाराकरीता दाखल करण्यात आले आहे.दिनांक २६.१.२०१५ रोजी ११.४० वाजता उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी केली असता १. बबन निवृत्ती झाडे वय रा. आरळा, २. विकास शिवाजी इंगवले वय ३८ रा.मांगले , ३. वसंत पांडुरंग निकम वय ५४ रा. जांभळेवाडी, ४. भास्कर रामचंद्र भैर वय ४२ रा. सिरशी, ५. आनंदा रामचंद्र बंडगर वय ४० रा. कांदे यांची यांची प्रकृत्ती खालावली असल्याने वैदयकीय अधिकारी यांनी त्यांना औषधोपचाराकरीता दवाखान्यामध्ये दाखल करण्याचा सल्ला दिल्याने त्यांना ग्रामिण रुग्णालय शिराळा येथे औषधोपचाराकरीता दाखल करण्यात आले आहे.दिनांक २६.१०.२०१५ रोजी १९.३० वाजता उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी केली असता १. संतोष निवृत्ती चांदे वय ३५ रा. मणदूर, २. श्री भिमराव विठ्ठल पाटील वय ३३, रा. रिळे, ३. मोहन गोविंद पाटील वय ४० रा. बिळाशी, ४. बळवंत नाना कांबळे वय ४५ रा. आरळा यांची प्रकृत्ती खालावली असल्याने वैदयकीय अधिकारी यांनी त्यांना औषधोपचाराकरीता दवाखान्यामध्ये दाखल करण्याचा सल्ला दिल्याने त्यांना ग्रामिण रुग्णालय शिराळा येथे औषधोपचाराकरीता दाखल करण्यात आले आहे.दिनांक २७.१०.२०१५ रोजी १०.३० वा.चे सुमारास उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी केली असता १. संजय केशव पाडळकर वय ४२ रा. मांगले, २. संग्राम शिवाजी जानकर वय रा. बिळाशी, ३. पोपट महीपती देसाई वय ४० रा. जांभळेवाडी, ४. रघुनाथ शंकर पवार वय ४८ रा. चिखली यांची प्रकृत्ती खालावली असल्याने वैदयकीय अधिकारी यांनी त्यांना औषधोपचाराकरीता दवाखान्यामध्ये दाखल करण्याचा सल्ला दिल्याने त्यांना ग्रामिण रुग्णालय शिराळा येथे औषधोपचाराकरीता दाखल करण्यात आले आहे.दिनांक २८.१०.२०१५ रोजी १२.३० वाजता डॉ. श्री भारत पाटणकर- अध्यक्ष श्रमिक मुक्ती दल यांनी उपोषणाचे ठिकाणी उपोषणकर्ते यांची भेट घेवून आंदोलनाबाबत मार्गदर्शन केले सदर वेळी कामगारांनी त्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व करण्याबाबत श्री भारत पाटणकर यांना विनंती केली असता डॉ. श्री भारत पाटणकर यांनी विनंती मान्य करुन आंदोलनाचे नेतृत्व स्विकारले आहे व दिनांक ३०.१०.२०१५ रोजी निनाईदेवी सह. साखर कारखान्याचे सर्व जुने सभासद, ऊस उत्पादक व कामगार असे मिळून साखर कारखान्याचे गेट ठिया आंदोलन करु असे कामगारांना सांगितले आहे. दिनांक २८.१०.२०१५ रोजी १८.३० वा. चे सुमारास उपोषण करणाचे कामगारांची वैदयकीय तपासणी केली असता १. आप्पासो किसन मुळीक वय ४५ रा. गिरजवडे, २. नामदेव आप्पा पाटील वय ४५ रा. काळुंद्रे, ३. बाबासो महादेव यमगर वय ३८ रा. बिळाशी यांची प्रकृती खालावली असल्याचे वैदयकीय अधिकारी यांनी सांगितेलेने त्यांना औषध उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय शिराळा येथे दाखल करण्यात आले आहे. उर्वरीत उपोषणकर्ते यांनी उपोषणाचे ठिकाणी उपोषण सुरु ठेवले आहे.<br>दि.३०.१०.२०१५ रोजी १४.०० वा चे सुमारास आंदोलनाचे ठिकाणी श्री. सत्यजीत देशमुख सरचिटणीस महाराष्ट्र कॉंग्रेस आय, हणमंत पाटील-माजी सभापती, पी.वाय.पाटील चेअरमन व इतर मान्यवरांनी भेट देवून उपोषणकर्ते व उपस्थित ऊस उत्पादक शेतकरी यांना त्यांचे मागण्याबाबत मार्गदर्शन केले. १६.३० वाचे सुमारास डॉ.श्री. भारत पाटणकर-अध्यक्ष, श्रमिकमुक्ती दल हे आंदोलनाच्या ठिकाणी आले व त्यांनी उपोषणकर्त्यांशी उपोषण सोडून याच ठिकाणी ठिय्या आंदोलन करणेबाबत, दि.०२.११.२०१५ रोजी जिल्हाधिकारी यांचे सोबत बैठक होणार असलेबाबत व सदर बैठकीस सर्व कामगार प्रतिनिधी, सर्व कामगारांच्या घरच्या महिलांना घेवून जाणेबाबत चर्चा केली असता उपोषणकर्ते यांनी योग्य प्रतिसाद दिला व १७.०० वा उपोषणकर्त्यांनी भारत पाटणकर यांच्या हस्ते पाणी घेवून उपोषण सोडले आहे. परंतू उपोषण कर्त्यांनी कारखान्याचे गेट समोरच ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. सदर वेळी ८०० ते १००० जनसमुदाय हजर होता. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७५. | | | | | असल्याचे वैदयकीय अधिकारी यांनी सांगितेलेने त्यांना औषध उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय शिराळा येथे दाखल करण्यात आले आहे. उर्वरीत उपोषणकर्ते यांनी उपोषणाचे ठिकाणी उपोषण सुरु ठेवले आहे. दि.३०.१०.२०१५ रोजी १४.०० वा चे सुमारास आंदोलनाचे ठिकाणी श्री. सत्यजीत देशमुख सरचिटणीस महाराष्ट्र काँग्रेस आय, हणमंत पाटील-माजी सभापती, पी.वाय.पाटील चेअरमन व इतर मान्यवरांनी भेट देवून उपोषणकर्ते व उपस्थित ऊस उत्पादक शेतकरी यांना त्यांचे मागण्याबाबत मार्गदर्शन केले. १६.३० वाचे सुमारास डॉ.श्री. भारत पाटणकर-अध्यक्ष, श्रमिकमुक्ती दल हे आंदोलनाच्या ठिकाणी आले व त्यांनी उपोषणकर्त्यांशी उपोषण सोडून याच ठिकाणी ठिय्या आंदोलन करणेबाबत, दि.०२.११.२०१५ रोजी जिल्हाधिकारी यांचे सोबत बैठक होणार असलेबाबत व सदर बैठकीस सर्व कामगार प्रतिनिधी, सर्व कामगारांच्या घरच्या महिलांना घेवून जाणेबाबत चर्चा केली असता उपोषणकर्ते यांनी योग्य प्रतिसाद दिला व १७.०० वा उपोषणकर्त्यांनी भारत पाटणकर यांच्या हस्ते पाणी घेवून उपोषण सोडले आहे. परंतू उपोषण कर्त्यांनी कारखान्याचे गेट समोरच ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. सदर वेळी ८०० ते १००० जनसमुदाय हजर होता. |
| १७६. | महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना | श्री बिराज साळुंखे-विभागीय अध्यक्ष | सांगली एस टी डेपो च्या इन गेट समोर | २८.१०.२०१५ रोजी ११.०५ वा. ते १३.४५ वा. | धरणे आंदोलन :- २० ते २५ कामगारांनी सांगली आगार व्यवस्थापक यांच्या आदेशाशिवाय इतर अधिकारी हे मनमानी व बेकायदेशीर कर्मचा-यांची पिळवणूक करीत आहेत याचे निषेधार्थ सांगली एस टी डेपो च्या इन गेट समोर धरणे आंदोलन केले. |
| १७७. | भुमी अभिलेख कर्मचारी संघटना | श्री सदाशिव कुलकर्णी | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | २९.१०.२०१५ रोजी १३.३० | निदर्शने:- ४५ ते ५० भुमीअभिलेख कर्मचा-यांनी, चुकीचा निकाल दिल्याच्या कारणावरुन भुमि अभिलेख पर्यवेक्षक श्री सुशील रामराव पवार यांना कामेरीतील पिता- पुत्रानी बेदम मारहाण केली आहे तरी त्यांचे विरुध्द मोका अंतर्गत कारवाई करावी या मागणी करीता जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर निदर्शने केली व दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री त्रिगुण कुलकर्णी – निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले. |
| १७८. | शेतकरी संघटना | श्री रघुनाथ रामचंद्र पाटील - अध्यक्ष शेतकरी संघटना | बाजार पेठ, येलूर | २२.१०.२०१५ रोजी १९.३० वा. ते २१.४० | मेळावा :- मेळाव्यामध्ये ऊस उत्पादन खर्चाच्या ५० टक्के साखर कारखान्यांना फायदा असुन शेतक-यांना चालू गळीत हगामामध्ये प्रती टन ३७५० /- रुपये दर एक रकमी मिळाला पाहीजे या बाबत मार्गदर्शन करण्यात आले, तसेच दिनांक ६.११.२०१५ रोजी साखर आयुक्त कार्यालय पुणे येथे जावून साखर आयुक्त यांचेशी चालू गळीत हगामामध्ये प्रती टन ३७५० /- रुपये दर एक रकमी मिळाला पाहीजे याबाबत चर्चा करुन मागण्याचे निवेदन देण्यात येणार असले बाबत सांगितले आहे. सदर मेळाव्यामध्ये ३५ ते ४० शेतकरी सहभागी झाले होते |
| १७९. | शेतकरी संघटना (रघुनाथ पाटील गट) | श्री रघुनाथ पाटील-अध्यक्ष शेतकरी संघटना | कवलापूर हनुमान मंदीरासमोरील पटांगणामध्ये | २७.१०.२०१५ रोजी १८.१५ वा. ते १९.५० वा. | सभा :- शेतकरी संघटना (रघुनाथ पाटील गट) चे वतीने सभा पार पडली. सभेस श्री रघुनाथ पाटील- अध्यक्ष शेतकरी संघटना, श्री शिवाजी नाना नानखिले- प्रदेशाध्यक्ष क्रांतीसिंह नाना पाटील ब्रिगेड रा. पुणे, श्री अरुण सावंत – जिल्हा उपाध्यक्ष शेतकरी संघटना रा. कवलापूर यांचे सह १२५-१५० जनसमुदाय उपस्थीत होता. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८०. | वैयक्तिक आंदोलन | श्री सतिश विठ्ठल म्हेत्रे रा. विटा | तहसील कार्यालय विटा समोर | ६.१०.२०१५ रोजी ११.०० वा. | उपोषण :- पार्श्वनाथ नागरी सहकारी पतसंस्था विटा या पंतसंस्थेच्य बेकायदेशीर व अन्यायकारक कामकाजाबाबत कारवाई करावी या मागणी करीता बेमुदत उपोषणास बसले आहेत.सदरचे बेमुदत उपोषण शांततेत सुरु आहे. दिनांक ८.१०.२०१५ रोजी उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी केली असता वेदयकीय अधिकारी यांनी उपोषणकर्ते यांना औषधोपचाराकरीता दवाखान्यामध्ये दाखल करण्याचा सल्ला दिल्याने उपोषणकर्ते यांना दिनांक ८.१०.२०१५ रोजी १९.४५ वाजता ग्रामिण रुग्णालय विटा येथे दाखल करण्यात आले होते. दिनांक ९.१०.२०१५ रोजी १५.०० वाजता औषधोपचारानंतर उपोषणकर्ते यांना दवाखान्यातून सोडलेनंतर त्यांनी पुन्हा उपोषणाचे ठिकाणी येवून उपोषण सुरु केले होते. दिनांक १९.१०.२०१५ रोजी १९.३० वाजता विटा पोलीस ठाणेकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी उपोषणकर्ते यांना ताब्यात घेवून चॅप्टर केस नंबर ४२४/२०१५ अन्वये प्रतिबंधक कारवाई केली आहे. त्यानंतर उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| १८१. | श्री अजित तुकाराम चव्हाण रा. यपाचीवाडी | श्री अजित तुकाराम चव्हाण रा. यपाचीवाडी | सहायक निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयासमोर आटपाडी | ७.१०.२०१५ रोजी ११.३० वा. ते १४.०० वा. | ठिया आंदोलन व निवेदन :- विकास सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, सचिव व इतर लोकांनी बोगस खोटी कागदपत्रे तयार करून वार्षिक सर्वसाधारण सभा घेवून ६० ते ६५ सभासदांची नांवे कमी करणेबाबत नोटीसा दिलेल्या आहेत. तरी सदर नोटीसा बेकायदेशीर असून न्याय मिळावा या मागणीसाठी श्री अजित तुकाराम चव्हाण रा. यपाचीवाडी यांचे नेतृत्वाखाली १५ ते २० सभासदानी सहायक निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयासमोर दिनांक ७.१०.२०१५ रोजी ११.३० वा. ते १४.०० वा. या वेळेत ठिया आंदोलन केले. दरम्यान मुदतीत प्रशिक्षणार्थी सहायक निंबधक प्रिया दवणकर यांना मागण्याचे निवेदन दिले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८२. | वैयक्तिक आंदोलन | श्री रामचंद्र तुकाराम जाधव रा. तुपारी | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ८.१०.२०१५ रोजी ११.३० वा. ते १८.०० व १३.१०.२०१५ रोजी १४.०० | धरणे आंदोलन व आमरण उपोषण :- तुपारी येथील ७० ते ८० स्त्री पुरुष अशानी पांडुरंग घाडगे व रोहीदास घाडगे रा. तुपारी यांचे साथीदारांचे विरुध्द गुन्हे दाखल करुन त्यांना तात्काळ अटक करावी या मागणीकरीता दिनांक ८.१०.२०१५ रोजी ११.३० वा. ते १८.०० वा. या वेळेत अचानकपणे जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर धरणे आंदोलन केले. त्यानंतर आंदोलनकर्ते यांच्या पैकी १. श्री रामचंद्र तुकाराम जाधव, २. आशा रामचंद्र जाधव, ३. अंजना संजय घाडगे सर्व रा. तुपारी यांनी दिनांक ८.१०.२०१५ रोजी १८.०० वा. पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले आहे. दिनांक १३.१०.२०१५ रोजी श्री पृथ्वीराज पवार- शिवसेना व सौ. स्वाती शिंदे - मनसे यांनी आंदोलनाचे ठिकाणी भेट देवून आंदोलनकर्ते यांच्या पाठीशी ठाम उभे राहण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्ते यांनी दिनांक १३.१०.२०१५ रोजी १४.०० वाजता उपोषण मागे घेतले आहे |
| १८३. | वैयक्तिक आंदोलन | श्री गारेख आनंदा काशिद रा. काशिदवाडी ता. शिराळा | काशिदवाडी ता. शिराळा | ८.१०.२०१५ रोजी ११.०० | धरणे आंदोलन :- श्री गारेख आनंदा काशिद रा. काशिदवाडी ता. शिराळा यांचे मालकीचे सर्व्हे नं. ६४/३ ब या जमिनीमध्ये विंडवर्ल्ड इंडीया प्रायव्हेट लिमीटेड या कंपनीने केलेले अतिक्रमण काढून घ्यावे या मागणीसाठी श्री गारेख आनंदा काशिद रा. काशिदवाडी यांचे नेतृत्वाखाली काशिदवाडी ता. शिराळा येथील १५ ते १६ शेतक-यांनी दिनांक ८.१०.२०१५ रोजी ११.०० पासून सदर जमीनीच्या ठिकाणी धरणे आंदोलन सुरु केले आहे. |
| १८४. | एम.आय.एम | जमिर सनदी | रामलिंग कॉलनी, जहनियाबाबा दर्गा जवळ, मिरज | ११.१०.२०१५ रोजी १९.२० ते १९.५५ | मेळावा :- मिरज तालुक्यातील एम.आय.एम कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. सदर मेळाव्यात समिर सनदी, मंदूर इनामदार, सागर दरबारे, सईद सौदागर,अल्लाऊदीन हाफिजी, इम्रान ढालाईत व शाकिर तांबोळी- जिल्हा अध्यक्ष, एम.आय.एम. यांनी पक्ष वाढीसाठी मार्गदर्शन केले. मेळाव्यास ६० ते ७० कार्यकर्ते हजर होते.मेळावा शांततेत पार पडला |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८५. | अखिल भारतीय औषधी विक्रेते संघटना | -- | सांगली जिल्हयामध्ये | १४.१०.२०१५ | औषध विक्री दुकाने बंद :-बेकायदेशीरपणे चालत असलेल्या ऑन लाईन इंटरनेट फार्मसी विरोधात अखिल भारतीय औषधी विक्रेते संघटनेच्या वतीने सांगली जिल्हयामध्ये दिनांक १४.१०.२०१५ रोजी औषध विक्री दुकाने बंद पाळण्यात आली. बंदला ९७ टक्के प्रतिसाद मिळाला. बंद कालावधी मध्ये अत्यावश्यक सेवेची गरज भासल्यास औषधे उपलब्ध करुन देण्याची सदर सदर संघटनेच्यावतीने करण्यात आली होती.<br>मोटार सायकल रॅली :- विश्रामबाग व सांगली शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक १४.१०.२०१५ रोजी १०.०० वा. ते १२.३० वा. या वेळेत श्री विनायक शेटे- सांगली जिल्हा अध्यक्ष व श्री विजय पाटील-अध्यक्ष राज्य कार्यकारणी यांचे नेतृत्वाखाली ९० ते १०० औषध विक्री व्यवसायीकानी बेकायदेशीरपणे चालत असलेल्या ऑन लाईन इंटरनेट फार्मसी विरोधात मोटार सायकल वरुन केमिस्ट भवन सांगली ते प्रशासकीय इमारत विजय नगर सांगली जावून सहायक अन्न व औषध अधिकारी श्री वाळवेकर –निरीक्षक यांना मागण्याचे निवेदन दिले. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे जावून श्री देवदत्त ठोंबरे-तहसीलदार महसूल यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>मुक मोर्चा :- मिरज शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक १४.१०.२०१५ रोजी १०.१५ वा. ते ११.०० वा. या वेळेत श्री विरंजय कद्दू- अध्यक्ष यांचे नेतृत्वाखाली १००ते १५० औषध विक्री व्यवसायीकानी बेकायदेशीरपणे चालत असलेल्या ऑन लाईन इंटरनेट फार्मसी विरोधात गांधी पुतळा मिरज ते उप विभागीय दंडाधिकारी कार्यालय मिरज असा मुक मोर्चा काढला. मोर्चा उपविभागीय कार्यालय मिरज येथे पोहचल्यानंतर श्री सुभाष बोरकर-उप विभागीय अधिकारी मिरज विभाग, मिरज यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>मोर्चा :- विटा पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक १४.१०.२०१५ रोजी १०.०० वा. ते ११.०० वा. या वेळेत श्री अनिल देशमुख- खानापूर तालुका अध्यक्ष यांचे नेतृत्वाखाली ८० ते ९० औषध विक्री व्यवसायीकानी बेकायदेशीरपणे चालत असलेल्या ऑन लाईन इंटरनेट फार्मसी विरोधात छ.शिवाजी महाराज पुतळा ते तहसील कार्यालय विटा असे मोटार सायकल वरुन जावून श्री अनिल कदम- नायब तहसीलदार विटा यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>मोर्चा :- शिराळा पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक १४.१०.२०१५ रोजी १०.३० वा. ते ११.४५ वा. या वेळेत श्री दिपक कृष्णा शेटे- शिराळा तालुका अध्यक्ष केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो. यांचे नेतृत्वाखाली ७०-७५ औषध विक्रेते व्यवसायीकांनी अंबामाता मंदीर शिराळा ते तहसील कार्यालय शिंराळा असा मोर्चा काढला. मोर्चा तहसील कार्यालय शिराळ येथे आल्यानंतर श्री विजय पाटील – तहसीलदार शिराळा यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८६. | आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटना व दलित महासंघ | श्री उदय दिनकर घाडगे- अध्यक्ष आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटना | स्टेशन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | १७.१०.२०१५ रोजी १३.०० वा. ते १४.०० वा. | मोर्चा/धरणे आंदोलनः- ४० पुरुष व ३० ते ३५ महीला अशांनी तुपारी येथील गोसावी समाजातील पांडुरंग घाडगे व इतरांनी रामचंद्र जाधव, संजय घाडगे यांचेवर खोटे गुन्हे दाखल केले आहेत तरी त्यांची नार्को स्टेट करण्यात यावी या व इतर मागण्यासाठी स्टेशन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर १४.०० वा. ते १६.०० वा. या वेळेत धरणे आंदोलन करण्यता आले. दरम्यान मुदतीत श्री त्रीगुण कुलकर्णी- उप जिल्हाधिकारी सांगली यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले. |
| १८७. | चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना | श्री संजय व्हनमाने- जिल्हा अध्यक्ष, चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना सांगली | निवासी उप जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | १७.१०.२०१५ रोजी १३.०० ते १३.३० वा. | निवेदनः- श्री संजय व्हनमाने- जिल्हा अध्यक्ष, चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना सांगली यांचे नेतृत्वाखाली ७ ते ८ कर्मचा-यांनी दिवाळी बोनस सुरु करावा, ६ टक्के थकीत महागाई भत्ता रोखीने मिळावा या व इतर मागण्याचे निवेदन श्री कुलकर्णी – निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |
| १८८. | हिंदू जनजागृती समिती, सनातन संस्था | श्री दत्तात्रय विष्णू रेठरेकर- अध्यक्ष हिंदू जनजागृती समिती | राजवाडा चौक- भारती विदयापीठ- कापड पेठ- मारुती चौक | १८.१०.२०१५ रोजी १६.०० वा. ते १८.३० वा. | निषेध फेरी :- श्री दत्तात्रय विष्णू रेठरेकर- अध्यक्ष हिंदू जनजागृती समिती यांचे नेतृत्वाखाली व श्री अभय वर्तक – प्रवक्ते सनातन संस्था, श्री नितीन शिंदे- महाराष्ट्र नव निर्माण सेना, श्री तानाजी सातपुते- शिवसेना मिरज, श्री किरण कुलकर्णी- शिवसेना कागल, श्री राजेंद्र मुणगे – हिंदू जनजागृती समिती, श्री सचिन पवार- शिवप्रतिष्ठान सांगली, श्री चंद्रकांत मैगुरे- शिवप्रतिष्ठान मिरज, श्री रमाकांत बोंगाळे- महाराज वारकरी सांप्रदाय, श्रीमती प्रतिभाताई तावरे- सनातन संस्था विटा, श्रीमती मधुरा तोफखाने, श्रीमती गौरी खिलारे- सनातन संस्था, श्री प्रशांत चव्हाण - सनातन संस्था तासगांव, श्री मानसिंग शिंदे, श्री प्रविण कवठेकर, श्री कृष्णा माळी, श्री हरीदास कालीदास, श्री इरगोंडा पाटील (रुद्र पाटील-गोवा बॉम्ब स्फोट आरोपी याचे चुलते) रा. काराजंगी यांचे प्रमुख उपस्थीत ३५०-४०० स्त्री – पुरुष कार्यकर्त्यांनी जगतगुरु शंकराचार्य स्वामी स्वरुपानंद सरस्वती सेना वारकरी सांप्रदाय, संत महंत हिंदुत्ववादी संघटना इत्यादीनी सनातन संस्थेला ठोस पाठींबा दिला असतानाही बेछुट आणि विध्देषी आरोप करुन सनातन संस्थेवर बंदीची मागणी केली जात आहे. कॉ. गोविंद पानसरे यांचे हत्ये प्रकरणी पोलीस यंत्रणेने कोणत्याही दबावास बळी न पडता चौकशी करावी. तसेच राष्ट्रप्रेमी सनातन संस्थेवर होत असलेला अन्याय आणि बंदीच्या विरोधात ठोस भुमिका घेण्यात यावी या मागणीसाठी निषेध फेरी काढण्यात आली. |
| १८९. | सेवानिवृत्त बी एस एफ जवान | श्री संजय खैरमोडे- सेवानिवृत्त बी एस एफ जवान | छ. शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | २०.१०.२०१५ रोजी १२.३० वा. ते १३.१५ वा | मोर्चा :- ५० ते ६० बी एस एफ जवानांनी सेवा निवृत्त बीएसएफ जवानांना पेन्शन मिळावी, इतर शासकीय सुविधा मिळाव्यात या व इतर मागण्यासाठी छ. शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर श्री त्रीगुण कुलकर्णी- उप जिल्हाधिकारी सांगली यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९०. | भारत मुक्ती मोर्चा सांगली | श्री. महादेव मानुगडे जिल्हाध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | २३.१०.२०१५ रोजी १२.३० ते १६.०० | निवेदनः- २०-२५ कार्यकर्त्यानी मुंबई बांद्रा पोलीस स्टेशन येथे अधिकारी व कर्मचारी यांनी अशिफ शेख वय-२१ दानिश शेख वय-२१ या मुस्लीम युवकांना विनाकारण अमानुषपणे मारहाण करण्यात आली त्यांची चौकशी करुन सबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करुन त्यांचेवर गुन्हे दाखल करावेत या व इतर मागण्याचे निवेदन श्री. त्रिगुण कुलकर्णी निवासी उपजिल्हाधिकारी सांगली यांना जिल्हाधिकारी कार्यालयांत देणेत आले. त्यानंतर वरील देणेत आलेल्या निवेदनाची प्रत मा. पोलीस अधीक्षक याना समक्ष देणेत आली. ऑल इंडिया मजलिस –ए- इतेहाद-उल- मुस्लमीन(एमआयएम) संघटनेने भारत मुक्ती मोर्चाचे वतीने करण्यात येणा-या आंदोलनास पाठींबा दिला असुन यापुढे दलीत व मुस्लीम समाजावर अन्याय अत्याचार झाल्यास तिव्र आंदोलन करण्यात येईल वगैरे मजकूराचे निवेदन श्री शाकीरभाई तांबोळी- जिल्हाध्यक्ष एमआयएम यांनी जिल्हाधिकारी सांगली यांना दिले आहे |
| १९१. | एमआयएम | श्री शाकीर तांबोळी- सांगली जिल्हा अध्यक्ष एम आय एम | शासकीय विश्रामगृह सांगली | २७.१०.२०१५ रोजी १५.०० वा. ते १६.३० वा. | बैठक :- डॉ. महेशकुमार कांबळे रा. मिरज, श्री निहाल महात रा. सांगली, श्री आशरफ बाकंर या प्रमुखासह ६० ते ७० कार्यकर्ते उपस्थीत होते.सदर बैठकीमध्ये दिनांक १४.११.२०१५ रोजी सांगली जिल्हयातील इस्लांमपूर, मिरज किंवा सांगली या पैकी एका ठिकाणी श्री इम्तीयाज जलील - आमदार एमआयएम, औरंगाबाद यांच्या उपस्थीत बैठक घेणार असल्याचे जाहीर केले आहे. |
| १९२. | इंडीयन मुस्लीम संघटना | श्री आयुब कुडचीकर | स्टेशन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | २७.१०.२०१५ रोजी १२.५० वा. ते १३.०५ वा. | मोर्चा :- ५० ते ६० कार्यकर्त्यांनी मुस्लीमांना भारतीय संविधान कलम २५ नुसार असलेल्या धार्मिक अधिकारावर निर्बंध येत आहेत ते रद्द करावे या व इतर मागण्या करीता स्टेशन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री त्रिगुण कुलकर्णी – निवासी जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |
| १९३. | वैयक्तिक आंदोलन | श्रीमती सुनिता प्रकाश मोरे व श्रीमती सोनाबाई निवृत्ती मोरे दोघी रा. कवठे पिरान ता. मिरज | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | २६.१०.२०१५ रोजी १२.०० वा | आमरण उपोषण :- कवठेपि रान गट नं. १५९८/ब८१ आर व आष्टा गट नं.६०१/७/२-१३ आर या जमिनीवर त्यांच्या चुलत्यांची नांवे लागलेली आहेत ती कमी करून त्यांची नांवे लावावीत या मागणीकरीता दिनांक २६.१०.२०१५ रोजी १२.०० वा. पासून जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर आमरण उपोषण सुरू केले होते.दिनांक २७.१०.२०१५ रोजी १६.०० श्री प्रविण साळुंखे - उप जिल्हाधिकारी पुनर्वसन यांनी उपोषकर्ते यांची भेट घेवून मागण्या बाबत लेखी आश्वासन दिलेनंतर उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९४. | वैयक्तिक आंदोलन | श्री महेशकुमार कांबळे - अध्यक्ष श्रमीक पत्रकार संघ | राज्य उत्पादन शुल्क कार्यालय सांगली समोर | २८.१०.२०१५ रोजी ११.०० | आमरण उपोषण :- उत्पादन शुक्ल कार्यालय सांगली येथील अधिकारी यांची चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करावी या मागणीसाठी राज्य उत्पादन शुल्क कार्यालय सांगली समोर आमरण उपोषणास बसले होते. श्री प्रकाश गोसावी - अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सांगली यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेवून मागण्याबाबत लेखी आश्वासन दिलेनंतर दिनांक २८.१०.२०१५ रोजी १५.४५ वाजता उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| १९५. | अखिल भारतीय महाराष्ट्र वडर समाज संघटना सांगली | श्री पिराजी मुंगळे | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | २९.१०.२०१५ रोजी १२.१५ वा. ते १२.३० वा | निदर्शने:- १५ ते २० कार्यकर्त्यांनी वडर समाजाला अनुसुचित जमातीमध्ये आरक्षण दयावे, जातीचा दाखल्यासाठी आवश्यक असणारी सन १९६१ ची पुराव्याची अट शिथील करावी या व इतर मागण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर निदर्शने केली दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री त्रिगुण कुलकर्णी निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |
| १९६. | आरवडे, चिंचणी, सावर्डे, कौलगे, लोढे, डोर्ली ग्रामस्थ | सौ छाया मस्के - सरपंच आरवडे | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | २९.१०.२०१५ रोजी ११.४५ वा. ते १२.१०. वा. | निदर्शने:- आरवडे, चिंचणी, सावर्डे, कौलगे, लोढे, डोर्ली आदी गांवातील ग्रामस्थांनी सौ छाया मस्के - सरपंच आरवडे यांचे नेतृत्वाखाली विसापूर – पुणदी योजनेचे पाणी लोढे तलावात सोडावे या व इतर मागण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर निदर्शने केली व मागण्याचे निवेदन श्री त्रिगुण कुलकर्णी – निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |
| १९७. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री महावीर पाटील –जिल्हा उपाध्यक्ष | ग्रामपंचायत कार्यालय नांद्रे समोरील रोडवर | ५.११.२०१५ रोजी १९.४५ वा. ते २१.१५ वा | सभा - : सभेच्या वेळी श्री राजू शेट्टी – खासदार स्वाभिमानी शेतकरी संघटना, श्री सदाभाऊ खोत- प्रदेशाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना, श्री रविकांत तुपकर- अध्यक्ष खादी ग्रामोदयोग विकास महामंडळ यांची भाषणे झाली. सदर वेळी उपस्थीत वक्त्यांनी आपले भाषणामध्ये साखर कारखानदार एफआरपीचे रक्क्कमेचे तीन तुकडे करणार आहेत त्यांचा डाव हाणून पाडला पाहीजे, एफआरपीची बिले एक रकमी घेतल्यास शेतक-यांचा फायदा आहे. एफआरपीचे तुकडे पाडल्यास शेतक-यांचे नुकसान आहे. या बाबत मार्गदर्शन करुन दिनांक ६.११.२०१५ रोजी जयसिंगपूर ता.शिरोळ जि. कोल्हापूर येथील ऊस परिषदेस मोठया संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन केले. सदर सभेस ५०० ते ५५० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| १९८. | आंत्री बद्रूक शेतकरी | श्री. रणधीर शिवाजीराव नाईक, जि प सदस्य | आंत्री बुद्रूक ते तहसील कार्यालय शिराळा | ०६.११.२०१५ रोजी ११.०० ते १४.०० | पदयात्रा व सभा - : ५०० ते ६०० शेतक-यांनी शिराळा तालुका टंचाईग्रस्त गावांमध्ये समाविष्ट करुन दुष्काळ जाहीर करावा. वाकुर्डे योजनेच पाणी मोरणा नदीमध्ये तातडीने सोडावे व वाकुर्डे बुद्रूक योजना त्वरीत सुरू करावी. या व इतर मागण्याकरीता पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रा तहसील कार्यालयासमोर आल्यानंतर सभेत रुपांतर झाले. प्रमुख वक्त्यांनी मागण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्री. विजय पाटील,तहसिलदार शिराळा यांना देण्यात आले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९९. | दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लि. | श्री निवृत्ती गणपती नायकवडी - अध्यक्ष निनाईदेवी सहकारी साखर कामगार युनियन करुंगली | निनाईदेवी सहकारी साखर कारखान्याच्या गेटसमोर | २३.१०.२०१५ रोजी १५.०० | आमरण उपोषण :- निनाईदेवी सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्र राज्य सह. बँकेने दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लि. यांना विक्री केला आहे. दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लि. यांनी कारखाना सुरु करताना जुन्या कामगारांना कामावर घेण्याचे आश्वासन दिले होते. परंतू जुन्या ५३३ कामगारांना कामावर घेतलेले नाही तरी जुन्या ५३३ कामगारांना कामावर घ्यावे या मागणी करीता श्री निवृत्ती गणपती नायकवडी - अध्यक्ष निनाईदेवी सहकारी साखर कामगार युनियन करुंगली यांचे नेतृत्वाखाली ९३ जुने कामगार दिनांक २३.१०.२०१५ रोजी १५.०० पासून निनाईदेवी सहकारी साखर कारखान्याच्या गेटसमोर आमरण उपोषणास बसले आहेत.दि.०२.११.२०१५ रोजी उपोषण कर्त्यांनी कारखान्याचे गेट समोरच ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. सदर वेळी ८०० ते १००० जनसमुदाय हजर होता उपोषण कर्त्यांनी कारखान्याचे गेट समोरच ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. सदर वेळी ८०० ते १००० जनसमुदाय हजर होता. |
| २००. | एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कर्मचारी संघटना सांगली | श्री.विजय प्रधान - अध्यक्ष, | जिल्हाधिकारी कार्यालयाचे पटांगणात | दि.०२.११.२०१५ रोजी ११.०० ते १५.४५ | धरणे आंदोलन - २० ते २५ कार्यकर्त्यांनी पाणलोट पथक सदस्यांच्या सेवांचे खाजगीकरण होवू नये या व इतर मागण्याकरीता धरणे आंदोलन करण्यात आले. दरम्यान मुदतीत शिष्टमंडळाने मागणीचे निवेदन श्री. त्रिगुण कुलकर्णी – निवासी उप-जिल्हाधिकारी, सांगली यांना देण्यात आले. |
| २०१. | जनरल श्रमीक कामगार युनियन | श्री सुनिल कदम- अध्यक्ष | बन्सी पल्प आणि पेपर मील्स प्रा. लि. कसबे डिग्रज ता. मिरज | ९.११.२०१५ रोजी ०६.०० | कामबंद आंदोलन - : बन्सी पल्प आणि पेपर मील्स प्रा. लि. कसबे डिग्रज ता. मिरज येथील कामगारांनी चालू वर्षी २० टक्के बोनस मिळालाच पाहीजे, २४० दिवस भरलेल्या कामगारांना कायम करावे या व इतर मागण्यासाठी दिनांक ९.११.२०१५ रोजी ०६.०० वाजले पासून कामबंद आंदोलन सुरु केले आहे. सदर कामबंद आंदोलनामध्ये २७ कर्मचारी सहभागी झालेले आहेत. |
| २०२. | श्रमिक संघ कोल्हापूर | कॉ. श्री गोपाळ पाटील | झुलेलाल चौक सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ३१.११.२०१५ रोजी १३.०० वा. ते १४.१५ वा | मोर्चा - : १५० ते १७५ पेन्शनर लोकांनी पेन्शनर लोकांना पेन्शन वाढवून मिळावी या व इतर मागण्याकरीता झुलेलाल चौक सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले. त्यानंतर शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्री ए.सी. वाकडे- सामान्य प्रशासन विभाग यांना दिले |
| २०३. | वैयक्तिक आंदोलन | श्री सतिश विठ्ठल म्हेत्रे रा. विटा | तहसील कार्यालय विटा समोर | ६.१०.२०१५ रोजी ११.०० वा | उपोषण - : पार्श्वनाथ नागरी सहकारी पतसंस्था विटा या पंतसंस्थेच्य बेकायदेशीर व अन्यायकारक कामकाजाबाबत कारवाई करावी या मागणी करीता बेमुदत उपोषणास बसले आहेत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २०४. | काशिदवाडी ग्रामस्थ | श्री गारेख आनंदा काशिद रा. काशिदवाडी ता. शिराळा | सर्व्हे नं. ६४/३ ब विंडवर्ल्ड इंडीया प्रायव्हेट लिमीटेड | ८.१०.२०१५ रोजी ११.०० पासून | धरणे आंदोलन - : श्री गारेख आनंदा काशिद रा. काशिदवाडी ता. शिराळा यांचे मालकीचे सर्व्हे नं. ६४/३ ब या जमिनीमध्ये विंडवर्ल्ड इंडीया प्रायव्हेट लिमीटेड या कंपनीने केलेले अतिक्रमण काढून घ्यावे या मागणीसाठी श्री गारेख आनंदा काशिद रा. काशिदवाडी यांचे नेतृत्वाखाली काशिदवाडी ता. शिराळा येथील १५ ते १६ शेतक-यांनी दिनांक ८.१०.२०१५ रोजी ११.०० पासून सदर जमीनीच्या ठिकाणी धरणे आंदोलन सुरु केले आहे. |
| २०५. | कडेगांव ग्रामस्थ | राजेंद्र भिमराव जाधव सरपंच ग्रामपंचायत कडेगांव | कडेगांव एस.टी.स्टँड ते सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय कडेगांव | ३.११.२०१५ रोजी १०.४५ वा.ते १२.३० वा | मोर्चा - : गूहानगर ते चिपळून,कराड जाणारा राज्यमार्ग क्र.१३६ चा दुरुस्तीचे काम करणारा कॉन्ट्रॅक्टर बदलावा व दुसरा कॉन्ट्रॅक्टर नेमून काम पूर्ण करावे या मागणी करीता काढण्यात आला. श्री.पाटील सहा.अभियंता सा.बा.विभाग कडेगांव यांनी आंदोलकांशी मागण्यांबाबत चर्चा करुन सदय स्थितीत काम बंद ठेवणेबाबत दिलेले पत्र व कॉन्ट्रॅक्टर बदलणेबाबत कार्यकारी अभियंता सां.बां.विभाग मिरज यांचेशी पत्र व्यवहार केला असलेबाबतच्या छायांकित प्रती आंदोलकांच्या वतीने राजेंद्र भिमराव जाधव सरपंच ग्रामपंचायत कडेगांव यांनी स्विकारले आहे |
| २०६. | ॲपे रिक्षा चालक मालक संघटना | श्री सनी खराडे - अध्यक्ष रा. इस्लांमपूर | इस्लांमपूर | ४.११.२०१५ | संप - : २५० ॲपे रिक्षा चालक व मालकानी इस्लांमपूर शहरातील वडाप ॲपे रिक्षा बंद कराव्यात, ई मिटरची वजन मापे विभागाकडून तपासणी करण्यात यावी या व इतर मागण्याकरीता दिनांक ४.११.२०१५ रोजीपासून संप सुरु केला आहे. पोलीस निरीक्षक इस्लांमपूर पोलीस ठाणे यांनी इस्लांमपूर नगरपालिकेचे अधिकारी, एसटीचे अधिकारी व ॲपे रिक्षा संघटनेचे अधिकारी यांची इस्लांमपूर पोलीस ठाणे येथे बैठक घेवून संप मिटविणेच्या अनुषंगाने चर्चा केली परंतू रिक्षा संघटनेचे पदाधिकारी हे त्यांच्या मागण्याशी ठाम असून त्यांनी संप सुरु ठेवला होता. दिनांक ५.११.२०१५ रोजी ॲपे रिक्षा संघटनेचे पदाधिकारी यांनी श्री वाघाले- उप प्रादेशीक परिवहन अधिकारी यांची भेट घेवून मागण्याबाबत चर्चा केली त्यामध्ये आंदोलनकर्ते यांचे समाधान झाल्याने त्यांनी दिनांक ५.११.२०१५ रोजी १९.०० वाजता संप मागे घेतल्याचे जाहीर केले आहे. |
| २०७. | राष्ट्रीय मानवाधिकार संघटना इस्लांमपूर | श्री वसंत रघुनाथ अस्वले - अध्यक्ष इस्लांमपूर | मुख्याधिकारी इस्लांमपूर नगर पालिका | ४.११.२०१५ रोजी १२.५० वा. ते १३.०० वा. | निवेदन - : १० ते १५ कार्यकर्त्यांनी इस्लांमपूर नगरपालिका हद्दीत रमाई बेघर वसाहत कामाची चौकशी करावी या व इतर मागण्याचे निवेदन मुख्याधिकारी इस्लांमपूर नगर पालिका यांना दिले. |
| २०८. | महाडीक युवा शक्ती इस्लामपुर | श्री सोमनाथ फल्ले, फिरोज मगदुम , विशाल शिंदे, सर्व रा. इस्लामपुर | पंचायत समिति कार्यालय इस्लामपुर | ०६.११.२०१५ रोजी १०.०० ते १७.०० | उपोषण - : वाळवा पंचायत समितीच्या जुन्या इमारतीतील सभागृहास पद्मभुषण वसंतदादा पाटील असे नाव होते. नव्या बांधण्यात आलेल्या इमारतीतील सभागृहास राजारामबापु पाटील असे नाव देणेत आले आहे. तरी नवीन इमारतीतील सभागृहास पुर्वीप्रमाणे पद्मभुषण वसंतदादा पाटील असे नाव देण्यात यावे. या व इतर मागण्याकरीता लाक्षणिक उपोषण करण्यात आले. आंदोलनाचे वेळी इस्लामपुर येथील भाजपा, शिवसेना, आरपीआय, कॉंग्रेस आय पक्षाचे प्रमुख नेत्यांनी येवून लाक्षणिक उपोषणास पाठिंबा दिला. दरम्यान मुदतीत मागण्यांचे निवेदन श्री.जाधव – गटविकास अधिकारी, पंचायत समिती इस्लामपुर - वाळवा यांना देण्यात आले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २०९. | श्रमिक मुक्ती दल | श्री. भारत पाटणकर- अध्यक्ष श्रमिक मुक्ती दल | बलवडी भाळवणी | १२.११.२०१५ रोजी १०.०० वा ते १५.०० | पुतळा दहन व सभा - : येरळा नदीवरील बळीराजा बंधाऱ्याचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सदरवेळी सामाजिक कार्यकर्ते कै. दाभोळकर, कै. पानसरे यांचे मारेकऱ्यांचा प्रतिकात्मक पुतळयांची दहन सभा पार पडली. सभेमध्ये भारत पाटणकर यांनी आपले भाषणात कै. दाभोळक कै. पानसरे यांचे हत्येच्या तपासामध्ये पोलीसांचेवर दबाव आहे त्यामुळे पोलीस यंत्रणेकडून मारेकऱ्यांचा शोध लागणार नाही त्याकरीता श्रमिक मुक्ती दलाच्या वतीने कै. दाभोळकर व कै. पानसरे यांचे मारेकऱ्यांची शोध मोहिम राबवली जाणार आहे. शोध मोहिमेस ज्या कार्यकर्त्यांना सहभागी व्हायचे आहे त्यांनी आपली नावे संघटनेकडे नोंदवावीत. संघटनेच्या वतीने दि. २१.११.२०१५ ते २४.११.२०१५ या कालावधीत पुणे ते कोल्हापूर अशी चारचाकी वाहनाची संघर्ष यात्रा काढण्यात येणार आहे. संघर्ष यात्रेची सांगता सभा दसरा चौक कोल्हापूर येथे दि. २४.११.२०१५ रोजी होणार आहे. तरी जास्तीत जास्त लोकांनी सहभागी व्हावे, असे अवाहन केले. सदरवेळी ९० ते १०० लोक उपस्थित होते |
| २१०. | वैयक्तिक आंदोलन | श्री साहेबराव दगडु कांबळे रा. माजर्डे ता. तासगांव | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | १६.११.२०१५ रोजी १२.०० | उपोषण - : तत्कालीन उप विभागीय अधिकारी श्री हेंमत निकम यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या पीटीशन क्रमांक.८२/२००१ दि. ३१.१०.२०१५ मधील आदेशाचा अवमान केला आहे. व अधिकाराचा गैरवापर केला आहे तरी त्यांचेवर फौजदारी कारवाई करावी या व इतर मागण्यासाठी दिनांक १६.११.२०१५ रोजी १२.०० वाजले पासून जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर आमरण उपोषणास बसले होते.दिनांक २१.११.२०१५ रोजी १६.१५ वाजता उपोषणकर्ते हे त्यांना मा. पोलीस महासंचालक यांचे कार्यालयातून फोन आला असून मागण्याबाबत पोलीस अधीक्षक सांगली यांचेकडे अर्ज देण्यास सांगितले असल्याने उपोषण मागे घेत आहे असे सांगून उपोषणाचे ठिकाणाहून निघून गेले आहेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २११. | वैयक्तिक आंदोलन | हळ्ळी ग्रामस्त | ग्रामपंचायत कार्यालय हळ्ळी समोर | १६.११.२०१५ रोजी ११.०० वा. | उपोषण - : १) श्री मलकारी अशोक पाटील वय २६, २) श्री परसगोंडा विठोबा सनदी वय ६०, ३) श्री भिमराव सिद्राम खपेकर वय ५५, ४) श्री प्रविण संगनगौडा पाटील वय २२, ५) श्री बसवराज मलकारी कावडे वय २२, ६) श्री निजगुणी परगोंडा कट्टीमणी, वय २३, ७) श्री बंगारेप्पा महानंदा मांग वय २१, ८) श्री सिध्दाराम कांताप्पा बिरगुणी वय २२ ९) श्री बाळासाहेब बाबुराव हन्नीनाळ वय ५५, १०) चंदू उ र्फ चद्रम आवण्णा बिराजदार वय ५५, ११) श्री संजय बंधव्वा केंगार वय २१, १२) श्री तुकाराम आप्पासाहेब आजमाने वय २२, १३) श्री लक्ष्मण सिद्राम हवीनाळ वय ५५, १४) तुकाराम आप्पासाहेब आजमाने वय २२, १५) श्री शिवशंकर गुरुसिध्दा मासाळ वय ४५ रा. सर्व रा. हळ्ळी ता. जत यांनी दिनांक १.११.२०१५ रोजी हळ्ळी ता. जत येथील ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक पार पडली आहे. सदर निवडणूकीचे वार्ड क्रमांक २ मधून ज्योती सदाशिव बेले रा. घेरडी ता. सांगोला जि. सोलापूर यांनी त्या हळ्ळी ता. जत येथील रहीवाशी असल्याबाबत खोटा दाखला तयार करुन तसेच शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये जन्म तारखेत खाडाखोड करुन निवडणूक लढवून निवडून आल्या आहेत. सदर बाबत तहसीलदार जत यांचे कडे तक्रार देवून ही संबधीतांवर कारवाई झालेली नाही याचे निषेधार्थ दिनांक १६.११.२०१५ रोजी ११.०० वा. पासून ग्रामपंचायत कार्यालय हळ्ळी समोर आमरण उपोषण सुरु केले आहे.उपोषणकर्त्या पैकी श्री लक्ष्मण सिद्राम हाविनाळ वय ५५ यांना उपोषणा दरम्यान चक्कर येवू लागल्याने त्यांनी दिनांक २१.११.२०१५ रोजी १६.३० वा. उपोषण मागे घेतले होते. तसा लेखी जबाब त्यांनी सपोनि उमदी पोलीस ठाणे यांचे कडे दिलेला होता. दिनांक २३.११.२०१५ रोजी श्री अभिजीत पाटील – तहसीलदार जत यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेवून गैर अर्जदार ज्योती बेले यांचे मतदार यादीतील नांव कमी केले असले बाबत व सदरबाबत वरीष्ठ कार्यालयास अहवाल पाठविला असले बाबत सांगितल्याने उर्वरीत १४ उपोषणकर्ते यांनी १२.३० वाजता उपोषण मागे घेतले आहे. |
| २१२. | महाराष्ट्र राज्य, गुंठेवारी विकास संघटना | श्री शंकर पुजारी – निमंत्रक | स्टेशन चौक सांगली ते सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यालय | १७.११.२०१५ रोजी १२.५० वा. ते १३.१५ वा. | मोर्चा - : ७५ ते ८० कार्यकर्त्यानी गुंठेवारी मधील सर्व घरांची नियमीत दुरुस्ती करावी, गुंठेवारी भागामध्ये नागरी सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात या व इतर मागण्यासाठी स्टेशन चौक सांगली ते सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यालय असा मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री सुनिल नाईक- उपायुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगर पालिका सांगली यांना देण्यात आले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१३. | वैयक्तिक आंदोलन | पलूस ग्रामस्त | तहसील कार्यालय पलूस समोर | १७.११.२०१५ रोजी ११.०० वा. ते १७.०० वा. | उपोषण - : १. श्री लालासाहेब नारायण गोंदील, २. मोहन श्रीपती जाधव, ३. राजेंद्र ईश्वरा मोरे, ४. कुमार तुकाराम गायकवाड, ५. विनायक नारायण गोंदील ६. श्री प्रशांत तानाजी जाधव सर्व रा. पलूस यांनी ग्रामपंचायत कार्यालय पलूस येथील अधिकारी व कर्मचा-यांनी पदाचा गैरवापर करुन विकास कामासाठी शासनाच्या विविध योजनातून मिळालेल्या निधीचा गैरवापर केला आहे त्याची चौकशी करुन संबधीतांवर कारवाई करावी या व इतर मागण्यासाठी तहसील कार्यालय पलूस समोर लाक्षणीक उपोषण केले. श्री जोशी – गट विकास अधिकारी पंचायत समिती पलूस यांनी उपोषणाचे ठिकाणी येवून लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| २१४. | सांगली जिल्हा सुधार समिती सांगली | श्री अमित शिंदे | स्टेशन चौक सांगली ते सामिकु मनपा कार्यालय सांगली | २०.११.२०१५ रोजी १२.०० वा. ते १४.०० वा | तांब्या मोर्चा - : ६० ते ७० कार्यकर्त्यांनी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगर पालीका क्षेत्रामध्ये लोकसंख्येचे प्रमाण विचारात घेवून महीलांसाठी चांगल्या सार्वजनिक मुता-या व स्वच्छतागृहांची उभारणी करावी, त्यांची योग्य ती देखभाल घेण्याची व्यवस्था करावी या व इतर मागण्यासाठी स्टेशन चौक सांगली ते सामिकु मनपा कार्यालय सांगली असा "तांब्या मोर्चा" काढला. मोर्चा मनपा कार्यालय सांगली येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री सुनिल नाईक- उपायुक्त, सांमिकु, मनपा यांना देण्यात आले. |
| २१५. | वैयक्तिक आंदोलन | श्री भानुदास गणपती पाटील- रा. नागांव ता. तासगांव | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | २०.११.२०१५ रोजी १२.०० | उपोषण - : मौजे नागांव निमणी येथील गायरान गट नं. १७७ मधील अतिक्रमण काढावे या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर उपोषणास बसले होते. जिल्हाधिकारी सांगली यांनी उपोषणकर्ते यांचेशी मागण्याबाबत चर्चा केली व पुर्तता करण्याबाबत आश्वासन दिल्यानंतर १५.१० वाजता उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| २१६. | शिवप्रतिष्ठान | श्री हणमंत पवार | छ. शिवाजी पुतळा, मारुती चौक सांगली | छ. शिवाजी पुतळा, मारुती चौक सांगली | मोर्चा व पोस्टर दहन - : २० ते २५ कार्यकर्त्यांनी देशात सर्व धर्मिय बिगर तणावाचे व बिगर तक्रारीचे रहात असताना सिनेअभिनेता अमीर खान याने देशात असंहिष्णूतेचे वातावरण आहे असे बेजबाबदारपणाचे वक्तव्य केलेचे निषेधार्थ सिनेअभिनेता अमीर खान याचे पोस्टर्सचे दहन करण्यात आले. सदर वेळी आंदोलनकर्ते यांनी यापुढे सिने अभिनेता अमीर खान याचा एकही चित्रपट सांगली जिल्हयामध्ये प्रदर्शित होवू देणार नाही असा इशारा दिला आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१७. | श्रमिक मुक्ती दल, सामाजिक अत्याचार प्रतिबंधक चळवळ आणि जाती मुक्ती आंदोलन | डॉ. भारत पाटणकर- श्रमिक मुक्ती दल, कॉ. धनाजी गुरव, कॉ. किशोर ढमाले, कॉ. किशोर जाधव, डॉ बालचंद्र कानगो, कॉ. ढवळे, | कासेगांव गावातून बाजार पेठ व मुख्य रस्त्यावरुन | २२.११.२०१५ रोजी १८.२५ | समता संघर्ष यात्रा व सभा - : श्रमिक मुक्ती दल, सामाजिक अत्याचार प्रतिबंधक चळवळ आणि जाती मुक्ती आंदोलन यांचे वतीने पुणे ते कोल्हापूर अशी काढण्यात आलेली समता संघर्ष यात्रा दिनांक २२.११.२०१५ रोजी १८.२५ वा. येथे दाखल झाली. सदर समता संघर्ष यात्रा कासेगांव गावातून बाजार पेठ व मुख्य रस्त्यावरुन फिरुन चावडी चौकामध्ये आल्यानंतर सदर रॅलीचे सभेमध्ये रुपांतर झाले. सदर रॅली मध्ये मध्ये डॉ. भारत पाटणकर- श्रमिक मुक्ती दल, कॉ. धनाजी गुरव, कॉ. किशोर ढमाले, कॉ. किशोर जाधव, डॉ बालचंद्र कानगो, कॉ. ढवळे, या प्रमुखासह ५० ते ६० जनसमुदाय व १० ते १२ चार चाकी वाहने सहभागी झालेली होती. प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणामध्ये डॉ नरेंद्र दाभोळकर, कॉ गोविंद पानसरे व डॉ कलबुर्गी यांच्या खुनाचा शोध लागला पाहीजे व खुन्यास फाशी झाली पाहीजे असे सांगितले आहे. २१.१५ वा. सभा संपल्यानंतर सदर रॅलीचा मुक्काम शुभारंभ मंगल कार्यालय कासेगांव या ठिकाणी झाला. दिनांक २३.११.२०१५ रोजी १०.०० वाजता सदरची रॅली पेठ मार्गे सांगली कडे रवाना झाली आहे.<br>दिनांक २३.११.२०१५ रोजी १८.०० वाजता स्टेशन चौक सांगली येथे समता संघर्ष रॅलीचे वतीने सभा आयोजीत करण्यात आली आहे. कासेगांव येथील रॅली व सभा शांततेत पार पडली असून कासेगांव येथे रॅली व सभेच्या अनुषंगाने योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला होता. सांगली जिल्हयामध्ये समता संघर्ष रॅलीच्या अनुषंगाने योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. हालचालीवर लक्ष ठेवून आहोत.<br>श्रमिक मुक्ती दल, सामाजिक अत्याचार प्रतिबंधक चळवळ आणि जाती मुक्ती आंदोलन यांचे वतीने पुणे ते कोल्हापूर अशी काढण्यात आलेली समता संघर्ष यात्रा दिनांक २३.११.२०१५ रोजी १७.३० वा. सांगली येथे दाखल झाली. सदर समता संघर्ष यात्रा सांगली शहरातील टिळक चौक- मारुती रोड- आंबेडकर पुतळा- शिवाजी पुतळा- रेवणी रोड- पंचमुखी मारुती रोड- कामगार भवन- या मार्गाने फिरुन स्टेशन चौक येथे आल्यानंतर समता संघर्ष रॅलीचे सभे मध्ये रुपांतर झाले. सदर ठिकाणी डॉ. भारत पाटणकर, कॉ. भिमराव बनसोडे, कॉ. धनाजी गुरव, कॉ. उमेश देशमुख यांची भाषणे झाली. प्रमुख वक्त्यानी आपल्या भाषणात केंद्रातील भाजपा सरकार व राज्यातील फडणवीस सरकार हे मनोवादी तसेच सनातनवादी प्रवृत्तीचे आरएसएसच्या विचाराची असून या राज्यात कॉ गोविंद पानसरे, डॉ. नरेंद्र दाभोळकर, कॉ. कलबुर्गी यांच्या हत्या होवूनही अदयाप खुनी सापडत नाहीत. तसेच मिळालेल्या खुन्यांना शासन पाठीशी घालत आहे. हे सरकार डाव्यांची विचारसरणी मोडीत काढून शाहू, फुले आंबेडकरांचे समतावादी विचाराला खो घालत आहे. सर्व सामान्यांना अच्छे दिनाचे गाजर दाखवून शासनाने महागाईचा आगडोंब केलेला आहे. या गोष्टीबाबत विचार विनीमय करण्यासाठी ही समता संघर्ष यात्रा काढण्यात आली आहे असे सांगून दिनांक २४.११.२०१५ रोजी कोल्हापूर येथे होणा-या सभेसाठी सर्वानी मोठया संख्येने उपस्थीत रहावे असे आवाहन केले. सभा २०.३० वा. संपली असून त्यानंतर रॅलीने शांतीनिकेतन सांगली येथे मुक्काम केला. रॅली मध्ये ५० ते ६० कार्यकर्ते व १० ते १२ वाहने सहभागी झाली होती<br>सांगली येथील समता संघर्ष यात्रा व सभा शांततेत पार पडली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१८. | कुपवाड शहर विकास मंडळ | श्री सुकूमार कर्नाळे | सोसायटी चौक ते आर पी पाटील हायस्कुल कुपवाड | २५.११.२०१५ रोजी १९.०० वा. ते १९.४० वा | शंखध्वनी आंदोलन - : ३० ते ३५ कार्यकर्त्यांनी भारत सुतगिरणी ते एमआयडीसी कुपवाड जकात नाक्या पर्यंतच्या रस्त्याचे काम निकृष्ठ दर्जाचे करण्यात आले आहे याचे निषेधार्थ सोसायटी चौक ते आर पी पाटील हायस्कुल कुपवाड या दरम्यान रस्त्याच्या कडेला मेणबत्त्या लावून, शंखध्वनी आंदोलन केले. |
| २१९. | महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन शिराळा | श्री मारुती निवृत्ती पाटील- अध्यक्ष शिराळा तालुका | तहसील कार्यालय शिराळा समोर | ०१.१२.२०१५ रोजी १०.०० वा. ते १७.०० वा | ठिया आंदोलन :- महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन शिराळाचे वतीने श्री मारुती निवृत्ती पाटील- अध्यक्ष शिराळा तालुका यांच्या नेतृत्वाखाली ३५ ते ४० ग्रामसेवकांनी खेड जिल्हा रत्नागिरी येथील तहसीलदार यांनी ग्रामसेवकावर फौजदारी कारवाई केलेचे निषधार्थ तहसील कार्यालय शिराळा समोर ठिया आंदोलन केले. |
| २२०. | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना | प्रा. श्री. एन डी पाटील | के.बी. कॉलेज इस्लांमपूर | ४.१२.२०१५ रोजी ०९.३० वा. ते १०.१५ वा. | निषेध सभा :- के.बी. कॉलेज इस्लांमपूर येथे दिनांक ३.१२.२०१५ रोजी केबीपी कॉलेज येथे सुरु असले फिजीक्स पेपरचे वेळी कॉलेजचा विदयार्थी दर्शन पोपट पाटील यास कॉपी करताना पकडे याचा राग मनात धरुन पर्यवेक्षक नितीन शिवाजी शिंदे यांना मारहाण करुन धमकी देण्यात आली व शासकीय कामात अडथळा आणला याबाबत इस्लांमपूर पोलीस ठाणेस भाग ५ गुरनं. २५१/१५ भादविस कलम ३५३५,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे पर्यवेक्षक नितीन शिंदे यांना झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ प्रा. श्री. एन डी पाटील यांचे उपस्थीतीत निषेध सभा पार पडली सदर निषेध सभेस १५० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, २०० विदयार्थी उपास्थितीत होते. तसेच सदर घटनेचा निषेध म्हणून दिनांक ४.१२.२०१५ रोजी केबीपी कॉलेज येथील २५० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी काळया फीती लावून कामकाज केले. |
| २२१. | महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण कर्मचारी संघटना , महाराष्ट्र राज्य | श्री अरुण शामराव गायकवाड | जल भवन सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ४.१२.२०१५ रोजी १०.४५ वा. ते १२.०५ | मोर्चा व निवेदनः- ६० ते ६५ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचा-यांनी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणचे शासनामध्ये विलीनीकरण करावे या व इतर मागण्यासाठी जल भवन सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा मोर्चा काढला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री संजयसिंह चव्हाण- अपर जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |
| २२२. | महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटना | श्री अमोल शिंदे अध्यक्ष | जिल्हा परिषद कार्यालय सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ५.१२.२०१५ रोजी १४.३० वा. ते १६.१५ वा. | मोर्चा व निवेदनः- २५० ते ३०० कार्यकर्त्यांनी १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या सर्व कर्मचा-यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना चालू करावी या व इतर मागण्याकरीता जिल्हा परिषद कार्यालय सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यांनतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले. सदर वेळी श्री अमोल शिंदे- यांनी दिनांक १४.१२.२०१५ रोजी विधान भवन नागपूर येथे मोर्चा काढण्यात येणार आहे सदर मोर्चास मोठया संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन केले आहे. त्यानंतर मागण्याचे निवेदन श्री संजयसिह चव्हाण- अपर जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२३. | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना | प्रा. श्री. एन डी पाटील | केबीपी कॉलेज इस्लामपूर ते तहसील कार्यालय इस्लामपूर | ५.१२.२०१५ रोजी १२.२५ वा. ते १५.०० वा | मोर्चा व निवेदनः- के.बी. कॉलेज इस्लामपूर येथे दिनांक ३.१२.२०१५ रोजी केबीपी कॉलेज येथे सुरू असले फिजीक्स पेपरचे वेळी कॉलेजचा विदयार्थी दर्शन पोपट पाटील यास कॉपी करताना पकडे याचा राग मनात धरून पर्यवेक्षक नितीन शिवाजी शिंदे यांना मारहाण करून धमकी देण्यात आली व शासकीय कामात अडथळा आणला याबाबत इस्लामपूर पोलीस ठाणेस भाग ५ गुरनं. २५१/१५ भादविस कलम ३५३५,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे पर्यवेक्षक नितीन शिंदे यांना मारहाण करणा-यांवर कडक कारवाई करावी या मागणी करीता प्रा. श्री. एन डी पाटील यांचे नेतृत्वाखाली १५० ते २०० पुरुष व १०० ते १२५ महीला अशांनी केबीपी कॉलेज इस्लामपूर ते तहसील कार्यालय इस्लामपूर असा मोर्चा काढला. मोर्चा तहसील कार्यालय इस्लामपूर येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले. त्यानंतर मागण्याचे निवेदन सौ. रुपाली सरनोबत यांना दिले. |
| २२४. | जनरल श्रमीक कामगार युनियन | श्री सुनिल कदम- अध्यक्ष जनरल श्रमीक कामगार युनियन | बन्सी पल्प आणि पेपर मील्स प्रा. लि. कसबे डिग्रज ता. मिरज | ९.११.२०१५ रोजी ०६.०० | कामबंद आंदोलन :- बन्सी पल्प आणि पेपर मील्स प्रा. लि. कसबे डिग्रज ता. मिरज येथील कामगारांनी श्री सुनिल कदम- अध्यक्ष जनरल श्रमीक कामगार युनियन यांचे नेतृत्वाखाली चालू वर्षी २० टक्के बोनस मिळालाच पाहीजे, २४० दिवस भरलेल्या कामगारांना कायम करावे या व इतर मागण्यासाठी दिनांक ९.११.२०१५ रोजी ०६.०० वाजले पासून कामबंद आंदोलन सुरु केले आहे. सदर कामबंद आंदोलनामध्ये २७ कर्मचारी सहभागी झालेले आहेत. कामबंद आंदोलनामध्ये सहभागी झालेले कर्मचारी दररोज १०.०० वा.पर्यंत मीलचे ठिकाणी थांबून राहणार आहेत. |
| २२५. | लाल निशान पक्ष लेनीनवादी | कॉ श्री गोपाळ पाटील | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ८.१२.२०१५ रोजी ११.३० वा | निवेदनः- .लाल निशान पक्ष लेनीनवादी या संघटनेचे वतीने कॉ श्री गोपाळ पाटील यांचे नेतृत्वाखाली १५ ते २० कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे जमून वाढती महागाई व शासनाचे धोरणाचे विरोधात मागण्याचे निवेदन श्री त्रिगुण कुलकर्णी निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |
| २२६. | आटपाडी महसूल कर्मचारी संघटना व तलाठी संघटना | श्री ए.ए.भांबुरे - अव्वल कारकून | आटपाडी पोलीस ठाणे | ११.१२.२०१५ रोजी १२.३० वा. ते १७.०० वा | कामबंद आंदोलन :- आटपाडी महसूल कर्मचारी संघटना व तलाठी संघटना यांचे वतीने श्री ए.ए.भांबुरे - अव्वल कारकून यांचे नेतृत्वाखाली ३५ ते ४० महसूल कर्मचा-यांनी दिनांक १०.१२.२०१५ रोजी अनाधिकृत वाळू उपसा करणा-या तस्करांनी अनाधिकृत वाळू उपसास विरोध करणा-या श्री पो.ए.सोनवणे - मंडल अधिकारी दिघंची व श्री ए.ए.बनसोडे- तलाठी दिघंची यांना जमाव करुन मारहाण केली आहे याचे निषेधार्थ दिनांक ११.१२.२०१५ रोजी १२.३० वा. ते १७.०० वा. या वेळेत कामबंद आंदोलन केले. दरम्यान मुदतीत महसुल कर्मचारी यांना मारहाण करणा-या वाळू तस्कराविरुध्द कारवाई करावी या व इतर मागण्याचे निवेदन पोलीस निरीक्षक आटपाडी पोलीस ठाणे यांना दिले |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२७. | महसुल कर्मचारी संघटना खानापुर | महादेव पाटील – तालुका अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | १४.१२.२०१५ रोजीचे १०.०० ते १७.०० | कामबंद आंदोलन :- अवैध वाळु वहातुक/ उपसा यांचेवर कारवाई करतांना महसुल कर्मचारी यांना वारंवार मारहाणीच्या घटना घडत आहेत पोलीस विभाग वाळु तस्करांना पाठीशी घालत आहे . त्यामुळे महसुल प्रशासन यापुढे अवैध वाळु उपश्यावर /वहातुकीवर कारवाई करणार नाही तसेच अनाधिकृत वाळु वहातुक व उल्लघन रोखणेसाठी रात्रीच्या वेळी गस्ती पथकाबरोबर एक शस्त्रधारी पोलीस व चारचाकी वहान मिळावे व मारहाणीच्या दाखल गुन्हयांतील आरोपीना अटक करुन त्याचेवर मोका कायदया अंतर्गत कारवाई करण्यासाठी काम बंद आंदोलन केले दरम्यान मुदतीत श्रीमती अंजली मरोड तहसिलदार यांचे नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांची भेट घेवुन मागण्याचे निवेदन दिले त्यावेळी मा. जिल्हाधिकारी यांनी तालुका स्तरांवर तहसिलदार , पोलीस विभाग , आर.टी.ओ. यांची एक समिती स्थापन महसुल कर्मचारी यांचेवर हल्ले होणार नाहीत याबाबत उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले कामबंद आंदोलनात खानापुर तालुक्यातील तलाठी, लिपीक,कोतवाल असे १२६ कर्मचारी सहभागी झालेले होते. |
| २२८. | महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना सांगली | श्री बिराज साळुंखे- विभागीय अध्यक्ष | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळसमोर शास्त्री चौक सांगली | १६.१२.२०१५ रोजी ११.०० वा. ते १६.०० वा | उपोषण : - ५० ते ५५ कामगारांनी एस टी कामगारांचे अनेक प्रश्न आगार व्यवस्थापक रा. प. सांगली झाले चर्चेमध्ये सोडविले होते पण त्याची अंमलबजावणी केलेली नाही याचे निषेधार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळसमोर शास्त्री चौक सांगली येथे एक दिवशीय उपोषण केले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२९. | एस.टी.वर्कर्स इंटक कॉंग्रेस | शरद शेळके अध्यक्ष शिराळा डेपो. इंटक संजय गुंडा यादव अध्यक्ष मिरज डेपो. इंटक व अशोक महादेव गंगाणे सचीव एसटी वर्कशॉप डी. पी. बनसोडे अध्यक्ष सांगली डेपो. इंटक श्री सुधीर बाळासो पाटील - इंटक अध्यक्ष कवठे महंकाळ आगार . श्री हुलगाप्पा हणमंत पाथरुट. श्री आसिफ आझाद मुल्ला - अध्यक्ष इंटक तासगांव आगार. श्री संतोष कृष्णा माळी - अध्यक्ष विटा आगार इंटक. उत्तम वासुदेव गुरंव - अध्यक्ष पलूस आगार इंटक . रामदास विश्वास रासकर - इस्लांमपूर आगार इंटक आगार | शिराळा आगार. मिरज आगार ,एस.टी. वर्कशॉप चंदनवाडी. सांगली आगार . कवठे महंकाळ आगार. जत आगार. तासगांव. आगार विटा आगार . पलूस आगार . इस्लांमपूर | दि. १७.१२.२०१५ रोजी ०७.०० ते दि. १८.१२.२०१५ रोजीचे १३.३०वा.पर्यत | कामबंद आंदोलन :- दि. १७.१२.२०१५ ते १८.१२.२०१५ या कालावधीत एस.टी.वर्कर्स इंटक कॉंग्रेसचे वतीने २५ टक्के पगारवाढ व इतर मागण्याकरीता सदर ठिकाणी कामबंद आंदोलन करण्यात आले.दिनांक १८.१२.२०१५ रोजी मंत्रालयात झाले बैठकीमध्ये मागण्याबाबत दिनांक ३१.१.२०१६ पर्यत निर्णय घेण्याचा तोडगा काढणेत आल्याने इंटकच्या कर्मचा-यांनी दिनांक १८.१२.२०१५ रोजी १३.३० वा.पासुन कामबंद आंदोलन मागे घेतलेले आहे. |
| २३०. | यशवंतराव चव्हाण सुरक्षा रक्षक व जनरल कामगार युनियन व संघटीत व असंघटीत कामगार युनियन | श्री भानुदार ख्राशाबा दाईंगडे - सरचिटणीस रा. कापील ता.कराड जि. सातारा | उदयोग भवन समोर सांगली | १८.११.२०१५ रोजीचे ११.०० वाजले पासून | उपोषण :- यशवंतराव चव्हाण सुरक्षा रक्षक व जनरल कामगार युनियन व संघटीत व असंघटीत कामगार युनियन मंडळाचे नोंदणीकृत असलेल्या सातारा जिल्हयातील महापारेषण कंपनीत कार्यरत असणा-या २८ सुरक्षा रक्षकांना चुकीचे निकर्ष लावून कमी केले त्यांना कामावर घ्यावे यासाठी उपोषणास बसले होते.दिनांक १९.१२.२०१५ रोजी सहायक कामगार आयुक्त व अध्यक्ष सांगली जिल्हा सुरक्षा मंडळ सांगली यांची उपोषणाच्या अनुषंगाने बैठक पार पडली त्यामध्ये उपोषणकर्ते यांच्या मागणीबाबत अपर कामगार आयुक्त पुणे यांचे समवेत बैठक आयोजीत करुन निर्णय घेवू., दरम्यान नव्याने सुरक्षा रक्षकांना एमएसईबी या ठिकाणी नियुक्ती देण्यात येवू नये असे ठरल्याने उपोषकर्ते यांचे समाधान झाल्याने उपोषण मागे घेण्यात आले आहे. |
| २३१. | एस.टी .कामगार सेना सांगली | श्री. डी. डी. सुर्यवंशी सचिव एस.टी .कामगार सेना सांगली | एस.टी विभागीय कार्यालय सांगली चे समोर | २८.१२.२०१५ रोजी ११.२५ ते १२.०० | निदर्शने :- श्री. डी. डी. सुर्यवंशी सचिव एस.टी .कामगार सेना सागली विभाग यांचे नेतृत्वाखाली ३०-४० कर्म-चारी यांनी एस.टी विभागीय कार्यालय सांगली चे समोर एस.टी. कर्मचारी यांचे प्रलंबित मागण्या बाबत निदर्शने केली. मागण्याचे निवेदन विभागीय नियंत्रक श्री. टी.एस.कदम.यांना देण्यात आले. निवेदन दिलेनंतर झाले चर्चेत जिल्हयातील सर्व आगार प्रमुखांना मागण्याचे निवेदन देणेबाबत निर्णय घेवुन आंदोलनकर्ते इतर आगारप्रमुखांना निवेदन देण्यासाठी निधुन गेले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३२. | निवारा बांधकाम कामगार संघटना सांगली | श्री शंकर पुजारी अध्यक्ष | डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय | २९.१२.२०१५ रोजी १२.०० ते १२.४५ | मोर्चा व निवेदनः- श्री शंकर पुजारी अध्यक्ष निवारा बांधकाम कामगार संघटना सांगली यांच्या नेतृत्त्वाखाली ३५ ते ४० कामगारांनी ५०००/- रुपये दिवाळी बोनस जाहीर केलेला त्वरीत मिळावा या व इतर मागण्याकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाचे पटांगणात आले नंतर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले प्रमुख वक्त्यांनी मार्गदर्शन केले दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्री त्रिगूण कुलकर्णी निवासी उप जिल्हाधिकारी यांना दिले. |
| २३३. | महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना सांगली | श्री राजेंद्र कांबळे संघटक | डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय | २९.१२.२०१५ रोजी १२.५० ते १२.४५ | मोर्चा व निवेदनः- श्री राजेंद्र कांबळे संघटक महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना सांगली यांचे नेतृत्त्वाखाली ७० ते ८० कर्मचाऱ्यांनी महावितरण कंपनीचे कोणत्याही परिस्थितीत क्षेत्रीय पातळीवर ५ विभागामध्ये विभाजन करण्यात येवूनये या व इतर मागण्याकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाचे पटांगणात आले नंतर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले प्रमुख वक्त्यांनी मार्गदर्शन केले दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्री त्रिगूण कुलकर्णी निवासी उप जिल्हाधिकारी यांना दिले. |
| २३४. | वैयक्तिक आंदोलन | श्री भगवान खंडू वाघमारे शशीकला पोपट वाघमारे सौ. वैशाली राजू माने कु. शितल राजू माने | कवठे महंकाळ पोलीस ठाणेसमोर | १.१२.२०१५ | उपोषण :- श्री भगवान खंडू वाघमारे वय ५०, शशीकला पोपट वाघमारे वय ४५, सौ. वैशाली राजू माने वय ३०, कु. शितल राजू माने वय १० सर्व रा. माळेवाडी, हिंगणगांव रोड ता. कवठे महंकाळ हे कवठे महंकाळ पोलीस ठाणेस भाग ५ गुरनं २२३/१५ भादविस कलम ३२६, ३५४ (अ),५०४,५०६, ३४ प्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपीवर त्वरीत कारवाई करावी या मागणीकरीता कवठे महंकाळ पोलीस ठाणेसमोर दि.१.१२.२०१५ रोजी आमरण उपोषणास बसले होते. श्री वाकुर्डे- उपविभागीय पोलीस अधिकारी जत विभाग जत यांनी उपोषणकर्ते यांचेशी चर्चा करुन दाखल गुन्हयातील आरोपींवर योग्य ती कारवाई करणेत येईल असे सांगितले नंतर १८.३० वा. उपोषणकर्ते यांनी आमरण उपोषण मागे घेतले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३५. | श्री नरेंद्राचार्य महाराज भक्त सेवा मंडळ सांगली | श्री प्रकाश गायकवाड- जिल्हाअध्यक्ष | मा. जयंत पाटील खुले नाटय गृह इस्लांमपूर | ०१.१२.२०१५ रोजी ११.०० वा . ते १७.३० वा. | प्रवचन व दर्शन सोहळा :- जगदगुरु श्री नरेंद्राचार्य महाराज यांचे प्रवचन व दर्शन सोहळयाचा कार्यक्रम पार पडला. त्याअंतर्गत श्री नरेंद्राचार्य महाराज यांचे नानीज येथून मोटारीने पेठ नाका येथे आगमन झालेवर स्थानिक भक्ताकंडून त्यांचे स्वागत करण्यात आले. खुले नाटयगृह इस्लांमपूर येथे आल्या नंतर श्री नरेंद्रचार्य महाराज यांचे आध्यात्म व विज्ञान या विषयावर प्रवचन झाले. त्यानंतर उपस्थीत भक्तांनी महाराजांचे दर्शन घेतले. कार्यक्रमा दरम्यान श्री राजू शेट्टी – खासदार स्वाभिमानी शेतकरी संघटना, श्री जयंतराव पाटील- आमदार राष्ट्रवादी कॉंग्रेस यांनी कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थीत राहून महाराजांचे दर्शन घेतले. सदर कार्यक्रम झाल्यानंतर श्री नरेंद्र महाराज हे मोटारीने नाणीज करीता रवाना झाले. सदर कार्यक्रमास सुमारे ५००० ते ६००० जनसमुदाय उपस्थीत होता. जगदगुरु श्री नरेंद्राचार्य महाराज यांचा इस्लामपूर येथील कार्यक्रम शांततेत पार पडला आहे. |
| २३६. | सांगली जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष | श्री जिल्हा शल्य चिकीत्सक सांगली | पुष्पराज चौक- राम मंदीर- सिव्हील हॉस्पीटल | ५.१२.२०१५ रोजी १०.२० वा | स्केटींग रॅली :- सांगली जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष प.व.पा.शा.रु. सांगली यांचे वतीने श्री जिल्हा शल्य चिकीत्सक सांगली यांचे नेतृत्वाखाली एड्स दिना निमित्त पुष्पराज चौक- राम मंदीर- सिव्हील हॉस्पीटल- अशी जनजागृती स्केटींग रॅली काढण्यात आली. सदर जनजागृती स्केटींग रॅली मध्ये ५० स्केटींग खेळाडू, शिक्षक व पालक सहभागी झाले होते. |
| २३७. | वैयक्तिक आंदोलन | श्री गारेख आनंदा काशिद रा. काशिदवाडी ता. शिराळा | काशिदवाडी ता. शिराळा | ८.१०.२०१५ रोजी ११.०० पासून | धरणे आंदोलन :- श्री गारेख आनंदा काशिद रा. काशिदवाडी ता. शिराळा यांचे मालकीचे सर्व्हे नं. ६४/३ ब या जमिनीमध्ये विंडवर्ल्ड इंडीया प्रायव्हेट लिमीटेड या कंपनीने केलेले अतिक्रमण काढून घ्यावे या मागणीसाठी श्री गारेख आनंदा काशिद रा. काशिदवाडी यांचे नेतृत्वाखाली काशिदवाडी ता. शिराळा येथील १५ ते १६ शेतक-यांनी दिनांक ८.१०.२०१५ रोजी ११.०० पासून सदर जमीनीच्या ठिकाणी धरणे आंदोलन सुरु केले आहे. सदरचे धरणे आंदोलन शांततेत सुरु आहे |
| २३८. | संभाजी ब्रिगेड | प्रा. श्री श्रीमंत कोकाटे | -- | ५.१२.२०१५ रोजी १८.४५ वा. ते २०.३० वा | व्याख्यान :- सांगली ग्रामिण पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ५.१२.२०१५ रोजी १८.४५ वा. ते २०.३० वा. या वेळेत संभाजी ब्रिगेडचे वतीने प्रा. श्री श्रीमंत कोकाटे यांचे शिवचरित्रातून काय घ्यावे या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. प्रा. श्रीमंत कोकाटे यांनी शिवाजी महाराजा यांची शिकवण, महीला विषयी आदर, शेतक-या विषयी निती या बाबत मार्गदर्शन केले. सदर व्याख्यानाचे कार्यक्रमास २५० ते ३०० जनसमुदाय उपस्थीत होता. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३९. | समस्त मुस्लीम समाज जमात (समाज) व पिपल्स रिपब्लीकन पार्टी | श्री जैलाब शेख- पिपल्स रिपब्लीकन पार्टी | मिरज शहर पोलीस ठाणे व प्रांत कार्यालय मिरज | ८.१२.२०१५ ११.४५ वा. ते ११.५५ व १२.१५ वा | निवेदन :- श्री आझमखान उत्तर प्रदेश मंत्री यांनी आरएसएस संघटनेवर टिका केली होती त्यास उत्तर देताना श्री कमलेश तिवारी - कार्यवाह हिंदू महासभा यांनी महंमद पैगंबरा विषयी खालच्या पातळीवर जावून टिका करुन मुस्लीम समाजाच्या भावना दुखावल्या याचे निषेधार्थ समस्त मुस्लीम समाज जमात (समाज) व पिपल्स रिपब्लीकन पार्टी चे श्री जैलाब शेख- पिपल्स रिपब्लीकन पार्टी यांचे नेतृत्वाखाली ८ ते १० कार्यकर्त्यांनी श्री कमलेश तिवारी कार्यवाह हिंदू महासभा यांचे वर कारवाई करावी या व इतर मागण्याचे निवेदन दिनांक ८.१२.२०१५ रोजी ११.४५ वा. ते ११.५५ वा या वेळेत पोलीस निरीक्षक मिरज शहर पोलीस ठाणे यांना दिले त्यानंतर १२.१५ वा. प्रांत कार्यालय मिरज येथे जावून सदर मागण्याचे निवेदन श्री माळवदे – प्रांत अधिकारी मिरज यांना दिले. |
| २४०. | मुस्लीम समाज | तौफीक मिरासाो मुजावर, अस्लम दिलावर मुजावर, शौकत सय्यद मुल्ला, धोंडीराम चॉंद गडकरी, शमशुद्दीन बाबासाो पटेल | नुराणी मशिद चिकुर्डे समोर | ७.१२.२०१५ रोजी १०.०० | उपोषण :- चिकुर्डे ता. वाळवा येथील सिसनं.११०० मध्ये मुस्लीम समाजाचे प्राथनास्थळ व मशिद आहे. सदर मशिदीसमोरच्या खुल्या जागेत श्री बच्चुलाल महंमद गवंडी (मुस्लीम) यांने लाकडी खोके घालून अतिक्रमण केले आहे. श्री गवंडी यांने सदर जागेमध्ये चिकन सेंटर चालू करुन इतरही बेकायदेशीर धंदे चालू ठेवले आहेत त्यामुळे मुस्लीम समाजास प्राथना करण्यास जागा कमी पडत आहे. मुस्लीम समाजास वर्ज्य असलेले धंदे गवंडी व त्यांची मुले करीत आहेत. सदर अतिक्रमण काढणे बाबत वेळोवेळी सांगून ही गवंडी हे त्यास जुमानत नाहीत. सदर अतिक्रमण काढणेबाबत सरपंच श्री कृष्णात पवार यांचे कडे अर्ज दिला होता त्या अर्जावरती कोणतीही कारवाई झाली नाही त्याबाबत गट विकास अधिकारी इस्लांमपूर यांचे कडे ही दिनांक २१.११.२०१५ रोजी विनंती अर्ज दिला होता परंतू त्यांचे कडून संबधीतांना आदेश झालेला नाहीत. याचे निषेधार्थ दिनांक ७.१२.२०१५ रोजी १०.०० वाजले पासून चिकुर्डे येथील मुस्लीम समाजाचे १) तौफीक मिरासाो मुजावर, २) अस्लम दिलावर मुजावर, ३) शौकत सय्यद मुल्ला, ४)धोंडीराम चॉंद गडकरी, ५)शमशुद्दीन बाबासाो पटेल सर्व हे नुराणी मशिद चिकुर्डे समोर आमरण उपोषणाला बसले होते. दिनांक ८.१२.२०१५ रोजी श्री अभिजीत पाटील- माजी जिल्हा परिषद सदस्य यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेवून ग्रामपंचायती मार्फत सदर अतिक्रमण काढून घेण्याचे तोंडी आश्वासन दिले नंतर २१.३० वाजता उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| २४१. | नौजवानाने - उमाते रसुल- ग्रुप मिरज | मौलाना अहमद पाशा | मिरासाो दर्गा पटांगण मिरज | १३.१२.२०१५ रोजी १८.०० वा. ते २२.०० | धार्मिक प्रवचन :- १३.१२.२०१५ रोजी १८.०० वा. ते २२.०० वा. या वेळेत मिरासाो दर्गा पटांगण मिरज येथे नौजवानाने - उमाते रसुल- ग्रुप मिरजचे वतीने पैगंबर जयंती निमित्त मौलाना अहमद पाशा यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमास ३०० ते ४०० जनसमुदाय उपस्थीत होता. कार्यक्रम शांततेत पार पडला आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २४२. | जमिअते उलमा सांगली | श्री हाफीज उमर मुजावर रा. सांगली | संगतराज मशिद,हिंदू मुस्लीम चौक सांगली | ८.१२.२०१५ रोजी १५.०० वा. ते १७.०० वा | धार्मिक प्रवचन :- जमिअते उलमा सांगली शहर यांचे वतीने आयोजक श्री हाफीज उमर मुजावर रा. सांगली यांचे मार्गदर्शनाखाली संगतराज मशिद,हिंदू मुस्लीम चौक सांगली या ठिकाणी हजरत अकसद मौलाना पीएम मुज्म्मिल रा. बेंगलोर यांचे बयाणाचा कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमास सांगली शहरातील इमाम लोक हजर होते. त्यांना मुस्लीम समाजाची शिकवण कशी आहे व सध्या देशात मुस्लीम समाजाबाबत विनाकारण अफवा फसरवून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तरी अशी कोणतेही समाजाबाबत तेढ निर्माण होणार नाही या बाबत खबरदारी घ्यावी. तसेच समाजातील लोकांना पाच वेळा नमाज पठणे करणेबाबत प्रबोधन करावे वगैरे विषयावर बयाण देण्यात आली आहे. सदर वेळी ७० ते ७५ लोक उपस्थीत होते. |
| २४३. | मुस्लीम समाज | हजरत अक्सद मौलाना पीएम मुज्म्मिल रा. बेंगलोर | सर्वधर्म चौक, गणेश नगर सांगली | ८.१२.२०१५ रोजी २०.५५ वा. ते २१.५५ वा | धार्मिक प्रवचन :- मुस्लीम समाजातील स्त्री पुरुष यांचे करीता हजरत अक्सद मौलाना पीएम मुज्म्मिल रा. बेंगलोर यांचे धार्मिक प्रवचनाचा कार्यक्रम पार पडला. सदर वेळी हजरत अक्सद मौलाना पीएम मुज्म्मिल यांनी मुस्लीम समाज हा अतिशय शुध्द प्रामाणिक असून त्याचा गैर फायदा इतर समाज घेत आहेत. अफवावर विश्वास ठेवू नका व समाजातील लोकांनी एकत्र एकजुटीने रहाण्याची गरज आहे. देशात मुस्लीम समाजावर अन्याय केला जात आहे. पुरुषांनी व्यसने सोडावीत. तसेच कुराणाबाबत महीती सांगितली व दररोज देवाला स्मरुन पाच वेळा जमाज पठण करण्याचे आवाहन केले आहे. सदर कार्यक्रमास १५० ते २०० स्त्री पुरुष उपस्थीत होते. |
| २४४. | जमिअत उलमा सांगली | हाफीज उमर मुजावर | वडर मारुती मंदीर जवळ खणभाग सांगली | ९.१२.२०१५ रोजी १९.३० वा. ते २१.०० वा | धार्मिक प्रवचन :- वडर मारुती मंदीर जवळ खणभाग सांगली येथे जमिअत उलमा सांगली यांचे वतीने हाफीज उमर मुजावर यांचे अध्यक्षतेखाली हजरत अक्सद मौलाना पीएम मुज्म्मिल रा. बेंगलोर यांचे धार्मिक प्रवचनाचा कार्यक्रम पार पडला. हजरत अक्सद मौलाना पीएम मुज्म्मिल यांनी आपले प्रवचनामध्ये मुस्लीम समाजातील तरुणांनी व पुरुषांनी दारु पिणे हे अतिशय पाप आहे तरी यापुढे कोणी दारु पिवून संसाराची बरबादी करु नये. तसेच देशातील केंद्र शासनाने व राज्य शासनाने दारुवर पुर्णपणे निर्बंध घालावेत. नमाज कसे पठण करावे, कुराण पठण याबाबत माहीती सांगितली. सदर कार्यक्रमास १२५ ते १५० लोक हजर होते. |
| २४५. | गुंठेवारी चळवळ संघर्ष समिती | श्री चंदन चव्हाण- अध्यक्ष | आयोध्यानगर चौक सांगली | ८.१२.२०१५ १९.०० वा.ते १९.५० | कॉर्नर सभा :- गुंठेवारी बाबत जनतेमध्ये जनजागृती करणेकरीता कॉर्नर सभा पार पडली. सदर कॉर्नर सभेस १. तानाजीराव सावंत, २. अमर पडळकर, ३. संदीप टेंगले, ४. अशरफ वांकर, ५. उत्तम मोहीते, ६. शंकर पुजारी या प्रमुखांनी मार्गदर्शन केले. सदर सभेस ३० ते ४० जनसमुदाय उपस्थित होता. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २४६. | गुंठेवारी चळवळ संघर्ष समिती | श्री चंदन चव्हाण- अध्यक्ष | आझाद चौक सांगली ते सां.मि.कु.महापालीका कार्यालय | १५.१२.२०१५ रोजी १२.१५ वा.ते १३.२५ वा | मोर्चा व निवेदनः- गुंठेवारी चळवळ संघर्ष समितीच्यावतीने श्री चंदन चव्हाण- अध्यक्ष यांचे नेतृत्वाखाली गुठेवारी आरक्षण क्षेत्रातील आरक्षणे उठवुन त्यांची रहाती घरे नियमित करुन त्यांच्या ७/१२ उता-यावर नोंदी कराव्यात या व इतर मागण्याकरीता आझाद चौक सांगली ते सां.मि.कु.महापालीका कार्यालय असा मोर्चा काढुन मोर्चा महापालीका कार्यालयासमोर आलेनंतर त्यांचे सभेत रुंपातर झाले .सभेत चंदन चव्हाण,अमर पडळकर, तानाजी चव्हाण, पृथ्वीराज पवार , जगन्नाथ ठोकळे, आश्रफ वाकर यांची भाषणे झाली. दरम्यान मुदतीत शिष्टमंडळाने मनपा कार्यालयांत जावुन श्री. सुनिल नाईक उपायुक्त- मनपा यांना त्यांच्या मागण्याचे निवेदन देवुन त्यांचेशी चर्चा केली. सदर मोर्चाचे वेळी २२५ ते २५० पुरुष व महीला कार्यकर्ते उपस्थित होते |
| २४७. | अखिल भारतीय भटके गोसावी समाज महासंघ | श्री राजकुमार घाडगे | स्टेशन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय | १६.१२.२०१५ रोजी ११.४५ वा. ते १३.०० वा. | मोर्चा व निवेदनः- अखिल भारतीय भटके गोसावी समाज महासंघाचे वतीने श्री राजकुमार घाडगे यांचे नेतृत्वाखाली २०० ते २२५ पुरुष कार्यकर्त्यांनी गोसावी समाजाची अनुसुचित जातीत समावेश करावा या मागणी करीता स्टेशन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढला. सदर मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्री शेखर गायकवाड- जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |
| २४८. | महाराष्ट्र सेल्स ॲन्ड मेडीकल रिप्रेझेंन्टीव्ह असोशिएशन सांगली | श्री गोविंद जोशी - सेक्रेटरी | राम मंदीर सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | १६.१२.२०१५ रोजी ११.४५ वा. ते १३.४५ वा. | मोर्चा व निवेदनः- महाराष्ट्र सेल्स ॲन्ड मेडीकल रिप्रेझेंन्टीव्ह असोशिएशन सांगली युनिटचे वतीने श्री गोविंद जोशी - सेक्रेटरी यांचे नेतृत्वाखाली १२५ ते १५० कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारच्या धोरणात बदल करावा, औषधांच्या किंमती कमी कराव्यात या व इतर मागण्यासाठी राम मंदीर सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा मोर्चा काढला. सदर मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्री शेखर गायकवाड- जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २४९. | वैयक्तिक आंदोलन | श्री राजेंद्र भिमराव माने रा. शिराळा | तहसील कार्यालय शिराळा समोर | १६.१२..२०१५ रोजी १५.०० | उपोषण :- श्री राजेंद्र भिमराव माने रा. शिराळा हे शिराळा नागपंचमी पारंपारीक पध्दतीने साजरी करण्यास परवानगी मिळावी या मागणी करीता तसेच शिराळा नागपंचमी पारंपारीक पध्दतीने सुरु करण्याबाबत अधिवेशनामध्ये विधेयक मांडण्याचे ना. श्री प्रकाश जावडेकर – केंद्रीय पर्यावरण मंत्री यांनी आश्वासन दिले होते परंतू त्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही झालेली नाही याचे निषेधार्थ तहसील कार्यालय शिराळा समोर आमरण उपोषणास बसले होते. दिनांक १५.१२.२०१५ रोजी उपोषणकर्ते यांची प्रकृती खालावल्याने त्यांना सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे औषधोपचाराकरीता दाखल करणेबाबत वैदयकीय अधिकारी ग्रामिण रुग्णालय शिराळा यांनी पत्र दिले असता सदर उपोषणकर्ते यांना दिनांक १५.१२.२०१५ रोजी सांगली सिव्हिल हॉस्पीटल येथे उपचाराकरीता दाखल करण्यात आले होते. सदर ठिकाणी त्यांनी वैदयकीय उपाचार करुन ते पुन्हा दिनांक १६.१२..२०१५ रोजी १५.०० वाजले पासून तहसील कार्यालय शिराळा समोर आमरण उपोषणास बसले आहेत. पोलीस निरीक्षक शिराळा पोलीस ठाणे यांनी सदर उपोषणकर्ते यांना उपोषणापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला असता ते आपले निर्णयाशी ठाम आहेत. प्रमुख मागणी मान्य झाल्याशिवाय किंवा मा.ना.श्री प्रकाश जावडेकर केंद्रीय पर्यावरण मंत्री यांनी उपोषण ठिकाणी भेट देवून मागण्याबाबत चर्चा करुन लेखी आश्वासन दिल्या शिवाय उपोषण सोडणार नाही असे उपोषणकर्ते हे सांगत आहेत. सदर आमरण उपोषण शांततेत सुरु आहे. |
| २५०. | पारधी मुक्ती आंदोलन महाराष्ट्र राज्य, | श्री प्रकाश वायदंडे- अध्यक्ष | हिवाळी अधिवेशन नागपूर | १९.१२.२०१५ | धरणे आंदोलन : - हिवाळी अधिवेशन नागपूर येथे दिनांक १९.१२.२०१५ रोजी श्री प्रकाश वायदंडे- अध्यक्ष पारधी मुक्ती आंदोलन महाराष्ट्र राज्य, यांचे नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाने पारधी समाज अभ्यास आयोगाची स्थापना करावी, पारधी समाजाचे सर्वेक्षण करण्यात यावे, पारधी समाजाचे पुर्नवसनाचा जिल्हा निहाय कृती आरखाडा तयार करुन जिल्हाधिकारी यांचे मार्फत पारधी पुनर्वसनाचा विशेष कार्यक्रम राबविण्यात यावा या व इतर मागण्या करीता करण्यात येणारे धरणे आंदोलना मध्ये भाग घेण्यासाठी सांगली जिल्हयातून श्री सनातन गणपती भोसले - (मो.नं. ९७३००२८६४७) यांचे नेतृत्वाखाली ५० ते ६० कार्यकर्ते दिनांक १७.१२.२०१५ रोजी महाराष्ट्र एक्सप्रेसने नागपूर करीता रवाना झालेले आहेत. सदर कार्यकर्ते दिनांक १८.१२.२०१५ रोजी नागपूर येथे पोहचणार आहेत व पटवर्धन पटांगण, नागपूर येथे मुक्काम करणार आहेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५१. | वैयक्तिक आंदोलन | श्री शंकर तुकाराम मोहीते रा. विटा | प्रसाद चित्रपटगृह व भैरवनाथ चित्रपटगृह विटा | १९.१२.२०१५ रोजी ११.१५ वा. ते ११.४५ वा | आंदोलन : - श्री शंकर तुकाराम मोहीते रा. विटा यांचे नेतृत्वाखाली ५० ते ६० तरुणांनी विटा येथील प्रसाद चित्रपटगृह व भैरवनाथ चित्रपट या ठिकाणी जावून शाहरुख्र खान याच्या दिलवाले चित्रपटामध्ये अक्षेपार्ह दृश्ये असल्याने सदर चित्रपट प्रदर्शित करण्यात येवू नये वगैरे मागण्याचे निवेदन चित्रपट गृहांचे मालकांना देवून चर्चा केली सदर वेळी चित्रपटगृहाचे मालकांनी आंदोलनकर्ते यांची मागणीमान्य करुन दुपारी १२.०० वाजताचा शो बंद ठेवला.दरम्यान आंदोलनकर्त्यांनी दिलवाले चित्रपटाचे पोस्टर दहन करण्याचा प्रयत्न केला असता विटा पोलीस ठाणे कडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सदर पोस्टर काढून घेवून ५ प्रमुख कार्यकर्त्यांना मुपोकाक ६८ प्रमाणे ११.३० वाजता ताब्यात घेतले व समज देवून मुपोकाक ६९ प्रमाणे १४.५८ वा. मुक्त केले आहे. |
| २५२. | वैयक्तिक आंदोलन | १. श्री लालासाहेब नारायण गोंदील, २. श्री मोहन श्रीपती जाधव, ३. श्री राजेंद्र ईश्वरा मोरे, ४. श्री कुमार तुकाराम गायकवाड, ५. श्री विनायक नारायण गोंदील, ६. श्री प्रशांत तानाजी जाधव सर्व रा. पलूस | तहसील कार्यालय पलूस समोर | १७.१२.२०१५ | उपोषण :- १. श्री लालासाहेब नारायण गोंदील, २. श्री मोहन श्रीपती जाधव, ३. श्री राजेंद्र ईश्वरा मोरे, ४. श्री कुमार तुकाराम गायकवाड, ५. श्री विनायक नारायण गोंदील, ६. श्री प्रशांत तानाजी जाधव सर्व रा. पलूस हे इमारत दळणवळण विभाग जि.प.सांगली, इमारत दळण वळण विभाग पंचायत समिती पलूस, ग्रामपंचायत कार्यालय पलूसचे अधिकारी,कर्मचारी, पदाधिकारी, सदस्य, यांनी अधिकाराचा गैरवापर करुन बेकायदेशीर काम करुन शासकीय निधीचा गैरवापर केले बाबत संबधीतांची चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करावी या व इतर मागण्यासाठी दिनांक १७.१२.२०१५ रोजी पासून तहसील कार्यालय पलूस समोर आमरण उपोषणास बसले होते.दिनांक १९.१२.२०१५ रोजी श्री राजेंद्र ईश्वरा मोरे व कुमार तुकाराम गायकवाड यांची तब्येत बिघडलेने त्यांनी उपोषण मागे घेतले आहे. उर्वरीत १. श्री लालासाहेब नारायण गोंदील, २. श्री मोहन श्रीपती जाधव, ३. श्री विनायक नारायण गोंदील, ४. श्री प्रशांत तानाजी जाधव यांचे उपोषण शांततेत सुरु आहे. |
| २५३. | श्री. विजय भिडे संघटक सांगली | श्री. विजय भिडे संघटक सांगली | राजवाडा, रिसाला रोड फौजदार गल्ली झुलेलाल चौक , आंबेडकर चौक मारुती रोड, टिळक चौक गणपती मंदीर, पटेल चौक, ते राजवाडा सांगली | २७.१२.२०१५ रोजी १९.१५ ते २०.३० | पथसंचलन : - श्री. विजय भिडे संघटक सांगली शहर यांचे नेतृत्वाखाली राजवाडा, रिसाला रोड फौजदार गल्ली झुलेलाल चौक , आंबेडकर चौक मारुती रोड, टिळक चौक गणपती मंदीर, पटेल चौक, ते राजवाडा सांगली असे सांगली नगराचे घोषाचे सराव पथसंचलन पार पडले. सदर पथसंचलनामध्ये ८४ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते सहभागी झालेले होते. |
| २५४. | जातीय अंत संघर्ष समिती | उमेश देशमुख | स्टेशन चौक, सांगली | २५.१२.२०१५ रोजी १२.०० वा. ते १२.१० | मनुस्मृती दहन दिन : - जातीय अंत संघर्ष समितीच्या वतीने श्री उमेश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ४ ते ५ कार्यकर्त्यांनी मनुस्मृती दहन दिन शासकीय पातळीवर पाळण्यात यावा या व इतर मागण्याकरीता मनुस्मृती असे लिहलेल्या कागदांचे दहन केले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५५. | वैयक्तिक आंदोलन | श्री विजय रामचंद्र अरबुने रा. दुधोंडी | तहसिल कार्यालय पलुस समोर | २८.१२.२०१५ रोजी १३.०० | उपोषण :- पलुस तालुक्यातील मटका , दारू व अन्य अवैध धंदयावर कारवाई व्हावी या मागणीकरीता आमरण उपोषणस बसले आहेत. |
| २५६. | जिल्हा सुधार समिती, व प्रहार अपंग क्रांती आंदोलन सांगली | ॲड. अमित शिंदे, रविंद्र चव्हाण, रामदास कोळी | स्टेशन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय | २९.१२.२०१५ रोजी ११.२० वा ते १२.२५ | मोर्चा व निवेदन:- जिल्हा सुधार समिती, व प्रहार अपंग क्रांती आंदोलन सांगलीचे वतीने ॲड. अमित शिंदे, रविंद्र चव्हाण, रामदास कोळी यांचे उपस्थितीत ३० ते ३५ अपंग स्त्री-पुरुष अशांनी अपंग व्यक्तीला मूळ शिधापत्रीका मधून विभक्त करून नवीन शिधापत्रीका देवून अन्न सुरक्षा योजनेमध्ये समावेश करावे या मागणीकरीता स्टेशन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाचे पटांगणात आलेनंतर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले प्रमुख वक्त्यांनी मार्गदर्शन केले दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन नायब तहसिलदार श्री वाडके यांना दिले. |

सर्व कामगार संघटना आंदोलने :-

| अ.क्र. | पक्ष/ संघटना | नेतृत्व | ठिकाण | दिनांक व वेळ | घटनेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य शिक्षण क्षेत्र संघटना समन्वय समिती | श्री जयसिंग पाटील – सचिव | कर्मवीर भाऊराव पाटील चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा | १३.१.२०१५ रोजी १२.१०. वा. ते १४.१० वा. | मोर्चा -दिनांक २०.११.२०१३ रोजीचा तुकडयांचा सुधारीत आदेश रद्द करुन चिपळूनक समिती प्रमाणे शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे मंजूर करण्यात यावीत या व इतर मागण्याकरीता मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले. त्यानंतर मागण्याचे निवेदन शिष्ठमंडळाव्दारे श्री दिपेंद्रसिंह कुशवाह- जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले. जनसमुदाय- ३००० ते ३५०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी |
| २ | महाराष्ट्र राज्य, भुमि अभिलेख, कर्मचारी संघटन | श्री असलम मुजावर- सरचिटणीस सांगली | सांगली | दिनांक १६.१.२०१५ रोजी पासून | कामबंद आंदोलन -श्री चंद्रकांत दळवी (भाप्रसे), जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यपध्दतीमुळे महाराष्ट्रातील भूमि अभिलेख खात्यातील कर्मचा-यांची पिळवणूक होत आहे तरी श्री चंद्रकांत दळवी (भाप्रसे), जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख पदावरुन दूर करावे या मागणी करीता बेमुदत कामबंद आंदोलन सुरु केले आहे. सदर कामबंद आंदोलनामध्ये सुमारे १५० भुमी अभिलेख कर्मचारी सहभागी झाले आहेत. |
| ३ | महाराष्ट्र राज्य,अंगणवाडी कर्मचारी संघ शाखा जिल्हा सांगली | सौ. मंगला सराफ – कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य व सौ. स्नेहलता कोरे- जिल्हाध्यक्ष, रा. इस्लांमपूर | जिल्हा परिषद कार्यालय सांगली जवळील इर्मॅम्युअल इंग्लीश स्कुलचे ग्राऊंडवर | दिनांक २०.१.२०१५ रोजी ११.०० वा. ते १५.०० वा. या वेळेत | धरणे आंदोलन -अंगणवाडी कर्मचारी यांना १.४.२०१४ पासून वाढीव मानधन मिळावे, सन २०१४ ची भाऊबीज भेट मिळावी या व इतर १० मागण्यासाठी धरणे आंदोलन केले.<br>दरम्यान मुदतीत श्री जाधव - उप कार्यकारी अधिकारी महीला व बाल कल्याण जि.प.सांगली यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>सदर वेळी सौ मंगला सराफ यांनी दिनांक ८.२.२०१५ रोजी गेवराई ते बीड अशी पदयात्रा काढून मा. पंकजा मुंडे-पालवे - महीला व बाल कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना तसेच १९.२.२०१५ रोजी पारनेर ते अहमदनगर अशी पदयात्रा काढून मा.ना.श्री राम शिंदे- गृहराज्य मंत्री यांना मागण्याचे निवेदन देणार असल्याचे जाहीर केले आहे. जनसमुदाय - ३०० ते ४०० अंगणवाडी महीला कर्मचारी |
| ४ | महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना, | अशोक रामय्या नाईक, अध्यक्ष | टिळक चौक, सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली | २८.१.२०१५ रोजी १३.०० ते १४.३० | **मोर्चा** --१०० ते १२५ कार्यकर्त्यानी गौन खनिजाचे उत्खननावर शासनाची असलेली बंदी ताबडतोब उठवावी या व इतर मागण्यासाठी मोर्चा काढण्यात आला मागण्याचे निवेदन मा श्री दिपेंद्रसिंह कुशवाह-जिल्हाधिकारी सांगली यांना दिले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | आटपाडी एस टी कर्मचारी संघटना | श्री प्रविण दिक्षीत-अध्यक्ष | एस टी डेपो आटपाडी समोर | दि.२९.१.२०१५ रोजी १२.०० वा ते १२.१५ वा | धरणे आंदोलन -- आटपाडी आगार प्रमुख यांचे मनमानी कारभाराचे विरोधात तसेच कर्मचारी यांना सुट्टया दयाव्यात,गाडया वेळेवर सोडाव्यात या मागणी करीता २० ते २५ कर्मचाऱ्यांनी 'धरणे आंदोलन करुन घोषणा देवुन मागण्याची पुर्तता न झालेस परत आंदोलन करण्याचे ठरले आहे. |
| ६ | हिंदू समाज | श्री भक्तराज ठिगळे यांचे नेतृत्वाखाली | शिवाजी चौक विटा | दिनांक १.१.२०१५ रोजी | **निवेदन** :- विटा शहरातील प्रसाद व भैरवनाथ या दोन चित्रपटा गृहामध्ये पीके चित्रपट प्रदर्शित होत होता. ` वतीने चित्रपट गृह मालकांना पीके चित्रपटामध्ये हिंदू धर्माच्या भावना दुखवणारी दृश्ये व संवाद दाखविण्यात आले असल्याने सदर चित्रपट बंद करावा या मागणी करीता<br>चित्रपट गृह मालक व आंदोलन कर्ते यांचे मध्ये चर्चा होवून चित्रपट गृह मालकांनी चित्रपट दाखविण्योचे बंद करण्याचे ठरले त्यामुळे आंदोलन कर्ते यांनी त्यांचे आंदोलन स्थगित केले आहे. |
| ७ | महाराष्ट्र राज्य, भुमि अभिलेख, कर्मचारी संघटनेच्या वतीने | श्री असलम मुजावर-सरचिटणीस सांगली | मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय विजयनगर सांगली | १६.१.२०१५ ते | **कामबंद** :- श्री चंद्रकांत दळवी (भाप्रसे), जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यपध्दतीमुळे महाराष्ट्रातील भूमि अभिलेख खात्यातील कर्मचा-यांची पिळवणूक होत आहे तरी श्री चंद्रकांत दळवी (भाप्रसे), जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख पदावरुन दूर करावे या मागणी करीता बेमुदत कामबंद आंदोलन केले. जनसमुदाय- १५० |
| ८ | सांगली जिल्हा तोलाईदार सभा | श्री विकास मगदुम सेक्रेटरी | कृषी उत्पन्न बाजार समिती सांगली | १६.२.२०१५ ते १८.०२.२०१५ | **धरणे आंदोलन** :- तोलाई मजुरी वाढ मिळावी या मागणीसाठी धरणे आंदोलन करणेत आले जन समुदाय- ५० ते ७५ तालाईदार |
| ९ | निवारा बांधकाम संघटना | श्री शंकर पुजारी-अध्यक्ष | डॉ आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी | २०.२.२०१५ रोजी १२.१५ ते १३.१५ | **मोर्चा**:- वयोवृध्द कलाकारांना पेन्शन मिळावी या व इतर मागण्यासाठी मोर्चा काढणेत आला<br>जन समुदाय ७० ते ७५ |
| १० | सांगली जिल्हा हमाल पंचायतीचे | श्री विकास मगदुम- सेक्रेटरी | कृषी उत्पन्न बाजार समिती सांगली | २१.२.२०१५ ते २६.०२.२०१५ | **कामबंद**:- हळद वाहतुक करणारे हमालांना व बैलगाडी मालकांना मजुरी वाढ मिळावी या व इतर मागण्यासाठी हमालांनी कामबंद आंदोलन सुरु केले होते. जनसमुदाय -१०० ते १२५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | हमाल पंचायत | श्री विकास मगदुम- सेक्रेटरी | मार्केट यार्ड, सांगली. | दि.२१.२.२०१५ पासुन ते दि.२६.०२.१५ रोजी १७.००-२१.०० वा<br><br>२७.२.२०१५<br>४.३.२०१५ रोजी १३.३० | **कामबंद** - हळद वाहतुक करणारे हमालांना व बैलगाडी मालकांना मजुरी वाढ मिळावी या व इतर मागण्यासाठी कामबंद आंदोलन सुरु केले होते.<br>**बैठक-** कृषी उत्पन्न बाजार समिती सांगली यांचे कार्यालयात हमाल पंचायतीचे श्री विकास मगदुम सेक्रेटरी, श्री बाळासाहेब बंडगर- माजी संचालक,कृषी उत्पन्न बाजार समिती सांगली. श्री.माळी- प्रशासक कृषी उत्पन्न बाजार समिती सांगली, श्री मनोहर सारडा- अध्यक्ष चेंबर ऑफ कॉमर्स, यांचेत हमालांचे मागण्याचे अनुषंगाने बैठक पार पडली. बैठकीमध्ये हमाल दरवाढी बाबत समाधान कारक चर्चा झालेने हळद हमालांनी कामबंद आंदोलन स्थगित केले होते. जनसमुदाय १०० ते १२५<br>**कामबंद** - परंतू हमाली व लेव्हीची रक्कम व्यापा-यांनी व वाहतुकदारांनी माथाडी बोर्डात भरावी या बाबत व्यापा-यांनी नकारात्मक धोरण स्वीकारले होते त्यामुळे हमालांनी दिनांक २७.२.२०१५ रोजी पासून आंदोलन पुढे चालू ठेवले होते.<br>दिनांक ४.३.२०१५ रोजी १२.१५ वा ते १३.३० वा या वेळेत श्री मदन पाटील- माजी मंत्री यांचे निवासस्थानी व्यापारी व हमाल पंचायतीचे पदाधिकारी यांची बैठक पार पडली. बैठकीत हमाली व लेव्ही व्यापारी देणार व माथाडी बोर्डात वाहतूकदार भरणार असा निर्णय झाल्याने हमालांनी कामबंद आंदोलन मागे घेतले आहे. |
| १२ | प्राथमिक शिक्षक समिती | श्री. विश्वनाथ मिरजकर- राज्य | त्रिकोणी बाग सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय | ०७.०३.२०१५ रोजी १३.०५ वा.ते १६.०५ वा | **मोर्चा** - प्राथमिक शिक्षकांनी प्राथमिक शिक्षकांच्या विविध प्रलंबीत मागण्यांसाठी मोर्चा काढणेत आला मागण्याचे निवेदन श्री.संजय शिंदे- निवासी उपजिल्हाधिकारी सांगली यांना दिले आहे. जनसमुदाय - ३००ते३५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | सांगली जिल्हा हमाल पंचायत. | श्री बापूसाहेब भुजाप्पा मगदूम - सेक्रेटरी | मार्केट यार्ड सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय | १६.३.२०१५ रोजी ११.३० वा. ते १४.४५ वा. या वेळेत | **मोर्चा - कामबंद आंदोलन- निवेदन - निदर्शने-** उदयोग व्यवसायातून माथाडी कामगार कायदा रद्द करु नये या व इतर मागण्यासाठी ४०० ते ५०० महीला व पुरुष अशांनी मोर्चा काढला.<br>मोर्चा सांगली मार्केट यार्ड येथून निघून मार्केट यार्ड परिसरातील माथाडी बोर्ड कार्यालय येथे गेला सदर ठिकाणी निदर्शने करुन मागण्याचे निवेदन श्री गुरव यांना दिले.<br>त्यानंतर सदर मोर्चा मार्केट कमिटी कार्यालय येथे आला व तेथे श्री एस डी पाटील- उप सचिव मार्केट कमिटी यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे येवून मोर्चाचे सभेत रुपांतर झाले.सभेत श्री विकास मगदूम- नगरसेवक, श्री पृथ्वीराज पवार- शिवसेना, अॅड. के डी शिंदे, श्री अमित शिंदे, सौ विदया स्वामी यांची भाषणे झाली<br>त्यानंतर मोर्चातील प्रमुख पदाधिकारी यांनी शिष्ठमंडळाने जावून निवासी उप जिल्हाधिकारी श्री संजय शिंदे यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>दरम्यान मुदतीत हमाल पंचायतीचे वतीने सांगली मार्केट व गणपती पेठ येथील हमालांनी कामबंद आंदोलन केले. |
| १४ | महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना सांगली | श्री बिराज साळुंखे - अध्यक्ष | विभागीय कार्यालय सांगली समोर | दिनांक २३.३.२०१५ रोजी ११.०० वा. ते १६.३० वा. | **धरणे आंदोलन** :- एस टी कामगार करार १९८८ नुसार लिपीक पदावर कर्मचारी यांना वेतन निश्चित करुन तफावत दूर करावी या व इतर मागण्यासाठी धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्री कदम – विभाग नियंत्रक सांगली यांना दिले. जनसमुदाय-५० ते ५५ |
| १५ | निवासा बांधकाम संघटना (आयटेक) | कॉ. श्री शंकर पुजारी - अध्यक्ष | मराठा सेवा संघ सभागृह सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा | दिनांक २३.३.२०१५ रोजी १३.४५ वा. ते १४.४५ वा. | **मोर्चा :-** बांधकाम कामगारांच्या इमारत वइतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने घोषीत केलेले सर्व लाभ व बांधकाम कामगारांना अंत्योदय रेशनकार्ड मिळण्याबाबत व सांगली जिल्हयातील दहा हजार बांधकाम कामगारांना कामगारांचे दोन कोटी पंचवीस लाख इतक्या रक्कमेचे लाभ कामगारांना न देणा-या सांगली सहायक कामगार आयुक्त व सरकारी कामगार अधिकारी यांच्यावर कारवाई करावी या व इतर मागण्या करीता मोर्चा काढला.मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली या ठिकाणी आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री शेखर गायकवड- जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले. १०० ते १२५ बांधकाम कामगार |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | महानगर पालिका कामगार सभा व म्युनसिपल मजदूर संघ सांगली | श्री दिलीप शिंदे - व श्री चिंतामणी कांबळे | महानगर पालिका कार्यालयासमोर | दिनांक २५.३.२०१५ रोजी ११.१० वा. ते १२.१० वा. | **निदर्शन :-** महानगरपालिका कर्मचा-यांचे पगार वेळेवर होत नाहीत, तरी व्यापा-याकडून एलबीटी वसुल करावी या मागणी करुन प्रत्येक महीन्याच्या १० तारखे पर्यंत कर्मचा-यांचे पगार अदा करावेत या मागणीसाठी निदर्शने केली. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री विवेक कांबळे - महापौर व श्री कारचे - आयुक्त मनपा यांना देण्यात आले. ६० ते ७० महानगरपालिका कर्मचारी |
| १७ | शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) | प्रा. डॉ. आर एच पाटील – कार्यवाह सुटा (मो. नं९८२३९८५७५० ) | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | दिनांक २७.३.२०१५ रोजी १६.०० वा. ते १६.३० वा. | **निदर्शेने :-** मिरज महाविदयालयातील शिक्षकांचे अनेक प्रश्न प्रलंबीत आहेत त्यांची पुर्तता व्हावी, शिक्षकांच्यावर होणा-या अन्यायी घटना लक्षात घेवून उपाय योजना होवून शिक्षकांना त्यांचे न्याय हक्क मिळावेत. शिक्षकांना केलेल्या कामाचे वेतन मिळावे, वेतनवाढ मिळावी, त्यांचा छळवाद थांबवावा या व इतर मागण्यासाठी निदर्शने केली. दरम्यान मुदतीत श्री शिंदे – निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले. ३० ते ३५ शिक्षकांनी |
| १८ | सां. मि. कु. पालिका कर्मचारी संघटनेच्या | श्री नितीन शिंदे- जनरल सेक्रेटरी | महानगर पालिका कार्यालय सांगली | २८.४.२०१५ रोजी ११.०० वा ते ११.३० | **निदर्शने** - एलबीटी व जकात रद्द करण्याच्या प्रयत्नात विदयमान सरकार असल्याचे निषेधार्थ महानगर पालिका कार्यालय सांगली समोर निदर्शने करण्यात आली. त्यानंतर शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन मा.आयुक्त,सामिक, मनपा यांना देण्यात आले. जनसमुदाय-७०-८० |
| १९ | एस टी कामगार संघटना सांगली | श्री बिराज साळुंखे – विभागीय अध्यक्ष | -- | ३०.४.२०१५ रोजी ०७.३० वा. वा ते ११.४५ | **संप-** जिल्हातील एस टी महामंडळाचे सर्व कर्मचारी केंद्र सरकारचा रस्ते व सुरक्षा कायदा सन २०१४ रद्द करावा या व इतर मागणी करीता संपा मध्ये सहभागी झाले होते.<br>मुंबई येथे मा.ना.श्री दिवाकर रावते- परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई व वहातुक संघटनांचे नेते/पदाधिकारी यांचे मध्ये मागण्याच्या अनुषंगाने चर्चा झाली त्यामध्ये वाहतुक संघटनांच्या नेत्यांचे व पदाधिकारी यांचे समाधान झाल्याने संप मागे घेतलेबाबत कळविण्यात आले नंतर सांगली जिल्हयातील सर्व एस टी बसेस ११.४५ वाजता सुरु झालेल्या आहेत. |
| २० | निवारा बांधकाम कामगार संघटना सांगली | श्री. शंकर लखू पुजारी- अध्यक्ष, | सांगली एस.टी. स्टॅण्ड - कॉंग्रेस कमीटी ते उदयोग भवन सांगली | दि. १४.०७.२०१५ रोजी १२.०० वा ते १४.५० वा या दरम्यान | मोर्चा :- बांधकाम कामगारांच्या विविध मागण्यांसाठी मोर्चा काढण्यात आला. (जनसमुदाय- ८० ते ९०) दरम्यान मुदतीत शिष्टमंडळाने मागण्यांचे निवेदन श्री. पाटणकर-सहाय्यक कामगार आयुक्त सांगली यांना देण्यात आले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१ | सांगली जिल्हा हमाल पंचायत समिती | जनरल सेक्रेटरी श्री. बापूसाहेब मगदूम | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली चे पटांगणात | दि. १५.०७.२०१५ रोजी ११.०० वा ते १७.०० वा या वेळेत | धरणे आंदोलन :- एल.पी.जी. गॅस एजन्सी व गॅस सिलेंडर गोदाम मधील हमाल कामगारांना माथाडी कायदयाचे संरक्षण मिळावे या व इतर मागण्यांकरीता १०० ते १२५ कार्यकर्त्यांसह धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत शिष्टमंडळाने आपल्या मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकरी श्री. शिंदे यांना दिले |
| २२ | एसटी कामगार संघटना | श्री. प्रविण देशमुख | आटपाडी एस टी आगारासमोर | दि. १७.०७.२०१५ रोजी १५.१५ | निदर्शने :- श्री. आत्तार- आटपाडी एसटी डेपो इनजार्च यांचे गैरकारभाराच्या निषेधार्थ २० ते २५ कामगारांनी निदर्शने केली. |
| २३ | महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघ | श्रीमती मंगला सराफ - कार्याध्यक्ष | सांगली एस. टी. स्टँड ते जिल्हापरीषद सांगली | दिनांक २३.०७.२०१५ रोजी १२.५० ते १५.०० या वेळेत | थाळीनाद मोर्चा :- अंगणवाडी कर्मचारी यांच्या विविध मागण्याकरीता असा थाळीनाद मोर्चा काढण्यात आला. मोर्चा जिल्हा परीषद येथे पोहचलेनंतर आपल्या मागण्यांचे निवेदन श्री. किरण जाधव - उप मुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण विभाग जि.प. सांगली यांना देण्यात आले. सदर मोर्चामधे ५०० ते ५५० अंगणवाडी महिला कर्मचारी सहभागी झालेल्या होत्या. |
| २४ | अंगणवाडी कर्मचारी संघटना | श्री. बिराज साळुंखे अध्यक्ष | मिरज पंचायत कार्यालयासमोर | २२.०७.२०१५ रोजी ११.०० वा ते १५.०० वा | धरणे आंदोलन :- अंगणवाडी सेविकांचे थकित मानधन मिळावे या मागण्यासाठी धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत श्री. यु एम वाघमोडे यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेवून मागण्यांचे निवेदन स्विकारले. व थकित वेतन त्वरीत देण्याची व्यवस्था करीत असल्याचे आश्वासन दिले. जनसमुदाय- ९० ते १०० अंगणवाडी सेविका व कर्मचारी |
| २५ | शिक्षक मतदार संघ | श्री भगवानराव साळुंखे - माजी आमदार | जिल्हा परिषद कार्यालय सांगली समोर | दिनांक ०१.०८.२०१५ रोजी १४.०० वा. ते १७.०० | निदर्शने : शिक्षकांचे पगार मागील ३ महीन्यापासून मिळालेले नाहीत याचे निषेधार्थ निदर्शने करण्यात आली. सदर वेळी ५० ते ६० शिक्षक / शिक्षीका उपस्थीत होते. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री मधुकर यादव – शिक्षणाधिकारी माध्यमिक जि.प. यांना देण्यात आले. |
| २६ | महाराष्ट्र एस टी वर्कर्स कॉंग्रेस संघटना | श्री आर डी पाटील – जनरल सेक्रेटरी | विभागीय एस टी महामंडळ कार्यालय सांगली | दिनांक १४.८.२०१५ रोजी १२.४५. वा. ते १३.१५ | निदर्शने : ढोल वाजवून :- एस टी कर्मचा-यांनी कामगार करार रद्द करुन पगारवाढ मिळालीच पाहीजे वगैरे मागण्यासाठी ढोल वाजवून निदर्शने केली व मागण्याचे निवेदन श्री कदम- डेपो मॅनेजर यांना दिले जनसमुदाय : १०० ते १२५ |
| २७ | महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी | श्री सुभाष बी. मरीगुद्दी- | जिल्हा परिषद कार्यालयासमोर | ११.८.२०१५ रोजी १३.३०. वा. ते १५.०० | निदर्शने : जिल्हा परिषद कर्मचा-यांनी जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या प्रलंबीत मागण्यासाठी निदर्शने केली. जनसमुदाय : २५० ते ३०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २८ | सांगली जिल्हा हमाल पंचायत समिती | श्री विकास मगदूम, सेक्रेटरी, सांगली जिल्हा हमाल पंचायत | स्टेशन चौक, वसंतदादा पुतळया जवळ सांगली | ०२.१०.२०१५ रोजी ११.३० ते १६.०० | धरणे आंदोलन :- १०० ते १२५ कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारचे कामगार विरोधी धोरणाचे विरोधात धरणे आंदोलन केले आहे. |
| २९ | महापालिका कामगार सभा सांगली | दिलीप शिंदे - सेक्रेटरी | सांगली मिरज आणि कुपवाड महापालिका कार्यालय सांगली समोर | ०३.१०.२०१५ रोजी ११.३० ते ११.५० वा | निदर्शने:- मनपा कामगारांनी महापालिकेच्या मुकादमास मारहाण करणारे नगरसेवक श्री सरगर व श्री लेंगरे यांचेवर कारवाई करावी या मागणी करीता निदर्शने केली. |
| ३० | महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना | श्री बिराज साळुंखे- अध्यक्ष | एस टी विभागीय कार्यालय सांगली | १४.१०.२०१५ रोजी ११.०० वा. ते १६.०० वा. | धरणे आंदोलन व निवेदन :- ९०- १०० एस टी कामगारांनी मिरज येथील आगार व्यवस्थापक यांना घेराव घालून दहशत निर्माण करणा-या इंटक कार्यकर्त्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावे या व इतर मागण्यासाठी एस टी विभागीय कार्यालय सांगली समोर धरणे आंदोलन केले. दरम्यान मुदतीत श्री दिलीप कदम – विभाग नियंत्रक, सांगली यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले. |
| ३१ | महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना तासगांव आगार | श्री डी वाय शेळके- अध्यक्ष | एस टी आगार तासगांव चे समोर | १५.१०.२०१५ रोजी १०.०० वा. ते १६.०५ या | धरणे आंदोलन :- आगार व्यवस्थापक यांचे मनमानी हेकेखोर अरेरावी पध्दतीच्या वागणूकीच्या निषेधार्थ व इतर मागण्यासाठी धरणे आंदोलन करण्यात आले. धरणे आंदोलनामध्ये ३० ते ४० एस टी कामगार सहभागी झाले होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३२ | निनाईदेवी सहकारी साखर कामगार युनियन करुंगली | श्री निवृत्ती गणपती नायकवडी - अध्यक्ष | निनाईदेवी सहकारी साखर कारखान्याच्या गेटसमोर | २३.१०.२०१५ रोजी १५.०० | आमरण उपोषण व ठिया आंदोलन :- निनाईदेवी सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्र राज्य सह. बँकेने दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लि. यांना विक्री केला आहे. दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज लि. यांनी कारखाना सुरु करताना जुन्या कामगारांना कामावर घेण्याचे आश्वासन दिले होते. परंतू जुन्या ५३३ कामगारांना कामावर घेतलेले नाही तरी जुन्या ५३३ कामगारांना कामावर घ्यावे या मागणी करीता आमरण उपोषणास बसले आहेत.दिनांक २३.१०.२०१५ रोजी उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी करण्यासाठी वैदयकीय अधिकारी आले असता उपोषणकर्त्यांनी वैदयकीय तपासणी करुन घेतली नाही. दिनांक २४.१०.२०१५ रोजी उपोषणकर्ते यांचे पैकी केरबा गोविदं घोंगडे रा. चिखली या उपोषकर्त्याच्या अचानकपणे पोटात दुखू लागल्यामुळे त्याला सीपीआर कोल्हापूर येथे उपचाराकरीता दाखल करण्यात आले आहे.दिनांक २५.१०.२०१५ रोजी वैदयकीय अधिकारी हे उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी करणे करीता आले असता साखर कारगार युनियनचे अध्यक्ष श्री निवृत्ती गणपती नायकवडी यानी उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी करायची नाही असे सांगितले. त्यानंतर २ ते ३ उपोषणकर्ते यांना चक्कर येवू लागल्याने कांही उपोषणकर्ते वैदयकीय तपासणी करुन घेण्यास तयार झालेने सपोनि कोकरुड पोलीस ठाणे यांनी वैदयकीय अधिकारी यांना बोलावून ५४ उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी करुन घेतली असता १. पांडुरंग महीपती पाटील, २. प्रकाश बबन पाटील, ३.संजय बाबुराव पाटील, ४. रघुनाथ शंकर पाटील, ५. विश्वनाथ रघुनाथ जंगम, ६. सर्जेराव बाबुराव जाधव यांची प्रकृत्ती खालावली असल्याने त्यांना उपाचाराकरीता दवाखान्यात दाखल करण्याचा सल्ला दिल्याने सदर उपोषणकर्ते यांना ग्रामिण रुग्णालय शिराळा येथे औषधोपचाराकरीता दाखल करण्यात आले आहे.दिनांक २६.१.२०१५ रोजी ११.४० वाजता उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी केली असता १. बबन निवृत्ती झाडे वय रा. आरळा, २. विकास शिवाजी इंगवले वय ३८ रा.मांगले , ३. वसंत पांडुरंग निकम वय ५४ रा. जांभळेवाडी, ४. भास्कर रामचंद्र भैर वय ४२ रा. सिरशी, ५. आनंदा रामचंद्र बंडगर वय ४० रा. कांदे यांची यांची प्रकृत्ती खालावली असल्याने वैदयकीय अधिकारी यांनी त्यांना औषधोपचाराकरीता दवाखान्यामध्ये दाखल करण्याचा सल्ला दिल्याने त्यांना ग्रामिण रुग्णालय शिराळा येथे औषधोपचाराकरीता दाखल करण्यात आले आहे.दिनांक २६.१०.२०१५ रोजी १९.३० वाजता उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी केली असता १. संतोष निवृत्ती चांदे वय ३५ रा. मणदूर, २. श्री भिमराव विठ्ठल पाटील वय ३३, रा. रिळे, ३. मोहन गोविंद पाटील वय ४० रा. बिळाशी, ४. बळवंत नाना कांबळे वय ४५ रा. आरळा यांची प्रकृत्ती खालावली असल्याने वैदयकीय अधिकारी यांनी त्यांना औषधोपचाराकरीता दवाखान्यामध्ये दाखल करण्याचा सल्ला दिल्याने त्यांना ग्रामिण रुग्णालय शिराळा येथे औषधोपचाराकरीता दाखल करण्यात आले आहे.दिनांक २७.१०.२०१५ रोजी १०.३० वा.चे सुमारास उपोषणकर्ते यांची वैदयकीय तपासणी केली असता १. संजय केशव पाडळकर वय ४२ रा. मांगले, २. संग्राम शिवाजी जानकर वय रा. बिळाशी, ३. पोपट महीपती देसाई वय ४० रा. जांभळेवाडी, ४. रघुनाथ शंकर पवार वय ४८ रा. चिखली यांची प्रकृत्ती खालावली असल्याने वैदयकीय अधिकारी यांनी त्यांना औषधोपचाराकरीता दवाखान्यामध्ये दाखल करण्याचा सल्ला दिल्याने त्यांना ग्रामिण रुग्णालय शिराळा येथे औषधोपचाराकरीता दाखल करण्यात आले आहे.दिनांक २८.१०.२०१५ रोजी १२.३० वाजता डॉ. श्री भारत पाटणकर-अध्यक्ष श्रमिक मुक्ती दल यांनी उपोषणाचे ठिकाणी उपोषणकर्ते यांची भेट घेवून आंदोलनाबाबत मार्गदर्शन केले सदर वेळी कामगारांनी त्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व करण्याबाबत श्री भारत पाटणकर यांना विनंती केली असता डॉ. श्री भारत पाटणकर यांनी विनंती मान्य करुन आंदोलनाचे नेतृत्व स्विकारले आहे व दिनांक ३०.१०.२०१५ रोजी निनाईदेवी सह. साखर कारखान्याचे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३३ | | | | | असल्याचे वैदयकीय अधिकारी यांनी सांगितेलेने त्यांना औषध उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय शिराळा येथे दाखल करण्यात आले आहे. उर्वरीत उपोषणकर्ते यांनी उपोषणाचे ठिकाणी उपोषण सुरु ठेवले आहे. दि.३०.१०.२०१५ रोजी १४.०० वा चे सुमारास आंदोलनाचे ठिकाणी श्री. सत्यजीत देशमुख सरचिटणीस महाराष्ट्र कॉंग्रेस आय, हणमंत पाटील-माजी सभापती, पी.वाय.पाटील चेअरमन व इतर मान्यवरांनी भेट देवून उपोषणकर्ते व उपस्थित ऊस उत्पादक शेतकरी यांना त्यांचे मागण्याबाबत मार्गदर्शन केले. १६.३० वाचे सुमारास डॉ.श्री. भारत पाटणकर-अध्यक्ष, श्रमिकमुक्ती दल हे आंदोलनाच्या ठिकाणी आले व त्यांनी उपोषणकर्त्यांशी उपोषण सोडून याच ठिकाणी ठिय्या आंदोलन करणेबाबत, दि.०२.११.२०१५ रोजी जिल्हाधिकारी यांचे सोबत बैठक होणार असलेबाबत व सदर बैठकीस सर्व कामगार प्रतिनिधी, सर्व कामगारांच्या घरच्या महिलांना घेवून जाणेबाबत चर्चा केली असता उपोषणकर्ते यांनी योग्य प्रतिसाद दिला व १७.०० वा उपोषणकर्त्यांनी भारत पाटणकर यांच्या हस्ते पाणी घेवून उपोषण सोडले आहे. परंतू उपोषण कर्त्यांनी कारखान्याचे गेट समोरच ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. सदर वेळी ८०० ते १००० जनसमुदाय हजर होता. |
| ३४ | महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना | श्री बिराज साळुंखे- विभागीय अध्यक्ष | सांगली एस टी डेपो च्या इन गेट समोर | २८.१०.२०१५ रोजी ११.०५ वा. ते १३.४५ वा. | धरणे आंदोलन :- २० ते २५ कामगारांनी सांगली आगार व्यवस्थापक यांच्या आदेशाशिवाय इतर अधिकारी हे मनमानी व बेकायदेशीर कर्मचा-यांची पिळवणूक करीत आहेत याचे निषेधार्थ सांगली एस टी डेपो च्या इन गेट समोर धरणे आंदोलन केले. |
| ३५ | भुमी अभिलेख कर्मचारी संघटना | श्री सदाशिव कुलकर्णी | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर | २९.१०.२०१५ रोजी १३.३० | निदर्शनेः- ४५ ते ५० भुमीअभिलेख कर्मचा-यांनी, चुकीचा निकाल दिल्याच्या कारणावरुन भुमि अभिलेख पर्यवेक्षक श्री सुशील रामराव पवार यांना कामेरीतील पिता- पुत्रानी बेदम मारहाण केली आहे तरी त्यांचे विरुध्द मोका अंतर्गत कारवाई करावी या मागणी करीता जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर निदर्शने केली व दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन श्री त्रिगुण कुलकर्णी – निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले. |
| ३६ | चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना | श्री संजय व्हनमाने- जिल्हा अध्यक्ष, चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना सांगली | निवासी उप जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | १७.१०.२०१५ रोजी १३.०० ते १३.३० वा. | निवेदनः- श्री संजय व्हनमाने- जिल्हा अध्यक्ष, चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना सांगली यांचे नेतृत्वाखाली ७ ते ८ कर्मचा-यांनी दिवाळी बोनस सुरु करावा, ६ टक्के थकीत महागाई भत्ता रोखीने मिळावा या व इतर मागण्याचे निवेदन श्री कुलकर्णी – निवासी उप जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |
| ३७ | एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कर्मचारी संघटना सांगली | श्री.विजय प्रधान - अध्यक्ष, | जिल्हाधिकारी कार्यालयाचे पटांगणात | दि.०२.११.२०१५ रोजी ११.०० ते १५.४५ | धरणे आंादोलन - २० ते २५ कार्यकर्त्यांनी पाणलोट पथक सदस्यांच्या सेवांचे खाजगीकरण होवू नये या व इतर मागण्याकरीता धरणे आंादोलन करण्यात आले. दरम्यान मुदतीत शिष्टमंडळाने मागणीचे निवेदन श्री. त्रिगुण कुलकर्णी – निवासी उप-जिल्हाधिकारी, सांगली यांना देण्यात आले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३८ | जनरल श्रमीक कामगार युनियन | श्री सुनिल कदम- अध्यक्ष | बन्सी पल्प आणि पेपर मील्स प्रा. लि. कसबे डिग्रज ता. मिरज | ९.११.२०१५ रोजी ०६.०० | कामबंद आंदोलन - : बन्सी पल्प आणि पेपर मील्स प्रा. लि. कसबे डिग्रज ता. मिरज येथील कामगारांनी चालू वर्षी २० टक्के बोनस मिळालाच पाहीजे, २४० दिवस भरलेल्या कामगारांना कायम करावे या व इतर मागण्यासाठी दिनांक ९.११.२०१५ रोजी ०६.०० वाजले पासून कामबंद आंदोलन सुरु केले आहे. सदर कामबंद आंदोलनामध्ये २७ कर्मचारी सहभागी झालेले आहेत. |
| ३९ | महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन शिराळा | श्री मारुती निवृत्ती पाटील- अध्यक्ष शिराळा तालुका | तहसील कार्यालय शिराळा समोर | ०१.१२.२०१५ रोजी १०.०० वा. ते १७.०० वा | ठिया आंदोलन :- महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन शिराळाचे वतीने श्री मारुती निवृत्ती पाटील- अध्यक्ष शिराळा तालुका यांच्या नेतृत्वाखाली ३५ ते ४० ग्रामसेवकांनी खेड जिल्हा रत्नागिरी येथील तहसीलदार यांनी ग्रामसेवकावर फौजदारी कारवाई केलेचे निषधार्थ तहसील कार्यालय शिराळा समोर ठिया आंदोलन केले. |
| ४० | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना | प्रा. श्री. एन डी पाटील | के.बी. कॉलेज इस्लांमपूर | ४.१२.२०१५ रोजी ०९.३० वा. ते १०.१५ वा. | निषेध सभा :- के.बी. कॉलेज इस्लांमपूर येथे दिनांक ३.१२.२०१५ रोजी केबीपी कॉलेज येथे सुरु असले फिजीक्स पेपरचे वेळी कॉलेजचा विदयार्थी दर्शन पोपट पाटील यास कॉपी करताना पकडे याचा राग मनात धरुन पर्यवेक्षक नितीन शिवाजी शिंदे यांना मारहाण करुन धमकी देण्यात आली व शासकीय कामात अडथळा आणला याबाबत इस्लांमपूर पोलीस ठाणेस भाग ५ गुरनं. २५१/१५ भादविस कलम ३५३५,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे पर्यवेक्षक नितीन शिंदे यांना झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ प्रा. श्री. एन डी पाटील यांचे उपस्थीतीत निषेध सभा पार पडली सदर निषेध सभेस १५० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, २०० विदयार्थी उपास्थितीत होते. तसेच सदर घटनेचा निषेध म्हणून दिनांक ४.१२.२०१५ रोजी केबीपी कॉलेज येथील २५० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी काळया फीती लावून कामकाज केले. |
| ४१ | महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण कर्मचारी संघटना , महाराष्ट्र राज्य | श्री अरुण शामराव गायकवाड | जल भवन सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ४.१२.२०१५ रोजी १०.४५ वा. ते १२.०५ | मोर्चा व निवेदन:- ६० ते ६५ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचा-यांनी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणचे शासनामध्ये विलीनीकरण करावे या व इतर मागण्यासाठी जल भवन सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा मोर्चा काढला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री संजयसिंह चव्हाण- अपर जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४२ | महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटना | श्री अमोल शिंदे अध्यक्ष | जिल्हा परिषद कार्यालय सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | ५.१२.२०१५ रोजी १४.३० वा. ते १६.१५ वा. | मोर्चा व निवेदनः- २५० ते ३०० कार्यकर्त्यांनी १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या सर्व कर्मचा-यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना चालू करावी या व इतर मागण्याकरीता जिल्हा परिषद कार्यालय सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यांनतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले. सदर वेळी श्री अमोल शिंदे- यांनी दिनांक १४.१२.२०१५ रोजी विधान भवन नागपूर येथे मोर्चा काढण्यात येणार आहे सदर मोर्चास मोठया संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन केले आहे. त्यानंतर मागण्याचे निवेदन श्री संजयसिंह चव्हाण- अपर जिल्हाधिकारी सांगली यांना देण्यात आले. |
| ४३ | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना | प्रा. श्री. एन डी पाटील | केबीपी कॉलेज इस्लामपूर ते तहसील कार्यालय इस्लांमपूर | ५.१२.२०१५ रोजी १२.२५ वा. ते १५.०० वा | मोर्चा व निवेदनः- के.बी. कॉलेज इस्लांमपूर येथे दिनांक ३.१२.२०१५ रोजी केबीपी कॉलेज येथे सुरु असले फिजीक्स पेपरचे वेळी कॉलेजचा विदयार्थी दर्शन पोपट पाटील यास कॉपी करताना पकडे याचा राग मनात धरून पर्यवेक्षक नितीन शिवाजी शिंदे यांना मारहाण करुन धमकी देण्यात आली व शासकीय कामात अडथळा आणला याबाबत इस्लांमपूर पोलीस ठाणेस भाग ५ गुरनं. २५१/१५ भादविस कलम ३५३५,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे पर्यवेक्षक नितीन शिंदे यांना मारहाण करणा-यांवर कडक कारवाई करावी या मागणी करीता प्रा. श्री. एन डी पाटील यांचे नेतृत्वाखाली १५० ते २०० पुरुष व १०० ते १२५ महीला अशांनी केबीपी कॉलेज इस्लांमपूर ते तहसील कार्यालय इस्लांमपूर असा मोर्चा काढला. मोर्चा तहसील कार्यालय इस्लांमपूर येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेमध्ये रुपांतर झाले. त्यानंतर मागण्याचे निवेदन सौ. रुपाली सरनोबत यांना दिले. |
| ४४ | जनरल श्रमीक कामगार युनियन | श्री सुनिल कदम- अध्यक्ष जनरल श्रमीक कामगार युनियन | बन्सी पल्प आणि पेपर मील्स प्रा. लि. कसबे डिग्रज ता. मिरज | ९.११.२०१५ रोजी ०६.०० | कामबंद आंदोलन :- बन्सी पल्प आणि पेपर मील्स प्रा. लि. कसबे डिग्रज ता. मिरज येथील कामगारांनी श्री सुनिल कदम- अध्यक्ष जनरल श्रमीक कामगार युनियन यांचे नेतृत्वाखाली चालू वर्षी २० टक्के बोनस मिळालाच पाहीजे, २४० दिवस भरलेल्या कामगारांना कायम करावे या व इतर मागण्यासाठी दिनांक ९.११.२०१५ रोजी ०६.०० वाजले पासून कामबंद आंदोलन सुरु केले आहे. सदर कामबंद आंदोलनामध्ये २७ कर्मचारी सहभागी झालेले आहेत. कामबंद आंदोलनामध्ये सहभागी झालेले कर्मचारी दररोज १०.०० वा.पर्यंत मीलचे ठिकाणी थांबून राहणार आहेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४५ | आटपाडी महसूल कर्मचारी संघटना व तलाठी संघटना | श्री ए.ए.भांबुरे - अव्वल कारकून | आटपाडी पोलीस ठाणे | ११.१२.२०१५ रोजी १२.३० वा. ते १७.०० वा | कामबंद आंदोलन :- आटपाडी महसूल कर्मचारी संघटना व तलाठी संघटना यांचे वतीने श्री ए.ए.भांबुरे - अव्वल कारकून यांचे नेतृत्वाखाली ३५ ते ४० महसूल कर्मचा-यांनी दिनांक १०.१२.२०१५ रोजी अनाधिकृत वाळू उपसा करणा-या तस्करांनी अनाधिकृत वाळू उपसास विरोध करणा-या श्री पो.ए.सोनवणे - मंडल अधिकारी दिघंची व श्री ए.ए.बनसोडे- तलाठी दिघंची यांना जमाव करुन मारहाण केली आहे याचे निषेधार्थ दिनांक ११.१२.२०१५ रोजी १२.३० वा. ते १७.०० वा. या वेळेत कामबंद आंदोलन केले. दरम्यान मुदतीत महसुल कर्मचारी यांना मारहाण करणा-या वाळू तस्कराविरुध्द कारवाई करावी या व इतर मागण्याचे निवेदन पोलीस निरीक्षक आटपाडी पोलीस ठाणे यांना दिले |
| ४६ | महसुल कर्मचारी संघटना खानापुर | महादेव पाटील – तालुका अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | १४.१२.२०१५ रोजीचे १०.०० ते १७.०० | कामबंद आंदोलन :- अवैध वाळु वहातुक/ उपसा यांचेवर कारवाई करतांना महसुल कर्मचारी यांना वारंवार मारहाणीच्या घटना घडत आहेत पोलीस विभाग वाळु तस्करांना पाठीशी घालत आहे . त्यामुळे महसुल प्रशासन यापुढे अवैध वाळु उपश्यावर /वहातुकीवर कारवाई करणार नाही तसेच अनाधिकृत वाळु वहातुक व उल्लघन रोखणेसाठी रात्रीच्या वेळी गस्ती पथकाबरोबर एक शस्त्रधारी पोलीस व चारचाकी वहान मिळावे व मारहाणीच्या दाखल गुन्हयांतील आरोपीना अटक करुन त्याचेवर मोका कायदया अंतर्गत कारवाई करण्यासाठी काम बंद आंदोलन केले दरम्यान मुदतीत श्रीमती अंजली मरोड तहसिलदार यांचे नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांची भेट घेवुन मागण्याचे निवेदन दिले त्यावेळी मा. जिल्हाधिकारी यांनी तालुका स्तरांवर तहसिलदार , पोलीस विभाग , आर.टी.ओ. यांची एक समिती स्थापन महसुल कर्मचारी यांचेवर हल्ले होणार नाहीत याबाबत उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले कामबंद आंदोलनात खानापुर तालुक्यातील तलाठी, लिपीक,कोतवाल असे १२६ कर्मचारी सहभागी झालेले होते. |
| ४७ | महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना सांगली | श्री बिराज साळुंखे- विभागीय अध्यक्ष | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळसमोर शास्त्री चौक सांगली | १६.१२.२०१५ रोजी ११.०० वा. ते १६.०० वा | उपोषण : - ५० ते ५५ कामगारांनी एस टी कामगारांचे अनेक प्रश्न आगार व्यवस्थापक रा. प. सांगली झाले चर्चेमध्ये सोडविले होते पण त्याची अंमलबजावणी केलेली नाही याचे निषेधार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळसमोर शास्त्री चौक सांगली येथे एक दिवशीय उपोषण केले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४८ | एस.टी.वर्कर्स इंटक कॉंग्रेस | शरद शेळके अध्यक्ष शिराळा डेपो. इंटक संजय गुंडा यादव अध्यक्ष मिरज डेपो. इंटक व अशोक महादेव गंगाणे सचीव एसटी वर्कशॉप डी. पी. बनसोडे अध्यक्ष सांगली डेपो. इंठक श्री सुधीर बाळासो पाटील - इंटक अध्यक्ष कवठे महंकाळ आगार . श्री हुलगाप्पा हणमंत पाथरुट. श्री आसिफ आझाद मुल्ला - अध्यक्ष इंटक तासगांव आगार. श्री संतोष कृष्णा माळी - अध्यक्ष विटा आगार इंटक. उत्तम वासुदेव गुरंव - अध्यक्ष पलूस आगार इंटक . रामदास विश्वास रासकर - इस्लांमपूर आगार इंटक आगार | शिराळा आगार. मिरज आगार ,एस.टी. वर्कशॉप चंदनवाडी. सांगली आगार . कवठे महंकाळ आगार. जत आगार. तासगांव. आगार विटा आगार . पलूस आगार . इस्लांमपूर | दि. १७.१२.२०१५ रोजी ०७.०० ते दि. १८.१२.२०१५ रोजीचे १३.३०वा.पर्यत | कामबंद आंदोलन : - दि. १७.१२.२०१५ ते १८.१२.२०१५ या कालावधीत एस.टी.वर्कर्स इंटक कॉंग्रेसचे वतीने २५ टक्के पगारवाढ व इतर मागण्याकरीता सदर ठिकाणी कामबंद आंदोलन करण्यात आले.दिनांक १८.१२.२०१५ रोजी मंत्रालयात झाले बैठकीमध्ये मागण्याबाबत दिनांक ३१.१.२०१६ पर्यत निर्णय घेण्याचा तोडगा काढणेत आल्याने इंटकच्या कर्मचा-यांनी दिनांक १८.१२.२०१५ रोजी १३.३० वा.पासुन कामबंद आंदोलन मागे घेतलेले आहे. |
| ४९ | यशवंतराव चव्हाण सुरक्षा रक्षक व जनरल कामगार युनियन व संघटीत व असंघटीत कामगार युनियन | श्री भानुदार खाशाबा दाईंगडे - सरचिटणीस रा. कापील ता.कराड जि. सातारा | उदयोग भवन समोर सांगली | १८.११.२०१५ रोजीचे ११.०० वाजले पासून | उपोषण : - यशवंतराव चव्हाण सुरक्षा रक्षक व जनरल कामगार युनियन व संघटीत व असंघटीत कामगार युनियन मंडळाचे नोंदणीकृत असलेल्या सातारा जिल्हयातील महापारेषण कंपनीत कार्यरत असणा-या २८ सुरक्षा रक्षकांना चुकीचे निकर्ष लावून कमी केले त्यांना कामावर घ्यावे यासाठी उपोषणास बसले होते.दिनांक १९.१२.२०१५ रोजी सहायक कामगार आयुक्त व अध्यक्ष सांगली जिल्हा सुरक्षा मंडळ सांगली यांची उपोषणाच्या अनुषंगाने बैठक पार पडली त्यामध्ये उपोषणकर्ते यांच्या मागणीबाबत अपर कामगार आयुक्त पुणे यांचे समवेत बैठक आयोजीत करून निर्णय घेवू., दरम्यान नव्याने सुरक्षा रक्षकांना एमएसईबी या ठिकाणी नियुक्ती देण्यात येवू नये असे ठरल्याने उपोषकर्ते यांचे समाधान झाल्याने उपोषण मागे घेण्यात आले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५० | एस.टी .कामगार सेना सांगली | श्री. डी. डी. सुर्यवंशी सचिव एस.टी .कामगार सेना सांगली | एस.टी विभागीय कार्यालय सांगली चे समो्र | २८.१२.२०१५ रोजी ११.२५ ते १२.०० | निदर्शने : - श्री. डी. डी. सुर्यवंशी सचिव एस.टी .कामगार सेना सागली विभाग यांचे नेतृत्वाखाली ३०-४० कर्म-चारी यांनी एस.टी विभागीय कार्यालय सांगली चे समो्र एस्.टी. कर्मचा्री यां्चे प्रलंबित मागण्या बाबत निदर्शने केली. मागण्याचे निवेदन विभागीय नियंत्रक श्री. टी.एस.कदम.यांना देण्यात आले. निवेदन दिलेनंतर झाले चर्चेत जिल्हयातील सर्व आगार प्रमुख्रांना मागण्याचे निवेदन देणेबाबत निर्णय घेवुन आंदोलनकर्ते इतर आगारप्रमुख्रांना निवेदन देण्यासाठी निधुन गेले. |
| ५१ | निवारा बांधकाम कामगार संघटना सांगली | श्री शंकर पुजारी अध्यक्ष | डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय | २९.१२.२०१५ रोजी १२.०० ते १२.४५ | मोर्चा व निवेदनः- श्री शंकर पुजारी अध्यक्ष निवारा बांधकाम कामगार संघटना सांगली यांच्या नेतृत्त्वाखाली ३५ ते ४० कामगारांनी ५०००/- रुपये दिवाळी बोनस जाहीर केलेला त्वरीत मिळावा या व इतर मागण्याकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाचे पटांगणात आले नंतर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले प्रमुख वक्त्यांनी मार्गदर्शन केले दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्री त्रिगूण कुलकर्णी निवासी उप जिल्हाधिकारी यांना दिले. |
| ५२ | महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना सांगली | श्री राजेंद्र कांबळे संघटक | डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय | २९.१२.२०१५ रोजी १२.५० ते १२.४५ | मोर्चा व निवेदनः- श्री राजेंद्र कांबळे संघटक महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना सांगली यांचे नेतृत्त्वाखाली ७० ते ८० कर्मचाऱ्यांनी महावितरण कंपनीचे कोणत्याही परिस्थितीत क्षेत्रीय पातळीवर ५ विभागामध्ये विभाजन करण्यात येवूनये या व इतर मागण्याकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाचे पटांगणात आले नंतर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले प्रमुख वक्त्यांनी मार्गदर्शन केले दरम्यान मुदतीत शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्री त्रिगूण कुलकर्णी निवासी उप जिल्हाधिकारी यांना दिले. |

## सर्व शेतकरी संघटना हालचाल.

| अनं | पक्ष/ संघटना | नेतृत्व | ठिकाण | दिनांक व वेळ | घटनेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १. | शेतकरी संघटनेच्या (रघुनाथ पाटील प्रणित) | श्री भाऊसाहेब पवार रा. तडसर | मायक्का मंदीरा शेजारी | ०१.०१.२०१५ **रोजी** १२.०० वा. ते १२.१० वा. | रस्ता रोको प्रयत्न :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी ४ ते ५ कार्यकर्ते यांनी एस टी स्टँड चौक, कडेगांव येथे येवून मायक्का मंदीरा शेजारी शेतकरी संघटनेचे झेंडे घेवून रस्ता रोको करण्याच्या इरादयाने जमा झाले होते, ते रस्ता रोको न करता निघून गेले आहेत. |
| २. | **शेतकरी संघटनेच्या (रघुनाथ पाटील प्रणित)** | श्री अशोकराव माने रा. अग्रण धुळगांव | मिरज - पंढरपूर रोडवर अलकुड एस फाटा | ०१.०१.२०१५ **रोजी** १०.३० वा. ते ११.१५ वा. | **रस्ता रोको** :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी २० ते २५ कार्यकर्त्यांनी रस्ता रोको आंदोलन केले. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन निवासी नायब तसहीलदार यांना देण्यात आले. |
| ३. | **शेतकरी संघटनेच्या (रघुनाथ पाटील प्रणित)** | श्री अशोकराव माने रा. अग्रण धुळगांव | मिरज - पंढरपूर रोडवर शिरढोण एस टी स्टँड चौक शिरढोण | ०१.०१.२०१५ **रोजी** १३.३० वा. ते १४.३० | **रस्ता रोको** :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी २०० ते २५० कार्यकर्त्यांनी रस्ता रोको आंदोलन केले. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन निवासी नायब तसहीलदार यांना देण्यात आले. |
| ४. | **शेतकरी संघटनेच्या (रघुनाथ पाटील प्रणित)** | श्री नंदकुमार पाटील रा. खरशिंग- | मिरज - पंढरपूर रोडवर खरशिंग फाटा | ०१.०१.२०१५ **रोजी** १२.०० वा ते १४.०० वा. | **रस्ता रोको** :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी २०० ते २५० कार्यकर्त्यांनी रस्ता रोको आंदोलन केले. दरम्यान मुदतीत मागण्याचे निवेदन सर्कल तलाठी यांना देण्यात आले.<br>खरशिंग फाटा येथे बेकायदा जमाव जमवून रास्ता रोको आंदोलन करुन लोकांचे जाण्या येण्यास अडथळा केला व मुपाकाक ३७ (१) (३) चे बंदी आदेशाचा भंग केलेच कारणावरुन कवठे महंकाळ पोलीस ठाणेस भाग- ५ गुरनं. १/२०१५ भा.द.वि.सं. कलम १४१,१४३,३४१,५०६, मुपोकाक १३५ प्रमाणे. |
| ५. | शेतकरी संघटना (शरद जोशी प्रणीत) | **श्री संजय कोले- सांगली जिल्हा अध्यक्ष** | **गणपती मंदीर सांगली** | **१०.१.२०१५ रोजी १०.३०-१९.००.** | मोटार सायकल रॅली - २०१४ – २०१५ चे ऊस गाळप हंगामा करीता एफआरपी प्रमाणे ऊस दर मिळावा, ऊस बिले एक रकमी मिळावीत या व इतर मागण्यासाठी मोटार सायकल रॅली काढून साखर कारखान्यांवर जावून मागण्याचण निवेदने दिली त्याची माहीती खालील प्रमाणे...<br>रॅलीची सुरुवात गणपती मंदीर सांगली येथून १०.३० वा. झाली. सांगली शहरातील प्रमुख मार्गावर फिरुन सदर रॅली वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना सांगली येथे गेली<br>सदर ठिकाणी श्री विशाल पाटील – चेअरमन वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना यांना मागण्याचे निवेदन दिले. त्यानंतर सदर रॅली क्रांती सहकारी कारखाना कुंडल येथे गेली सदर ठिकाणी श्री अरुण लाड- चेअरमन यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>त्या ठिकाणाहून ४ ते ५ लोकांचे शिष्ठमंडळ सोनहीरा शेतकरी सहकारी साखर कारखाना येथे मागण्याचे निवेदन देण्यासाठी गेले<br>त्यानंतर रॅली राजाराम बापू सहकारी साखर कारखाना इस्लांमपूर येथे गेली सदर ठिकाणी मागण्याचे निवेदन श्री आर डी माउली-एमडी राजाराम बापू कारखाना यांना मागण्याचे निवेदन दिले.<br>त्यानंतर रॅली हुतात्मा अहीर सहकारी साखर कारखाना वाळवा या ठीकाणी गेली सदर ठिकाणी श्री बाळासाहेब पाटील - संचालक यांना मागण्याचे निवेदन दिले<br>त्यानंतर रॅलीची सांगता झाली. रॅली मध्ये २५ ते ३० मोटार सायकलवर ५० ते ६० कार्यकर्ते सहभागी झाले होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६. | पलूस तालुका स्वाभिमानी शेतकरी संघटना युवा आघाडी २ | संदीप धनपाल राजोबा अध्यक्ष पलूस तालुका स्वाभिमानी शेतकरी संघटना युवा आघाडी | पलूस ते सांगली जाणारे रोडवर वसगडे एस टी स्टँड येथे | १०.१.२०१५ रोजी ११.१५ वा. ते १३.१५ वा. | रस्ता रोको :- शेतक-यांची ऊस बिले एफआरपी प्रमाणे दिलेली नाहीत त्या साखर कारखान्यांचे चेअरमन व संचालक मंडळावर व त्यांना पाठीशी घालणा-या साखर आयुक्त यांचेवर फौजादारी गुन्हे दाखल करावेत या व इतर मागण्या करीता रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सदर आंदोलनाचे अनुषंगाने भिलवडी पोलीस ठाणेस भाग ५ गुरनं. ६/१५ भादविस कलम १४३, १४५,३४१, मुपोकाक १३५ |
| ७. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री दिपक आप्पासाो मगदूम रा. समडोळी | सांगली ते इस्लांमपूर जाणारे रोडवर लक्ष्मी फाटा | १२.१.२०१५ रोजी १६.०० - १७.००.वा. | रस्ता रोको :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी व साखर आयुक्त कार्यालय येथील आंदोलनाचे वेळी मा. श्री. राजू शेट्टी- खासदार स्वाभिमानी शेतकरी संघटना व श्री सदाभाऊ खोत- प्रदेशाध्यक्ष यांना अटक झाल्याचे निषेधार्थ रास्ता रोको करण्याच्या उद्देशाने अचानक पणे श्री दिपक आप्पासाो मगदूम रा. समडोळी यांचे नेतृत्वाखाली समडोळी,दुधगांव,सावळवाडी कसबे डिग्रज येथील १० ते १५ कार्यकर्त्यांनी जमा होवून शासनाचे विरोधात घोषणाबाजी केली. त्यानंतर सदर कार्यकर्ते रस्ता रोको करण्याच्या इरादयाने रस्त्यावर आले असता त्यातील प्रमुख १० कार्यकर्त्यांना बंदोबस्तावरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी १६.१० वा. मुपोकाक ६८ प्रमाणे ताब्यात घेतले व १७.०० वाजता मुपोकाक कलम ६९ प्रमाणे मुक्त केले आहे.<br>तसेच नांद्रे गांवचे हद्दीमध्ये नांद्रे ते वसगडे जाणारे रोडवर सायली धाब्यासमोर १५.०० वाजता पलूस ते सांगली जाणारे एस टी बसवर दगड मारुन एस टी ची काच फोडून ५०००/- रुपये नुकसान केले बाबत सांगली ग्रामिण पोलीस ठाणे भाग-६ गुरनं. ३/२०१५ भादविस कलम ३३६,४२७,३४ प्रॉ.डॅ.ॲक्ट कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल आहे जुनी धामणी गांवचे हद्दीत रेल्वे पुलाजवळ ४ ते ५ लोकांनी धामणी गांवाकडे येत असलेली बस आडवून घोषणा देवून एस टी बसवर दगड मारुन एस टी च्या काचा फोडून १००००/- रुपये नुकसान केले बाबत सांगली ग्रामिण पोलीस ठाणे भाग-६ गुरनं. ४/२०१५ भादविस कलम ३४१,३३६,४२७,३४ प्रॉ.डॅ.ॲक्ट कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयांची माहीती अलहिदा इकडील जा.क्र.जिविशा/उस दर गुन्हे/२३२/२०१५ दिनांक १३.१.२०१५ अन्वये सादर करण्यात आली आहे. |
| ८. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री नितीन नारायण पाटील- स्वाभिमानी शेतकरी संघटना | आमणापूर गांवातील चौका | १३.१.२०१५ रोजी ०९.३० वा. ते ०९.४५ वा | रस्ता रोको :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन केले. |
| ९. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री बी आर पाटील- कार्यकर्ता | आरग ता.मिरज गांवातील चौका | १३.१.२०१५ रोजी १२.०० वा. ते १२.२० वा | रस्ता रोको :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन केले. सदर वेळी पर्यायी मार्गाने वाहतूक सुरु ठेवण्यात आली होती. जनसमुदाय- २० ते ३० कार्यकर्ते |
| १०. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री जयकुमार कोल्हे – अध्यक्ष पलूस तालुका | अंकलखोप ते नागठाणे जाणारे रोडवर नागठाणे फाटा | १३.१.२०१५ रोजी ९.४० वा. ते ०९.५० वा | रस्ता रोको :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन केले. ७ प्रमुख कार्यकर्त्यांना मुपोकाक ६८ प्रमाणे ०९.५० वा. ताब्यात घेवून मुपोकाक ६९ प्रमाणे १०.१५ वा. मुक्त करण्यात आले आहे. जनसमुदाय - १० ते १५ कार्यकर्ते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री संदीप राजोबा –युवा अध्यक्ष | वसगडे ता. पलसू एस टी स्टँड चौक | १३.१.२०१५ रोजी १३.३० वा. ते १३.४० | <u>निदर्शने</u> :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी निदर्शने केली. जनसमुदाय - १५ कार्यकर्ते |
| १२. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री शहाजी पाटील – कार्यकर्ता | ताकारी ता.वाळवा येथे ताकारी ते कराड रोडवर कॅनॉलवर | १३.१.२०१५ रोजी १३.३० वा. ते १३.४५ वा | रास्ता रोको :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन केले. जनसमुदाय - ५० ते ६० कार्यकर्ते |
| १३. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | संभाजी चौगुले बागणी | बागणी | १३.१.२०१५ रोजी ०८.०० वा. ते १४.०० वा. या वेळेत | गांवबंद/पुतळा दहन :- :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी बागणी गांव बंद पाळण्यात आले. बंदला अत्यावश्यक सेवा वगळता ९० टक्के प्रतिसाद मिळाला. दरम्यान मुदतीत ४ ते ५ कार्यकर्त्यांनी अचानकपणे साखर सम्राटांच्या प्रतिकात्मक पुतळयाचे दहन केले. |
| १४. | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री महेश खराडे - प्रवक्ता | आष्टा एस टी स्टँड चौकामध्ये | १३.१.२०१५ रोजी ०८.३० | जमाव बंदी आदेश भंग :- ऊसाला एफआरपी प्रमाणे दर मिळावा या मागणीसाठी २० ते २२ कार्यकर्त्यांनी बेकायदा जमाव करुन एफआरपी प्रमाणे ऊसाला दर मिळावा वगैरे घोषणा दिल्या. आष्टा पो. ठाणेस भाग -६ गुरनं ४/२०१५ भा.द.वि.सं.कलम- १८८, मुं.पो.का.क. १३५ , प्रमाणे दाखल आहे. |
| १५. | स्वाभिमनी शेतकरी संघटना | श्री संदीप राजोबा- स्वाभिमानी शेतकरी संघटना युवा आघाडी अध्यक्ष | जुने एस टी स्टँड चौक, पलूस | दिनांक १६.१.२०१५ रोजी ११.३५. वा. ते ११.५५ वा. | रस्ता रोको --ऊसाला प्रतिटन एफआरपी प्रमाणे दर मिळावा, एफआरपी प्रमाणे ऊसाला दर न देणा-या साखर कारखान्यांच्या संचालकांच्यावर फौजदार गुन्हे दाखल करावेत या मागणी करीता रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. जनसमुदाय - ५० ते ६० कार्यकर्ते |
| १६. | शेतकरी संघटना | श्री रघुनाथ दादा पाटील | अंकलखोप गांवी विठ्ठल मंदीरात | दिनांक १६.१.२०१५ रोजी १६.४५ वा. ते १९.०० वा | रस्ता रोको --ऊश्री बी जी पाटील,श्री बाळासाहेब कुलकर्णी, श्री श्रीकांत आण्णा लाड व श्री वसंत बिरनाळे यांचे उपस्थितीत उस दरा बाबत बैठक झाली त्यामध्ये वरील सर्वानी शेतकऱ्यांना उस दरासाठी कारखानदार व शासना बरोबर संघर्ष करावा लागेल त्याकरीता सर्वानी एकत्र येवुन कोल्हापुर येथील आर जे डी ऑफिसवर मोर्चा काढण्याचे ठरले आहे. सदर बैठकीस ६०-७० शेतकरी उास्थीत होते. |
| १७. | पाणी संघर्ष समिती उमदी | श्री सुनिल गणपती पोतदार- अध्यक्ष पाणी संघर्ष समिती जत तालुका | उमदी गावी | दिनांक २६.१.२०१५ रोजी १७.४५ वा. ते १८.४५ वा. | **<u>जाहीर सभा व चर्चा</u>** :- जत तालुक्यातील उमदी परिसरातील ४२ गावांना म्हैशाळ योजनेचे पाणी मिळावे या विषयावर जाहीर सभा व चर्चा सत्र पार पडले. सदर सभेस मा. श्री संजय पाटील- खासदार भाजपा, मा. श्री विलासराव जगताप-आमदार भाजपा यांनी मागदर्शन करुन उमदी परिसरातील ४२ गांवाना म्हैशाळ योजनेचे पाणी देण्या करीता प्रयत्न करु असे आश्वासन दिले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८. | शेतकरी संघर्ष समिती | मारुती केशव चव्हाण-अध्यक्ष | पलूस सहकारी बँक चौक पलूस ते तहसील कार्यालय पलूस असा | - दिनांक २३.३.२०१५ रोजी ११.०० वा. ते १२.४५ वा. | मोर्चा :- अवकाळी पावसाने द्राक्ष बागायत शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई दयावी, कर्ज माफी करावी, दिर्घकालीन कर्जाचे व्याज माफ करावे, कमीत कमी १६ तास विदयुत पुरवठा व्हावा, कृष्णा कॅनल व आर फळ योजनेचे पाणी वेळच्यावेळी मिळावे या व इतर मागण्या करीता मोर्चा काढला. मोर्चामध्ये ४०० ते ५०० द्राक्ष बागायतदार शेतकरी सहभागी झाले होते. मोर्चा तहसील कार्यालय पलूस येथे आल्यानंतर शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन नायब तहसीलदार श्री बरुडे यांना दिले आहे. मोर्चाचे वेळी पलूस बाजार पेठ येथील व्यापा-यांनी आपआपली दुकाने बंद ठेवून मोर्चा पाठींबा दिला होता. मोर्चा बाजारपेठेतून पास झालेनंतर सर्व दुकाने सुरु करण्यात आली होती. |
| १९. | शेतकरी संघटना | श्री रघुनाथ रामचंद्र पाटील - अध्यक्ष शेतकरी संघटना | बाजार पेठ, येलूर | २२.१०.२०१५ रोजी १९.३० वा. ते २१.४० | मेळावा :- मेळाव्यामध्ये ऊस उत्पादन खर्चाच्या ५० टक्के साखर कारखान्यांना फायदा असुन शेतक-यांना चालू गळीत हगामामध्ये प्रती टन ३७५० /- रुपये दर एक रकमी मिळाला पाहीजे या बाबत मार्गदर्शन करण्यात आले, तसेच दिनांक ६.११.२०१५ रोजी साखर आयुक्त कार्यालय पुणे येथे जावून साखर आयुक्त यांचेशी चालू गळीत हगामामध्ये प्रती टन ३७५० /- रुपये दर एक रकमी मिळाला पाहीजे याबाबत चर्चा करुन मागण्याचे निवेदन देण्यात येणार असले बाबत सांगितले आहे. सदर मेळाव्यामध्ये ३५ ते ४० शेतकरी सहभागी झाले होते |
| २०. | पाणी संघर्ष समिती उमदी | अध्यक्ष श्री. सुनील गणपती पोतदार | उमदी ते जिल्हाधिकारी सांगली | दि. ०१.०७.२०१५ रोजी ११.०० वा ते ०६.०७.२०१५ रोजी १३.०० वा. पर्यंत पदयात्रा व दि.०६.०७.१५ ते ०९.०७.१५ रोजी ११.३० वा पर्यंत ठिय्या आंदोलन | पदयात्रा व ठिय्या आंदोलन :- जत तालुक्यातील पाणी प्रश्ना संदर्भात शासनाने पाणी संघर्ष समितीस दिलेली लेखी आश्वासने पूर्ण न केलेचे निषेधार्थ यांचे नेतृत्वाखाली दि. ०१.०७.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा पासून उमदी ते सांगली अशी पदयात्रा सुरु केलेली पदयात्रा दिनांक ०६.०७.२०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे १३.०० वा आल्या नंतर सदर रॅलीचे सभेत रुपांतर होवून रॅलीस खा.श्री. संजय काका पाटील, आ.श्री. विलासराव जगताप, आ.श्री. सुरेश खाडे, आ.श्री. सुधिर गाडगीळ, आ.श्री. शिवाजीराव नाईक, माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, नितीन शिंदे - मनसे व सुनिल पोतदार व इतर पदाधिकारी यांनी मार्गदर्शनपर भाषण करुन त्यांच्या मागण्याचे निवेदन शिष्टमंडळाव्दारे जिल्हाधिकारी,सांगली यांना देण्यात आले. व मागण्या मान्य होईपर्यंत दिनांक ६.७.२०१५ रोजी पासून ७० ते ७५ ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालय सांगली समोर ठिया आंदोलन सुरु केले होते. महाराष्ट्र शासनाने मागण्यांच्या पूर्ततेसाठी ३२ कोटी रुपये निधी मंजूर केलेने ग्रामस्थांनी दि. ०९.०७.२०१५ रोजी ११.३० वा आपले आंदोलन स्थगीत केले आहे. ठिय्या आंदोलनास सुमारे ७० ते ७५ लोक हजर होते |
| २१. | पाणी संघर्ष समिती उमदी | अध्यक्ष श्री. सुनील गणपती पोतदार | उमदी ता. जत | १०.०७.२०१५ रोजी १९.०० वा ते २०.३० वा या वेळेत | नागरी सत्कार सोहळा:- पाणी संघर्ष समिती उमदीचे वतीने अध्यक्ष श्री. सुनील पोतदार यांचे नेतृत्वाखाली जत तालुका पुर्व भागातील ४२ गांवाना म्हैशाळ योजनेचे पाणी मिळावे या व इ तर मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या उमदी ते जिल्हाधिकारी सांगली पदयात्रेस यश मिळून मागण्या मान्य होऊ योजनेस निधी मंजूर होण्यात मा. खासदार संजयकाका पाटील, मा.आमदार विलासराव जगताप यांनी शासन दरबारी प्रयत्न केलेने त्यांच्या सत्कारासाठी नागरी सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. सुमारे १०० ते १२५ लोक हजर होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२. | सांगली जिल्हा कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना | सचिव प्रा.एन डी बिरनाळे | आमराई ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | दि. २२.०७.२०१५ रोजी १४.५० ते १६.३० या वेळेत | मोर्चा :- २०११-१२ पासून २०१४-१५ पर्यंत वाढीव पदांना त्वरीत मान्यता दयावी, ऑनलाईन मान्यता त्रुटी दूर कराव्यात, सन २००७ ते २०१५ अख्रेर वाढीव पदावरील शिक्षकांना पगार मिळावा या व इतर मागण्यासाठी असा मोर्चा काढला. सदरचा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. दरम्यान मुदतीत आपल्या मागण्यांचे निवेदन निवासी जिल्हाधिकारी श्री. शिंदे यांना दिले. जनसमुदाय- १०० ते १२५ |
| २३. | ग्रामस्थ | श्री.विनोद गजानन सुर्यवंशी रा.बेलवडे | कडेगाव तहसीलदार कार्यालया समोर | दि.२८.०८.२०१५ रोजी १०.०० वा | उपोषण : ग्रामस्थ टेंभू उपसा जलसिंचन पोट कालवा क्रमांक ७ मधून पाणी मिळावे या मागणीसाठी उपोषणस बसले होते. तसेच काशीनाथ लक्ष्मण चव्हाण ,पांडूरंग गणपती चव्हाण दोन्ही रा.विहापूर यांनी टेंभू उपसा जलसिंचन पोट क०.२ कालवा क्रमांक ७ हा विहापूर गावचे जमीन गट नंबर २०८/२०९ मधून बळजबरीने गैरहाक्काने सर्व्हे नसताना काढलेला पोट कालवा सर्व्हे झालेल्या शेतातून काढावा,काढण्यात आलेला कालवा मुजवून नुकसान भरपाई मिळावी या मागणीसाठी दिनांक ३१.०८.२०१५ रोजी तहसीलदार कार्यालया समोर कुंटूबासह आत्मदहन करणार म्हणून इशारा दिला होता.दिनांक २८.०८.२०१५ रोजी १०.३० ते १५.३० या वेळेत मुख्य कार्यकारी अभियंता टेभु उपसा योजना ओगलेवाडी यांचे कार्यालयात श्री.झिंगटे मुख्य कार्यकारी अभियंता यांचे उपस्थितीत बैठक पार पडली. बैठकीत आंदोलकांच्या मागणीबाबत चर्चा झाली.त्यात विहापूर गट जमीन नं २०८,२०९ संपादित करावयाच्या जमिनीचा प्रस्ताव तातडीने महसूल विभागाकडे पाठविणे विहापूर येडे रस्त्याकडील पुर्वे कडील भराव रस्ते बांध ठेवून काढून घेणे पाणी चालू करणे व आंदोलन कर्त्याच्या संमती शिवाय दोन्ही बाजूचा रस्ता भराव करावयाचा नाही असे सर्वानीमते ठरले.सदर बाबतचे प्रोसेडींग तयार करुन त्यांची प्रत आंदोलन कर्त्याना दिल्याने आंदोलन कर्ते श्री.विनोद गजानन सुर्यवंशी,मनोज किसनराव मोहिते,पोपट विठोबा मुळीक,विशाल सिध्दनाथ सुर्यवंशी ,रविंद्र शंकर सुर्यवंशी यांनी १८.३० वा प्रांत कडेगाव यांच्या हस्ते सरबत घेवून उपोषण मागे घेतले आहे. काशीनाथ लक्ष्मण चव्हाण,पांडूरंग गणपती चव्हाण यांनीही दिनांक ३१.०८.२०१५ रोजीचे कुंटूबासह आत्मदहन आंदोलन मागे घेतले आहे. |
| २४. | स्वाभीमानी शेतकरी संघटना | खासदार राजू शेट्टी व प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत रा.मरळनाथपूर ता.वाळवा जि.सांगली | स्वाभीमानी शेतकरी संघटनेच्या जिल्हा कार्यालयामध्ये | ०४.१०.२०१५ रोजी १४.२५ वा.१६.४५ वा | बैठक व पत्रकार परिषद :- यापूर्वीच्या गळीत हंगामात साखर कारखान्यात ऊसाला शासनाच्या एफआरपी प्रमाणे दर दयावा या मागणीसाठी तसेच म्हैशाळ योजनेच्या पाणीपट्टीची थकबाकी शेतक-यांच्या सातबा-यावर चढविण्याची शासनाने तयारी केली आहे त्यास विरोध करण्यासाठी नियोजनाची बैठक व पत्रकार परिषद घेतली. बैठकीस स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे १२५ ते १५० कार्यकर्ते उपस्थित होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५. | स्वाभीमानी शेतकरी संघटना | श्री. रविकांत तुपकर, अध्यक्ष- वस्त्रोद्योग महामंडळ,महाराष्ट्र राज्य | पाडळी, कांदे व मांगले | ११.१०.२०१५ रोजी १८.०० ते २२.०० | जाहिर सभा :- सभेमध्ये प्रमुख वक्त्यांनी दिनांक.१६.१०.२०१५ रोजी कोल्हापूर येथे आयोजीत केले मोर्चामध्ये मोठया संख्येने हजर राहणेबाबत व एफ.आर.पी.ची. रक्कम एक रक्कमी घ्यायची या बाबत मार्गदर्शन केले. प्रत्येक ठिकाणी १०० ते १२५ कार्यकर्ते हजर होते. |
| २६. | स्वाभीमानी शेतकरी संघटना | श्री जयकुमार जिनपाल कोले वश्री राजू शेट्टी – खासदार स्वाभिमानी शेतकरीस संघटना, श्री विकास देशमुख- [illegible] | सोसायटी चौक्, अंकलखोप | १४.१०.२०१५ रोजी २०.०० वा. ते २१.३० वा. | सभा :- एफआरपी प्रमाणे ऊसास दर मिळाल्या शिवाय साखर कारखान्यांना गाळप परवाना देण्यात येवू नये, ज्या कारखान्यानी मागील गाळपाचा अर्धवट एफआरपी दिलेला आहे, एक रकमी एफआरपी मिळावी या व इतर मागण्यासाठी दिनांक १६.१०.२०१५ रोजी कोल्हापूर येथे साखर उपआयुक्त कार्यालयावर मोर्चा आयोजीत केला आहे सदर मोर्चास मोठया संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सदर सभेस ४०० ते ५०० शेतकरी उपस्थीत होते. |
| २७ | शेतकरी संघटना (रघुनाथ पाटील गट) | श्री रघुनाथ पाटील- अध्यक्ष शेतकरी संघटना | कवलापूर हनुमान मंदीरासमोरील पटांगणामध्ये | २७.१०.२०१५ रोजी १८.१५ वा. ते १९.५० वा. | सभा :- शेतकरी संघटना (रघुनाथ पाटील गट) चे वतीने सभा पार पडली. सभेस श्री रघुनाथ पाटील- अध्यक्ष शेतकरी संघटना, श्री शिवाजी नाना नानखिले- प्रदेशाध्यक्ष क्रांतीसिंह नाना पाटील ब्रिगेड रा. पुणे, श्री अरुण सावंत – जिल्हा उपाध्यक्ष शेतकरी संघटना रा. कवलापूर यांचे सह १२५-१५० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| २८ | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री महावीर पाटील –जिल्हा उपाध्यक्ष | ग्रामपंचायत कार्यालय नांद्रे समोरील रोडवर | ५.११.२०१५ रोजी १९.४५ वा. ते २१.१५ वा | सभा - : सभेच्या वेळी श्री राजू शेट्टी – खासदार स्वाभिमानी शेतकरी संघटना, श्री सदाभाऊ खोत- प्रदेशाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना, श्री रविकांत तुपकर- अध्यक्ष खादी ग्रामोदयोग विकास महामंडळ यांची भाषणे झाली. सदर वेळी उपस्थीत वक्त्यांनी आपले भाषणामध्ये साखर कारखानदार एफआरपीचे रक्ककमेचे तीन तुकडे करणार आहेत त्यांचा डाव हाणून पाडला पाहीजे, एफआरपीची बिले एक रकमी घेतल्यास शेतक-यांचा फायदा आहे. एफआरपीचे तुकडे पाडल्यास शेतक-यांचे नुकसान आहे. या बाबत मार्गदर्शन करुन दिनांक ६.११.२०१५ रोजी जयसिंगपूर ता.शिरोळ जि. कोल्हापूर येथील ऊस परिषदेस मोठया संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन केले. सदर सभेस ५०० ते ५५० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| २९ | आंत्री बद्रूक शेतकरी | श्री. रणधीर शिवाजीराव नाईक, जि प सदस्य | आंत्री बुद्रूक ते तहसील कार्यालय शिराळा | ०६.११.२०१५ रोजी ११.०० ते १४.०० | पदयात्रा व सभा - : ५०० ते ६०० शेतक-यांनी शिराळा तालुका टंचाईग्रस्त गावांमध्ये समाविष्ट करुन दुष्काळ जाहीर करावा. वाकुर्डे योजनेच पाणी मोरणा नदीमध्ये तातडीने सोडावे व वाकुर्डे बुद्रूक योजना त्वरीत सुरु करावी. या व इतर मागण्याकरीता पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रा तहसील कार्यालयासमोर आल्यानंतर सभेत रुपांतर झाले. प्रमुख वक्त्यांनी मागण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर शिष्ठमंडळाने मागण्याचे निवेदन श्री. विजय पाटील,तहसिलदार शिराळा यांना देण्यात आले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३० | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री सदाभाऊ खोत प्रदेशाध्यक्ष | गेस्ट हाऊस, इस्लांमपूर | ८.१२.२०१५ रोजी १५.०० | पत्रकार परिषद :- श्री सदाभाऊ खोत यांनी पत्रकार परिषदेमध्ये, साखर कारखाना संचालकांनी ऊसाला एफआरपी प्रमाणे एकरकमी दर दिला पाहीजे या मागणीसाठी दिनांक १३.१२.२०१५ रोजी सांगली जिल्हयामध्ये विविध ठिकाणी चक्का जाम आंदोलन करण्यात येणार आहे. त्यावेळी वैदयकीय सेवा वगळून दुध,ऊस वाहतुक करणारी व इतर वाहने रोखून धरणेत येणार आहेत. सदर दिवशी नागरीकांनी बाहेर पडू नये अन्यथा आंदोलन चिघळले जावून आंदोलन पुढे सुरु ठेवावे लागेल वगैरे सांगितले आहे. |
| ३१ | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री सदाभाऊ खोत प्रदेशाध्यक्ष | पत्रकारभवन पुणे | १५/१२/२०१५ रोजी १६.३० वा. ते १७.१५ वा. | पत्रकार परिषद :- पत्रकारभवन येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते श्री सदाभाऊ खोत रा. मरळनाथपुर व विकास देशमूख रा. कोकरुड (जिल्हाध्यक्ष) यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेवून सांगली जिल्हयातील साखर कारखानदारांनी ऊसाला प्रतिटन पहिला हप्ता १७००/- रुपये देण्याचा प्रयत्न चालू केलेचे विरोधात आंदोलनाच्या पहील्या टप्प्यात दि. १६.१२.२०१५ रोजी चे १७.०० वा. पासून ऊसतोडी व ऊस वाहतूक बेमुदत बंद करण्याचे जाहीर केले आहे. तसेच कारखानदारांनी व वाहन मालकांनी बळजबरीने ऊस नेण्याचा प्रयत्न केलेस तोडी बंद पाडून वाहनांची तोडफोड केली जाईल, तसेच साखर कारखान्यांच्या गट कार्यालयांना कुलपे लावली जातील. कारखान्यांच्या कर्मचायांना, संचालकाना व अध्यक्षांना गावात फिरु देणार नाही व फिरले तर चोप दिला जाईल असा इशारा दिला आहे. आंदोलनाच्या दुस-या टप्यात दोन दिवसानंतर रास्ता रोको, राज्य व राष्ट्रीय महामार्गाची अडवणूक करुन मुंबई पुण्याची वाहतुक, दुध, भाजीपाला पुर्णपणे थांबविण्यात येईल. कारखाण्यातून बाहेर पडणारी साखर रोखली जाईल, कारखाण्यावर धडक मोर्चे काढले जातील व सदरचे आंदोलन एक रक्कमी एफ.आर.पी. निर्णय झाल्याशिवाय थांबणार नसल्याचे जाहीर केले आहे. एकंदरीत नागपूर येथे शासन, कारखानदार, संघटना यामध्ये झालेल्या बैठकीत ८०टक्के प्रथम उर्वरीत २० टक्के नंतर अशी एफ.आर.पी. ची रक्कम देण्याचे मान्य केल्याचे संघटना सांगत आहे, परंतु प्रत्यक्षात कारखानदार १७००/- रु पहिली उचल देण्याच्या मनस्थितीमध्ये असल्यामुळे शेतक-यामध्ये नाराजी आहे. त्याचा फायदा स्वाभिमानी शेतकरी संघटना घेवून आंदोलन छेडून संघटना बळकट करण्याचा प्रयत्न करीत आहे. |
| ३२ | स्वाभिमानी शेतकरी संघटना | श्री सदाभाऊ खोत प्रदेशाध्यक्ष | इस्लामपूर शासकिय विश्रामगृह | १७.१२.२०१५ रोजी १२.४५ वा.ते १३.०५ | बैठक : - दि.१८.१२.२०१५ रोजी एफआरपीची ८० टक्के रक्कमी शेतक-यांचे खात्यात तात्काळ जमा व्हावी या मागणीसाठी सांगली जिल्हयात करण्यात येणा-या चक्का जाम आंदोलनाची पुर्वतयारी व कार्यकर्त्यांना सुचना देण्याबाबतची बैठक आज दि.१७.१२.२०१५ रोजी १२.४५ वा.ते १३.०५ वा.पर्यंत इस्लामपूर शासकिय विश्रामगृह येथे पार पडली. सदर बैठकीस श्री.सदाभाऊ खोत रा.मरळनाथपुर (प्रदेशाध्यक्ष) यांनी मार्गदर्शन केले असून बैठकीस १.श्री.विकास देशमुख रा.कोकरुड-जिल्हाअध्यक्ष, २.भास्कर नाना कदम रा.इस्लामपूर- कार्याध्यक्ष, ३.भागवत जाधव रा.इस्लामपूर, ४.राम पाटील रा.शिराळा (तालुका अध्यक्ष) वगैरे २५/३० संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. सदरची बैठक संपल्यानंतर श्री सदाभाऊ खोत हे सांगली येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेस उपस्थित राहण्यासाठी प्रमुख्र कार्यकर्त्यासह सांगली करीता रवाना झाले. १४.३५ वा.ते १५.०५ वा. या वेळेत स्वभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष श्री सदाभाऊ खोत यांनी पुष्पराज चौक,सांगली येथील संघटनेचे जिल्हा कार्यालयात पत्रकार बैठक घेतली |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३३ | शेतकरी संघटना (रघुनाथ पाटील गट) | श्री महादेव शंकर कोरे- जिल्हाध्यक्ष | किसान चौक मिरज | ९.१२.२०१५ रोजी १८.२० वा.ते २०.३० वा. | सभा :- सातवा वेतन आयोग रद्द करावा, ऊसाला एफआरपी प्रमाणे एक रक्कमी दर मिळावा या व इतर विषयावर सभा पार पडली. सभे मध्ये श्री सतनाथ सिंग बेरु - अध्यक्ष शेतकरी महासंघ पंजाब, श्री रघुनाथदादा पाटील- अध्यक्ष, शेतकरी संघटना, श्री शिवाजीराव नांदखिले- प्रदेशाध्यक्ष क्रांतीसिंह नोना पाटील ब्रिगेड महाराष्ट्र राज्य, श्री महादेव कोरे - जिल्हा अध्यक्ष शेतकरी संघटना या प्रमुख वक्त्यांची भाषणे झाली. सदर सभेस १०० ते १२५ जनसमुदाय उपस्थीत होता. |
| ३४ | शेतकरी संघटना (रघुनाथदादा पाटील गट) | श्री महादेव कोरे- जिल्हाध्यक्ष | मार्केट यार्ड तासगांव | १२.१२.२०१५ रोजी ११.१५ वा. ते १२.३५ वा. | निवेदन : - शासकीय नोकरांना सातवा वेतन आयोग लागू करु नये, शेतीमालावरील निर्यात बंदी उठवावी, ऊसाला एफआरपी प्रमाणे एक रकमी दर मिळावा या व इतर मागण्याचे निवेदन श्री संजयकाका पाटील- खासदार भाजपा यांना दिनांक १२.१२.२०१५ रोजी ११.१५ वा. ते १२.३५ वा. या वेळेत मार्केट यार्ड तासगांव येथे दिले. |
| ३५ | शेतकरी संघटना (रघुनाथदादा पाटील गट) व अखिल भारतीय शेतकरी शर्यत बचाव संघर्ष कृती समिती | श्री रघुनाथ पाटील- अध्यक्ष शेतकरी संघटना रा. साखराळे व श्री प्रसाद गणपतराव धर्माधिकारी - अध्यक्ष अखिल भारतीय शेतकरी शर्यत बचाव संघर्ष कृती समिती | राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४, सांगली व कोल्हापूर जिल्हा सिमा हद्दीवर किणी-वाठार पुलावर | २१/१२/२०१५ रोजी १२.१५ वा ते १२.३५ | रस्ता रोको : - १. गोवंश हत्याबंदी कायदा हा चुकीच्या पध्दतीने राबविलाजात असुन त्यामुळे भाकड व अनुउत्पादक गोवंश जनावरांची संख्या वाढत आहे. अशा जनावरांचे संगोपन करण्यासाठी शेतक-यास नाहक खर्च होतो तो शेतक-यांना पेलवत नाही तरी गोवंश हत्या बंदी कायदयाचा फेरविचार करुन दुरुस्ती करावी २. बैलगाडी शर्यतीवरील बंदी उठवावी व पुर्ववत बैलगाडया शर्यती घेण्यास परवानगी दयावी ३. उसाची एफ आर पी. रक्कम एक रकमी एकाच टप्प्यात मिळावी ४. दुधाचे भाव कमी होत आहेत त्यामध्ये शासन हस्तक्षेप करीत नाही शासनाने हस्तक्षेप करुन.दुधाची दरवाढ करणेबाबत योग्य नियोजन करावे ५. शेतक-याच्या अन्य शेतीमालाच्या किंमती कमी होत आहेत त्यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही तरी शासनाने अन्य शेतमालाच्या किंमतीबाबत परिणामकारक धोरण तयार करुन शेतक-याचे अन्य शेती मालांस कायमस्वरुपी हमी भाव दयावा ६. शेतक-याच्या आत्महत्याकरण्याच्या प्रमाणांत वाढ झालेली आहे त्यामध्ये शासनाचा दृष्टिकोन उदासीन आहे शेतक-याच्या आत्महत्या बंद होण्यासाठी शासनाने शेतक-याची कर्जमाफी करावी . शेतीमालांस हमी भाव दयावा शेतक-याचे कल्याणासाठी योग्य त्या उपाय योजना सुरु कराव्यात ७. शेतक-याच्या प्रश्नाकडे शासन जाणुनबुजून दुर्लक्ष करीत आहे शासन भांडवलशाहीचा विचार करीत आहे. या व इतर मागण्याकरीता शेतकरी सघटना (रघुनाथदादा पाटील गट) व अखिल भारतीय शेतकरी शर्यत बचाव संघर्ष कृती समिती यांच्या वतीने श्री रघुनाथ पाटील- अध्यक्ष शेतकरी संघटना रा. साखराळे व श्री प्रसाद गणपतराव धर्माधिकारी -अध्यक्ष अखिल भारतीय शेतकरी शर्यत बचाव संघर्ष कृती समिती यांचे नेतृत्वाखाली राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४, सांगली व कोल्हापूर जिल्हा सिमा हद्दीवर किणी-वाठार पुलावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. रस्ता रोको आंदोलनास १५०/२०० कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते. |

# हिदुत्ववादी हालचाल

| अनं | पक्ष/ संघटना | नेतृत्व | ठिकाण | दिनांक व वेळ | घटनेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १. | हिंदू समाज | श्री भक्तराज ठिगळे यांचे नेतृत्वाखाली | शिवाजी चौक विटा | दिनांक १.१.२०१५ रोजी | **निवेदन** :- विटा शहरातील प्रसाद व भैरवनाथ या दोन चित्रपटा गृहामध्ये पीके चित्रपट प्रदर्शित होत होता. ` वतीने चित्रपट गृह मालकांना पीके चित्रपटामध्ये हिंदू धर्माच्या भावना दुखवणारी दृश्ये व संवाद दाखविण्यात आले असल्याने सदर चित्रपट बंद करावा या मागणी करीता<br>चित्रपट गृह मालक व आंदोलन कर्ते यांचे मध्ये चर्चा होवून चित्रपट गृह मालकांनी चित्रपट दाखविण्योचे बंद करण्याचे ठरले त्यामुळे आंदोलन कर्ते यांनी त्यांचे आंदोलन स्थगित केले आहे. |
| २. | शिवप्रतिष्ठाण | श्री संभाजी भिडे- संस्थापक | श्री वैराटगड ते श्रीसप्तर्षीगड मार्गे श्री क्षेत्र धावडशी जि. सातारा | दिनांक १५.१.२०१५ ते १८.१.२०१५ | गडमोहीमः-शिवप्रतिष्ठानचे वतीने दिनांक १५.१.२०१५ ते १८.१.२०१५ या कालावधी मधील श्री वैराटगड ते श्रीसप्तर्षीगड मार्गे श्री क्षेत्र धावडशी जि. सातारा अशी काढणेत येणा-या गडकोट मोहीमेमध्ये सहभागी होण्यासाठी सांगली जिल्हयातून खालील प्रमाणे कार्यकर्ते रवाना झाले. |

| अ.नं. | नेतृत्व करणाराचे नांव | जनसमुदाय |
|---|---|---|
| १ | श्री संभाजीराव भिडे (गुरुजी )- | ४०० ते ५०० |
| २ | श्री विनायक माईणकर रा. मिरज | १०० ते १२५ |
| ३ | श्री सतिश बापट रा. आष्टा | ८० ते ९० |
| ४ | श्री विनोद बसुगडे रा. आष्टा | २५ ते ३० |
| ५ | श्री आनंदा धनवडे रा. तासगांव | ७५ ते ८० |
| ६ | श्री राहुल रमेश टिंगरे रा. खानापूर | ६० ते ७० |
| ७ | श्री अभिजीत बोडरे रा. विटा | ६०ते ७० |
| ८ | श्री गजानन पाटील रा. इस्लांमपूर | १० ते १५ |
| ९ | श्री प्रशांत पतंगराव पाटील रा.अंकलखोप | ४ ते ५ |
| १० | श्री राजेंद्र रामचंद्र खुर्द रा. शिराळा | १०० ते १२५ |
| ११ | श्री प्रदिप शिंदे रा. कवठे महंकाळ | ४० ते ५० |
| १२ | श्री सुनिल केशव लाड रा. कवलापूर | ४० ते ४५ |
| १३ | श्री सागर केशव पाटील रा.कवठे पिरान | १० ते १५ |
| १४ | श्री संजय हजारे रा. समडोळी | २० ते २५ |
| १५ | श्री चंद्रकांत शिंदे रा. कसबे डिग्रज | ३५ ते ४० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री सिद्राम आप्पा स्वामी | श्री रामराव विदयामंदीर हायस्कुलचे जत | २२.२.२०१५ १४.३० वा. ते १७.४५ | **व्याख्यान** :- छ. संभाजी महाराज बलीदान मास चे अनुषंगाने श्री संभाजी भिडे- संस्थापक अध्यक्ष श्री शिवप्रतिष्ठान हिदुस्तान यांचा व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. जनसमुदाय-१०० ते १२५ |
| ४. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री मिलींद मानगुडे | सग्राम लॉन पलूस | २३.२.२०१५ १९.०० वा. ते २०.५५ | **व्याख्यान**- छ. संभाजी महाराज बलीदान मास चे अनुषंगाने श्री संभाजी भिडे- संस्थापक अध्यक्ष श्री शिवप्रतिष्ठान हिदुस्तान यांचा व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. जनसमुदाय- ३०० ते ३५० |
| ५. | शिवप्रतिष्ठान हिदुस्तान | श्री प्रदीप वसंत शिंदे | ग्रामपंचायत नाटयगृह कवठे महंकाळ | २१.२.२०१५ १४.०० वा. ते १६.३० वा. | **व्याख्यान**: - छ. संभाजी महाराज बलीदान मास चे अनुषंगाने श्री संभाजी भिडे- संस्थापक अध्यक्ष श्री शिवप्रतिष्ठान हिदुस्तान यांचा व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. जनसमुदाय- ४०० ते ५०० शिवप्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थीत होते. |
| ६. | श्री शिवप्रतिष्ठान हिंदूस्तान | आनंदराव चव्हाण | टिळक चौक - बालाजी चौक - मारुती चौक- | दिनांक ०१.०३.२०१५ रोजी १०.३० वा. | **शोभा यात्रा** - श्री संभाजी भिडे- संस्थापक अध्यक्ष श्री शिवप्रतिष्ठान हिंदूस्तान यांचे उपस्थीत वडबुद्रूक जि. पुणे येथून छ. संभाजी महाराज यांची धर्मवीर ज्वाला आणण्यात आली. सदर धर्मवीर ज्वालेचे ेस्वागत करण्यात आले.<br>३० ते ३५ मोटार सायकल वरुन सांगली शहरातून शोभा यात्रा काढली. शोभा यात्रा छ. शिवाजी पुतळा येथे आल्यानंतर ध्येय मंत्र म्हणून शोभा यात्रेची सांगता झाली.<br>जनसमुदाय - ६० ते ७० |
| ७. | **शिवप्रतिष्ठान** कार्यकर्ते | ---- | मारुती चौक सांगली | १५.३.२०१५ रोजी १६.४५ वा. ते १९.३० वा. | दि.१९.२.२०१५ पासुन छ.संभाजी महाराज बलीदान मास सुरु झालेला असून सदर बलीदान मास श्री शिवप्रतिष्ठान चे वतीने तिल्हयात महीना भर साजरा केला जातो.त्या निमित्ताने विविध कार्यक्रम सुरु आहेत.<br>धर्मवीर संभाजी महाराज बलीदान मास निमित्त शिवप्रतिष्ठान, सांगलीचे वतीने दिनांक ९.३.२०१५ रोजी वडबुद्रुक जि. पुणे येथून धर्मवीर ज्वाला (ज्योत) आणून मारुती मंदीर, मारुती चौक, सांगली येथे आणून ठेवण्यात आली आहे. सांगली जिल्हयातील कवलापूर, बुधगांव, अंकली, समडोळी, कसबे डिग्रज, कवठे पिरान, बामनोळी, पदमाळे गावांमधून तसेच कोल्हापूर जिल्हयातील नांदणी, शिरोळ, जयसिंगपूर, कुरुंदवाड या गांवामधील सुमारे ४०० ते ४५० शिवप्रतिष्ठान कार्यकर्ते मारुती चौक सांगली येथे येवून मारुती मंदीर येथे ठेवण्यात आले धर्मवीर ज्वालेस (ज्योतीस) दुस-या धर्मवीर ज्वाला पेटवून घेवून आपआपल्या गांवी गेले आहेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८. | संभाजी ब्रिगेड | संजय पाटील | मिशन कंपौड ,जिल्हा परिषद जवळ सांगली | ७.३.२०१५ व ८.३.२०१५ रोजी | **राज्यस्तरीय अधिवेशन** - संभाजी ब्रिगेड या संघटनेचे ८ वे राज्यस्तरीय अधिवेशन उद्घाटन कार्यक्रम व ८ सत्रा मध्ये पार पडले.सदर अधिवेशनाचे ठिकाणी प्रमुख प्रवेशव्दारास कै आर आर पाटील प्रवेशव्दार, सभागृहास कै. पद्मभुषण वसंतदादा पाटील व कार्यक्रम स्थळास क्रांतीसिंह नाना पाटील, व्यासपीठास कॉ.कै गोविंद पानसरे, पुस्तक विक्री ठिकाणास कै नागनाथ नायकवडी, कै जी.डी. (बापू) लाड, डॉ बाबासाहेब आंबेडकर अशी नांवे देण्यात आली होती. तसेच सभा मंडपात कै. यशवंतराव चव्हाण, कै वसंतदादा पाटील, कै राजाराम बापू पाटील, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, शहीद भगतसिंग, अहिल्याबाई होळकर, छ. शाहू महाराज, संत गाडगे महाराज, रविंद्रनाथ टागोर इत्यादी थोर महापुरुषांची तैलचित्रे लावण्यात आलेली होती व व्यासपीठावर शेतक-यांचे सन्मानत--- संभाजी ब्रिगेड मैदानात, एकच ध्यास, तरुणांचा आर्थिक विकास, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड असे लिहलेला दोन्ही बाजूस वरील कोप-यामध्ये राजमाता जिजाऊ व छ.शिवाजी महाराज यांचे फोटो व मध्यभागी छ. संभाजी महाराज यांचा मोठा फोटो असेलेला फलक लावण्यात आला होता.<br>**उद्घाटन :-** दिनांक ७.३.२०१५ रोजी १०.०० वाजता जिजाऊ वंदन व संभाजी ब्रिगेड यांचे वतीने आलेल्या शाहीरांनी आपली शाहीरी गीते सादर केली. त्यानंतर आमदार श्री जगन्नाथ शिंदे - अध्यक्ष केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोशिएशन महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते दिप प्रज्वलन करुन झाले. सदर कार्यक्रमास श्री विवेक कांबळे- महापौर सांमिकु,मनपा सांगली, माजी आमदार श्री हाफीजभाई धत्तुरे, श्री मनोज शिंदे, श्री दिग्वीजय सुर्यवंशी- नगरसेवक सामिकु मनपा, ॲड. मनोज आखरे, श्री संजय देसाई, श्री वैभव शिंदे व इतर संभाजी ब्रिगेडचे १५ ते २० पदाधिकारी स्टेजवर उपस्थीत होते. उद्घाटन कार्यक्रमाचे वेळी हिंदकेसरी विजेता श्री सुनिल साळुंखे, व भंगारातून क्रेन निर्माण करणारे श्री महादेव जगताप यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे ठिकाणी विविध महापुरुषांच्या नावांने सद्भावना ज्योती आणल्या जात होत्या. त्या मध्ये मुस्लीम समाज ही सहभागी झालेला होता. उद्घाटन कार्यक्रमांचे वेळी प्रमुख वक्ते १. ॲड. मनोज आखरे २. आमदार श्री जगन्नाथ शिंदे ३. श्री यशवंत गोसावी- ४. श्री अमोल मिटकरी – ५. श्री मुन्नान शेख ६. प्रा. श्री गंगाधर बनबरे- ७. श्रीमंत कोकाटे ८. श्री सतिश चव्हाण ९. श्री पुरुषोत्तम खेडेकर यांची भाषणे झाली सदर बाबतचा सविस्तर अहवाल अलाहिदा सादर करण्यात आलेला आहे. |
| ९. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान सांगली. | श्री नितीन चौगुले- कार्यवाह शिवप्रतिष्ठान | सांगली शहर(मारुती चौक ते शहरातील प्रमुख मार्गाने फिरुन परत मारुती चौक) | २०.३.२०१५ रोजी ०८.०० ते ०९.३५ | मुक अंतयात्रा-- शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान सांगलीचे वतीने सांगली जिल्हयामध्ये दिनांक २१.२.२०१५ ते २०.३.२०१५ या कालावधीमध्ये छ. संभाजी महाराज बलीदान मास पाळण्यात आला. छ. संभाजी महाराज बलीदान मास निमित्त सांगली जिल्हयामध्ये चौका चौकामध्ये छ. संभाजी महाराज यांचे फोटो लावून ध्येयमंत्र व प्रेरणामंत्र म्हणण्यात येत होते.<br>छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री विनायक कुलकर्णी | मिरज शह | २०.३.२०१५ रोजी १९.१० ते २०.३५ | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय १५० ते २०० |
| ११. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री सुनिल केशव लाड | कवलापूर | २०.३.२०१५ रोजी १०.०० ते १०.३० | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय ७० ते ८० |
| १२. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री सागर वसंतराव पाटील | कवठे पिरान | २०.३.२०१५ रोजी १८.०० ते १८.४५ | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय १०० ते १२५ |
| १३. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री संजय हजारे | समडोळी | २०.३.२०१५ रोजी १९.०० ते १९.४५ | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय १०० ते १२५ |
| १४. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री चंद्रकांत शिंदे | कसबे डिग्रज | २०.३.२०१५ रोजी १९.३० ते २०१० | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय १०० ते १२५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री सतिश बापट | आष्टा | २०.३.२०१५ रोजी १८.३५ ते १९.२० | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय १०० ते १२५ |
| १६. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री शरद कमलाकर पाटील | बागणी | २०.३.२०१५ रोजी १९.०० ते २०.१० | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय ९० ते १०० |
| १७. | शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान | श्री महेश बाबर | विटा | २०.३.२०१५ रोजी १९.०० ते २०.०० | मुक अंतयात्रा-- छ. संभाजी महाराज बलीदान मासची सांगता दिनांक २०.३.२०१५ रोजी छ. संभाजी महाराज यांचे पुण्यतिथी दिवशी मुक अंतयात्रा काढून छ. संभाजी महाराज यांना श्रध्दांजली वाहून झाली. जनसमुदाय ८० ते ९० |
| १८. | हिंदू जनजागृती समिती, सनातन संस्था | श्री दत्तात्रय विष्णू रेठरेकर- अध्यक्ष हिंदू जनजागृती समिती | राजवाडा चौक- भारती विदयापीठ- कापड पेठ- मारुती चौक | १८.१०.२०१५ रोजी १६.०० वा. ते १८.३० वा. | निषेध फेरी :- श्री दत्तात्रय विष्णू रेठरेकर- अध्यक्ष हिंदू जनजागृती समिती यांचे नेतृत्वाखाली व श्री अभय वर्तक – प्रवक्ते सनातन संस्था, श्री नितीन शिंदे- महाराष्ट्र नव निर्माण सेना, श्री तानाजी सातपुते- शिवसेना मिरज, श्री किरण कुलकर्णी- शिवसेना कागल, श्री राजेंद्र मुणगे – हिंदू जनजागृती समिती, श्री सचिन पवार- शिवप्रतिष्ठान सांगली, श्री चंद्रकांत मैगुरे- शिवप्रतिष्ठान मिरज, श्री रमाकांत बोंगाळे- महाराज वारकरी संप्रदाय, श्रीमती प्रतिभाताई तावरे- सनातन संस्था विटा, श्रीमती मधुरा तोफखाने, श्रीमती गौरी खिलारे- सनातन संस्था, श्री प्रशांत चव्हाण - सनातन संस्था तासगांव, श्री मानसिंग शिंदे, श्री प्रविण कवठेकर, श्री कृष्णा माळी, श्री हरीदास कालीदास, श्री इरगोंडा पाटील (रुद्र पाटील-गोवा बॉम्ब स्फोट आरोपी याचे चुलते) रा. काराजंगी यांचे प्रमुख उपस्थीत ३५०-४०० स्त्री – पुरुष कार्यकर्त्यांनी जगतगुरु शंकराचार्य स्वामी स्वरुपानंद सरस्वती सेना वारकरी संप्रदाय, संत महंत हिंदुत्ववादी संघटना इत्यादीनी सनातन संस्थेला ठोस पाठींबा दिला असतानाही बेछुट आणि विध्देषी आरोप करुन सनातन संस्थेवर बंदीची मागणी केली जात आहे. कॉ. गोविंद पानसरे यांचे हत्ये प्रकरणी पोलीस यंत्रणेने कोणत्याही दबावास बळी न पडता चौकशी करावी. तसेच राष्ट्रप्रेमी सनातन संस्थेवर होत असलेला अन्याय आणि बंदीच्या विरोधात ठोस भुमिका घेण्यात यावी या मागणीसाठी निषेध फेरी काढण्यात आली. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९. | शिवप्रतिष्ठान | श्री हणमंत पवार | छ. शिवाजी पुतळा, मारुती चौक सांगली | छ. शिवाजी पुतळा, मारुती चौक सांगली | मोर्चा व पोस्टर दहन - : २० ते २५ कार्यकर्त्यांनी देशात सर्व धर्मिय बिगर तणावाचे व बिगर तक्रारीचे रहात असताना सिनेअभिनेता अमीर खान याने देशात असंहिष्णूतेचे वातावरण आहे असे बेजबाबदारपणाचे वक्तव्य केलेचे निषेधार्थ सिनेअभिनेता अमीर खान याचे पोस्टर्सचे दहन करण्यात आले. सदर वेळी आंदोलनकर्ते यांनी यापुढे सिने अभिनेता अमीर खान याचा एकही चित्रपट सांगली जिल्हयामध्ये प्रदर्शित होवू देणार नाही असा इशारा दिला आहे. |
| २०. | संभाजी ब्रिगेड | प्रा. श्री श्रीमंत कोकाटे | -- | ५.१२.२०१५ रोजी १८.४५ वा. ते २०.३० वा | व्याख्यान :- सांगली ग्रामिण पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ५.१२.२०१५ रोजी १८.४५ वा. ते २०.३० वा. या वेळेत संभाजी ब्रिगेडचे वतीने प्रा. श्री श्रीमंत कोकाटे यांचे शिवचरित्रातून काय घ्यावे या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. प्रा. श्रीमंत कोकाटे यांनी शिवाजी महाराजा यांची शिकवण, महीला विषयी आदर, शेतक-या विषयी निती या बाबत मार्गदर्शन केले. सदर व्याख्यानाचे कार्यक्रमास २५० ते ३०० जनसमुदाय उपस्थीत होता. |
| २१. | श्री. विजय भिडे संघटक सांगली | श्री. विजय भिडे संघटक सांगली | राजवाडा, रिसाला रोड फौजदार गल्ली झुलेलाल चौक , आंबेडकर चौक मारुती रोड, टिळक चौक गणपती मंदीर, पटेल चौक, ते राजवाडा सांगली | २७.१२.२०१५ रोजी १९.१५ ते २०.३० | पथसंचलन : - श्री. विजय भिडे संघटक सांगली शहर यांचे नेतृत्वाखाली राजवाडा, रिसाला रोड फौजदार गल्ली झुलेलाल चौक , आंबेडकर चौक मारुती रोड, टिळक चौक गणपती मंदीर, पटेल चौक, ते राजवाडा सांगली असे सांगली नगराचे घोषाचे सराव पथसंचलन पार पडले. सदर पथसंचलनामध्ये ८४ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते सहभागी झालेले होते. |

# मुस्लीम हालचाल

| अनं | पक्ष/ संघटना | नेतृत्व | ठिकाण | दिनांक व वेळ | घटनेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुस्लीम कार्यकर्ता | श्री मुस्तफा बुजरुक - मुस्लीम कार्यकर्ता मिरज | श्रीकांत चौक मिरज | दि.१८.०१.१५ ११.०० वा. ते १५.४५ वा | धरणे आंदोलन -- मुस्लीम समाजाला आरक्षण मिळावे या मागणी करीता धरणे आंदोलन केले.<br>सदर वेळी श्री इद्रीस नायकवडी-माजी महापौर,जैलाब शेख,मुबारक काझी वगैरे उपस्थीत होते. नंतर शिष्टमंडळाने श्री हेमंत निकम-उपविभागीय दंडाधिकारी मिरज विभाग मिरज यांना निवेदन दिले आहे. जनसमुदाय- २५ ते ३० कार्यकर्ते |
| २. | जमीयत उलेमा-ए-हिंद | श्री मौलाना मुबारक काझी अध्यक्ष | मिरासाो दर्गा ते प्रांत कार्यालय मिरज | २३.१.२०१५ रोजी १५.३० वा. ते १६.४५ वा | मोर्चा - ४०० ते ५०० कार्यकर्त्यानी मुस्लीम समाजास आरक्षण मिळावे या व इतर मागण्या करीता मुक मोर्चा काढला. मोर्चा प्रांत कार्यालय मिरज येथे आल्या नंतर श्री हेमंत निकम – प्रांताधिकारी मिरज यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले. |
| ३. | जमीयत उलेमा-ए-हिंद | श्री मुफती सादीक पटेल -अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय | दिनांक २३.१.२०१५ रोजी १६.१५ वा. | निवेदन :- जमीयत उलेमा-ए-हिंद सांगली जिल्हा मुस्लीम समाजास आरक्षण मिळावे या व इतर मागण्या करीता शिष्टमंडळाने मागण्याचे निवेदन मा श्री.दिपेंद्रसिंह कुशवाह-जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. जनसुदाय - ७ कार्यकर्ते |
| ४. | मुस्लीम आरक्षण कृती समितीच्या वतीने | श्री फिरोज पठाण- अध्यक्ष मुस्लीम आरक्षण कृती समिती सांगली | स्टेशन चौक सांगली | ०९.०३.२०१५ रोजी ११.१५ वा. ते १७.०५ वा. या वेळेत | **धरणे आंदोलन-** मुस्लीम समाजास दिलेले आरक्षण शासनाने रद्द केले आहे तरी मुस्लीम समाजास शिक्षणा मध्ये व नोकरी मध्ये आरक्षण दयावे या व इतर मागण्याकरीता धरणे आंदोलन केले.<br>दरम्यान मुदतीत शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे जावून श्री शेखर इनामदार- जिल्हाधिकारी सांगली यांची भेट घेवून त्यांना मागण्याचे निवेदन दिले आहे. जनसमुदाय-५०-५५. |
| ५. | मुस्लीम समाज आरक्षण हक्क बचाव कृती समिती | मकसुद रहीमतुल्ला पटवेकर व श्री मुनीर रहीमतुल्ला पटवेकर- | आझाद चौक, मोमीन मोहल्ला ते तहसील कार्यालय इस्लांमपूर | २०.३.२०१५ रोजी १४.५५ वा. ते १६.०५ वा या वेळेत | मोर्चा - डिसेंबर अखेर मुस्लीम समाजास आरक्षण न मिळाा निषेधार्थ मोर्चा काढला. मोर्चा तहसील कार्यालय इस्लांमपूर येथे आल्यानंतर तहसीलदार श्रीमती रुपाली साळंखे यांना मागण्याचे निवेदन दिले आहे. सदर वेळी आंदोलनकर्ते यांनी डिसेंबर अखेर मुस्लीम समाजास आरक्षण न मिळाल्यास एक लाख मुस्लीम लोकांसह विधानसभेस घेराव घालण्यात येईल व गावांगावामध्ये मेळावे घेवून जनजागृती करु असा इशारा दिला आहे. |
| ६. | वाळवा तालुका मुस्लीम समाज आरक्षण हक्क बचाव कृती समिती | श्री मकसुद रहीमतुल्ला पटवेकर व श्री मुनीर रहीमतुल्ला पटवेकर- माजी नगराध्यक्ष इस्लांमपूर नगरपालिका | आझाद चौक, मोमीन मोहल्ला ते तहसील कार्यालय इस्लांमपूर | दिनांक २०.३.२०१५ रोजी १४.५५ वा. ते १६.०५ वा | मोर्चा- मुस्लीम समाजाच्या विविध मागण्यासाठी मोर्चा काढला. मोर्चा तहसील कार्यालय इस्लांमपूर येथे आल्यानंतर तहसीलदार श्रीमती रुपाली साळंखे यांना मागण्याचे निवेदन दिले आहे. सदर वेळी आंदोलनकर्ते यांनी डिसेंबर अखेर मुस्लीम समाजास आरक्षण न मिळाल्यास एक लाख मुस्लीम लोकांसह विधानसभेस घेराव घालण्यात येईल व गावांगावामध्ये मेळावे घेवून जनजागृती करु असा इशारा दिला आहे. |
| ७. | नगरसेवक | श्री अय्याज नायकवडी –मिरज | स्टेशन चौक सांगली ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | दिनांक २३.३.२०१५ रोजीचे ११.३५ वा ते १२.०५ वा. | मोर्चा- दिनांक १५.३.२०१५ रोजी महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये हजरत महंमद पैगंबर यांचे बद्दल आक्षेपार्ह मजकूर छापला याचे निषेधार्थ मोर्चा काढण्यात आला. मोर्चा मध्ये मुस्लीम समाजाचे प्रमुख श्री असिफ बावा, श्री ए ए मुत्तवली, ॲड. रियाज जमादार यांचे सह ५० ते ६० मुस्लीम समाजाचे लोक हजर होते.मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर शिष्ठ मंडळाने मागण्याचे निवेदन श्री शेखर गायकवाड जिल्हाधिकारी सांगली यांना मागण्याचे निवेदन दिले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८. | --- | | मार्केट यार्ड, जत चे पाठीमागील डफळे सरकार यांचे मालकीचे मोकळया जागेत | दिनांक २७.३.२०१५ व २८.३.२०१५ रोजी | **इस्तेमा :-** मुस्लीम धर्मियाचा इस्तेमा पार पडला. दिनांक २७.३.२०१५ रोजी ०६.०० वाजता इस्तेमास सुरुवात झाली. इस्तेमा कार्यक्रमामध्ये रोज ५ वेळा नमाज पठण करण्यात आले. मौलाना आसिफ शेख यांनी नमाज पठण पढविले. तसेच इस्तेमा कार्यक्रमा दरम्यान मौलाना शमीम शेख रा. पुणे, मौलाना अफसरभाई रा. पुणे,मौलाना वाजीदभाई नांदेडवाले, मौलाना शोयब मुंब्रावाले, यांची प्रवचने झाली.<br>दिनांक २८.३.२०१५ रोजी ०९.३० वा. ते १०.०० वा. या वेळेत मौलाना मुबीन यांनी दूवा मागणेचा कार्यक्रम केला.<br>इस्तेमा कार्यक्रमास दिनांक २७.३.२०१५ रोजी ८ ते १० हजार व दिनांक २८.३.२०१५ रोजी ३५ ते ४० हजार जनसमुदाय उपस्थीत होता. |
| ९. | महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग | श्री मोहमंद हुसेन खान (आमीरसाब) अध्यक्ष | मदरसा हजरअली बिन तालीब व डॉ झाकीर हुसेन रेसिडेन्सीयल हासस्कुल पलूस | दिनांक १२.४.२०१५ रोजी ०९.०० वा. ते १५.०० वा. | स्नेहसम्मेलन व पदवीदान कार्यक्रम:- पलूस येथील मदरसा हजरअली बिन तालीब व डॉ झाकीर हुसेन रेसिडेन्सीयल हासस्कुल पलूस येथे स्नेहसम्मेलन व पदवीदान कार्यक्रम पार पडला. सदर वेळी श्री मोहमंद हुसेन खान (आमीरसाब) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग यांचे हस्ते व इब्राहीम बाबा तांबोळी, हजरत मौलाना अमानुल्ला साहब, परवेज पिरजादे, सर्जेराव खरात इत्यादी लोकांचे उपस्थीतीत शाळेतील १४ मुलांना हुरान हाफीज ही पदवी दान करुन रोख रक्कम, कपडे, शालेय पुस्तके देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे वेळी श्री मोहमंद हुसेन खान (आमीरसाब) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग यांनी खेडयातील मुलांना आपल्या इस्लाम धर्माची तालिम देण्यासाठी असे समारंभ वरचेवर झाले पाहीजेत व त्यांना इस्लामिक धर्माची शिकवण दिली पाहीजे, तसेच मदरसा मध्ये मुस्लीम मुलांसाठी बीएमएस, एमबीबीएस, इंजिनियरींगची शिक्षण सुविधा सुरु केली पाहीजे या साठी मुस्लीम जमातीच्या लोकांनी मदत करावी असे आवाहन केले व सदर मदरसा मधील गुणवंत विदयार्थ्यासाठी अकलकुवा येथे मोठा समारंभ घेणार आहे असे जाहीर केले.<br>सदर स्नेहसम्मेलन व पदवीदान कार्यक्रमाकरीता करीता ५०० स्त्रिया व १५०० ते १७०० पुरुष हजर होते. स्नेहसम्मेलंन व पदवीदान कार्यक्रम शांततेत पार पडला. |
| १०. | एम.आय.एम | जमिर सनदी | रामलिंग कॉलनी, जहनियाबाबा दर्गा जवळ, मिरज | ११.१०.२०१५ रोजी १९.२० ते १९.५५ | मेळावा :- मिरज तालुक्यातील एम.आय.एम कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. सदर मेळाव्यात समिर सनदी, मंदूर इनामदार, सागर दरबारे, सईद सौदागर,अल्लाऊदीन हाफिजी, इम्रान ढालाईत व शाकिर तांबोळी- जिल्हा अध्यक्ष, एम.आय.एम. यांनी पक्ष वाढीसाठी मार्गदर्शन केले. मेळाव्यास ६० ते ७० कार्यकर्ते हजर होते.मेळावा शांततेत पार पडला. |
| ११. | एमआयएम | श्री शाकीर तांबोळी-सांगली जिल्हा अध्यक्ष एम आय एम | शासकीय विश्रामगृह सांगली | २७.१०.२०१५ रोजी १५.०० वा. ते १६.३० वा. | बैठक :- डॉ. महेशकुमार कांबळे रा. मिरज, श्री निहाल महात रा. सांगली, श्री आशरफ बाकंर या प्रमुखासह ६० ते ७० कार्यकर्ते उपस्थीत होते.सदर बैठकीमध्ये दिनांक १४.११.२०१५ रोजी सांगली जिल्हयातील इस्लांमपूर, मिरज किंवा सांगली या पैकी एका ठिकाणी श्री इम्तीयाज जलील - आमदार एमआयएम, औरंगाबाद यांच्या उपस्थीत बैठक घेणार असल्याचे जाहीर केले आहे. |
| १२. | इंडीयन मुस्लीम संघटना | श्री आयुब कुडचीकर | स्टेशन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली | २७.१०.२०१५ रोजी १२.५० वा. ते १३.०५ वा. | मोर्चा :- ५० ते ६० कार्यकर्त्यांनी मुस्लीमांना भारतीय संविधान कलम २५ नुसार असलेल्या धार्मिक अधिकारावर निर्बंध येत आहेत ते रद्द करावे या व इतर मागण्या करीता स्टेशन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय सांगली असा मोर्चा काढला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे आल्यानंतर मागण्याचे निवेदन श्री त्रिगुण कुलकर्णी – निवासी जिल्हाधिकारी सांगली यांना दिले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३. | समस्त मुस्लीम समाज जमात (समाज) व पिपल्स रिपब्लीकन पार्टी | श्री जैलाब शेख- पिपल्स रिपब्लीकन पार्टी | मिरज शहर पोलीस ठाणे व प्रांत कार्यालय मिरज | ८.१२.२०१५ ११.४५ वा. ते ११.५५ व १२.१५ वा | निवेदन :- श्री आझमखान उत्तर प्रदेश मंत्री यांनी आरएसएस संघटनेवर टिका केली होती त्यास उत्तर देताना श्री कमलेश तिवारी - कार्यवाह हिंदू महासभा यांनी महंमद पैगंबरा विषयी खालच्या पातळीवर जावून टिका करुन मुस्लीम समाजाच्या भावना दुखावल्या याचे निषेधार्थ समस्त मुस्लीम समाज जमात (समाज) व पिपल्स रिपब्लीकन पार्टी चे श्री जैलाब शेख- पिपल्स रिपब्लीकन पार्टी यांचे नेतृत्वाखाली ८ ते १० कार्यकर्त्यांनी श्री कमलेश तिवारी कार्यवाह हिंदू महासभा यांचे वर कारवाई करावी या व इतर मागण्याचे निवेदन दिनांक ८.१२.२०१५ रोजी ११.४५ वा. ते ११.५५ वा या वेळेत पोलीस निरीक्षक मिरज शहर पोलीस ठाणे यांना दिले त्यानंतर १२.१५ वा. प्रांत कार्यालय मिरज येथे जावून सदर मागण्याचे निवेदन श्री माळवदे – प्रांत अधिकारी मिरज यांना दिले. |
| १४. | मुस्लीम समाज | तौफीक मिरासाो मुजावर, अस्लम दिलावर मुजावर, शौकत सय्यद मुल्ला, धोंडीराम चॉंद गडकरी, शमशुद्दीन बाबासाो पटेल | नुराणी मशिद चिकुर्डे समोर | ७.१२.२०१५ रोजी १०.०० | उपोषण :- चिकुर्डे ता. वाळवा येथील सिसनं.११०० मध्ये मुस्लीम समाजाचे प्राथनास्थळ व मशिद आहे. सदर मशिदीसमोरच्या खुल्या जागेत श्री बच्चुलाल महंमद गवंडी (मुस्लीम) यांने लाकडी खोके घालून अतिक्रमण केले आहे. श्री गवंडी यांने सदर जागेमध्ये चिकन सेंटर चालू करुन इतरही बेकायदेशीर धंदे चालू ठेवले आहेत त्यामुळे मुस्लीम समाजास प्राथना करण्यास जागा कमी पडत आहे. मुस्लीम समाजास वर्ज्य असलेले धंदे गवंडी व त्यांची मुले करीत आहेत. सदर अतिक्रमण काढणे बाबत वेळोवेळी सांगून ही गवंडी हे त्यास जुमानत नाहीत. सदर अतिक्रमण काढणेबाबत सरपंच श्री कृष्णात पवार यांचे कडे अर्ज दिला होता त्या अर्जावरती कोणतीही कारवाई झाली नाही त्याबाबत गट विकास अधिकारी इस्लांमपूर यांचे कडे ही दिनांक २१.११.२०१५ रोजी विनंती अर्ज दिला होता परंतू त्यांचे कडून संबधीतांना आदेश झालेला नाहीत. याचे निषेधार्थ दिनांक ७.१२.२०१५ रोजी १०.०० वाजले पासून चिकुर्डे येथील मुस्लीम समाजाचे १) तौफीक मिरासाो मुजावर, २) अस्लम दिलावर मुजावर, ३) शौकत सय्यद मुल्ला, ४)धोंडीराम चॉंद गडकरी, ५)शमशुद्दीन बाबासाो पटेल सर्व हे नुराणी मशिद चिकुर्डे समोर आमरण उपोषणाला बसले होते. दिनांक ८.१२.२०१५ रोजी श्री अभिजीत पाटील- माजी जिल्हा परिषद सदस्य यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेवून ग्रामपंचायती मार्फत सदर अतिक्रमण काढून घेण्याचे तोंडी आश्वासन दिले नंतर २१.३० वाजता उपोषणकर्ते यांनी उपोषण मागे घेतले आहे. |
| १५. | नौजवानाने - उमाते रसुल- ग्रुप मिरज | मौलाना अहमद पाशा | मिरासाो दर्गा पटांगण मिरज | १३.१२.२०१५ रोजी १८.०० वा. ते २२.०० | धार्मिक प्रवचन :- १३.१२.२०१५ रोजी १८.०० वा. ते २२.०० वा. या वेळेत मिरासाो दर्गा पटांगण मिरज येथे नौजवानाने - उमाते रसुल- ग्रुप मिरजचे वतीने पैगंबर जयंती निमित्त मौलाना अहमद पाशा यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमास ३०० ते ४०० जनसमुदाय उपस्थीत होता. कार्यक्रम शांततेत पार पडला आहे. |
| १६. | जमिअते उलमा सांगली | श्री हाफीज उमर मुजावर रा. सांगली | संगतराज मशिद,हिंदू मुस्लीम चौक सांगली | ८.१२.२०१५ रोजी १५.०० वा. ते १७.०० वा | धार्मिक प्रवचन :- जमिअते उलमा सांगली शहर यांचे वतीने आयोजक श्री हाफीज उमर मुजावर रा. सांगली यांचे मार्गदर्शनाखाली संगतराज मशिद,हिंदू मुस्लीम चौक सांगली या ठिकाणी हजरत अकसद मौलाना पीएम मुज्म्मिल रा. बेंगलोर यांचे बयाणाचा कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमास सांगली शहरातील इमाम लोक हजर होते. त्यांना मुस्लीम समाजाची शिकवण कशी आहे व सध्या देशात मुस्लीम समाजाबाबत विनाकारण अफवा फसरवून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तरी अशी कोणतेही समाजाबाबत तेढ निर्माण होणार नाही या बाबत खबरदारी घ्यावी. तसेच समाजातील लोकांना पाच वेळा नमाज पठणे करणेबाबत प्रबोधन करावे वगैरे विषयावर बयाण देण्यात आली आहे. सदर वेळी ७० ते ७५ लोक उपस्थीत होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७. | मुस्लीम समाज | हजरत अक्सद मौलाना पीएम मुज्मिल रा. बेंगलोर | सर्वधर्म चौक, गणेश नगर सांगली | ८.१२.२०१५ रोजी २०.५५ वा. ते २१.५५ वा | धार्मिक प्रवचन :- मुस्लीम समाजातील स्त्री पुरुष यांचे करीता हजरत अक्सद मौलाना पीएम मुज्मिल रा. बेंगलोर यांचे धार्मिक प्रवचनाचा कार्यक्रम पार पडला. सदर वेळी हजरत अक्सद मौलाना पीएम मुज्मिल यांनी मुस्लीम समाज हा अतिशय शुध्द प्रामाणिक असून त्याचा गैर फायदा इतर समाज घेत आहेत. अफवावर विश्वास ठेवू नका व समाजातील लोकांनी एकत्र एकजुटीने रहाण्याची गरज आहे. देशात मुस्लीम समाजावर अन्याय केला जात आहे. पुरुषांनी व्यसने सोडावीत. तसेच कुराणाबाबत महीती सांगितली व दररोज देवाला स्मरुन पाच वेळा जमाज पठण करण्याचे आवाहन केले आहे. सदर कार्यक्रमास १५० ते २०० स्त्री पुरुष उपस्थीत होते. |
| १८. | जमिअत उलमा सांगली | हाफीज उमर मुजावर | वडर मारुती मंदीर जवळ खणभाग सांगली | ९.१२.२०१५ रोजी १९.३० वा. ते २१.०० वा | धार्मिक प्रवचन :- वडर मारुती मंदीर जवळ खणभाग सांगली येथे जमिअत उलमा सांगली यांचे वतीने हाफीज उमर मुजावर यांचे अध्यक्षतेखाली हजरत अक्सद मौलाना पीएम मुज्मिल रा. बेंगलोर यांचे धार्मिक प्रवचनाचा कार्यक्रम पार पडला. हजरत अक्सद मौलाना पीएम मुज्मिल यांनी आपले प्रवचनामध्ये मुस्लीम समाजातील तरुणांनी व पुरुषांनी दारु पिणे हे अतिशय पाप आहे तरी यापुढे कोणी दारु पिवून संसाराची बरबादी करु नये. तसेच देशातील केंद्र शासनाने व राज्य शासनाने दारुवर पुर्णपणे निर्बंध घालावेत. नमाज कसे पठण करावे, कुराण पठण याबाबत माहीती सांगितली. सदर कार्यक्रमास १२५ ते १५० लोक हजर होते. |